म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय कथा
दा. क्र. 96338
IRBK-0117338
IRBK-0117338

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, असे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा मागणी भरावी लागेल.

2 1 AUG 1978
3 0 AUG 1978
1 AUG 1978
SEP 1978
SEP 1978
SEP 1978
2 6 SEP 1978
7 OCT 1978
NOV 1978
1 SEP 1979
1 1 NOV 1978
3 0 NOV 1978
9 DEC 1978
3 0 JAN 1979
6 FEB 1979
1 9 MAR 1979
7 MAY 1979
2 7 JUN 1979


१९ (क्रि.मा.प.)

# हसुभाषिते

सुभाषचंद्र विष्णूपंत देसाई

IRBK-0117338
IRBK-0117338

प्रकाशक :
डॉ. कु. इंदू पटवर्धन
संचालिका आनंदग्राम सोसायटी,
६ अ बोट क्लब रोड,
पुणे ४११ ००१
दूरध्वनी : २४०२८

मुद्रक :
ले. कर्नल वि. वा. जोशी
सकाळ प्रिंटिंग प्रेस,
५९५ बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२

प्रथमावृत्ती :
१७ नोव्हेंबर १९७७
लाला लजपतराय पुण्यतिथी
मराठी साहित्य-संमेलन,
बावन्नावे अधिवेशन, पुणे

पुस्तकाचे सर्व हक्क आनंदग्राम सोसायटी, पुणे यांचे स्वाधीन

**मूल्य दहा रुपये** + +

मराठी साहित्य-संमेलन बावन्नावे अधिवेशन पुणे येथे ता. १८।११।७७ रोजी झाले. त्यावेळी श्रद्धेय अध्यक्षमहोदय श्री. पु. भा. भावे यांच्या करकमले हे पुस्तक प्रसिद्ध झाले.

ती. पूज्यचरण भाऊंस

व

चि. हेमंत

चि. सीमा

चि. सुबोध

आणि

त्यांच्या पुण्यशील मातोश्रींस–

ज्यांनी जर घर डोक्यावर घेतले नसते तर पुस्तक लवकर पूर्ण झाले असते.

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | पहिल्या नंबरची गोष्ट | ... | १ |
| २ | फोटो | ... | २४ |
| ३ | दिव्या दिव्या दीपोत्कार | ... | ४२ |
| ४ | ट्रॅफिक स्टॉप | ... | ४९ |
| ५ | माझ्या 'प्रेमा' प्रकरणाचा सप्ताह | ... | ५९ |
| ६ | यशस्वी शाहीर | ... | ७६ |
| ७ | वहिनींचा वांगडा | ... | ८३ |
| ८ | आपले मरण पाहिले म्या डोळा | ... | ९३ |
| ९ | कल्याणच्या सुभेदाराची सून | ... | १०८ |
| १० | शेवटी डॉक्टर भेटले एकदाचे | ... | १२१ |

म. श्री. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र 95332 नों दि 70.1.9.88
वि. कथा

# पहिल्या नंबरची गोष्ट

अतुल भट....

अतुल भट....नंबर पहिला.

टाळयांच्या कडकडाटात अतुल भट आला आणि बक्षीस घेऊन जाऊ लागला.

तोच परत.

अतुल भट....अतुल भट.

पहिला नंबर.

परत टाळया. यावेळी सर्व गुरुजीही टाळया वाजवू लागले.

परत....अतुल भट

अतुल भट परत आला आणि बक्षीस घेऊन चालू लागला.

पुन्हा परत

अतुल भट

पुन्हा परत

अतुल भट.

आता यावेळी मात्र बक्षीस देणारे पाहुणे अस्वस्थ झाले. थोडे आश्चर्य व थोडा राग असे मिश्रण असणारी त्यांची दृष्टी सर्वत्र फिरली आणि माझेवर खिळली. मी तावडतोब अजिजीने पुढे झालो.

" मी सांगितले होते ना...."

" काय..."

" जिथे माझा अगर कुणाचाही—माझ्या नातेवाईकांचा संबंध असेल व तिथे काही निर्णयाचा प्रसंग असेल तर मला यायचे नाही म्हणून."

" हो हो– पण, इथे निर्णय अगोदरच झाला आहे. आपण फक्त वक्षीसच द्यायचे."

" पण इतकी बक्षिसं माझ्या मुलाला ? आणि सगळी पहिली ? "

" अहो खरोखरच हुशार आहे तो. "

" हुशार असल्याशिवाय का बक्षिसे मिळतील त्याला ? साहेब, आपला चिरंजीव आहे ना तो. " मी जरा लाचारीने व अजिजीने बोललो.

संस्थेचा कार्यवाह असल्यामुळे मला लाचारी व अजिजी करणे भागच होते. कारण काहीही करून वेळ निभावायला हवी ना. केव्हा, कुठे अजिजी करायची व ती कशी, कुठे भरून काढायची हे आता मी माझ्या सार्वजनिक कार्यात पुरते शिकलो होतो. न्यायाधीशमहोदयांना मी पुन्हा सांगितले,

" आपणाला दिलेले वचन मी मोडलेले नाही. कोणत्याही प्रसंगात आपल्या स्थानमाहात्म्याला अगर व्यक्तिगत प्रतिष्ठेला धक्का लागेल अशा पेचप्रसंगात आपल्याला मी आणणार नाही. "

अतुल भटची पारितोषिके सोडून बाकीच्यांची पारितोषिके द्यावयास न्यायाधीशमहोदय तयार झाले. मी एकदा ' कर्म ' नांवाचा सिनेमा पासावर पाहिला होता. त्या सिनेमात न्यायाधीश आपल्या मुलाला वक्षीस देतो पण तो मुलगा त्याचा असतो हे त्याला माहीत नसतं. त्या प्रसंगाची आठवण झाली· पण इथे तर न्यायाधीशाला माहीत आहे की, हा वक्षीस मिळविणारा मुलगा आपला आहे ! पण त्याकरता तर न्यायाधीशमहोदय जरा अस्वस्थ झाले होते. व्यक्तिगत संबंध जिथे असतील तिथे दूरान्वयाने का होईना आपण गुंतायचे नाही. विशेषत: न्यायाधीश म्हणून हा त्यांचा दंडक ! आणि आज आपल्या मुलाला बक्षिसावर बक्षिसे देण्याचा प्रसंग आला ! आणि म्हणून न्यायाधीश-महोदयांनी माझ्यावर दृष्टी टाकली. मी त्यांना बोलावून आणले होते ना !

मी त्या संस्थेचा कार्यवाह ! आमच्या शाळेचा आज वार्षिकोत्सव. पाहुण्यां-शिवाय व भोजनाशिवाय शाळेच्या उत्सवाला मजा नसायचीच. बाहेरचे पाहुणे अगोदरच ' बुक ' झालेले ! गावातील सर्व पुढारी संस्थेच्या नियामक मंडळात खुर्ची अडवून बसलेले ! उत्सवाच्या दिवशी तरी त्यांच्या मुखारविंदातील वाणी ऐकावयास लागू नये ही इच्छा. बरे कुणी महत्त्वाचा पुढारी बोलवावा तर राजकीय वातावरण अस्थिरच. कारण आज या पार्टीच्या पुढाऱ्याला बोलवावे

म्हटले तर नेमकी विरुद्धच पार्टी निवडून यायची आणि आमच्या शाळेवर वरवंटा फिरायचा ! आणि आतापर्यंत आमच्या शाळेची परंपरा ही की ज्याला आम्ही बोलावू त्या पुढाऱ्यावर काहीतरी बालंट यायचे व ते पुढारी अस्तंगत किंवा दिवंगत व्हायचे. नंतर ज्यावेळी आम्ही सरकारदरबारी काही अनुदान अगर अनुमती मागायला जात असू ( एकेकाळी कुणी अनसूयाबाई शिक्षण खात्यात अधिकारपद अलंकृत करीत होत्या. त्यावेळी त्या 'अनू' ची मती व 'दान' मिळविणे म्हणजे अक्षरशः अनुनासिक स्वरात रडणे हेच ) त्यावेळी आमच्या संस्थेला व कार्याला त्या पुढाऱ्याच्या गुणावरून गुण मिळत आणि मी त्या संस्थेचा कार्यवाह असल्यामुळे त्या सर्व गुणांचा गुणाकार माझ्या ठायी त्या साऱ्या शिक्षणखात्यातील अगर मंत्रालयातील लोकांना दिसायचा. संस्थेनेसुद्धा वार्षिक पाहुणा शोधण्याचे कायमचे कंत्राट माझ्याकडे दिलेले ! आजपर्यंत तरी मी चांगलाच माल पुरवीत आलो होतो. 'कंडम' किंवा 'टाकाऊ' माल कधीच पुरविला नव्हता !

पण या वर्षी जरा मंदी आली होती. पाहुणा – चांगला माल – मिळणे जरा अवघड जात होते. शेजारच्या संस्थेने – आमच्यातूनच फुटलेल्या लोकांनी काढलेल्या – चांगला माल अगोदरच घेऊन टाकला होता. बरे चालढकल तरी किती म्हणून करायची ! गव्हरनर वारले त्यावेळी चट्दिशी सांगून मोकळा झालो "गव्हरनर आले असते, माझे त्यांचे बरे होते. एक दिवस या म्हणून पत्र टाकले असते तर ना म्हटले नसते त्यांनी . . ." नंतर कधीतरी राष्ट्रपती वारले. त्यावेळी अगदी व्यवस्थित ठेवून दिली." फक्रुद्दीन पूर्वीचे विसरले नव्हते. मुलाच्या मुंजीकार्यक्रमाला मुद्दाम बोलाविले होते." पण अशा चालढकली तरी किती करणार ! बरे आता इमर्जन्सी उठली होती. पोरांनी मला घेराव करण्याचे ठरविले. "पाहुणा द्या नाहीतर खुर्ची सोडा." इतक्या घोषणा रंगवे-पर्यंत प्रकरण ठेपले होते स्नेहसंमेलन व नंतरची मेजवानी याकरतां फारच उधाण आले होते. पाहुणा शोधणे आवश्यकच होते. कोण करणार सहाय्य ?

आता साहाय्यार्थ मिळणारा नित्याचा अधिकारी म्हणजे फौजदार. May I help you? मी काही मदत करू ? अशी पाटी होतीच. पण फौजदारसाहेबांना शाळेचा पहिल्यापासूनच कंटाळा होता. दोन-तीन शाळांतून त्यांना त्यांच्या विद्यार्थिदशेत प्रवेश नाकारण्यात आला होता. कधी काही इंग्रजीतून आवेदन

करावयाचे असेल तर ते आमच्या संस्थेच्या इंग्रजीच्या सरांकडे येत. या फौजदारांना उत्सवाकरता बोलाविणे म्हणजे कसंसंच. फौजदारसाहेबांच्या शेजारी हपीस म्हणजे मामलेदार – तहशीलदारसाहेब यांचे. मामलेदारसाहेबांना गाठावं म्हणून त्यांच्या घरीच गेलो. वास्तविक मामलेदारसाहेब ऑफिसपेक्षा घरीच जास्त असायचे आणि घरापेक्षा जास्त वेळ बाहेर फिरतीवर आणि अलीकडे आदिवासी कल्याण योजनांसाठी मामलेदारसाहेबांना जंगलात जास्त वेळ दौरे काढावे लागतात. म्हणजे ' कान्तार ' कान्तेपेक्षा जवळ – मामलेदार-साहेबांना ! पण मामलेदारसाहेबांना भेटायचं म्हणजे सेव्हिंग सर्टिफिकेट घेतल्याशिवाय त्यांच्याशी बोलताच येत नसे. एकदा खुद्द मामलेदारसाहेबांचे श्वशुर आले होते. त्यांचेकडे सेव्हिंगज् सर्टिफिकेटकरता पुरेसे पैसे नव्हते. म्हणून दुसऱ्या दिवशी त्यांनी सर्टिफिकेट्स घेतली. मग दुसऱ्या दिवसानंतरच ते बोलले. तोपर्यंत ते आपल्या मुलीशी बोलत होते. मामलेदारसाहेब तोपर्यंत आपल्याच ' कार्यालयीन ' कामात तल्लीन ! हा प्रकार आम्हाला मामलेदार-साहेबांचा चपराशी यांनी स्वत:च सांगितला. चपराशीसाहेबांना तसे सांगण्याचे आदेशही असावेत ! मी संस्थेच्या खर्चाने सर्टिफिकेटस् घेतली आणि मामलेदार-साहेबांना भेटावयाला गेलो. मामलेदारसाहेबांची मीटिंग – ( व ईटिंग ) चाललेली होती. खाजगी काम आहे असे कळताच मामलेदारसाहेबांनी सुनाव-लेच. " व्यक्तिगत भेटी कार्यालयातच होतील. " अलीकडे व्यक्तीचे काम ऐकून कामे करायची नाहीत असा आदेश निघाला होता. पण घरी कार्यालयाचे काम चाललेले असताना कार्यालयात घरचे काम असा दंडक असेल म्हणून मी गप्प बसलो. चपराशीसाहेबांनीही धीर धरा म्हणून नेत्रपल्लवी केलेली होतीच. मी धरणेच धरले ! आणि मग मामलेदार वळेच मीटिंग संपवून बाहेर आले. मामलेदारसाहेबांच्या मीटिंगचे वैशिष्ट्य की मीटिंग लवकर संपायची पण नंतर प्रत्येकाशी व्यक्तिगत मीटिंग होत असे. ती जरा लांबत असे. पण या साऱ्यातून मामलेदारसाहेबांनी एकदाचा वेळ काढला आणि आम्हाला दर्शन दिले. माझ्या हातातील सेव्हिंग्ज सर्टिफिकेट पाहिल्यावर मग ते कुठे बोलू लागले.

मग मी नित्याच्या अजिजीने व लाचारीने बोलणे सुरू केले. आमच्या शाळेच्या वार्षिकोत्सवाबाबत बोललो आणि नंतर विनंती केली. ( अगदी शिनिमातल्या नटासारखी. )

" आपण आमची शाळा पवित्र करावी ही प्रार्थना. "

मामलेदारसाहेबांच्या चेहऱ्यावर अजूनही काहीच छटा उगवलेली दिसली नाही. बहुधा मीटिंगमधील विचारच घोळ घालीत असावेत. म्हणून मी पुन्हा लाघवी अजिजीने बोललो. अगदी भिकाऱ्याजवळून एक भाविक मनुष्य जातो. त्यावेळी त्या मनुष्याला दया आलेली असते; पण तरीपण तो पुढे जातो. भिकाऱ्याला वाटते, सावज निसटले आणि निसटताना आरोळी मारतो ना ' देवा. . देवा तुझे कल्याण होईल रे, कामात यश येईल. नको टाळू या गरिबाला . . .' आणि मग तो माणूस त्याचे कोणतेतरी काम अगदी टप्प्यावर आलेले असले तर – पावळतो तसेच अगदी मी केले. मी बोललो,

" एकच त्रास होईल आपणाला . . "

मामलेदारसाहेबांना खडा लागला एकदाचा.

" कोणता त्रास हो ? आम्हाला कामात कसला त्रास आला आहे ? लोकांची कामे नकोत करायला ?" मामलेदारसाहेब उत्तररामचरितातील प्रभु रामचंद्र म्हणत ना, ' आराधनाय लोकानाम् नास्ति मे व्यथा ' या थाटात.

" त्रास म्हणजे आपले छायाचित्र घेणार आणि ते चित्रवाणीवर प्रसिद्ध होणार."

" T. V. ? . . . ' T. V. ' वर नको रे आपण. आम्ही तेवढे काही मोठे नाही. " विनयाने आपला मोठेपणा दाखवीत मामलेदारसाहेब बोलले.

" बरे नको T. V. तर नको. मला तरी कुठे T. V. वरील छायाचित्राची हौस होती ? आणि त्या T. V. वाल्यांना कोण जाणार बोलवायला ? त्यांची मिजासी आणि त्यांचे ते हिंदी किंवा मराठी इंग्रजीच्या थाटात बोलणे. नकोच ते. " मला जरा आनंद झाला. T. V. किंवा V. T. मला सारखेच.

मामलेदारसाहेब ' कसचं, कसचं ' म्हणतील म्हणून मी T. V.चा शब्द फेकला होता.

पण मामलेदारसाहेब बारा गावचे पाणी प्याले होते. प्याले का ? दररोज फिरतीवर बारा गावे करीत व मुक्कामाला बाराव्या गावी त्यांना विशेष पाणी व कुक्कुटभोजन लागत असे. त्या मुक्कामातील बारावे गाव कोणते हे ओळखायचे म्हणजे गुढ्या, तोरणे, कमानी नव्हेत. तर त्या गावातील कोंबड्यांच्या पिसांचा ढीग ! त्या दिवशी त्या गावात कोंबडा आरवत नसेच.

अशा मामलेदारसाहेबांना आमच्या शाळेतील सुधारस किंवा मोतीचूर लाडू असले भोजन रुचकर लागणार नाहीच आणि मामलेदारसाहेबांना शाळेच्या किंवा कोणाच्याही खर्चात 'सेप्रेट' कुक्कुटभोजन आणि तेसुद्धा 'आकंठ' देणे मला जमणे शक्य नव्हते. हे मामलेदारसाहेबांनी ताडलेच असेल. त्यांनी जरा अधिकाराच्या स्वरात सांगितले,

"मी आलो असतो—पण मी दौरा लावलेला आहे." याचा अर्थ कोंवडयांच्या फाशीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत व मुक्कामाच्या गावाला कोंबडयांच्या रक्ताचे पाट वाहाणार आहेत.

"पण साहेब, आमच्या शाळेवर आपली नजर आहेच. आता, आपण आश्रयदाते असताना आम्हाला दुसरीकडे कसे धाडता ? मामलेदारसाहेबांनी विचार केला आणि सांगितले "भटसाहेबांकडे जा."

भटसाहेब एक न्यायाधीश. दिवाणी न्यायाधीश व न्यायदंडाधिकारी. त्यांची आता सुटीनंतर बदली व्हायची. त्यांच्याकडे आता जायला हरकत नव्हती. शिवाय मामलेदारसाहेबांनी सांगितले होते. मग काय !

मी दबत दबत श्री. भटसाहेबांकडे गेलो." भटसाहेबांची तशी माझी ओळख होतीच. मी एका गुर्जर कन्येशी विवाह केला होता— आहे म्हणावे. आणि भट हे गुर्जरभापिक. त्यामुळे थोडा नाजुक धागा होताच. भटसाहेबांनी आदरातिथ्य केलं आणि स्पष्ट सांगितलं—फोटो नाही. समारंभाचे अवडंबर नाही. भोजनात ते सामील होणार नाहीत. सामील झाले तर त्या ताटाचे ते पैसे देणार. दुसरे म्हणजे कोणत्याही वादग्रस्त अगर वादाचे वादळ उद्भवेल या प्रसंगावर ते भाषण करणार नाहीत. आणखी साऱ्यांत महत्त्वाचे म्हणजे त्यांचे आप्तेष्ट जिथे असतील त्या स्पर्धेचे ते पंच म्हणून होणार नाहीत अगर दूरान्वयानेसुद्धा त्यांचा संबंध असावयाचा नाही. या साऱ्या अटी मला नवीनच. त्या अटी मान्य करून त्यांना आज वार्षिक उत्सवाला बोलावले होते. मी जरा विशेष कपडे घातले होते आणि समारंभाला भारदस्त पाहुणे मिळाले म्हणून मी विशेष मिरवत होतो. नाहीपेक्षा मिरवण्यात माझा तसा हातखंडाच. आणि आता हे प्रकरण उद्भवलं.

'अतुल भट. . .' हा न्यायाधीशांचा मुलगा आणि त्याला पहिले बक्षीस न्यायाधीशसाहेब आपल्या करकमले देणार ! न्यायाधीशसाहेबांनी हे नाकारलं.

मला आग्रह धरता येईना सर्व समारंभ नाहीतर रद्द व्हायचा. अतुल भट बाजूला बसला आणि नंतर कार्यक्रम पार पडला. नंतरचा कार्यक्रम भोजनाचा होता. आतापर्यंत प्रभू रामचंद्र, येशू ख्रिस्त या पृथ्वीवर येऊन गेले व त्यांचे संदेश पुस्तक, गाण्याच्या रूपाने ग्रथित झाले आहे. त्यांचं कुणी ऐकत नाही. मग न्यायाधीश महोदयांचे कोण ऐकेल ? त्यांचा कार्यक्रम केव्हा एकदा संपतो आणि घशाखाली किती ढकलता येतं या विचारात मास्तर-मास्तरिणी गुंतलेल्या. बऱ्याच शिक्षिकेंनी दुसऱ्याच्या 'मजा' कशा करायच्या हे आखले होते. काही शिक्षकांनी उरलेला माल कसा घरी घेऊन जाता येईल याबाबत प्लॅन आखले होते. अतुल भटची बक्षिसे वाटण्यात आली नाहीत. बाकी सारी हाराहारी, भाषणे झाली.

कार्यक्रम संपला. मी श्री. भटांबरोबर घरी निघून गेलो. श्री. भटसाहेब तसे मनमिळाऊ. त्यांनी मला मुद्दाम बसवून घेतलं. चहा दिला. कार्यक्रमातल्या भोजन व चहामध्ये मला जरी रस असला तरी माझी अनुपस्थिती साऱ्याच जणांना वांछनीय होती. मास्तर–मास्तरणी खुशाल मजा करणार होते. मुलेही गंमत–गंमत करणार होती. मी भटसाहेबांच्या गोष्टीला बसलो. त्यांनी सांगायला सुरुवात केली,

आमच्या अतुलचा किस्साच वेगळा आहे. तो पहिला नंबर आहेच; पण मी ज्या गावात अधिकारी असतो त्या गावात त्याचा पहिला नंबर असणारच. पहिला नंबर नसला तरच आश्चर्य.

"कसं–कसं. . ." मी जरा कृतक आश्चर्याने म्हटले.

काही मुले पत्रिकेतच पहिला नंबर घेऊन जन्माला येतात. तसा आहे हा अतुल. कुठेही जा, पहिलाच.

श्री. भटसाहेब सांगू लागले,

"अहो, अशाच एका कुग्रामात मी न्यायदंडाधिकारी वर्ग पहिला व दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर म्हणजे 'दिन्याकस्त' म्हणून नोकरीला लागलो होतो. त्यावेळी हा अतुल नुकताच बिगरीत जाण्याच्या वयाचा ! अतुलचा बिगरी ते डिग्री हा प्रवास सारा पहिल्याच नंबरातून होणार असे दिसते. अतुलला शाळा अशी नव्हतीच. मला त्याच्याबरोबर घरी शिकवायला बसणे जमत नसे. गावात एका खोलीची एक-शिक्षकी शाळा होती. कुणीएक शेठ निपुत्रिक

मेला होता. त्याच्या घरात काही पुरलेले पैसे मिळाले. ते भूमिगत धन म्हणून सरकारच्या ताब्यात न देता गावकऱ्यांनी त्या धनाने एक खोली बांधली व तिथे शाळा सुरू केली. एक सार्वजनिक कार्यकर्ती शिक्षिका झाली. तिला कुणी नव्हते. तिचा नवरा परागंदा झाला होता. तिने काही मानधन घेऊन शाळेत शिकवायचे कबूल केले होते. त्या शाळेत अतुलला घातले. अतुल शाळेत नियमित जाई. नियमित जाई म्हणजे कोर्टाचा बेलिफ किंवा शिपाई या लाद्याला सायकलीवर ठेवी व जसे दळण आणायचे तसे हे पोते ठेवी व परत शाळा सुटल्यावर सायकलीवरून आणी. शाळिग्राम नदीत बुचकळून आणणे तसा अतुलला शाळेत बसवून आणणे.

आता शाळा तर एक खोलीची. गावातील सर्व पोरं आई-वडिलांनी घरातला गोंगाट कमी करण्याकरता धाडलेली. ती खोली अगदी गच्च भरत असे. त्यामुळे अतुल आपला शाळेबाहेरच बसत असे. "पहिल्यापासूनच हा 'बाहेर'च ! बाहेरख्याली झाला नाही म्हणजे मिळवलं !" भटसाहेब त्राग्याने बोलले.

हा जरी बाहेर खेळत असला तरी वर्गात काय चालले हे याच्या कानांवर जाई. वर्गाच्या तीन तुकड्या. पुस्तक एकच. पहिल्या तुकडीतील मुले आत बसणार. तोपर्यंत दुसऱ्या व तिसऱ्या तुकडीतील मुले बाहेर बसायची. अतुल सदा बाहेरच. तास एकच वाचनाचा. बाई वाचणार व मुले पाठोपाठ म्हणणार. बऱ्याच मुलांना पुस्तकंच नाहीत. बाई म्हणतील त्याप्रमाणे 'वाचायचं' म्हणजे म्हणायचं. पुस्तक फक्त नाममात्र उघडून ठेवणार आणि मग सुरुवात.

**कावळा काळा आहे.**
**कावळा झाडावर बसला आहे.**
**कावळा म्हणतो काऊ, काऊ.**
**चिऊ म्हणते चिऊ, चिऊ.**

आमचा अतुल बाहेर खेळायला असे खरा; पण त्याच्या कानांवर हे 'काऊ–चिऊ' सातत्याने दोन–अडीच तास येत असे. बाहेर झाडावरही काऊचिऊ असतातच. साहजिकच याचे 'कावळा काळा आहे' हे सारे तोंडपाठ. मी कधी रागावलो असे दिसलं की हा आपला पुस्तक उघडे व कोपऱ्यात बसून फाड फाड वाचे.

"कावळा काळा आहे."

"कावळा झाडावर बसला आहे."

अगदी स्वच्छ. स्पष्ट शब्दात. त्याचे बोल बोबडे असायचे. पण हा पुस्तक घेऊन असे वाचायला लागला की माझा राग आपोआप जात असे. मी ओशाळत असे. 'काय हुषार आहे आपला अतुल' असे वाटायचे.

त्याची आईही मला म्हणे,

"उगाच बोलतो आपण त्याला. कसा वाचतो पाहा तर. कुणी म्हणेल का हा पाच वर्षांचा आहे म्हणून? किती भरभर. ."

आई अगदी रामचंद्राची कौसल्या होई.

मलाही वाटायचे, 'माझा मुलगा राष्ट्रीय पंडित होणार. मोठा मोठ्ठा मोठ्ठाच होणार. मग पाहातो एकेकाला. प्रत्येकाला ठोकून काढीन. विश्ववंद्य बुद्धिमान् मुलाचा बाप आहे बाप! कोण बोलतंय मला."

अशी तरंगे स्वारी अस्मादिकांची,सांगणे नकोच की, त्या शाळेत सर्व मुलांत याचा पहिलाच नंबर. ते एकच पुस्तक त्या शाळेत शिकविले जात होते. जिल्ह्याच्या ठिकाणी कुणाला तरी पाठवून मी ते पुस्तक आणवून घेतले. मी कोर्टातून घरी आलो की अतुल ते पुस्तक 'वाचे' व माझ्याकडून खंडणी वसूल करी. कुठे गोळ्या—कुठे खेळातील बंदूक—कुठे सिनेमा. मीही त्याच्या अभ्यासावर खूष होऊन बक्षिसे देई. वाटायचं, अभ्यास करीत आहे. लहान आहे. त्याला उत्तेजन द्यायलाच हवे. माझ्याचकडे मागणार तो. दुसऱ्या कुणाकडे मागणार तो! नंतर मोठा झाला की मलाच मिळणार सारे परत.

असे भराभर दिवस चालले. दिवाळीची सुट्टी आली. सुट्टीत आम्ही वडिलांकडे जात असू. म्हणून मी, अतुल व त्याची आई वडिलांकडे गेलो. आमचे वडील हाडाचे शिक्षक. शिस्त एकदम कडक. मुलांचा अभ्यास व्यवस्थित हवा. पाया मजबूत पाहिजे हा दंडक. अजूनही मी वडिलांना घाबरतो. त्यांच्यासमोर बसणे म्हणजे काहीतरीच वाटते. मी आता कुठे भांग पाडतो. विद्यार्थिदशेत भांग ठेवलाच नव्हता. सफाचाट डोके. लग्न ठरले म्हणून भांग ठेवायला सुरुवात. नाहीतर 'भांग' कोणतीही—खाण्याची किंवा डोक्याचा—आमच्या घरात निषिद्धच.

वडिलांकडे गेल्यावर नित्याप्रमाणे माझी चौकशी वडिलांनी करायला सुरूवात केली. कुठे भरीव लेखन, स्वाध्याय, नवीन नवीन वाचन यांबाबत मी काही केले का म्हणून वडील विचारू लागले. नवीन वाचन व लेखनाचा मला कंटाळाच आणि सरकारी नोकरीत नोकरीचा व्याप, कागदपत्र, वरिष्ठांचे आदेश, हे सगळे वाचेपर्यंत नवीन असे वाचायला उसंतच मिळत नसे. वडिलांना मला सांगता येईना. वडिलांनी त्रागा केलाच. 'स्वाध्याय हवाच. काही तरी वाचन पाहिजेच.' वडील सांगत," ही लक्षणे ठीक नाहीत बरे." वडिलांनी मला सुनावलेच.

वडील बोलत असताना अतुलने पाहिले. आपल्या पपांना त्यांचे पपा बोलतात, रागावतात, हे त्याला कसे वाटले माहीत नाही. मी त्याच्यावर रागावलो की, तो पुस्तक काढून फाडफाड वाचायचा. आपल्या पपांना फाडफाड वाचता येत नसावे म्हणून पपांचे पपा त्यांना वाचनाबद्दल सांगत असावेत हा त्याचा समज झाला. पपांच्या पपांवर एक प्रयोग म्हणून त्याने धावत जाऊन पुस्तक काढले व वाचायला सुरुवात केली,

**कावळा काळा आहे.**
**कावळा झाडावर बसला आहे.**
**कावळा म्हणतो, 'काऊ, काऊ.'**
**चिऊ म्हणते, 'चिऊ, चिऊ.'**

आणि क्षणार्धात धडा संपविला. आजोबांचे लक्ष तो वेधू शकला नाही. आजोबा आपल्या मुलाच्या अनभ्यस्त वृत्तीवर विमनस्क झाले होते. त्यांचे आपल्या मुलावर लक्ष. मुलाच्या मुलावर लक्ष गेले नव्हते. 'आपणाकडे कसे लक्ष जात नाही' हे पाहून अतुलने पुन्हा स्पीड लावली व मोठ्याने वाचू लागला,

**कावळा काळा आहे..**

स्पीड भलतीच फास्ट. अगदी रॉकेटसारखी. जवळजवळ तीनदा धडा 'वाचला' त्याने.

स्पीड लावल्यावर व तीसुद्धा जेट रॉकेटची—आजोबांचे लक्ष जाणे क्रमप्राप्तच. कितो झाले तरी हाडाचे शिक्षक ते. वाचन कसे शुद्ध असावे याबाबत लक्ष असणारच. अतुलच्या आईच्या वडिलांचे पत्र ज्यावेळी माझ्यासाठी आले

होते – त्या वर्षी कर्तव्य होते – त्यावेळी त्यांनी ते दोनदा वाचून घेतले होते. मी ते भराभरा पत्र वाचायचा. पण त्यांनी धीमेपणे, धीमेपणे वाचून घेतले. त्यानंतर अतुलच्या आईचे मला आलेले पत्रही मी चारचारदा धीमे-पणे वाचायचा. आता अतुलच्या आईचे पत्र म्हणजे वाण्याच्या दुकानातून महिन्याकाठी लागणाऱ्या मालाची यादी !

अतुल खुर्ची-टेबलावर बसला होता. पुस्तक समोर उघडेच होते. अतुलच्या जवळ आजोबा जाऊ लागले. अतुलला वाटले, आजोबा आपणाला शाबासकी देतीलच. आपल्या पपांवरचा हल्ला त्यानेहून लावून आपणाकडे ओढला होता. आजोबा त्याचेजवळ गेले. पण त्याला शाबासकी देण्याऐवजी माझ्या-जवळ ते परत रागाने आले. अतुलला शाबासकी देणाऱ्या त्या हातांनी माझ्या मनगटालाच पकडले आणि मला म्हणाले,

" अरे तुझे तर स्वत:वर नाही तर नाही मुलावर लक्ष पाहिजे. चल बघ तरी—तुझा सुपुत्र काय वाचतोय ते . ."

मला जवळजवळ ओढतच त्यांनी अतुलजवळ नेले.

अतुल वाचतच होता. पण स्पीड जरा मंदावली होती. पपा व पपांचे पपा आता त्याच्या वाचनाने आकर्षित झाले होते. ते जवळजवळ 'बारावे' वाचन होते.

**कावळा काळा आहे.**
**कावळा झाडावर बसला आहे.**
**कावळा म्हणतो—**

मी वडिलांकडे प्रश्नार्थी दृष्टिक्षेप केला. " काय गैर आहे माझ्या पोराचं ! पोरगा कसे फर्डे वाचतो लहान असून." अशा अर्थाची मुद्रा केली. काही बोलण्याची सोय नव्हतीच.

"तुला टक्कल पडले तरी अक्कल येणेच अशक्य आहे." वडील रागाने म्हणाले.

"अरे तुझा हा मुलगा पुस्तक उलटे ठेवून वाचत आहे रे. त्याला अक्षरओळख अजिबात नाही. पुस्तक उलटे आहे. वाचणार काय ? कपाळ ? तोंडपाठ-पोपटपंची करतो. पुस्तक वाचण्याचे सोंग आहे रे."

मी पाहतो तो खरेच अतुलने उलटेच पुस्तक धरले होते व धडाही दुसरा कुठला तरी. पण तो तोंडपाठ वाचीत होता. 'कावळा' काळा. .वगैरे वगैरे. पण माझी विकेट पडली हे कसे कबूल करायचे?

"भाऊ, तो पहिला नंबर मिळवीत असतो. तो पुस्तक उलटे धरून वाचतो म्हणजे त्याची अक्षरओळख चांगलीच झाली असणार. फार घटवून घटवून अक्षरे झाली असणार त्याची. बाईंनी प्रॅक्टिस चांगली करून घेतली असणार. त्याशिवाय का उलटे पुस्तक वाचेल," मी वकिली पॉइंटने वादविवाद केला.

"तू गप्प बस." वडिलांना हा युक्तिवाद मुळीच आवडला नाही. तुझे मुलाच्या शिक्षणावर लक्ष नाही हेच खरं. पुस्तक सुलटे धरून वाचून घे बघू.

स्वत: वडिलांनीच पुस्तक सुलटे केले व मधूनच त्याला वाचायला सांगितलं. अतुलचे जेट रॉकेट जळून खाक होऊन पडले. त्रेधातिरपीट झाली. ग ऐवजी प, प ऐवजी म—थोडक्यात गमप ऐवजी 'ढ' 'फ' व्हायला लागली. कावळा गेला उडून. चिमणी चिवचिव करू लागली व अतुलसाहेब मुसमुसू लागले. वडिलांनी मलाच एक थोबाडीत मारली.

वडिलांनी आईला हाक मारली व इशारा दिला.

"हा मुलगा अभ्यासू दिसत नाही. हुशार आहे; पण याला काम करावेसे वाटत नाही. आठवड्याच्या आठवड्याला शाळेत काय घडले आहे, काय मार्क मिळतात, असे याचेवर आत्तापासून लक्ष ठेवले तर बरे. नाही तर हा फुकट जाणार. बापाचे आयुष्य फुकटच गेले आहे. याचे नको. . ."

सर्वजण गुपचूप् झाले. अतुलच्या आईलाही खरा प्रकार व पुत्राची विद्वत्ता कळून आली होती. अतुलचे उलटे पडलेले पुस्तक तिने पाहिले होते. अतुल एव्हाना पळालाच होता ! अतुलच्या पहिल्या नंबरचे पितळ बाहेर पडले.

दिवाळीची सुट्टी संपवून आम्ही परत त्या कुग्रामी आलो. वडिलांनी स्टेशनवर पुन्हा अतुलच्या आईला अतुलच्या अभ्यासाकडे लक्ष दे, आठवडा संपला की प्रगती विचार वगैरे सूचना दिल्या. आम्ही परत स्थिरस्थावर झाल्यावर अतुलला अतुलच्या आईने विचारले.

"काय आवडते रे माझ्या बाळाला" छडी वाजे छम् छम् विद्या येई घम् घम् या तत्वावर अतुलच्या आईचा विश्वास नव्हता. प्रेम, प्रोत्साहन या तत्त्वांनी मुलाची प्रगती साधावी हा प्रयोग त्यांनी सुरू केला.

" मला  मला " अतुलला काय सांगावे ते कळेना. जे दिसेल ते त्याला आवडायचे. मोटार दिसली की मोटार–हत्ती – काय दिसेल ते. एकदा एक फकीर अस्वलाला घेऊन चालला होता, ते अस्वल मागत होता एकेवेळी माझ्याकडं. पण आता थोडक्या वेळात काय सांगायचं हा प्रश्न होताच. त्याने सांगितलं.

" मला . . मला मँगोला, किंवा नकोच . . . कोका कोला . . . " त्याने मोठ्या आनंदात ओरडून सांगितलं. " पण देणार ना तू ? " कारण आईसाहेब एकदम मागण्या पुऱ्या करीत नाहीत हा अनुभव माझाही.

" बस्स् तुला दर शनिवारी मँगोला किंवा कोका कोला. पण शनिवारच्या परीक्षेत तुला मार्क चांगले पडायला हवेत. तिथल्या तिथे मँगोला किंवा कोकाकोला तू मागशील त्याप्रमाणे . . पण मार्क चांगले पडून पहिला नंबरच यायला पाहिजे. "

" पहिला नंबर. . .पहिला नंबर " अतुलला काळजीच वाटत होती.

"ते काही नाही. अभ्यासात पहिला ये. मगच मँगोला किंवा कोकोकोला . . " आईसाहेब.

आणि खरोखरच आठवड्याच्या परीक्षेत १०० पैकी शंभर मार्क अतुलला मिळू लागले. अतुल सांगेल ते – मँगोला किंवा कोका कोला शाळेत परस्पर मिळण्याची व्यवस्था झाली. अतुल पहिला येऊ लागला.

प्रत्येक आठवड्याच्या परीक्षेत अतुलला शंभरपैकी शंभर गुण पडू लागले. मी खूप झालो. मला कधी पहिला नंबर माहितच नव्हता. परीक्षेत ॲपिअर (appear) होण्यापेक्षा डिस्ॲपिअर (disappear) मी झालो होतो. परीक्षा पास होण्यापेक्षा वायपास कशा कराव्यात यात माझे शालेय आयुष्य खर्ची गेलेले. एक इयत्ता काही वेळेला दोन-दोनदा घटवलेली ! अतुलचे हे नेत्रदीपक यश व तेदेखील सातत्याने दर आठवड्याला पाहून मला समाधान वाटायचे.

पण का कुणास ठाऊक दोन-चार परीक्षा झाल्यावर अतुलच्या आईला शंका आली. अतुलच्या व्रात्यपणात जरासुद्धा फरक झाला नव्हता. घरी काहीच अभ्यास करत नसे. सारखा खेळ आणि दर शनिवारी हे नेत्रदीपक यश ! पण तिनेच हा मँगोलाचा प्रयोग केला होता. मला कशी सांगणार ती ?

एक दिवस आमच्या कोर्टातील एका पोक्त, समंजस व अनुभवी क्लार्कला तिने बोलावून घेतले आणि कळकळीने सांगितले.

" भाऊसाहेब, मी कधीही व्यक्तिगत कामे तुम्हाला सांगत नाही. पण आज आमच्या भावी पिढीकरिता मला सांगावे लागत आहे. "

" बाईसाहेब, आपण या गावात परकी आहोत. आम्हाला काम सांगायला लाजू नका." त्या क्लार्कने सांगितले.

आणि बाईसाहेबांनी आमच्या वंशाचा दिवा व त्याचा अभ्यास व दर शनिवारची परीक्षा यांबाबत सांगितले. काहीतरी यात असले पाहिजे अशी शंका व्यक्त केली. एका शनिवारी परीक्षेचा निकाल लागणार त्याच दिवशी त्या क्लार्कने अचानक शाळेत जायचे असे ठरले.

एका शनिवारी कोर्टाचे आमचे भाऊसाहेब अनपेक्षितपणे शाळेत गेले. अतुललाही कल्पना नव्हती. तो आज स्पेशल आनंदात होता. आज दोन कोका कोला मिळतील म्हणून आईने सांगितले. भाऊसाहेब शाळेत गेले, तो पाहतात तो, अतुल व बाई निम्मा निम्मा मँगोला पीत बसले आहेत.

अतुलने बाईंशी कंत्राटच केले होते.

" माझी आई मला मँगोला देईल किंवा कोका कोला. तुम्हाला निम्मा ग्लास – मला निम्मा. " फक्त तुम्ही शंभरपैकी शंभर मार्क द्यायचे. पहिला नंबर हवा. "

कोकाकोल्याचीही बाटली आता मागवली गेली. मँगोला व कोकाकोला या दोन बाटल्या आज एकाच वेळी देण्याचा आदेश अतुलच्या आईने दिला होता. बाल शिक्षणशास्त्रातील हा महत्त्वाचा प्रयोग होता. आज दोनशेपैकी दोनशेही मार्क मिळाले म्हणून कोकाकोला होता. मार्क दिले की कोकाकोला व कोकाकोला दिला की मार्क. तसेच मँगोलाचे.

आणि म्हणून कंत्राटानुसार मास्तरीणबाई उदंडहस्ते मार्क देत. शंभरपैकी शंभर. परीक्षा असो अगर नसो, शनिवारच्या साप्ताहिक परीक्षेत पहिलाच नंबर. आणि मग मँगोला किंवा कोका कोला ठरलेला ! शंभरपैकी शंभर मार्क. भाऊसाहेबांनी मग मागील परीक्षेचे रेकॉर्ड पाहायला सुरूवात केली. तो त्यांना कळले की दोन शनिवारी मास्तरीणबाईंना बघायला कुणीतरी बिजवर आला होता म्हणून मास्तरीणबाई शाळेत आल्याच नव्हत्या. मँगोला खर्ची पडला होता. तो सोमवारी घटाघटा मास्तरीणबाईंनी व अतुलने घशाखाली ओतला होता. परीक्षा घेण्याची व्यवस्था काहीतरी थातुरमातुर केली होती. कोणातरी

" बापय् " पोराने अतुलची साप्ताहिक परीक्षा घेतली होती. अतुल सूचना दिल्याप्रमाणे पहिलाच आल होता. अशा परीक्षा चालू राहिल्या असत्या तर अतुलने रेकॉर्ड-ब्रेकच केले असते.

कोर्टाच्या भाऊसाहेबांनी हे सर्व प्रकरण अभ्यासिले व आपल्या ' कार्यालयीन ' भाषेत अतुलच्या आईना सांगितले. अतुलच्या मातोश्रींनी हा साद्यंत अहवाल ऐकल्यावर त्यांचा तिळपापडच झाला. आपला प्रयोग साफ साफ फसला. सासरेबुवा आत्तापर्यंत आपल्या मुलापेक्षा सून हुशार असे म्हणत असत ते आता डगमगणार. आणि सर्वांत ताण म्हणजे या अतुलने आपल्यावर कुरघोडी केली. या साऱ्याचा संताप आला त्यांना. त्यांनी आकाशपाताळ एक केले.

मी शांतच होतो. अतुलच्या अभ्यासाबाबत अवाक्षरही बोलायचे नाही. हे मी ठरविले होते व मलाहा प्रकार कळलाच होता. पण तिची फटफजिती झाली हे माझ्या लक्षात येऊ नये !—निदान मला लक्षात आले हे तिला कळणे चांगले नव्हे. अतुलच्या आई संतापल्या.

विकास योजनाधिकारी—बी. डी. ओ – आमच्या शेजारीच राहात होते तालुक्याच्या सर्व शाळा त्यांच्या ताब्यात – अधिपत्याखाली होत्या. ही शाळा त्यांच्याच प्रेरणेने चालू झाली होती. त्यांच्याकडे जावे व सांगावे असे अतुलच्या आईने ठरविले. तिने मला बरोबर घेतले व तडक बी. डी. ओ. महाशयांकडे गेली.

बी. डी. ओ. महाशयांना तिने हा " मॅंगोला – मार्क " प्रकार कथन केला आणि सांगितले " काहीही करा– पण या शिक्षिकेची बदली करा. "

त्या शिक्षिकेवर बी. डी. ओ. साहेबांचा राग होताच व तिची बदली ते करणारच होते. पण त्यांनी अतुलच्या आईला पुन्हा सांगितलेच,

" शिक्षकांच्या बदलीने तुमच्या मुलामध्ये बदल होईल असे वाटत नाही . . . "

पण अतुलच्या आईला त्या शिक्षिकेच्या बदलीने बरे वाटले आता. अतुल नित्य अभ्यास करील असे वाटले.

शाळेत नवीन शिक्षक रुजू झाले. अतुलची परीक्षा रीतसर झाली. अतुलला गुण फारच कमी पडले. अतुलचा मॅंगोला बंद झाला व हूडपणा कमी झाला पुढच्या परीक्षेतही अतुलला गुण कमीच मिळाले.

" आता व्यवस्थित अभ्यास करील अतुल. पूर्वीची शिक्षिका बरोबर नव्हती हो. " असे अतुलची आई बोलू लागली.

अतुलच्या परीक्षा आता केव्हा पंधरवडयातून दोनदा—अगर आठवडयातून केव्हाही घेतल्या जात. आणि खरोखरच आता प्रत्येक परीक्षेत अतुलला भरपूर गुण मिळू लागले. अतुल आता खरोखरच सुधारायला लागला.

पण का कुणास ठाऊक अतुलच्या आईला यात काहीतरी वेगळे वाटायला लागले. काहीतरी विचित्र वाटायला लागले. केव्हाही परीक्षा घ्यायच्या ही एक अत्याधुनिक निराळी पद्धत असली तरी या कुग्रामातील तरुण शिक्षक ही पद्धत आत्मसात करून प्रत्यक्षात आणतो याबद्दल थोडे आश्चर्य वाटे तिला.

मला नकळत तिने आमच्या एका बेलिफाकडून ही काय पद्धत आहे – हे शिक्षक कोण यांबद्दल गोपनीय अहवाल मागविला.

आणि नंतर जो अहवाल बाहेर आला ते सारे विलक्षण . .

शिक्षिकेची बदली झाल्यानंतर दुसरा शिक्षक या जागेवर नेमण्यासाठी मिळत नव्हता. बरे या कुग्रामात कोणाची बदली झाली तर रदबदली होऊन ती जागा रिकामीच राहाणार. म्हणून एका विमुक्तजातीतील – गिरिजन असावा– तरुणाला – ३०-३५ वर्षांचा– वयाची व शिक्षणाची अट शिथील करून तात्पुरता या शाळेत नेमला होता. तो त्याच तालुक्यातील होता व कर्दनकाळ असल्यामुळे मुले निदान गोंगाट तरी करणे कमी करतील व शाळा चालेल या हेतूने त्याला नेमला होता. आणि बी. डी. ओ. साहेबांनाही अतुलच्या आईचे समाधान केल्याच आनंद मिळाला होता.

. . .पण . . .पण . .पण . . .

विमुक्त जातींतील पुरुषांच्या विवाहविषयक कल्पना अमेरिकन लोकां-प्रमाणे असतात. विवाह हा संस्कार म्हणण्यापेक्षा विवाह ही एक पार्टनरशिप, असे त्यांचे म्हणणे. पार्टनरने पार्टनरशिप—भागीदारीत—कायमचेच गुंतावे असे नाही, तसेच भागीदाराने स्वतःच्या भागीदारीव्यतिरिक्त व भागीदारीतील व्यवसायाला हानिकारक नसणारे असे दुसरे व्यवसाय करायला कुणाचीच हरकत नसते. त्यामुळे सौ. 'क्ष' उद्या सौ. 'य' होऊ शकतात. किंवा सौ. 'य' या पुन्हा सौ. 'क्ष' होऊ शकतात किंवा " सौ. " हे विशेषणच लागत नाही. रसायनाच्या परिभाषेत सांगायचे म्हणजे सौ. 'क्ष' या $H_2$ आहेत. त्या कुठेही

विसर्जित होत नाहीत. $H_2$ सारख्याच राहतात. $H_2$ बरोबर O मिसळला तर पाणी; दुसरे काही मिसळले तर दुसरे काही; पण $H_2$ कायमच. तसेच एक स्त्री कुणाचीही भागीदार होऊ शकते. पटले नाही तर दुसऱ्याकडे जाते.

हे जे शिक्षक होते त्यांच्याबरोबर अशाच कुणी $H_2$ राह्यला आल्या नित्य रिवाजानुसार; पण त्यापूर्वीच्या तिच्या भागीदाराला हे पाहवले नाही. आणि त्याने वकिलाचा सल्ला घेऊन " माझी बायको पळवली " या आरोपाखाली या शिक्षकावर फिर्याद गुदरली आणि तीसुद्धा माझ्याच कोर्टात.

" हा शिक्षक आहे व अतुलचा शिक्षक आहे हे मुळी मला माहीत नव्हते." भटसाहेब सांगू लागले. आम्ही न्यायाधीश, व्यक्तींच्या बाबतीत आंधळे — ठार आंधळे — असतो. कोर्टासमोर आलेल्या पुराव्यावरून काय तो निकाल द्यायचा. माणसे कुणी का असेनात.

पण हे गुरुजी प्रत्येक वेळी तारखा घेत असत. तारखा आम्ही आमच्या बोर्डाला किंवा आमच्या कामकाजाला पाहून देत असू. कधी आठवड्याची कधी पंधरवड्याची. कधी ताबडतोब लागलीच. . . .

" आणि . . . . ?" मी कुतूहलाने विचारले.

आणि काय . . . .

त्या तारखांना—किंवा कदाचित एक दिवस अगोदर हे गुरुजी अतुलची परीक्षा घ्यायचे व अतुलला पहिला नंबर मिळायचा.

प्रथम-प्रथम खरोखरच परीक्षा घेतली जात होती आणि त्यामुळे अतुलला कमी मार्क मिळत असत. पण नंतर गुरुजींना ज्यावेळी कळले की अतुल माझा मुलगा आहे त्यावेळी परीक्षा न घेता ' गुण ' मिळू लागले. आणि ते इतके की अनंतहस्ते . . . .घेता घेता अतुल गुदमरला जाऊ लागला.

आणि या सर्वांचा—कोर्टातल्या तारखा, चाचणी परीक्षेच्या तारखा, पहिल्यांदा पडलेले गुण, नंतर पडलेले गुण, या साऱ्यांसह बेलिफ महाराजांनी अतुलच्या मातोश्रींना साद्यंत अहवाल सादर केला. आणि अतुलच्या आई तांडवनृत्य करू लागल्या.

" चला " . . .कुठे चला हे मला सांगण्याअगोदरच मला पकडून घेऊन त्या बी. डी. ओ. साहेबांकडे गेल्या.

मला पाहताच बी. डी. ओ. साहेब बोलले –

"काय कसं काय ? अतुलचा अभ्यास कसा आहे ?"

"कसलं काय घेऊन बसलात ! अहो त्याचा पुन्हा पहिला नंबर येऊ लागला आहे." आमच्या सौ. नी जोराचा सूर लावला.

"अभ्यास केल्यावर पहिला नंबर यायचाच. . . ." बी. डी. ओ.

आमच्या सौभाग्यलक्ष्मी आता चवताळल्या. आणि त्यांनी सध्याच्या शिक्षणपद्धतीबाबत प्रबंधवजा भाषण देण्यास सुरुवात केली.

बी. डी. ओ साहेब म्हणाले,

"हे पाहा–शिक्षण सगळीकडे सारखंच. हा दोष व्यावहारिक आहे. तालुक्याला अधिकाऱ्यांची मुलं पहिली येणारच. अहो, माझा मुलगा तर फर्स्ट क्लास विथ् डिस्टिंक्शन यायचा. म्हणून तर त्याला मी आमच्या गावच्या शाळेत टाकला. तिथे सर्वांना माझी बुद्धिमत्ता माहीत आहे. तसेच आमचे घराणे माहीत आहे. त्यामुळे त्याने वाजवीपेक्षा बुद्धिमत्ता दाखविली तर कळते सारे. . . ."

"पण यावर आता उपाय. . ."

"उपाय एकच – कोणत्या तरी मोठ्या गावात – महानगरात बदली करून घ्या. . ."

"पण. . . "

"पण नाही बीण नाही. माझ्या शाळेत जेवढे शिक्षण द्यायचे ते मी देऊन टाकले. एक ते दहा आकडे त्याला व्यवस्थित येतात."

"त्याला आकडेशास्त्राचे ज्ञान उमगले तर कोणताही नंबर आला तरी संध्याकाळपर्यंत पैसे मिळतील."

बी. डी. ओ. ही चवताळून बोलत होते. कारण नुकत्याच जिल्हापरिषदेच्या शिक्षण समितीच्या निवडणुका झाल्या होत्या व शिक्षण समितीच्या अध्यक्ष-पदावर एका आकडेशास्त्रज्ञ व मृत्तिकाकुंभवाल्याची निवड झाली होती.

बी. डी. ओ. साहेबांचा राग उतरला. अतुलच्या आईचाही राग उतरला. आणि . . .

. . .आणि आमची बदली अशाच एका महानगरात – म्हणजे जिथे म्युनिसिपल कॉर्पोरेशन आहे अशा ठिकाणी झाली.

बस, आता अतुलच्या शिक्षणाकडे व्यवस्थित लक्ष द्यायचे असे आमच्या सौभाग्यलक्ष्मीने जिद्दीने ठरविले.

मला त्याबरोबर गृहखात्याचा मौखिक आदेश आला– "अतुलला सर्वात चांगल्या व कडक शिस्तीच्या शाळेत घाला व त्याच्या शिक्षिकेची व आमची मुलाखत घडवून आणा."

"शिक्षिकेशी मुलाखत कशाला?" मी.

"हो, मला शिक्षिका पाह्यची आहे. पाहते आता कोण कसे मार्क देते व मिळवते ते!" अतुलच्या आई.

"शिक्षिकेला मी सांगू कसे 'घरी या' म्हणून? ते वाईट दिसेल."

"ते काही नाही! मी त्या शिक्षिकेच्या मुलाखतीला येईन; पण मी तिच्याशी बोलणारच."

अतुलच्या मातोश्री एकदा चिडल्या की आम्ही अगतिक होतो. आम्ही शिपायाला शाळेत पाठवायचे असे ठरविले.

"हे पाहा..." पुन्हा अतुलच्या मातोश्री कडाडल्या. "शिपाई, बेलिफ मुळीच वापरायचे नाहीत. ते आहेत कोर्टाचे; खाजगी कामास वापरणे चुकीचे. आणि अतुल त्यांनाही वश करून घेईल. हे कोर्टाचे शिपाई! त्यांनी अतुलला विडी-काडीचे व्यसन लावले तर? पुन्हा कोर्टाच्या शिपायाचे नाव घेऊ नका. तुम्ही स्वतः जा..."

यानंतर मी सर्व नगर हिंडून एका शिस्तप्रिय शाळेत अतुलला प्रवेश मिळवला अतुलच्या अभ्यासाचा आराखडा सांगणे मला केवळ अशक्य वाटत होते. कारण अतुलला पुन्हा पहिला नंबर द्या, असे अध्याहृतपणे मी सुचवीत आहे असे वाटायचे.

वर्गशिक्षिकाबाईना मी लाचारीची परमावधी करून विनंती केली की आपण एकदा आमच्या घरी पायधूळ झाडावी. वर्गशिक्षिका काय शिकल्यात–कोणत्या दर्जाच्या–याचा विचार न करता त्यांची अजिजी केली. आणि त्या एकदा घरी आल्या. आमच्या सौभाग्यलक्ष्मीसमोर त्यांना हजर केले. सौभाग्यलक्ष्मींना तसा माझा अभिमान होता. त्या रागावल्या की शक्यतो त्यांची कामे मनपसंत होतात हे त्यांना माहीत. पण तरीसुद्धा कधी पसंतीचा शिक्का द्यावयाच्या

नाहीत. पण आता मी माझे काम पक्के केले होते. अतुलच्या शिक्षिका त्यांच्या पुढे – मॅजिस्ट्रेटसमोर आरोपी जसा हाजिर करतात – त्याप्रमाणे हजर केल्या.

आमच्या सौभाग्यलक्ष्मींनी चांगले आगत-स्वागत केले, आणि शेवटी त्यांना बजावून सांगितले,

" हे पाहा–हा अतुल शाळेत जिथे असेल तिथे तुम्ही राहा. त्याला चढवून ठेवू नका. स्पेशल ट्रीटमेंट मुळीच देऊ नका, पण तो जिथे जाईल तिथे त्याच्या सांगाती राहा."

त्या शिक्षिकेला सर्व तऱ्हेची आमिषे दाखविण्यात आली. त्या शिक्षिका प्रौढ कुमारिका होत्या. आमच्या सौ. ने जाता जाता हळूच त्यांची पत्रिका मागून घेतली. त्या प्रौढ कुमारीच्या चेहऱ्यावर थोडा तजेला आला. 'कोल्हापूरकडील वर चालेल का ? ' असेही आमच्या सौ. ने विचारून घेतले. नवरा तो नवरा. कोल्हापूरचा असो अगर सोलापूरचा असो. त्या प्रौढ कुमारिकेने सलज्ज संमती दिली. आमच्या सौ. ने आता मात्र काम घट्टच करून घेतले. अतुल शाळेत असेपर्यंत त्याला दृष्टिआड होऊ द्यायचाच नाही व त्याची सर्वतोपरी काळजी त्या प्रौढ शिक्षिकेने घ्यायची असे ठरले. या तहाच्या बदल्यात प्रौढ कुमारी शिक्षिकेला कोल्हापूरचे राज्य मिळणार होते ! आमच्या सौ. आता निश्चित झाल्या.

दररोज सकाळी आठ वाजता मी स्वत: सायकलवरून अतुलला शाळेत नेई आणि बरोबर पावणेअकराला परत शाळेतून आणायला मी हजर. माझ्या शाळेत कधी मी इतका नियमित नसेन. त्याला शाळेतून आणल्यानंतरच मी कोर्टात जायचा प्यून, बेलिफ या सर्वांना आश्चर्य वाटे–साहेब स्वत:ची कामे स्वत: करतात ! नाही तर सरकारी कचेऱ्यांतून शाळांतून मुलांना ने-आण करण्याची कामे प्यूनच करतात साहाजिकच प्यून मग त्या मुलांना विडी-काडीची विद्या शिकवायचेच व शाळेत जाता-येताना मुलांना 'च्या–आयला' हे अलिखित व कधीही शाळेत न शिकविले जाणारे वाङमय ऐकायला मिळे. एका विद्याधिकाऱ्याच्या मुलाच्या तोंडात अस्खलित शिव्या व्यवस्थित बसल्या होत्या. त्या विद्याधिकाऱ्याला रिटायर झाल्यानंतर इतके उत्कृष्ट हसत-खेळत शिव्यामाहात्म्य शिकवणारी चालती-बोलती शाळा कोणती व गुरुजी कोण असावेत, हे नंतर कळले. त्यांचे वेगवेगळे प्यून त्या विद्याधिकाऱ्यांच्या

मुलाला शाळेतून ने-आण करीत. 'च्या–आयला' हा शब्द इतका फिट् बसल होता त्याच्या मुखात की पुढे तो अमेरिकन विद्यापीठात शिकवताना 'Sorry— Excuse !' म्हणण्याऐवजी 'च्या–आयला' असे म्हणे. फार विद्वान म्हणून तो गणला गेला असल्यामुळे त्याची भाषणे टेप झालेली होती. ती एकदा त्याच्या वडिलांनी ऐकली. वडिलांनी त्याच्या आईला काय सुनावले असेल ते जाणूनच घ्यावे. असो. पण हा संस्कार प्यूनच्या संभाषणातून आलेला. लहान मुलांना या प्यूनचे अनुकरण करावे असे वाटतेच. मी मात्र काहीच न बोलता अतुलची ने-आण करीत असे. माझ्या बोलण्यात येणार म्हणजे दोषी, आरोपी, फिर्यादी ही मंडळी. पण अतुलच्या सान्निध्यात या मंडळींना मी बंदी घातली होती.

त्या महानगरात मी एकदम नवीन. सर्वांना अपरिचित. अतुलला शाळेत शिक्षिका चांगल्याच मिळालेल्या. अतुलच्या आईने तिची नाडीच धरलेली होती. शाळेचे किंवा शाळेतील शिक्षकांचे किंवा शाळेशी संबंधित असलेले कोणतेही प्रकरण न्यायप्रविष्ट नव्हते. निदान माझ्या कोर्टात तरी नव्हते. मी आता निर्धास्त होतो. अतुलचा अभ्यास व्यवस्थित चालणार असे वाटू लागले.

पण कसे कुणास ठाऊक, दोन-तीन महिने झाले आणि अतुलचा नंबर पुन्हा पहिला यायला सुरुवात झाली. प्रगतिपुस्तकात भरपूर गुण. अगदी 'बुद्धिमताम् वरिष्ठम्'– सव्यसाची–अशा तऱ्हेची त्याची नेत्रदीपक प्रगती पाहून मलाच आश्चर्य वाटायला लागले. सौभाग्यवती प्रसूतीगृहात असतेवेळी दुसऱ्या कोणा बुद्धिवंताचा मुलगा चुकून आपल्याकडे नाही ना आला, असेच मला वाटू लागले. आत्ता . . .

तर त्याचे कारण –

अगदी अरेबियन् नाइट्स्सारखी सुरस व चमत्कारिक उपकथा सुरू झाली. अतुलच्या पहिल्या क्रमांकाबाबत व अभ्यासाच्या गती का अधोगतीबाबत गोष्टीतून गोष्ट निघू लागली. 'कमले कमलोत्पत्ति.' कमळातून कमळच निघावे तशा अतुलच्या पहिल्या नंबरच्या रहस्यकथा.

"त्याचे कारण हेच–" न्यायाधीश सांगू लागले–

"त्या शाळेजवळच–त्या महानगरीतील अद्ययावत वातानुकूलित चित्रगृह (बहुधा उच्चपदस्थाच्या भागीदारीत) चालू झाले होते. त्या चित्रगृहाचे

व्यवस्थापक व स्थानिक पोलीस यांच्यामध्ये काही वाद निर्माण झाले होते. बहुधा फ्री पास, तिकीटविक्री अशाच काही तरी कारणांनी. आणि एक दिवस त्या व्यवस्थापकांच्या निवासस्थानावर पोलिसांनी छापा घातला. त्या छाप्यात काही तरी निषिद्ध व आक्षेपार्ह वस्तू मिळाल्या व त्याबाबत रीतसर फौजदारी केस झाली होती. त्या केसबाबत वृत्तपत्रातून गाजावाजा झाला होता. फौजदाराची बदली झाली होती. या व त्या कोर्टातून प्रकरण फिरत होते व शेवटी माझ्याच कोर्टात ते प्रकरण पडले होते. माझ्या कोर्टात अक्षरशः हजारो प्रकरणे पडलेली होती. कोणत्या प्रकरणावर विशेष असे लक्ष देण्याचे मला कारण नव्हते व पक्षकार कोण याबाबत तर मी अज्ञानीच.

पण त्या व्यवस्थापकाला कळले की भटसाहेबांच्या न्यायालयात ही केस जाणार आहे व तीन-चार महिन्यांनी केस उभी राहाणार आहे. मी दररोज सकाळी अतुलला त्या शाळेत नेतो व अकरा वाजता परत न्यायला येतो हे त्याने पाहून ठेवले होते. आमच्या प्यूननेच ती बित्तंबातमी दिलेली असायची. मी एक दिवस अतुलला शाळेत पोचविले हे पाहून त्याने हळूच अतुलला बोलावले. अतुल त्या चित्रगृहात गेला म्हणून त्या शिक्षिकाही गेल्या. चित्रगृहात एक चिमणे चित्रगृह (मिनी–थिएटर) होतेच. या चिमण्या चित्रगृहात त्याने स्पेशल शो दाखवावयास सुरुवात केली. शिक्षिकेने अतुलला काहीच सांगावयाचे नाही असे ठरलेले. फक्त त्याच्याबरोबर राह्यचे. ती शिक्षिका अतुलबरोबर चित्रगृहात जाऊ लागली.

"याचा परिणाम एकच– अतुलचा पहिला नंबर. सर्व विषयांत." ती प्रौढ शिक्षिका इतर आपल्या शिक्षिका मैत्रिणींना आणू लागली. अतुल व त्याच्या शिक्षिका यांना सिनेगीते मुखोद्‌गत झाली; पण परीक्षा व अभ्यास यांबाबत घड्याळ पाठीमागे फिरवावे लागले. अतुलचा क्रमांक पहिलाच राहिला. सर्वच विषयांत. कारण त्या विषयाच्या शिक्षिका चित्रगृहात असायच्या.

कालांतराने ती केस चालली. पंचशील का पंचतंत्र–म्हणजे पंचांना फोडणे– अशा कारणाने व केस दाखल करणारा फौजदार मेल्यामुळे त्या केसमधून तो व्यवस्थापक सुटला व त्या व्यवस्थापकाने त्या प्रौढ मास्तरणीशीच लग्न केले. पण अतुलचा नंबर पहिलाच राहिला. अतुल सर्व परीक्षेत पास व पहिला नंबर.

न्यायमूर्ती श्री. भटसाहेब जसजसे पहिल्या नंबरबद्दल सांगायला लागले तस-तसा मी हसे व पुढचे ऐके.

पण मी जरा धीर चेपूनच बोललो.

" सर–आमच्या शाळेत तसे कधीच होत नाही. होणार नाही. "

" हे पाहा–" श्री. भट न्यायमूर्ती सांगू लागले, " हा व्यवहार आहे. व्यवहाराचे कितीही जरी उदात्तीकरण झाले तरी माया, लोभ हे असतातच. म्हणूनच काहीही असो–अतुलला बक्षीस देण्याचे मी त्यामुळेच नाकारले. तो खरा पहिला येवो की खोटा पहिला येवो, मी जोपर्यंत न्यायदानाच्या खुर्चीवर आहे तोपर्यंत त्याला मी माझ्या हस्ते बक्षीस देणार नाही; आणि समारंभात सन्माननीय पाहुणा म्हणून मला पाचारण केले असले तरी मी मुळीच अतुलला बक्षीस देणार नाही. पहिल्या नंबरचे तर मुळीच नाही."

झाले, चहा झाला. संभाषण संपले. नित्याप्रमाणे मी घरी आलो. संस्थेचा कार्यकारी सचीव म्हणून शिक्षकवृंदाशी माझी दुसऱ्या दिवशी अनौपचारिक मीटिंग होती. त्या सभेत मी अतुल भटच्या बक्षिसाची चौकशी केली.

अतुल भटला चार बक्षिसे मिळाली होती.

पहिले गुजराती भाषेतील प्रावीण्याबाबत. अतुलच्या मातोश्री व वडील गुजराती. घरात गुजराती भाषा बोलली जाई. सर्व शाळेत गुजराती बोलणारी दोन किंवा तीनच मुले. गुजराती लोकांची वेगळी शाळा होती. पण या शाळेच्या माहात्म्यामुळे अतुलला या शाळेत घातले होते. शाळेत गुजराती शिक्षक नव्हते. ड्रॉइंगचे शिक्षक फावल्या वेळात गुजराती शिकवण्याचे काम करीत. ते पूर्वी साबरमती जेलमध्ये होते म्हणून गुजरातीशी त्यांची तोंडओळख. साहजिकच अतुल पहिलाच आला.

– आणि बाकीची बक्षिसे ?

– त्या बक्षिसांना कोणताच विषय नव्हता.

पहिल्याच विद्यार्थ्याला बक्षिसे का द्या ? चढाओढीचे जीवन नको. सहजीवन हवे. प्रभुत्व नको; सेवा हवी. या तत्त्वानुसार ती बक्षिसे अतुलला आयत्या वेळी जाहीर करण्यात आली होती.

पहिल्या नंबरची !

⊔ ⊔ ⊔

# फोटो

" तावडतोब तुमचा फोटो हवा आहे. "

एकदम निर्वाणीच्या भाषेत मला सांगण्यात आले. माझा चेहरा फोटो घेण्याजोगा झाला खरा. मला परदेशगमनाचा योग आला होता. आणि प्रस्थान पत्राकरिता फक्त फोटोचीच जरूरी होती. नित्याप्रमाणे " तुका म्हणे माझे तुम्हां संतावरी ओझे " या न्यायाने आम्ही आमचे ओझे अशाच एका व्यहारकुशल संतांवर टाकले होते. आणि त्यानेच आम्हाला सक्त ताकीद दिली होती.

"संध्याकाळपर्यंत फोटो मिळाला तर पाहाच— काहीही करा फोटो हवाच " संध्याकाळपर्यत फोटो मिळणे शक्य नव्हते. पण आम्ही धीर न घालवित सांगितलेच, " या संध्याकाळी . . . "

आणि ते संत निघून गेलानंतर घरातील सर्वांना तावडतोब हुकूम सोडले. " जे जे म्हणून दस्तुरखुद्द यांचे फोटो असतील—ते जसेच्या तसे पकडून आमचेपुढे हाजिर करावेत." हुकमाची तामिली तावडतोब झाली व भिंतीवरचे जुने—मण्यात गुंतवून नक्षी काढलेले – तसेच पूर्वीचे आल्बम्स—सारे जसे असतील तसे पकडण्यात आले व अस्मादिकांसमोर दाखल झाले.

सर्वांत प्रथम छायाचित्र होते – ते म्हणजे आम्ही पृथ्वीवर येऊन एक वर्षही झाले नसेल त्यावेळचे ! कोणत्या तरी छापखान्यात आमच्या पुण्यशील मातोश्रींचा मावस का आतेभाऊ चिकटला होता. त्या छापखान्यात " उच्च दर्जाचे " " केवळ अभिजात कलेला वाहिलेले " असे मासिक प्रसिद्ध होत असे. त्या मासिकात ' नव्या कळ्या ' मध्ये मलपृष्ठावर आमचा रांगडा ' फोटू ' आला होता. कालांतराने रांगडेपणा गेला व नोकरीतील रांगणे आमच्या नशीबी

आले ! तो भाग वेगळा. त्या फोटोत आम्ही विवस्त्र होतो. केवळ दिशा हेच आमचे वस्त्र ! आमच्या शेजारीच – अगदी आम्हाला चिकटून– दोन हसऱ्या कळ्या सुखासीन होऊन आव्हानात्मक पाहत होत्या. आणि ते सुद्धा अत्यल्प वस्त्रांत ! आम्ही फोटोत गंभीर दिसत असलो तरी त्या शेजारच्या अत्यल्प वस्त्री सुंदरीवर आमची निगाह गेली नाही ! किंवा त्यांचे लक्ष आमच्याकडे वळावे असा आमचा प्रयत्नसुद्धा दृश्यमान नव्हता. आम्ही स्थितप्रज्ञ होतो व आमची मुद्रा परमहंसाची होती! त्या कळ्यांचे आईबाप त्या 'सर्वांत अधिक खप असलेल्या' ( हा खप आमच्या गल्लीतच बहुधा ) मासिकाच्या संपादकाचे कुणीतरी आते– मामे– असे (गोतेत अर्जुनाला जे त्याच्यासमोर ठाकलेले दिसले) नातेवाईक असावेत. कारण माझ्या उजव्या बाजूला बसलेल्या कळीला " आदर्श " म्हणून बक्षीस जाहीर झाले होते. दुसरी जी डाव्या बाजूला होती – म्हणजे अत्यल्पातील अत्यल्पवस्त्रांत जी होती– तिला " उत्तेजनार्थ " बक्षीस देण्याचे ठरले होते. डाव्या बाजूला जी बसते ती जास्त 'विशेष' किंवा 'स्पेशल' असते – असे म्हणतात आणि या माझ्या वाममार्गात असणाऱ्या हसऱ्या कळीला 'विलक्षण' केशसंभार म्हणून विशेष बक्षीस जाहीर झाले होते. आता या या कळ्या दाताला कवळ्या लावून फिरत असाव्यात. जिच्या केशसंभाराचे कौतुक झाले तिचे क्षौर झाले व आता कुठेतरी स्वयंपाकीणबाईचे काम ती करीत असावी. दुसरी हसरी कळी काय करते ते कळत नाही–पण ती पूर्णपणे फुलली, 'पोरांच्या लेंढारामुळे' सुकली – व कोमेजली असेच झालेले असायचे. या दोन्ही कळ्या आता कोणत्या 'कळे' ला आहेत नकळे ! पण आता अगदी अत्यंत जवळ आल्या – आणि कोणतेही वस्त्र परिधान केले ( बहुधा पांढरे फटफटीत असावे – नाहीतर स्वयंपाकिणीचे सोवळे असायचे ) तरी आम्ही स्थितप्रज्ञच! आता वेळ निघून गेली. बैल गेला आणि जागा झाला. पण आमचा हा विवस्त्र 'कळ्यांतील' फोटो आम्ही आमच्या 'जीवितम् मे द्वितीयम्' यांनाही दाखविला नव्हता मग पासपोर्टकरिता कसा चालेल ? आम्ही त्या 'उच्च अभिरुचीच्या' 'केवळ कलेला वाहिलेल्या' ( नंतर वाहून गेलेल्या ) व 'सर्वांत अधिक खप असलेल्या' मासिकाला व त्या हसऱ्या कळ्यांना पुन्हा जुने कपाट दाखविले ! कारण रद्दीचा भावही कमी झाला होता.

दुसरा फोटो म्हणजे मुंजीवेळेचा. गायत्री मंत्राचे तेज आमच्या चेहऱ्यावर ओसंडत होते – ओसंडत म्हणण्यापेक्षा 'फेसाळत' होते म्हणणे योग्य. 'वाल' शास्त्रज्ञांनी जोराचा वस्तरा फिरवल्यामुळे स्वारी डिस्-ईज (Dis-ease) झाली होती ! वडिलांची टोपी आमच्या मुंडन झालेल्या डोक्याला पूर्णपणे पोटात घालून थेट नासिकाग्रावर येण्याचा प्रयत्न करीत होती. आमचे नेत्र अर्धोन्मीलित व आश्रुपूर्ण होते. हसऱ्या कळचांचे वेळी आम्ही कौपीनवद्ध नव्हतो. पूर्णपणे वस्त्रहीन–पण वाढत्या वयाबरोबर आम्ही सुसंस्कृत होऊ लागलो होतो म्हणून यावेळी आम्ही कौपीनवंत होतो. पुढे पुढे जे जे फोटो घेतले त्या त्या वेळी आम्ही कौपीनवंत होतो की काय हे आम्हास निश्चितपणे सांगता नाही यायचे. पण या छायाचित्रात कौपीन उठून दिसत होती. प्रस्थानपत्राच्या वेळी अधिकाऱ्यांनी आमच्या कौपीनवंत प्रतिमेचे तेज व ओज पाहिले असते–पण प्रस्थानपत्र देण्याचे नाकारलेच असते. त्यावेळी माझ्या आजीला हा फोटो आवडला होता व "दृष्ट काढा" म्हणून तिने फर्मानही काढले होते. पण आता हा फोटो दाखवायचा म्हणजे दृष्टीच काढायची ! या फोटोला आम्ही जुने कपाट दाखविले.

नंतरचा आमचा फोटो म्हणजे कॉलेजातील आयडेंटिटी कार्डावरील –तसे बाल्यावस्थेतील आमचे बरेच फोटो होते. आईच्या कडेवर बसलेला. आईकडील कुणाचे तरी लग्न झाले होते. त्यावेळी मेळाव्यात घेतलेल्या फोटोत– कुठेतरी घुसडलेला ! कुठे घोडा–घोडा खेळत असलेला असा. पण हे सारे फोटो चिल्लर. विशेष व्यक्तिमत्त्व दाखवणारे ( जरी लहान मुलाचे पाय पाळण्यात दिसत असले तरी ) नव्हते. कॉलेजातील आयडेंटिटी कार्डावरील फोटो जरा बरा होता. मिशीला – ती नुकतीच उमलू लागली होती – स्पेशल तरवार कट व डोक्यावर फेल्ट हॅट घालून तो फोटो काढून घेतला होता. फेल्ट हॅट त्या फोटोग्राफरचीच ! मान एकदम ताठ व डोळे एकदम वटारलेले व रागीट. अगदी 'सुलतान'. त्यावेळी – त्या वयात (सध्यासुद्धा) माझ्यावर प्रत्येकजण रागावलेले असायचे. वडील तर जवळजवळ बोलतच नसत. आईकडे नेहमी मी पैसे मागे म्हणून चिडलेली आई ! कॉलेजात म्हणण्यापेक्षा कॉलेजच्या बाहेरच. सर्वजण नाखूप. कोणाचे तरी प्रेम संपादन करावे म्हणजे दारुण पराभव व शोकांतिका. अशा वेळी मनातील राग कुणी नाही हे पाहून नेत्राद्वारे प्रगट झाला ! फोटोग्राफरची फेल्ट हॅट – तात्पुरती का होईना– पण राजचिन्हांकित

मुकुट वाटला होता मला. अगदी आम्ही ‘जहाँपनाह’ झालो आहोत व आमचे निश्वसित म्हणजे फर्मान होते–अशी मुद्रा. फोटो पाहणाऱ्यालाच वाटावे की त्यालाच जेरबंद करून आमच्यासमोर हजर केले आहे व आम्ही त्याला जाब विचारीत आहोत ! आमच्या तीर्थरूपांनी हा फोटो पाहणेसुद्धा नाकारले होते. कॉलेजातील कुणीही माझे आयडेंटिटी कार्ड पाहायलाही मागितले नव्हते. कारण आमचा गबाळेपणा हीच आमची आयडेंटिटी. आयडेंटिटी कार्डची जरूरीच नव्हती ! हॅट अगदी भगतसिंगासारखी शोभून दिसत होती. भगतसिंग नाव आठवण्याचे कारण की त्यावेळी सिंग नावाची एक कन्याकुमारी आमच्या कॉलेजात होती व आम्ही त्यांचे भगत होतो. भगतसिंगाचा आत्मा नंतर तळमळतच राहिला असावा. पण हॅट मला खरोखरच भगतसिंगासारखी दिसत होती व तरवार कटही जास्त शोभा देत होता. खरे म्हणजे त्यावेळी डोक्यावर पुढे केस येणे–आणणे ही लेटेस्ट फॅशन होती. पण फोटोवाल्याने सल्ला दिला, हा आयडेंटिटी कार्डावरील फोटो आहे “ हॅट घातलेली बरी. ” म्हणून त्याच्याचकडे वीस वर्षाहून अधिक काळ असलेली हॅट त्याने मला दिली. ही हॅट त्याने कॅमेरा ज्यावेळी खरेदी केला त्यावेळी कॅमेऱ्याबरोबर घेतलेली असावी. किंवा ज्या दुकानात तो कॅमेरा विकत घ्यायला गेला त्यावेळी तिथे कुणीतरी ती हॅट विसरलेले असावे – आणि याने ती हॅट आणलेली असावी ! न पेक्षा इतक्या प्रेमाने विकत घेतलेली वस्तू दुसऱ्याला वापरायला कोण देणार? आता आम्हाला टक्कल आहे. टक्कलाबरोबर अक्कलही थोडी आली आहे. पण त्यावेळी फार वाटायचे की आपला केशसंभार आकर्षक असावा व थोडे कुंतल भालप्रदेशावर यावेत व आम्हाला कुणाच्या तरी गोडगोड हृदयात एन्ट्री मिळावी. पण त्या फोटोग्राफरने सल्ला दिला आयडेंटिटी कार्डाकरिता हा फोटो चालायचा नाही. दुसरा काढून मिळेल! स्वस्तात! अर्थात त्याची चूल पेटती राहावी म्हणून हा सल्ला होता. आईने मला असला ‘केसाळ’ फोटो काढायला पैसे दिले नसतेच. पण वडिलांनीही माझा केशमुंचनविधी केला असता. या फोटोग्राफरची फेल्ट हॅट प्रत्येकाच्या डोक्याला बसे. स्त्रियांनी केलेल्या एका नाटकात पुरुषाचे काम करण्याकरिता म्हणून एका स्त्रिनटाने ती फेल्ट हॅट वापरली होती. ती फेल्ट हॅट अनेकांनी शिरोधार्य केली होती. आणखी एक आकर्षण म्हणजे ते फोटोग्राफर या फेल्ट हॅटला मोरपिसे लावीत. कुणी ‘रंगीत’

गिऱ्हाईक आले की या फेल्टहॅटचा 'मुकुट' होई व कुणीतरी मुगुटराव नंदी बैलासारखा सजे व हसत हसत आपला झाक्पैकी फोटू काढून घेई. कधी कधी हा मुकुटराव तोंड रंगवून घेई—अगदी शिनिमातल्या नटासारखे. आणि हा फोटो त्या स्टुडियो (बहुधा "चंद्रप्रभा", "भारत", "दिलखुष" "किरण" अशीच काहीतरी नांवे या स्टुडियोची) च्या प्रवेशद्वारावर काही पैसे आकारल्यावर टांगला जाई. माझा हा आयडेंटिटी कार्डावरील फोटो त्याने असाच बाहेर टांगला होता. पुष्कळ पोलीसठाण्यात व बसस्टँडवर पाकीटमाराचे फोटो लावून ठेवलेले असतात ना तसेच अगदी! आमच्या बादशाही नजरेला नजर देता देता नजर लावणाऱ्याची दृष्टी खाली मोठ्या अक्षरांत लिहिलेल्या माहिती-वर जाई . ." एका रुपयास तीन . .पुढील प्रत्येक प्रतीस चार आणे " आमच्या आईवडिलांना आमच्यानंतर 'प्रत' नव्हतीच व आमच्या एकंदरीत वर्तनावरून आमची ही प्रत एकदाची 'खपेल' तर बरे असे तीर्थरूपांनी आपल्या मुखारविंदातून उद्गार काढले होते नंतर आणेवारी बंद झाली रुपयांचे शंभर तुकडे झाले. तसा आमचा भाव बदलला व प्रतीला " फक्त पचास पैसे पडू लागले. माझ्याजवळच कुणीतरी नवतारका टांगलेली होती. तिचा भाव होता. 'दोन रुपये फक्त' कारण ती आकाराने मोठी – कार्डसाइज म्हणून आमच्यावरती कुणीतरी 'नत्यांगना' फुलसाईजमध्ये होत्या. – वस्त्रत्याग करण्याच्या तयारीत असलेल्या– त्यावेळी त्यांची किंमत ढाई रुपये—अडीच रुपयांत फक्त फोटोच हं– होती. जवळच एका अगडबंब शँडोचा फोटो लावला होता. हा फोटो कोणत्या तरी नियतकालिकातून काढलेला असावा, कारण हा शँडो त्या फोटोग्राफरच्या स्टुडियोत आला असता तर तो फोटोग्राफर पार भेदरून गेला असता व त्याचाच चेहेरा फोटो घेण्याजोगा झाला असता. पण आपला फोटो 'मॉडर्न' किंवा 'अप टू डेट' आहे हे दाखविण्याकरिता त्या शँडोला विलायतेतील मासिकांतून अलगद उचलून तिथे त्या 'तन्वी श्यामा—कमल लोचनी' नृत्यांगनेजवळ टांगून ठेवले होते. हा आयडेंटिटी कार्डावरील फोटो आम्हालासुद्धा आता त्याज्यच वाटतो. त्या फोटोतील ती सुलतानी दृष्टी व फेल्ट हॅट नोकरीत उपयोगी नाही. कृत्रिम दंतमंजनी हास्य व 'खाविंदचरणा-रविंदी मिलिन्दायमान' होणारी दृष्टी—त्याबाबत फोटोग्राफरने स्पेशल इफेक्टस द्यावेत– जादा पैसे आकारून हे हल्ली फोटोमध्ये हवेच. नोकरीत राहावयाचे

असेल तर ! प्रस्थानपत्रावर तर सुलतानी मुद्रा चालायची नाही. योगासनांच्या वर्गात या मुद्रेला ' विपरीत ' मुद्रा म्हणत असावेत.

पुढचे फोटो म्हणजे ग्रुप फोटो. थोडक्यात सांगायचे म्हणजे जनसेवेकरिता आम्ही ज्यावेळी पोलादी चौकटीत प्रवेश केला, त्या वेळेपासून आचे 'ग्रुप' सुरू झाले. चौकट ' पोलादी ' खरी – पण आम्ही मेणाहुनी मऊ – नव्हे तर च्युइंग गमसारखे चघळले जाण्याइतके मऊ झालेलो होतो. शक्यतो वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जवळ – अगदी जवळ– आणि कांनष्ठांपासून दूर – अतिदूर– अशा पोजमध्ये आम्ही ग्रुपमध्ये असायचे. आणि ही जागा वर्गणीच्या अगर विनवर्गणीच्या ग्रुपमध्ये आम्ही पटकावणारच. असेच कोणत्या तरी कुग्रामात अधिकारी म्हणून काम करीत असताना आमचा फोटो – ' ग्रुप फोटो ' साहेबा-बरोबर काढला होता. आमच्या कार्यालयाला – बहुधा हातात अधिकार असल्याने – कोणत्या तरी कार्यक्रमात ढाल किंवा चषक असे बक्षीस मिळा-लेले होते. साहेब इनिसपेक्शनकरिता आले म्हणजे फोटो काढणे आलेच. तो चषक किंवा ढाल मिळवण्याकरिता आम्ही यत्किंचितही काम केले नव्हते. आम्हाला फक्त ' चषक ' प्रिय होता. पण मी व माझ्यासारखे चार बंधू अधि-कारी यांनी साहेब व चषकाबरोबर फोटो काढून घेण्याचे ठरविले. फोटो काढून घेण्याचे कामी 'म्होरंच' साहेब, त्यांच्यापुढे चषक, आजूबाजूला –दोन का तीन असेच ' पुढे पुढे ' करणारे बसले. खुर्च्या कमी का फिल्म अपुरी म्हणून फक्त सहा जणांचा फोटो काढावयाचा असे ठरले. साहेब व चषक पुढे. साहेब नेहमीप्रमाणे खुर्ची अडवून ! साहेबाचे बाजूला दोन अधिकारी उभे. अर्थात हसत हसत साहेबाचे पाठीमागे बाकडा टाकून त्यावर चपराशी उभा ! पट्टा घातलेला ! साहेबांच्या समोर सतरंजी टाकलेली व चषकाच्या एका-बाजूला मी मत्स्याकृतीत ! फक्त डोके व संपूर्ण चेहरा तळहातावर ठेवला आहे व सर्व शरीर वेलबुट्टीसारखे झोकून दिलेले आहे. तसेच विरुद्ध बाजूला म्हणजे ' शिमेट्री ' म्हणून तळहातावर शीर घेऊन पडलेले आमचे दुसरे सहकारी ! असा हा ग्रुप फोटो होता. साहेबांचा चेहरा किडच्याने खाल्ला ! पण तळहाती शीर धरलेला आमचा फोटो तजेलदार होता. खरो-खरच त्या साहेबाला नंतर पैसे खाल्ल्याबद्दल शिक्षा झाली व त्याचा चेहरा काळवंडलाच ! असो पण हा तळहाती शीर घेतलेला मत्स्याकृती फोटो –

फोटो पासपोर्ट अधिकाऱ्यांना भेदरून सोडेल व ते मला सरळ सागरातील मत्स्यांकडे धाडतील. म्हणून हा फोटो मी बाजूलाच काढला.

दुसरे ग्रुप फोटो म्हणजे समव्यावसाकांमधील ! व्यावसायिक आले की गणवेष आले. सारे साचेबंद कपडे घातलेले. गळा – छाती – मापलेले व त्याप्रमाणे कापलेले ! यामध्ये आपला माणूस ओळखून काढायचा म्हणजे दमयंतीने देवांमधून आपल्या नलाला पायावरून ओळखायचे. सारे देव दमयंतीला भांवावून टाकण्याकरिता तिच्या स्वयंवरात नलाच्याच युनिफॉर्ममध्ये आले होते म्हणे. शेवटी तिने तळपायावरून ओळखले – कोण नल व कोण देव ते. या साऱ्या युनिफॉर्मातील लोकांतून आपला माणूस ओळखायचा म्हणजे तळटीपेवरून. तळटीपेत नावे छापलेली – नाहीतर सारे सारखेच! फक्त मध्यभागी खुर्चीवर साहेब बसलेला असायचा ! पांढऱ्या फटफटीत अगर काळ्या किरमिजी कपड्यांत ! आणि त्याच्या बरोबर त्याची (?) मडम असायची ! हे फोटो काढणाऱ्या फोटोग्राफरची चंगळच असावी ! पैसे भरपूर ! काम किंवा फिल्म नसली तरी चालते. सगळ्यांना आधी तासभर रखडत ठेवायचे आणि मग म्हणावयाचे " रेडी – रेडी, वन्, टू. . ." आणि त्या काळ्यातांबड्या फडक्याखाली तोंड ढकलायचे व 'थँक्यू – थँक्यू' करीत 'क्लिक्' करायचे. फोटो येवो अगर न येवो. नगांस नग आले की बस! सगळे एकाच शिक्क्याचे चेहरे. पुढील रांगेत ते चेहरे बसलेले आहेत. तर मागील रांगेत या पुतळ्यांचा वरचा भाग. त्याच्या मागील भागात एक चतुर्थांश शरीरे व सर्वात उंच पाठीमागे डोकी नसलेली एकदोन डोकी ! फक्त स्टेन्सिल भरायची नुसते डोळे भरावयाचे. फोटो नाही आला तर चालेल. फक्त साहेब – त्याचा त्याच्या पायापर्यंतचा व तोंड न पाहता येण्याजोगा घातलेला हार आला तर चालतो. त्यांच्या पाठीमागे पण नेहमी पुढे पुढे करणारा व साहेबाच्या गादीवर डोळे असणारा नुसता दिसला म्हणजे झाले. बरे, त्या साहेबाला त्याचा तो जसा असेल तसा फोटो यायलाच पाहिजे असे वाटत नसते. कारण बहुतेक साहेब दिसायला तसे बेतावाताचेच (म्हणून नोकरीत आलेले असतात.) काणाक्ष साहेब कृष्णोपनेत्र घालून फोटोला बसतात. आणि हे साहेब फुले व हार यांनी कोमेजून जातात ! थोडक्यात म्हणजे असे हे गणवेशातील फोटो काढणाऱ्याची चंगळच ! सैन्य

किंवा वनाधिकारी किंवा रक्षक. पोस्टमन, रेल्वेगार्ड, तिकीट चेकर, हमाल युनियन यांच्या मेळाव्याच्या फोटोचे कंत्राट ज्याला मिळाले त्याचा भाग्योदय. फक्त एक साचा करून ठेवायचा व नंतर डोळे चिटकटावयाचे. त्यात कुणी एकाक्ष असेल तर 'आंधळा मागतो एक डोळा !' या फोटोग्राफरचा चेहेरा मूनलाइटमध्येही चकाकत असावा. वर्गणी भरपूर. खर्च काही नाही. वरे प्रत्येकाला एक आश्वासन दिल्यासारखे भासवायचे की तुझा फोटो जरा उठून आलाय. म्हणजे पोलिस – तिकीट चेकर काही काम असल्यास "मी आपणास सहाय्य करू ? May I help you ?" असे म्हणत फोटो हातात येईपर्यंत फोटोग्राफरची वडदास्त ठेवत असतो. तसेच या फोटोग्राफर लोकांन मुस्लिम महिलांचा मेळावा – हा ग्रुप फोटो भलताच फायद्यात. सगळीकडे गोषाच गोषा. एकाच गोषातील स्त्रीचा आकार सगळीकडे चिकटवावयाचा. अध्यक्ष तेवढा उघडा दाखवला म्हणजे झाले. राजस्थानी वनितामंडळाचा सामूहिक फोटो हाही किफायतशीर. सारेच घुंगट. फक्त अध्यक्षांचा घुंघट थोडा वरती झालेला दाखवायचा. तीच गत शीख वीरजी समाजाच्या छाया-चित्राची. एक दाढी व फेटा घातलेला आकार सगळीकडे ठसवायचा. पैसे मात्र मोजून घ्यायचे. असाच एका ग्रुपमधील फोटो आम्हाला मिळाला. परंतु पासपोर्ट अधिकाऱ्यांना हा ठशाचा अगर साच्याचा फोटो चालायचा नाहीच. आमच्या कनिष्ठ कार्यालयातील कर्मचारी त्यावर फारतर हार घालतील. पण पासपोर्ट अधिकारी संतापून जातील. वरे हा फोटो "आमचा" म्हणायचा याचे कारण आम्ही वर्गणी दिली होती म्हणून. नाहीतर तो असाच –फक्त डोळे चिकटवलेले – शरीर दुसऱ्याचे !

नंतरचे आमचे फोटो म्हणजे सहलीचे अगर ट्रिपचे ! सहली आयोजित करण्याची विद्या आम्ही आमच्या इन्फंटमधील शिक्षिकेकडून घेतली. आमच्या वर्गशिक्षिका महिन्यातून एकदा सहल काढीत. सहलीला प्रत्येकाने डबा आणायचा. आणि बाईंचा डबा अर्थात नसायचा. प्रत्येकाने आपआपल्या आईला सतवायचे व डबा तयार करून घ्यावयाचा. मी तर ओक्साबोक्सी रडायची ! मग आई तीन तीन जिन्नस तयार करायची. लाडू तर तीन लाडू. पोळी तर तीन पोळे. मी दोन खाणार व एक बाईंना. लहानपणीच आम्हाला बाईंचा लळा लागलेला. आणि या बाई या सहलीला. प्रत्येकाच्या डब्यातले

खाऊन चांगल्या गलेलठ्ठ झालेल्या. याच बाईंनी आम्हाला ट्रिप काढण्याची विद्या शिकवली होती. वर्गणी सर्वांची – ट्रिप व त्यातल्या त्यात छायाचित्रे माझी ! अगदी पहिल्याच सहलीमध्ये माझा अर्धा अगर अर्धवट फोटो काढला होता. डोळ्यावर कृष्णोपनेत्र ! एक चट्टयापट्टयाचा पोलका व 'आता एकदम पाकिस्तानने युद्ध पुकारलेय असें' ज्यावेळी शास्त्रीजींना–सांगणेत आले त्यावेळी शास्त्रीजींचा चेहरा कसा असावा – त्या चेहेऱ्यासराखा माझा चेहरा त्या फोटोत आला होता. कृष्णोपनेत्राची फॅशन चक्रवर्ती राज-गोपालाचारी, नेपाळ-नरेश, म्हैसूर-नरेश यांचेकडून वऱ्याच चक्रम्वर्तींनी घेतलेली ! आम्ही असेच एक चक्रम्वर्ती ! आमचा फोटो पाहिला की कुणा-लाही वर्तमानपत्रातील जाहिरातीची आठवण यावी–

"हरवला आहे– गव्हाळ वर्णी, पांच साडेपाच फूट उंच. कालपासून कुणासही न सांगता घरातून निघून गेला आहे. कुणी पत्ता दिल्यास पन्नास रुपये बक्षीस."

आणि शेवटी खालती टीप–

"चि. बाळू यास–

तू घरातून निघून गेल्यापासून ती. आई जेवलेली नाही. बाबा काळजीत आहेत. तुला हवे ते मिळेल. पण ये.

पुरा. . . . !"

या जाहिरातीत एक ठराविक टाइपचा फोटो येत असतो – अगदी तेच तेज माझ्या फोटोतील चेहेऱ्यावर. अर्थात् हल्ली आम्ही घरातून जाण्याचा प्रसंग विरळाच. (वाटते पुष्कळ वेळा) पण आमच्याकरिता जेवण्याशिवाय राहणारे कुटुंबीय नाहीतच. आमचे कुलदीपक ऑबेरॉयच्या छत्तिसाव्या मजल्यावर जाऊन आपले वडील हरवल्याचे दुःख हलके करतील. आणि आमचे मित्र अगर बंधू सहस्रकुक्कुट भोजन घालतील ! असो. पण हा फोटो आम्ही हरवलो अगर घरातून निघून गेलो तर उपयोगी. एरवी पासपोर्टला चालायचा नाही.

कालान्तराने आम्ही भारदस्त झालो. म्हणजे आम्ही स्थूल होऊन पृथ्वी-मातेवरील भार वाढला. त्यावेळी अशाच एका सहलीत कोट-टोपी घालून

आमचे छायाचित्र काढण्यात आले होते. ते छायाचित्र पाहिल्यावर नुकत्याच हातातून बाजूस केलेल्या वर्तमानपत्रातील जाहिरातीची आठवण आली. कोणत्यातरी लोकप्रिय जर्दा का विडी का दंतमंजन कारखान्याचे संस्थापक अकाली (जख्ख म्हातारा झाला असला तरी 'अकाली') देवाघरी गेले होते. त्यांचा फोटो देऊन खालती – " त्यांची प्रेरणा आम्हास सदैव स्फूर्तिदायी ठरो" म्हणून घरातील झाडून साऱ्यांची नावे (अगदी त्या एकमेका-मध्ये वकिलांमार्फत नोटिसा-प्रतिनोटिसा व नंतर फौजदारी प्रकरणे चालत असली तरी) " व इतर परिवार " असे लिहिले होते. अगदी तशा फोटोला एकदम फिट् बसणारा हा आमचा फोटो होता. अर्थात ते अकाली देवाघरी गेलेले कुणीतरी कारखानदार होते. म्हणून खालती एका कामगार पुढाऱ्याचेही नाव छापून आले होते. आमचा कारखाना म्हणजे सुख महान असणारे लहान कुटुंब व पंचवीस तारखेला बंद पडणारा. आम्ही अकाली किंवा अगदी शतायू होऊन जरी या पृथ्वीवरून गेलो तरी असा प्रेरणादायी फोटो वर्तमान-पत्रात आमचे कुलदीपक देतील असे वाटत नाही. सध्याच नाव लावताना आमचे बालराजे फक्त आपलेच नाव लावतात. हेमन्तकुमार, बस् बंगाली किंवा उत्तरभारतीयाप्रमाणे वडिलांचे नाव लावायचे नाही. सध्याच आम्ही मृत आहोत. तर वर्तमानपत्रातून फोटो देऊन संस्कार जाहीररीत्या प्रकट कोण करणार. असा या जाडचा फोटोचा अयोग नाही. आमच्या आत्म्याच्या शांतीचे सोडाच – पण पासपोर्ट अधिकाऱ्यांची शांती होणे – या फोटोमुळे तर केवळ अशक्य.

सहलीच्या वेळी – मात्र मनाने केलेल्या सहली जास्त उठून दिसत होत्या. उदाहरणार्थ आम्ही एव्हरेस्ट शिखर पाहिले नव्हते. पण मी गिर्यारोहकाचा वेष घातला आहे व खाली " एव्हरेस्टच्या तयारीत " असे लिहिलेले आहे– असा फोटो, किंवा "समुद्रपर्यटनाच्या तयारीत" किंवा "अथ विमानमार्गेण " –असे छायाचित्र. कधीतरी कोणत्यातरी टेकडीवर बसून मी दुर्बिणीने काही टिपतोय्. कधी काश्मिरी टोपी–तर कधी कालिकतची लुंगी; कधी कोल्हापुरी फेटा तर कधी कलकत्त्याची शाल – नानारत्ना वसुंधरा आमच्या देहयष्टी-

वरून बाहेर पडलेली ! थोडक्यात म्हणजे नेहेमीचे शिक्षक आले नाहीत की पोरांना एक निबंध लिहायला देतात ना "मला कोण व्हावेसे वाटते" – त्या निबंधात जे आम्ही लिहू (खरे सांगायचे म्हणजे मी कधीच निबंध लिहीत नसे. दुसऱ्याचे कॉपी करी. कारण कॉपीराइट वॉज माय वर्थराइट – आणि त्या दुसऱ्यानेच माझी कॉपी केली अशी कागाळी करे ! ) – या निबंधातील सर्व इच्छा या सहलीच्या फोटोत येत असत. उदाहरणार्थ मला शिवाजी महाराज व्हावेसे वाटे. म्हणून माझा अश्वारूढ फोटो सहलीत काढून घेतला. हा अश्व म्हणजे मरतुकडे तट्टू ! त्या घोडेवाल्याने आठ आणे किंवा पन्नास पैसे घेतले होते आमच्या मुलाला बसवण्याकरिता. पण आमचा मुलगा रडू लागला. पण आठ आणे का सोडा, म्हणून मी त्या तट्टावर बसलो होतो. केवळ मालकाला पन्नास पैसे मिळतात म्हणून ते मरायला आलेले तट्टू माझा ढीग कसाबसा सावरत होते. ते केविलवाण्या नजरेने पाहतेय आणि मी मात्र दिग्विजयी छत्रपतीच्या नजरेने पाहतोय. बाजूला आमच्या सोयराबाई व शंभूराजे उभे ! गजारूढ मी ! चंद्रकोरीत बसलेला मी ! भिल्लाच्या वेषातील मी ! सौभाग्यलक्ष्मीबरोबर उघडचा मोटरीतील मी – जसे पंडीत नेहरू व केनेडी किंवा उच्चपदस्थ राजमार्गातून जात असतात तसे – तर कधी मेलेल्या वाघाबरोबर बहाद्दर मी ! सहली अगदी जवळपासच्याच असल्या तरी मी सर्व देशांचीच सफर केली आहे असे वाटावे म्हणून माझ्याच एका सहचऱ्याला "पंजाब-सिंध-गुजरात-मराठा" असे कपडे घालून त्याच्याबरोबर मी माझे फोटो काढलेत. पण काही काही वेळेस मात्र मी ताजमहालमध्ये नूरजहाँच्या कबरेजवळ बसलोय. तसंच रायगडावर आबासाहेबांच्या सदरेवर जाऊन आलोय. दिवाण-इ-खास मध्ये बादशहाच्या हमामखान्यात – तर शनिवारवाड्यात मस्तानी महालात ! – तसेच आळंदीला जाऊन अजानवृक्षाखाली बसलो. इंद्रायणीजवळ तुकाराम जिथे बसले तिथला फोटो आहे. कात्रजच्या घाटात फोटो घेतला आहे. पण यावेळी आमच्या सौ. आमच्याबरोबर होत्या ! सहलीच्या वेळी काही नाजूक रेशमी धाग्याइतके नाजूक फोटोही घेतले गेले आहेत. उदाहरणार्थ मी चिंचेच्या झाडावर चढलो आहे आणि काही सख्या चिंचा गोळा करीत आहेत. मी कोणत्यातरी झाडा-

खाली बसून पावा वाजवीत आहे व कुणीतरी कान देऊन (गाय-बकरी नव्हेत) ऐकत आहेत. मी आंधळी कोशींबीर खेळत आहे. सहलीत मी व असेच कुणीतरी कुणा एका मैफलीत काहीतरी भाषण का संभाषण करीत आहोत. असो ! माझी अनेक अनेक रूपे. गीतेत श्रीकृष्णांनी सांगितल्याप्रमाणे मीच सर्वांत भरून आहे ! तपस्वी मी ! सायकलवाला मी ! संन्यासी मी ! गृहस्थी मी ! लेंढारातील मी ! पण पासपोर्ट अधिकाऱ्यांनी फक्त एकच रूप हवे. विश्वरूपदर्शन त्यांना नको !

मग काही फोटो असे प्रासंगिक होते. उदाहरणार्थ मी भाषण करतोय् असा. ध्वनिवर्धकापुढे मी उभा आहे एवढाच. पुढे सभा होती का काय हे माहीत नाही. पण 'वक्ता दशसहस्रेषु' हा फोटो. तसाच अभ्यासिकेत घेतलेला माझा फोटो ! हा माझा फोटो पाहिला तर माझ्यासारखा चिंतनशील कुणी पृथ्वीवर नसेलच असे वाटावे. पण चिंतन कसले असावे याचा उल्लेख करून लेखणी विटाळट नाही. तसेच एकदा सौ. ला भरतकाम करावसे वाटले. म्हणून मी काही बिल्ले घेऊन माळ घातली व त्याचा फोटो काढून घेतला होता ! मी थोडाफार धार्मिक व सर्वधर्मसहिष्णू असल्यामुळे माझे नानाधर्मिय फोटो काढून घेण्यात आले होते. एकदा तर महंमद पैगंबरांचा मी कट्टा अनुनायी होतो. तर काही दिवसांनी गायत्रीचे पुरश्चरण मी केले आहे, असा फोटो घेतला गेला होता. एकदा पार्श्यांचा झेंडा अवेस्ता हातांत घेऊन लांब कोट व टोपी घालून मी फोटो काढवून घेतला. दुसऱ्या वेळी तर बायबल घेऊन माझा फोटो निघाला आहे. यावेळी मात्र माझ्या मनात 'मेरी' चाच विचार होता असे वाटते. ही मेरी त्या वेळी आमच्या शेजारीच राह्यची व ही 'मेरी' (हिंदी अर्थाने) केव्हा होईल असे मला सारखे वाटायचे. आम्ही बाप्तिस्मा घ्यावयास त्यावेळी उद्युक्त झालो होतो. कालांतराने या मेरी – कुमारी असतानाच प्रसूत झाल्या व आता कोणत्यातरी इस्पितळात नरसाबाईंचे काम करीत आहेत ! सांगायला नकोच की हे सगळे फोटो पासपोर्टला 'कंडम' च.

नंतर एकदम जाडजूड आल्बम निघाला तो रंगभूमी ज्यावेळी आम्ही रंगवून सोडली त्यावेळचा ! कॉलेजातील गॅदरिंग किंवा गणेशोत्सव तसेच कोणत्या-तरी 'ऐक्यवर्धक' 'हितेच्छू' अगर मित्रमंडळ समाज यांच्या समारंभातील नाटकातील प्रसंगाचा, शाळेत असताना रडून रडून राणीच्या सेवकाचे काम

मला कुठे मिळाले होते. राणी काही आली नाही. नाटकात काम करण्याबाबत तिच्या घरी तिच्या आईवडिलांचे चांगलेच जुंपले होते. आणि त्यामुळे ती काही आली नाही. म्हणून ऐनवेळी आमच्या मास्तरीणबाईंनी राणीसरकारचे काम केले. मी मात्र सेवक झालो होतो. पण मास्तरीणबाई राणी होत्या हे विसरून कानफाटीत मारीत आणि मग कुठे हेडमास्तरांनी त्याना दटावले त्यावेळी त्यांचा 'शामा' (शाळा मास्तरीण) पद विसरून महाराणीभाव जागृत झाला. तसेच एका नाटकात मला विश्वामित्राचे काम दिले होते. मी जवळ जवळ उघडाच ! कुणातरी मेनकेसमोर उघडे बसायचे म्हणून आम्हाला 'कसेसेच' वाटू लागले. आमच्या डायरेक्टरनां — मराठीच्या गुरुजींना — वाटू लागले की मेनका येणार हे माहित असल्याने मी डोळे उघडेच ठेवेन. खऱ्या विश्वामित्राला मेनका येणार हे माहित नसते. पण आम्ही विश्वामित्राचे काम करणारे — डोळे उघडेच ठेवू लागतो. कारण सुंदर मेनका आता येणारच आणि याकरिताच आम्ही घोर तप करीत होतो. त्या मेनकेसाठी आम्ही विश्वामित्राचे पद मिळविले होते, आणि अशी मेनका येणार मग डोळे का बंद करावयाचे आम्ही? डायरेक्टर गुरुजींच्या हे नजरेला आले आणि त्यांनी एका 'वापय' मिसरूड फुटलेल्या पोराला मेनकेच्या वस्त्रात गुंडाळून आमची तपश्चर्या भंग करण्याकरिता धाडले. मग काय विचारता ? 'इश्वामित्राची' जी समाधी लागली ती फोटो घेतल्यावरही उतरलेली दिसत नव्हती. असो तसंच एका मत्स्यगंधेबरोबर मी 'जाळ्यात अडकला मासा' या द्वंदगीतात काम केले आहे. सध्या त्या मत्स्यगंधा मत्स्यसंचालनालयातील एका अधिकाऱ्याच्या गळ्यातील मासा झाल्या आहेत व त्यांच्या गळ्यात सोन्याचा मासा आहे. असू दे. एका नाटकात राजा असून मी भीक मागतो आहे असा फोटो होता. एका स्त्रीपात्रविरहित नाटकात मी कंचुकीचे काम केले आहे ! काही नाटकातून मी चोराचे काम फार झक्कासपैकी वठवले आहे. सुमेरसिंग गारद्याच्या भूमिकेत माझा एक फोटो आहे. पण जीवन ही जरी रंगभूमी असली तरी हे रंगभूमीवरील फोटो पासपोर्टला चालणार नाहीत.

दुसरा मोठा आल्बम निघाला 'लगीन घाईचा' — चांगला जाडजूड ! पहिल्यांदाच माझा मित्र व मी असा स्मितहास्यातील फोटो होता. फोटोवरील

भाव कुणालाही कळेल असाच– की आताच राष्ट्रपतीची निवडणूक झाली आहे व मी बहुसंख्य मतांनी निवडून आलो आहे. सारे लोक माझे अभिनंदन करताहेत. विशेषत: पंतप्रधान माझे अभिनंदन करीत आहेत. आणि मी विनयाने "कसचे ! कसचे ! हे तो श्रींची इच्छा" असे पुटपुटत आहे व आतून मात्र "मी या जगाचा राजा आहे आता. जिरली की नाही सगळ्यांची (विशेषत: शेजाऱ्यांची व नातेवाइकांची) हा अगदी ओसंडत असणारा भाव ही दृष्टी त्या फोटोतील. नंतर आम्हाला व आमच्या सासुरवाडीला जोडणारी व थोड्याच दिवसांनी फोडणारी एक मंथरा मला आशीर्वाद देत आहे असा ! आमच्या सौ. चा मावसभाऊ का आतेभाऊ व त्याचा आतेमामेभाऊ माझ्या दोन्ही बाजूंना उभे आहेत पण दृष्टी दुसरीकडे, असा एक फोटो होता. लग्नात लोक आइसक्रीम खात आहेत. कुणीतरी कुणाला तरी वधूपित्याच्या जिवावर फुकटचा आग्रह करीत आहेत. कुणी मिरवीत आहे. कुणी गुजगोष्टी, कानगोष्टी करीत आहेत. सासू-सासरे रडत आहेत. विहिणबाई गुळाच्या ढेपीवर बसली आहे–वगैरे . . .

हे सगळे फोटो पाहिले. कोणताच योग्य नव्हता. आता फोटो काढून घ्यायलाच पाहिजे. तरी काही लहान लहान फोटो यायचे थांबलेच नव्हते. हुकमाची तामिली होत होती. एक लहानसे पुडके निघाले, ते होते फिल्मसचे. पाहतो तो त्यात एक्स रे फोटो होते. दंताजींनी ठाणे सोडण्याची नोटिस दिली होती त्यावेळचे ते क्ष-रश्मी फोटो होते.

शेवटी वाड्यातील कुणी होतकरू फोटोवाला आहे काय हे विचारायला पाठवले. एकाने चक्कच सांगितले "फिल्म संपली". दुसऱ्याने कळविले की फिल्म रंगीत आहे. सर्व फोटो काढून झाले की फिल्म परदेशात पाठवली जाईल व तिथे डेव्हलप होईल व नंतर फोटो मिळेल. म्हणजे फोटो काढलेनंतर एक महिना थांबावे लागेल. तिसऱ्याचा निरोप आला की पासपोर्ट साइजचा फोटो नाही. फोटो निघेल पण फार बारिक साइजचा. चौथ्याने सांगितले "घरी येऊन आम्ही फोटो कधीच काढत नसतो. आम्ही गरीब असू पण स्वाभिमानी आहोत."

हे सगळे ऐकून आम्ही ठरविले की आपणच स्टुडियोत गेलेले बरे. स्टुडियोही पुष्कळच. 'गुरुदत्त' 'चंद्रकिरण' 'राजकपूर' – असे. आम्ही त्या दत्तगुरु स्टुडियोत गेलो.

सांगायला नकोच – आमच्यासारखे बरेच प्राणी तिथे ताटकळत होते. आमच्या साहेबांचा फोटो टांगत होता. आमच्या कार्यालयातील लघुलेखिका आपल्या वाग्दत्त पतिदेवाबरोबर चंद्रकोरीमध्ये उभ्या होत्या. सध्या त्यांचे विवाहविच्छेदनाचे काम सुरू आहे, आणि थोड्याच दिवसात घटस्फोट मिळेल. काही पुढारी मंडळीही त्यामध्ये दिसली. सतत १०१ तास सायकल चालवणारा त्या लोकांमध्ये मध्येच कुठेतरी होता. कुणीतरी बालयोगी होते ! काही दांपत्यांचे फोटो होते. म्हणजे काही वेळेस लक्ष्मी खुर्चीवर बसलेल्या तर नारायण उभे. तर काही वेळेस दोघेही लक्ष्मीनारायण खुर्चीवर बसलेले. काही वेळेला लक्ष्मीनारायण मोटरसायकलवर बसलेले.

" आपला रंगीत फोटो काढायचा का – थोडी फिलम शिल्लक आहे म्हणून विचारतो " फोटोवाल्याने विचारले मी शांतच होतो. दुकानात कुणी दुसरे नव्हते.

त्याला हे गिऱ्हाईक सोडायचे नव्हते. म्हणून अत्यंत आर्जवाने व निरनिराळ्या तऱ्हेच्या हास्याने तो माझे स्वागत करण्याचे प्रयत्न करू लागला.

" कार्डसाइज " – त्याने तिथंच टांगळलेल्या एका 'सरोज' नी च्या फोटोकडे बोट दाखवित विचारले.

मी शांतच. कारण मी याचा आश्रयदाता आहे ही भावना ! परत दुसरे फक्त दोनच दंतकळ्या दिसतील असे हास्य मुखकमलावर फेकीत तो विचारतो.

" कशाकरिता फोटो हवा आहे ? पोर्ट्रेट काढायचे ?" आता कुठे मी बोलायचे ठरविले.

" पासपोर्टसाठी. " शक्यतो 'तार' स्वरात.

" हो – हो – मिळेल . . .मिळेल" आता पुन्हा निराळेच स्मितहास्य फक्त खालचे दोन व वरचे दोन दात दिसावेत असे.

मी जरा गुरमीचा पारा थोडा वाढवलाच. हा फोटोग्राफर जरा नरमाईत आहे मग अहंकाराचा ॲक्सिलरेटर दाबायला हरकत नाही हा विचार.

" पण लवकरात लवकर पाहिजे ".

" मग काय – हे विचारणे झाले. शक्यतो लवकर " नवनीतापेक्षाही मृदू व मुलायम आवाजात व यावेळी वेगळे हास्याचे शॅम्पल !

आता पुन्हा गुरमीचा ॲक्सिलरेटर दाबला. पुन्हा आबासाहेबांच्या आवाजात बोलता झालो–

"पण हे पाहा, माझा फोटो हा टांगळता जाता कामा नये. माझ्या फोटोचे असे प्रदर्शन मला खपत नाही."

जणू मी फारच मोठा – पण त्याचवेळी अहंकाराचा वारा चित्तापासून दूर ठेवणारा असा ! आणि माझ्या साहेबाचा फोटो तिथे लटकावलेला होता म्हणून त्याच्यापेक्षा मी मोठा – अगर विशेष हेही जाता-जाता मला दाखवायचेच होते. एरवीतेरवी साहेबापेक्षा मी मोठा आहे हे दाखवण्यास जागा नव्हतीच.

"असं-कसं साहेब – आपल्यासारख्याचा फोटोजेनिक चेहेरा असलेला फोटो आम्ही ठेवायचा नाही तर कुणी ?" पुन्हा एक हास्याची लकेर. व मला चढवत चढवत 'आता हे सावज हातात पडणारच' या रीतीने कसा गळ टाकला असा विचार करीत असावा तो फोटोग्राफर. माझा फोटोजेनिक चेहरा आहे, हे ऐकून आमच्या चेहेऱ्यांवर थोडा प्रकाशच आला होता. पण एकदा गुरमीचे बटण दाबले होते ते खालती कसे आणायचे ? म्हणून जरा जास्त गुरमीत.

"ते काही नाही – माझा फोटो येथे लावायचा नाही – तरच मी फोटो काढून घेईन." मी जरा 'स्ट्रिक्ट' आवाजात. मला पूर्णपणे माहीत की या गावात मला ओळखणारे तसे कोणी जास्त नाहीत. आणि याने दररोज फोटो लावला तर कोण पाहायला येणार आहे ? मला काही दररोज या स्टुडियोत जायला वेळ नसणार.

"बरे...बरे..." तो फोटोग्राफर अत्यंत काकुळतीने. मी इतक्या गुर्मीत बोलत आहे आणि तो फोटोग्राफर प्रत्येकवेळी रेडिमेड व्हरायटीचे हास्य टाकीत बोलत आहे हे पाहून माझ्यातील औरंगजेब जागा झाला. मी पुन्हा जरा रागाने बोललो.

"हे पाहा-माझा फोटो मी जसा आहे तसाच हवा. मी सिनेमा-नट नाही किंवा कॉलेज स्टूडंट नाही. माझा फोटो माझ्यासारखाच हवा."

आता तो फोटोग्राफर वितळला.

" हो-हो – सारे मान्य. आपण आत चला."

मी आत जायला तयार झालो. माझ्या गुर्मीने जरा फोटोग्राफरवर परिणाम झाला तर, हे पाहून बरे वाटले. आत अंधाऱ्या रूममध्ये गेलो. आणि आता माझा संभाजी झाला. औरंगजेब आता तो.

" हं, तिथं बसा." त्याने माझ्याकडे डोळे वटारीत हात अक्षरशः उगारीत सांगितले.

मी बसलो. आणि एकदम भपकन प्रकाशाचा झोत त्याने माझ्या चेहेऱ्यावर टाकला.

" हां हां. . .घाबरायचं काय त्यात." मी मघाशी ज्या गुर्मीने बोलत होतो. त्याच गुर्मीने तो बोलत होता.

" हे सरळ पाहा. . .सरळ. . .सरळ म्हणतो ना " जरा जास्त गुर्मीत."

परत त्याने माझी मान हातात धरली आणि जरा तिरपी केली.

आणि पुन्हा हुकूम सोडला " हंसा आता."

माझ्या मानेशी खेळ करणाऱ्या व मला पटापट हुकूम सोडणाऱ्या या फोटोग्राफरला चांगला बुकलून काढावा अशी माझी इच्छा झाली होती. तर मी हसणार कसला ? कपाळ !

तोंडावर थोडे हंसू आणले.

" अहो असे नाही हंसायचे. "

माझी पत्नी देखील मला कसे हंसायचे सांगत नसे आणि हा सांगतोय् काय!

पण शेवटी हसणे आणले.

रेडी-रेडी करीत त्याने अर्धा तास मला अंधारकोठडीत ठेवून एकदाचा फोटो काढला !

पण नंतर ती निगेटिव्ह कशी झालीय् हे पाहायला तो गेला. आणि मी मात्र तिथे एकटाच.

तोच कुणीतरी-बहुधा काल गावात रंगीत बारी आली होती तीमधील कुणीतरी मंजुळा आत आली व नखराईने मलाच विचारूं लागली–

" साहेब कालचा माझा फोटू बेस आला न्हवं ! " मी थरकांपू लागलो. आता हा फोटोग्राफर आला तर याच खोलीत या मंजुळेबरोबर माझे छायाचित्र घेईल व कोणत्या तरी " भारत " फोटोत चिकटवून टाकेल.

मी चट्दिशी बाहेर आलो. ती मंजुळाही "भाएर" आली.

तोच तो फोटोग्राफर आला.

"साहेब, फोटो व्यवस्थित आला. पण एक डोळा जरा व्यवस्थित आलेला नाही. परत एक घ्यावा लागेल."

मी स्पष्टपणे सांगितले, "जसा असेल तसा पाठवून द्या. मला आता नवीन फोटो घ्यायला वेळ नाही." मी तडक घरी आलो. परत नवीन फोटो म्हणजे परत अंधार कोठडी. परत या चांडाळाचे "जरा अशीच मान करा-जरा तिकडे डोळे करा. जरा हंसा हसा—" कुणी सांगितले! जसा असेल तसा फोटो येवो.

दुसऱ्या दिवशी कुणाला तरी फोटोग्राफरकडे पाठविले. तो कळले की फोटोग्राफरवर घराच्या भाड्याकरिता कुणीतरी दावा लावला आहे आणि त्या दाव्यात जप्ती घेतली आहे. आणि त्या सामानात आमचाही फोटो जप्त झाला आहे !

शाबास !—

आमचे प्रस्थानपत्राचे काम लांबले हे सांगणे नकोच.

□ □ □

# दिव्या दिव्या दीपोत्कार

"शुभम् करोति व दिव्याला पाहून नमस्कार..." हा संस्कार आम्हा दिवट्यांवर लहानपणीच झालेला ! आपण दम फुटेपर्यंत खेळायचे आणि दुसऱ्याचा डाव अगर इनिंग देण्याची पाळी आली की "चला दिवे लागले... आता शुभम् करोति म्हणायचे" असे म्हणत म्हणत आम्ही तसाच खेळ टाकत असू, व ही दिवेलागणी आमच्या फायद्यात पडत असे. तसेच रात्री कुणीही पैसे मागायला आला—जरी रात्रीच्या नाटकाची तिकिटे असली तरी—मी "दिवेलागणीनंतर पैसे द्यावयाचे नसतात..." या तत्त्वाचा आधार घेत असे. वास्तविक कोणाचेच घेतलेले पैसे परत देऊ नयेत. या तत्त्वाचा मी—रात्र असो वा दिवस ! पण एकदा दिवे लागले की 'लक्ष्मी जाऊ द्यायची नाही' म्हणून दिवे लागले की पैसे न देण्याचे कारण लोकांना पटे. आता निशाभोजन व वस्त्रत्याग नृत्यांना (कॅबेरा-स्ट्रिपटीज) मात्र पैसे देताना हे दिवेलागणीचे तत्त्व बाजूला करावे लागेल. कारण अशा हॉटेलात दिवे हॉटेलचे ज्या वेळी उद्घाटन होते त्याच वेळी लावलेले असतात. व माझ्यासारख्या 'तत्त्वा'च्या माणसांना मग हॉटेलात प्रवेशच बंद ! असो. दिवेलागणीप्रमाणे दिवे जाणे हेही आम्हाला नफादायक झाले आहे. पुष्कळदा दिवे मुद्दाम घालविले आहेत. पुष्कळदा आपोआप गेलेले आहेत. दिव्याने न प्रकाशणे—हेच आमच्या जीवनात प्रकाशदायी ठरलेले आहे.

आमच्या या अंधारी आयुष्यात दिव्याने अनेकदा दिव्यत्व आणले आहे. सायकलला दिवा नसल्याने माझ्यावर जितक्या केसिस् झाल्या असतील तितक्या टिळक व गांधी यांच्यावरही ब्रिटिश सरकारने केल्या नसाव्यात. मोटरचे फुललाइट, स्कूटरवरील लाल धोक्याचा दिवा, या गोष्टी म्हणजे माझ्यावर केस भरण्याच्या जागा ! त्रुटी असायचीच ! दिवे म्हणजे कोर्टकेस

असे हल्ली झालेय खरे माझ्याबाबत ! महाराष्ट्र विद्युत मंडळानेही आमच्यावर वीजबिलाकरिता केस भरली आहेच. पॉइंट मंजूर नसताना पॉइंटवर दिवा घेतला – अशीच काहीतरी.

समई, पणती, 'खंदील', बॅटऱ्या-टयूबलाइट हे आपआपल्या परीने येऊन आमच्या जीवनात तेवून गेले आहेत. समई तर हल्लीच्या आमच्या 'मुबारक-मंझिल' मध्ये नाहीच. कारण घरचे देव थोरल्या भावाकडे असतात. नाहीतर ही जबाबदारी व ते सर्व देवकार्य करण्याचा कार्य-भार कुणी करायचा ? म्हणून समई, देवघर, हे प्रकार आमच्या घरी नाहीत. नाही म्हणायला एक लाकडी समई व त्यावर झीरो पॉवरचा बल्ब व समोर स्वामी विवेकानंदांचा फोटो असे एका कोनाडयात आमच्या बालराजांनी लावले आहे. पणतीतर सध्या शहरात कोणत्या तरी पक्षाची निशाणी म्हणूनच अस्तित्वात आहे. खऱ्या मिणमिणत्या मातीच्या पणत्या आता गेल्या. – आता आल्या मेणाच्या पणत्या. आमच्या जीवनात पणती आली असेल ती एकदाच. शाळेच्या गॅदरिंगला एका 'ज्योती' चे गाणे होते. बहुधा 'घरि एकच पणती मिणमिणती' हेच. आणि या ज्योतीला घरातून निघायला वेळ झाला. आमची अशा प्रसंगात लोकांना मदत करायची तयारी नेहमीचीच. आम्ही या ज्योतीला सायकलवरून नेले. वाटेत या मिणमिणत्या पणतीचे गाणेही गुणगुणत होतो. त्याच्यानंतर त्या ज्योतीचा अगर पणतीचा संबंध आला नाही. पण एका ज्योतीने अनेक ज्योती लागाव्यात तसे एका ज्योतीचा आकाशदिवा तयार करायचे काम मला मिळाले होते. आणि अशाच दोन तीन ज्योतींचा आकाशदिवा मी तयार करून दिला. आकाशदिव्यासाठी खर्चही केला असावा. अर्थात त्या वयात या ज्योतींवर सर्वस्व ओवाळायला मी तयार होतो. आता आकाशदिव्यावर खर्च करायचा म्हणजे तिकडून आवाज येतो –

"एवढे आकाशदिवे काय करायचे म्हणते मी ! मागे घेतला आहे ना, तोच पुरे. पैसे तरी खर्च किती करायचे . . ."

हा आवाज ऐकल्यावर आमच्या उत्साहाची ज्योत मालवते. कारण हा 'आवाज' आहे – ज्वालेचा. आमच्या सौ. चे नाव ज्वाला आहे ! ज्वालेपुढे ज्योती मंदावतेच. नंतर कळले की पूर्वीच्या एका ज्योतीने कुणा ज्योतीबाशी का ज्योतीरावाशी विवाह केला आहे.

'खंदील' जुना झाला. पण आमच्या आयुष्यात त्याने एकदा भडका उडवला आहे. कोणत्या तरी कुग्रामात आम्ही अधिकारी म्हणून अचानक तपासणीकरिता गेलो होतो. अर्थात रात्री आकंठ कुक्कुटभोजन झाले व मुक्काम ठोकावा लागला. गावात वीज नव्हती कुक्कुटाला इच्छेविरुद्ध मरण आल्यामुळे तो पोटात आरवू लागला. व आम्हाला 'खंदील' घेऊन माळावर जावे लागले. खंदील जमिनीवर ठेवला — आणि आमच्या कार्यक्रमाला सुरवात होते तोच त्या कंदिलाच्या प्रकाशामुळे तिथे एक सर्प आला. तो कंदिलाच्या जवळ आला. आमच्या दृष्टीला तो कृष्णसर्प पडला आम्ही टमरेल तसेच टाकले मात्र ... नंतरचे आमचे वर्णन आम्ही करत नाही. पण हा कंदिलाचा प्रकाश आमच्या ध्यानात चांगलाच ठसून आहे.

कंदिलाप्रमाणेच टेबल लँपनेही आमच्या स्मृतीत घर करून ठेवले आहे. राजा केळकर संग्रहालयात दिव्याचे दालन आहे ना. तसे अगदी टेबललँप करता स्पेशल दालन. कुठे सर्पाकृती टेबल लँप, कुठे सारंगीवाला टाइप टेबललँप कुठे उंटाच्या तोंडात दिवा—अशा टेबललँपची आवड आम्हाला. "अरे लोकांनी मुनशीपालिटीच्या दिव्यावर अभ्यास केला. आणि तुला टेबललँप कशाला रे. कसली पुस्तके वाचतोस टेबललॅम्पात" असे तीर्थरूप त्राग्याने बोलत. पण माझी टेबललँपची हौस दांडगी. माझ्या मावसभावाला हे माहीत. त्याचे नुकतेच लग्न झाले होते, व त्याला पुष्कळ टेबललँप प्रेझेंट म्हणून आले होते. त्याने मला सांगितले— "तू ये आणि कोणताही दिवा उचलून घेऊन जा." मी त्याच्यापेक्षा एका तपाने लहान म्हणून मजवर फार प्रेम त्याचे. मी एकदा त्याच्या घरी गेलो आणि एक सुरेखसा टेबललँप घेऊन आलो. माझ्या अभ्यासाच्या टेबलावर ठेवला. रात्री वडिलांनी तो टेबललँप पाहिला आणि जी मला थोबाडीत दिली ती अजून आठवणीत आहे.

"अगोदर तो टेबललॅम्प आणलास तसा परत नेऊन दे. असल्या टेबल-लॅम्पवरून अभ्यास होतो काय ? नाहीतर शाळाच बंद तुझी" इतके वडील चिडले होते.

मला नंतर कळले की तो टेबललॅम्प नवविवाहितांकरिता होता व दिवा मालवल्यानंतरच त्या लॅम्पचे कार्य सुरू होत होते !

रंगीबेरंगीही दिवे आमच्या आयुष्यात येऊन गेले. अनेक गणेशोत्सवात प्रकाशयोजनेचे काम मी केले आहे. नायिका आली की तिच्यावर सप्तरंग कसे व केव्हा उधळायचे हे मला चांगलेच माहीत. एका नाटकात पुरुषाने स्त्रीचे काम केले होते. त्यावेळी करुणरस आविष्कार करण्याऐवजी तो शौर्य अगर वीर्यरसाचा आविष्कार करी. नाटकातील भाषण पाठ नसले आणि कुठे तो विसरला तर अभद्र शब्द वापरून बीभत्सरसही प्रगट करी. अशा वेळी मला निरनिराळे दिवे पटापट लावावे लागत. मध्येच समजा कुठेतरी फ्यूज गेला की 'अंधेरेमे एक प्रकाश' कसा करावा याचेही ज्ञान मला होतेच. पुष्कळ गणपतींना मी निळ्या, फिकट निळ्या-लाल रंगात ठेविले आहे. पण गणपती पेक्षा कंपनी-अधिकारी यांच्या केबिनसमोर नेहेमी तांबडा दिवा असायला पाहिजे हेही तत्त्व मी दिव्यामुळेच शिकलो.

एका कंपनीच्या कार्यालयात मी माझ्या जावयाला चिकटवण्याकरिता म्हणून गेलो होतो. अधिकारी आमच्या माहितीचे होते म्हणून त्यांच्या केबिनमध्ये घुसलो. जावईबापूंना मी या आमच्या अधिकारी मित्राचे चांगले वर्णन ऐकवले होते. आम्ही आत गेलो आणि . . .पुढचे न सांगणे.

"बाहेर लाल दिवा नाही लागलेला ?" . . . असे त्यांनी शरमेने व त्राग्याने विचारले.

नंतर चौकशी करता करता कळले की विद्युतप्रवाह कुंठित झाला आहे म्हणून नित्याचा लाल दिवा लागत नाही. "साहेब कामात आहेत—आत येऊ नये" हे दर्शवण्याकरिता लाल दिवा लावायचा असतो. आणि त्या दिवशी तो लागला नव्हता. त्या खोलीत असलेल्या, लाल झालेल्या अशा एक विद्युल्लता तातडीने उत्तरीय सावरीत सावरीत बाहेर गेल्या. आमच्या जावईबापूंना तिथे नोकरी मिळाली नाहीच, हे सांगणे नलगे. पण तांबडा दिवा हा असा आमच्या जीवनात प्रकाशून गेला !

हिरव्या दिव्याशी माझा तसा विशेष संबंध आला नाही. ट्रॅफिक सिग्नला व रेल्वे गार्ड यांचा हिरवा दिवा लांबून पाहिलेला. या हिरव्या दिव्याने "पुढे जा" असे अनेकदा सांगितलेले. पण आयुष्यात आम्ही आहो तिथेच राहिलो.

पण आमच्या आयुष्यात दिव्याने एक जखम केली आहे तीच सांगून हे दीपमाहात्म्य पुरे करतो.

यथाकाल आमचे लग्न झाले. आणि . . .ते पुढचे सांगत नाही. पण आमच्या सौभाग्यलक्ष्मी ज्वाला (त्यांचे पूर्वीचे नाव उज्ज्वला होते. आम्ही लग्नाच्या वेळी नांव बदलणार नाही असा त्यांचा पण होता. आमचाही लग्न करणार नाही असा पण होता– पण शेवटी आमच्या थोरल्या वहिणीमध्ये व त्या लोकांमध्ये तह होऊन कु.उज्ज्वलाचे सौ.ज्वाला झाले व या ज्वाला पुष्कळदा आमच्या मनाला शांत करतात) व आम्ही शिनिमाला जायचे ठरले. लग्न झाल्यावर आम्ही आमच्या ज्येष्ठ बंधूकडे राहत होतो. घरापेक्षा घराबाहेरच वेळ घालवणे हे तत्त्व. आणि शिनीमा हेच तीन साडेतीन तास 'सुख संवादा' चे ठिकाण. अगदी मोठ्यातला मोठा वशिला लाऊन तिकिटे मिळवली. वशिला लावायचे कारण म्हणजे प्रत्येक थिएटरवर हाऊसफुल्ल ही पाटी लागलेलीच. अर्थात ती मुद्दाम लावलेले असायची की काय ते माहीत नाही. पण अशाच एका शिनेमाच्या कोपऱ्यातील दोन शीटा रिझर्व केल्या. शिनेमा कोणता हे आठवत नाही. पण सिनेमात आमचे लक्षच नव्हते. कोणताही शिनिमा असला तरी चालेल. पण 'यल्लमा' का 'मदालसा' असाच पौराणिक शिनेमा होता. यथाकाल शिनेमा सुरू झाला. लाइटस गेले व आम्ही आनंदी झालो. देवी सप्तशढीतील श्लोक

भो दीप देविरूपस्त्वं कर्मसाक्षी ह्यविघ्नाकृत् ।
यावत्कर्मसमाप्ति : स्यात्तावस्त्वं सुस्थिरो भव ।। आठवला–

( हे दिव्या तूं देवीरूप आहेस. तू कर्माचा साक्षी
आहेस. तू विघ्न आणणार नाहीस. माझे कर्म समाप्त
होईपर्यंत तूं सुस्थिर राहा. . )

असे मी मनातल्या मनात विझलेल्या दिव्याला विनवून प्रार्थना करू लागलो. दिव्या तू तसाच विझलेल्या स्थितीत राहा. ही प्रार्थना दिव्यांनी ऐकली वाटते!

सिनेमामध्ये यल्लम्मा अक्राळ विक्राळ रूप घेऊन आता राक्षसाला मारणार आहे असा भयानक प्रसंग आला आणि याच वेळी फिलम तुटली की काय कळत नाही. पण एकदम अंधार झाला. एकदम अंधार ! आंधळा मागतो एक . .बाहेर तरी कुठे जाणार. बाहेरचेही लाइटस् गेले ! ज्वाला व आम्ही तसेच (?) बसलो. पण आता बारा मिनिटे झाली, पंधरा मिनिटे झाली.

आता खरोखरच अंधाराचा कंटाळा आला ! ज्वालेऐवजी आता तोंडात धूर असावा असे वाटू लागले व आम्ही पिवळा हत्ती काढला व मुखारविंदी ठेवला. "अग्निदिव्यम् मुख कृत्वा" म्हणून धूम्रपान सुरू केले. कारण ज्वालेपेक्षा अगोदर माझी व पिवळ्या हत्तीची दोस्ती, हे विसरून कसे चालेल? धूम्रवलये सुरू केली –

–आणि तोच दिवे आले. तो राक्षस आला व यल्लम्मावर स्वारी करू लागला. ताबडतोब मी सिगरेट तोंडातून काढली व विझवण्याकरिता म्हणून खुर्चीच्या हातावर जोराने दावली. अगदी जोरात दाबून इकडेतिकडे फिरवू लागलो. सिगरेटचे जळते थोटूक कुठेही शिल्लक राहू नये म्हणून. आणि सिगरेट आपण ओढली हे कोणाच्या लक्षात येऊ नये. थिएटरमध्ये धूम्रपान करणे गुन्हा होता.

तोच "अयाई. . .अयाई. ." म्हणून कान फोडणारी किंकाळी आली.

मी सिग्रेट जोरात दावतोय व तशीच जोराची किंकाळी "आई आई आई– एकदम हृदयभेदक. जशी मी सिग्रेट दाबून विझविण्याचा प्रयत्न करीत आहे तशी जोराची मोठ्याने किंकाळी, लोकांना वाटले राक्षसाने यल्लमाला मारले, आणि तिची ही किंकाळी. तो पुन्हा जोराने मोठमोठ्याने किंकाळी ऐकू आली. सिनेमात भराभर लाइटस् लागले. व लोक काय झाले ते पाह्यला लागले.

तो पाहतो तो –

तो आवाज, ती किंकाळी 'ज्वालामुखी' होती. सौ. ज्वालाच्या मुखातून ती किंकाळी आली होती. व ती आता विव्हळत होती. मी जी जळती सिगरेट विझवली ती खुर्चीच्या हातावर नसून ज्वालेच्या हातावर. तिचा हात मी ओळखू शकलो नाही. मला वाटले – म्हणजे मी धरूनच चालला होतो की तिचा हात माझ्या अंगावर आहे. पण जसा सिनेमा सुरू झाला तसा तिने खुर्चीवर हात ठेवला होता. हत्तीच्या तावडीत असल्यामुळे मला तिचा विसर पडला होता. तिचा खुर्चीवर हात आहे की काय हे न पाहता मी सिगरेट विझवण्याकरिता त्या हातावर दाबले होती व जळती थोटूक राहू नये म्हणून मी ते तिच्या हातावर निर्धास्तपणे कुस्करीत होतो आणि तिने ही भयानक किंकाळी ठोकली होती.

नुकतेच लग्न झाल्यामुळे मला तिच्या किंकाळ्यांचा परिचय नव्हता. मला फक्त तिचे खुदकन हंसणे, लटके रागावणे. . इत्यादी इत्यादी परिचित. अशी किंकाळी ती मारेल व एवढी गगनभेदी ! यल्लम्मा शिनेमाचाच हा भाग असावा असे वाटले मला.

तिचा हात मी मघाशीच बराच वेळ हातात धरला होता तो हात डाग दिल्यासारखा झाला !

पोलिस आले. सिनेमागृहात सिगरेट ओढली म्हणून माझ्यावर खटला झाला. ज्वाला अज्ञान असावी–म्हणजे अठरा वर्षांखाली–याबाबत पोलिसांनी पुरावा घेतला होता. कारण अज्ञान मुलीशी विवाह जरी केला तरी तो एक कायद्यांत बलात्काराचा प्रकार ! ज्वालेच्या शाळेतील दाखला व जन्मकुंडल्या यात थोडी तफावत होती. शाळेत वय कमी लागले होते. जन्मकुंडली वेगळी, वर पक्षाला दाखवण्याकरिता वेगळी स्पेशल कुंडली केली होती. पण शेवटी सिनेमागृहात शिग्रेट ओढली या कलमाबाबत कोर्टात केस झाली ! बाकी कोणत्याही कलमाखाली खटला भरता आला नाही.

या दिव्यांमुळे हे सारे झाल्यामुळे आम्ही आमच्या पहिल्या सुकन्येचे नाव दीपा ठेवले. . .

दिव्या दिव्या दीपोत्कार !

□ □ □

# ट्रॅफिक स्टॉप

"अकरा वाजून अकरा मिनिटांनी...बरोब्बर अकरा वाजून अकरा मिनिटे....अकरा म्हणजे एक नव्हे. अकरा म्हणजे दहा किंवा नऊ झाले तर चालतील. पण भाऊराया, यावेळी लवकर या."

आमच्या भगिनी आम्हाला निक्षून आग्रह करीत होत्या. त्यांच्या ब्लॉकचे त्या पौर्णिमेस अकरा वाजून अकरा मिनिटांनी उद्घाटन होणार होते. शासकीय अधिकाऱ्यांनी केव्हा एकदा को-ऑपरेटिव्ह सोसायटीची नाव पाण्यात सोडली होती. बरेच कोर्टकज्जे होऊन आता इमारत पूर्ण झाली होती. त्यातील एक ब्लॉक आमच्या कनिष्ठ भगिनींचा. 'प्रथमम् वन्दे' या न्यायाने सर्वात प्रथम आम्हालाच आमच्या भगिनींनी हे आमंत्रण दिले. सहकारी सोसायटी म्हणजे त्यातील इमारतींची नावे एकदम अयथार्थनामा अशी ! नाव असायचे राजस. पण त्यात मेजॉरिटी असणार तामस लोकांची. अगदी शंभर टक्के ! त्यात सात्त्विक असायचा म्हणजे पायाचा दगडच तेवडा ! तद्वतच सोसायटीचे नाव पारिजात को-ऑपरेटिव्ह सोसायटी म्हणून मोठ्या वादाअंती ठरलेले असायचे. पण ब्लॉक–ब्लॉक्मधून स्वार्थाचा दुर्गंध दरवळलेला असणार. शांती को-ऑपरेटिव्ह सोसायटी म्हणजे बीभत्स व रौद्ररसाची गॅरन्टीच. प्रेमनगर म्हणजे द्वेष. गीता म्हणजे कलह. सहकारी सोसायटीचे जिवन्त किंवा व्यवच्छेदक लक्षण म्हणजे–त्यातील इमारतींची नांवे तीव्र विरोधी असणार. तरच ती को-ऑपरेटिव्ह सोसायटी. याला अपवाद म्हणजे हाजीअली को-ऑपरेटिव्ह....सारे हांजी हांजी करणारे किंवा गुरुप्रसाद हाउसिंग गुरूलाही प्रसाद देणारे. लो–इनकम सोसायटी–म्हणजे लो व इनकम असणारे. अमृत को–ऑपरेटिव्ह म्हणजे सारे अमृत पिणारे–असे अपवाद असतात

म्हणा ! अशाच कोणत्या तरी विरुद्ध नाव असणाऱ्या सोसायटीत आमच्या भगिनींचा ब्लॉक होता. त्यात विशेष असे की सोसायटीच्या प्रत्येक मेंबरच्या ब्लॉकमध्ये जर तो सोसायटीत आल्यानंतर नवीन अर्भकाने जन्म घेतला तर त्याचे नाव ते को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे राहणार होते. उदाहरणार्थ शिवशम्भो हे जर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीचे नाव असेल तर सोसायटीच्या पन्नास मेंबरांच्या घरात जवळ जवळ पाच ते दहा वर्षांत एक तरी शिवशंभो होणार; नाहीपेक्षा हकालपट्टी. असो. अशीच काही तरी चमत्कारिक नाव असणारी सोसायटी आणि त्या दिवशी त्या सोसायटीत अकरा वाजून अकरा मिनिटांनी यावे असे आम्हाला आग्रहाचे—अत्याग्रहाचे निमंत्रण. आमच्या भगिनी फक्त भाऊबिजेच्या दिवशीच तेवढ्या रागवत नाहीत. नाहीपेक्षा त्यांचे बोलणेच मुळी रागाचे. आम्ही त्यांना होकार दिला.

आम्ही जायचे म्हणजे आमची शिबन्दी असणारच. ज्येष्ठ व श्रेष्ठ कुलदीपक हे बिनीवाले. बाहेर कुठेही जायचे असेल तर आमच्याबरोबर ते असायलाच हवेत. त्यांनी फक्त कॉलेजात नावच तेवढे घातले आहे. बाकी 'तन' व 'मन' कॉलेजच्या बाहेरच. नेहेमीच ते बाहेर फिरत असतात. धन जे आहे ते आमचे त्यांच्या मातृदेवतेच्या करकमळाने त्यांच्याकडे जाते. आम्ही आमच्या बहिणीकडे निघणार म्हणून ते आमच्याबरोबर कॉलेज सोडून यायला तयार. दुसरे अपत्य म्हणजे कन्यारत्न. पंडित जवाहरलाल नेहरू इंदिरेला बरोबर घेऊन जात असत. झुल्फिकार भुत्तो पाकिस्तानचे पंतप्रधान असताना बेनझीर या आपल्या सुकन्येला बरोबर घेऊन निघत असत. इंग्लंडचे सहावे जार्ज आपल्याबरोबर एलिझाबेथला घेऊन परदेशदौऱ्याला जात असत. ती प्रथा आम्ही चालू ठेवली. आमची सुकन्या कुठे आम्ही बाहेर जायचे झाले तर आमच्याबरोबर येतेच. विशेषत: प्रीतिभोजन, चित्रपट व बाहेर जाणे या प्रसंगी. धाकटे चिरंजीव यावेळी यायलाच हवेत. आमचे एक भाचे आहेत. त्यांनीही आम्हाला आपली सत्संगती देण्याचे ठरविले. हे सर्व असल्यावर आमच्या कुलदेवता—अष्टभुजा आहेत त्या—तीन मुलांचे सहा हात व त्यांचे दोन हात मिळून आठ हात—यायला तयार झाल्या आणि या सर्वांचा काफिला घेऊन निघायचे म्हणजे मोटरगाडी ! आमच्या मोटरगाडीबद्दल सांगणे या वेळी तरी नको. गाडी आमची खरी पण ती गावातल्या साऱ्या गॅरेज-

वाल्यांची आश्रयदाती आहे, अगदी नियतकालिकाप्रमाणे तिला कोणातरी गॅरेजवाल्याची भेट आवश्यक असतेच. एका गॅरेजवाल्याने केवळ तिच्या बिलावरच एक गाडी घेतली आहे. असो. ही गाडी एकदा आम्ही बाहेर काढली व आम्ही चक्रपाणी झालो.

गाडीने नापसंती दर्शवलीच. पण कुठे एकदा ढकल, कुठे खाटखुट कर—असे करत गाडी सुरू झाली. गाडीने पहिल्यांदा नापसंती दर्शवलीच होती व सुरू होण्याचे नाकारले होते. पण आमच्या कुलदेवतेचा कोप नको म्हणून की काय ती सुरू झाली एकदाची. ज्येष्ठ कुलदीपकांनी खिडकीजवळचीच जागा धरली. बाकीच्या दोन अपत्यांमध्ये खिडकीजवळच्या जागेमुळे वादविवाद सुरू झाला. पण कुलदेवतेच्या हस्तप्रसादामुळे तो वाद मिटला आणि हा कारवा निघाला.

आम्ही सारथी होतो. वहिणीकडे शक्य तितक्या लवकर जायचे होते. म्हणून आम्ही गाडी जोरात हाकत होतो. मागून इशारे येत होते.

" आता पोरकटपणा नको. मुले आहेत. जरा उशीर झाला तर वन्सं इतक्या रागवणार नाहीत काही. " आणि सायलेन्स झोन असो, अगर रेल्वे स्टेशन-वरील गर्दी आमच्या कुलदेवतेच्या आवाज आमच्या कानात घुमलाच पाहिजे. अशाच रीतीने त्या बोलतात. त्यांच्या आवाजाची फेकच अशी आहे की कुणी-कडूनही तो आवाज आमच्याच कानात जाणार आणि आम्ही काय समजा-यचे ते समजणार. पण आम्ही आपली मजेने गाडी चालवीत होतो. मध्येच दुसरी गाडी दिसली तर तिला गाठावे—मागे टाकावे व पोरांना आपले सारथ्य कौशल्य दाखवावे. पोराला वाटावे की आपल्या पपांसारखे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मोटर ड्रायव्हर कुणी नाहीतच ! हायवे आला आणि गाडी जोरात हाकलायला सुरवात झाली. प्रत्येकजण आपआपल्या विचारात. कोणाचे कोणकोणते विचार असतील काही सांगता यायचे नाहीत. पण धाकट्याच्या मनात खाऊच्या पुड्याशिवाय दुसरा विचार येणे संभवत नव्हते.

तोच आमची गाडी एका ट्रॅफिक स्टॉपकडे आली. लालभडक दिवा व पांढरा पोलीस ! कर्रर्र कर्रर्र करीत गाडी थांबली. एकदम ब्रेक दाबल्यामुळे धाकटे चिरंजीव पटकन् आपटले. पण रडण्याची सोय नव्हती. अष्टभुजेचा प्रसाद मिळाला असता ना. कसाबसा आपला राग सावरीत आमचे चिरंजीव पुन्हा जागेवर धुसफूस करीत बसले.

" तरी मी सांगत होते. सरळ बैस, सरळ बैस म्हणून. मोठ्या माणसांचे नाही ऐकले की कसे होते ते कळले ना . . . . . ." कुलदेवतेचा आवाज.

धाकट्या चिरंजीवांना सारे गिळून आपल्या जागेवर गप्प बसावे लागले. आता आम्हालाही काही तरी ऐकावे लागणार म्हणून आम्ही मागे न पाहताच चाकावर डोके ठेवले. मागे पहावयाचे म्हणजे धाकट्या चिरंजीवाचे कोमेज-लेले मुखकमल पाहावयाचे आणि मग त्याचा मानभंग व्हायचा. आणि परत 'डोळे हे जुल्मी गडे' – आमच्या सर्वमंगला लक्ष्मीच्या नजरेला नजर लागणार.

आम्ही डोके व डोळे सारथ्यचक्रावर ठेवले. तोच आमच्यासारखी दुसरी एक गाडी पीं पीं पीं . . . .करकर कर्रर करीत आली व आचके देत थांबली. आमच्या गाडीच्या जवळच. गाडीचे ड्रायव्हर तेजस्वी होते व ऋषीमुनीसारखे त्यांचे केस होते. पाठीमागे रुळलेले. पण काळेभोर. गाडी थांबल्याबरोबर त्यांनी चाकावरचा हात काढला व सरळ हातात माळ घेतली. पण ही माळ जपाची माळ नव्हती. त्या ड्रायव्हरच्या शेजारी असलेल्या कापायधारी अब-लेच्या गळयातील ती माळ होती ! जपमाळेचे मणी ओढता ओढता काही मंत्रोच्चार करतात तशा तऱ्हेचे ते काही पुटपुटत होते व स्वर्ग हाती आल्याचा आनंद दृग्गोचर होत होता. त्या काषायवस्त्राधारी अबला विरोधविकासाचा आविर्भावही दाखवत नव्हत्या. त्या शांत होत्या. आणि या मुनिवृत्ती ड्रायव्हर-साहेबांचे जपमाळा ओढण्याचे काम चालू होते. तेवढ्यात "शी : शी शी : भलतीकडे काय पाहायचे ते ? मुले आता मोठी झालीत म्हटले . . ." परत ठराविक फेकीचा आवाज. तो परत–

" खि: खि: खि: . . . . " आणि माळा जोराने ओढायला सुरवात इकडे.

तोच " पाणी . . .पाणी पायजे " . . .आमचे शेंडेनक्षत्र गाडी कुठेही जास्त वेळ थांबली की आमच्या चिरंजीवांना तहान लागायचीच.

आम्ही एकदम म्हटले, " अरे पाणी आता थोड्याच मिनिटात मिळेल. थांब हं–" असे म्हणत माझी नजर शेजारच्या ड्रायव्हरकडे आणि माळेकडे.

त्याची आता एक माळ पुरी ओढून झाली होती व आतापर्यन्त शान्त असणाऱ्या त्या काषायवस्त्राधारी भगवती प्रसन्न झाल्या होत्या व त्यांच्या

चेहेऱ्यावर नाना छटा उमलू लागल्या होत्या. त्यांच्या ओठांचे डाळिंब फुटले होते. म्हणजे ओठावरची लिपस्टिक अस्ताव्यस्त झाली होती.

आमच्या सौंच्या नजरेत आले हे !

" निलाजरे मेले ! पशू !" असे बोलत पाणी मागणाऱ्या आमच्या पोराच्या पाठीत एक धपका घातला शेवटी.

अर्थात् आम्हालाच ही सूचना होती. कासवासारखी आम्ही आमची दृष्टी आत घेतली.

तोच दुसरी एक फियाट ' सारेगम . .सारेगम ' असा हॉर्न वाजवीत आली. हॉर्न वेगळ्या तऱ्हेचा. आणि आपणाला हॉर्नच्या आवाजावरून ओळखावे अशी अपेक्षा असणारा मोटरमालक. गाडीत खच्चून पुरुष मंडळी भरलेली होती व प्रत्येकाच्या मिशा स्टाईलबाज होत्या. साऱ्यांकडे माझे लक्ष गेले नाही. पण ड्रायव्हरच्या जवळ बसलेले एक सुलतानदृष्टीचे गृहस्थ पाहायला मिळाले. कुरळे कुरळे केस, कल्ले व सरळ लांब नाक आणि त्यांनी अगदी विचित्र नजरेने साऱ्यांकडे पाहिले. ते बहुधा खलनायकाचे काम करणारे नट असावेत. बरेच दिवस त्यांना काम मिळालेले नसावे आणि आताच कुठे खलनायकाच्या कामाबद्दल त्यांचे कंत्राट झालेले असावे. थोडे दिवस बेकारीपासून मुक्त झाल्याचा आनंद आणि त्याचबरोबर खलनायकाची पाताळयंत्री दृष्टी. या दोहोंचे एक विचित्र मिश्रण त्यांच्या डोळ्यांत दिसत होते व त्याच दृष्टीने ते सारीकडे पाहात होते. एक प्रकारचा राग आला होता त्यांना. गाडी दुसऱ्याची खरी. पण ते गाडीत होते. ते असताना गाडीला थोडा वेळ थांबायला लागले म्हणून जरा चिडलेले दिसले. ड्रायव्हरसाहेबांच्या व इतर बसलेल्या लोकांच्या तोंडून "च्या . ." या शब्दाने काहीतरी पुटपुटणे सुरू झाले व भ्रूकुटिभंग दृश्यमान झाले. स्पष्टच लिहायला हरकत नाही. की—त्यांच्या पुटपुटण्यात पोलीस, शासन, तो ट्राफिक स्टॉप यांच्या प्रत्येकाच्या मातेचा उद्धार होत होता. ड्रायव्हरसाहेबांनी पुन्हा सारेगमचा हॉर्न वाजवला व गाडी थोडी पुन्हा ढकलल्यासारखे केले. सारेगमचा हॉर्न तिथल्या वाहनांना नसावा. त्यामुळे आमच्या गाडीतील लहानग्यांची दृष्टी त्या गाडीकडे गेली आणि त्याबरोबर त्या खलनायकाला वाटले की आपले शूटिंग सुरू झाले आहे. चित्रकथेत खलनायकाला प्रारंभी यश मिळाले असे दाखवतात. काही थोड्या वेळेस त्याला

सिंहासन मिळते व खरा पुरुष आपत्तीत असतो आणि त्यावेळी त्या खलनायकाला आपल्या भूमिकेत कौशल्य पणाला लावावे लागते. बस, अगदी तसेच. अगदी तसेच त्या खलनायकाला झाले त्याला वाटले आपण राजा झालो आणि त्याने तशीच बारिक नजर इतरत्र फेकली. सारेगमचा हॉर्न म्हणजे "निगाह रखो– आ रहे हैं . ." अशा तऱ्हेची ललकारी झाली आहे व खरोखरच आपणाकडे लोक त्या नजरेने पाहत आहेत असे वाटले त्याला. त्याने मान ताठ केली व खः खः करीत खाखरत दृष्टी शून्याकडे लावली. पण हा स्टॉप आहे व लाल दिवा लागला आहे, बाकीची वाहने थांबली आहेत, हे पाहून हा सारेगमचा हॉर्न वाजवून गाडी पुढे कोण चालवतो या उत्सुकतेने पोलिसाने पाहिले व पोलिसाने आपल्या गणवेषातील डायरी काढली, पायपट्ट्यांना लावलेले फाउन्टन पेन काढले, व मोटरचा नंबर टिपून घ्यायला सुरुवात केली. पोलिसांनी आपल्या गाडीचा नंबर टिपायला सुरवात केली हे त्या सारेगमचा हॉर्न वाजवणाऱ्याला कळले आणि मग त्या ड्रायव्हरची व खलनायकाची अशी काही चुळबूळ सुरू झाली की कोणालाही वाटावे की या दोघांना आत्ताच्या आत्ता 'बहिर्दिशेकरता ' जायलाच पाहिजे. त्या दोघांनी आपल्या हातांनी नमस्कार केला व त्या खलनायकाने तर काकुळतीचा भाव असा काही नाटविला की त्या पोलिसाला दया आली. त्याने परत डायरी खिशात ठेवली. ड्रायव्हर साहेबांनी गाडी जरा मागे घेतली व बंद ठेवली व दोन्ही हात कपाळावर ठेवले व गाडीच्या सारथ्यचक्रावर डोके ठेवले. पोलिसाला कळलेच की ही शरणागती आहे. खलनायक परत मान ताठ करून बसला व पाठीमागे लोकांच्या व पोलिसांच्या मातेचे मंगल स्तोत्र संघगीताने गाणारे शांत बसले. त्यापैकी कुणीतरी एकाने सिगरेटचे पाकीट काढले. पण त्या पाकिटातून इडी काढली व ती प्रदीप्त केली ! धूर झाला.

तोच एक यष्टीचे भलेमोठे धूड आले. बहुधा कोणत्या तरी दोनएकशे मैल लांब असणाऱ्या कुग्रामातून ती एष्टी निघाली असावी. हल्ली प्रत्येक कुग्रामांतून मुंबईला एष्टी आहेच. गांवात समाजकार्य सुरू करायचे म्हणजे "आमच्या गावाला एष्टी पाहिजेच" या मोर्चाचे नेतृत्व करायचे आणि हा मोर्चा बहुधा यशस्वी होतो आणि मग समाजकार्याला सुरवात होते. अशीच कोणत्या तरी मोर्चातून फलित झालेली ही गाडी असावी. कारण आत फक्त दोन का तीन

शिटा दिसत होत्या. व गाडीवर लिहिले होते "ज्यादा". आत कुणीतरी शहाज्यादी व अम्माजान दिसत होत्या. शहाज्यादी व अम्माजान जवळ जवळ ज्यादाच वाटत होत्या. अम्माजान खिडकीतून बाहेर "म्हमयी आयी देख" करीत डोकावत होत्या. आतील शिटांचे लक्ष शाहाज्यादीकडे होते. शहाज्यादीने आपली ओढणी का बुरखा मुद्दाम डोक्यावर ओढला. तरी शिटा मुंबई पाहणेऐवजी शहाज्यादीकडे पाहात होत्या. आम्हालाही त्या झिरमिरी बुरख्याआड पाहण्याची वासना झाली. शाहाज्यादी आता कुणाची तरी आपण बेगम होणार या नादात दिसल्या. गाडी फार दूर कोकणातून आल्याचे दिसत होते. गाडीच्या टपावर सुक्या मासळीचे पार्सल होते व तो दर्प आता दरवळायला लागला. गाडीवर बरीच धूळ साचलेली अगर आणलेली दिसली आणि त्या धुळीत कुणीतरी 'जंता झिन्दाबाद' अशी धुळाक्षरे काढलेले दिसले. मोटरीच्या खिडकीतून कुणीतरी वरून द्रव पदार्थ टाकल्याने झिन्दाबाद मधील "बाद" बाद झाला होता व जंता झिन्दा. . ही त्या लिहिणाऱ्याची इच्छा असावी असे वाटत होते. कोर्टात मृत्यूपत्राचा अर्थ करताना मृत्युपत्र लिहिणाऱ्याची इच्छा काय होती यावर तुटक्या-फाटक्या मत्यूपत्रामुळे वाद चालतो. तसाच वाद "जंता झिंदा..." यावरून व्हावा. असो. यष्टीचे ड्रायव्हर इतर वाहनांच्या ड्रायव्हरच्या मानाने उच्चासनावर बसलेले. पण निर्विकार होते. मिशी 'ल'कार टाइप होती व दोन्ही बाजूच्या मिशा गळलेल्या दिसत होत्या व एकंदरीत 'ड्यूटी संपते केव्हा व आपण अंग टाकतो केव्हा' अशा तऱ्हेचा भाव चेहऱ्यावर उमटत होता. पण एक भीतीही दिसत होती की मुक्कामाला पोचल्यावर इमर्जन्सी ड्यूटी म्हणून पुन्हा गाडी चालवायला सांगतील ! कंडक्टरसाहेब शिटा व तिकिटे यांचा हिशेब तपासून पाहात होते. शहाज्यादीचे तिकीट बहुधा त्यांनी अर्धे आकारलेले असावे.

एस्टीच्या पाठोपाठ दुसरी मोठी प्रवासी गाडी आली. सुरेख रंगवलेली होती व लक्ष्मीचे छायाचित्र काढले होते आणि तामीळमध्ये का मल्याळममध्ये कापडावर बोर्ड रंगवला होता. केरळ व मद्रासकडील ही मंडळी भारतभ्रमण यात्रेला चाललेली होती. धुतलेल्या शाळिग्रामसारखी काळीभोर मंडळी होती. फक्त पांढरे पंचे पण उत्तरीय काही नाही. असे पुरुष आणि प्रत्येकाबरोबर म्हाताऱ्या काकू. नाकात व कानांत काहीतरी घातलेल्या बारीक नजरेने बाहेर

पाहात होत्या व बाहेर नजर टाकल्याबरोबर पुन्हा एकदा आपल्या नवऱ्यावर हळूच लक्ष फिरवणाऱ्या 'गुलामाचे कुठे आहे बरे लक्ष' अशा विचारात असणाऱ्या. गंमत म्हणजे एकही म्हातारी आपल्या नवऱ्याशी काहीसुद्धा बोलत नव्हती. बहुधा मौनव्रत धारण केलेले असावे. ड्रायव्हर मात्र तरणाबांड आणि या काळचा रंगातही टुमदार दिसत होता. एक म्हातारा खिडकीजवळ होता. त्याच्या शेजारी एक म्हातारी होती. तिने तावडतोब पडदा ओढून घेतला.

आमच्या गाड्या थांबलेल्या पाहत एक जोडपे हळूच रस्ता ओलांडू लागले. नवऱ्याने छानपैकी लखनऊचा झब्बा घातला होता व बायकोने भगवी साडी. एक लहान मूल नवऱ्याने हातांत घेतले होते व ती बायको "चला लवकर, चला लवकर" करीत नवऱ्याला मार्गदर्शन करीत होती. तो नवरा नेहमी पँटमध्ये असणार. त्यामुळे त्याला लेंगा, झब्बा घालून चालणे जमत नसावे. ती बाई मात्र विद्युल्लतेसारखी चपळाई करीत होती. त्या बाईला पाहून त्या खलनायकाला सारेगमचा हॉर्न वाजवण्याची इच्छा झाली असावी पण आताच पोलिसांनी आपणावर दया केली आहे हे ते खलनायक विसरलेले नव्हते. या गाड्यांतून त्या विद्युल्लतेने शेवटी पैलतीर गाठलाच. असेच आपले ओझे ही नवऱ्यावर देऊन भवसागर तरणार...नवरा विचारा धांवतच गेला असल्यामुळे नरम पडला होता. ते पोर आता रडायला लागले होते.

लाल दिवा लागला म्हणजे थांबलेल्या गाडीजवळ भिकाऱ्याची एक दोन पोरे येणारच. आणि आमच्या गाडीजवळ एक पोर आलेच. आमचा सर्वांत धाकटा त्या पोराच्या अंगावर एकदम खेकसला. कारण आमच्या धाकट्याने आत्ताच आईचे बोलणे खाल्लेले होते. गाडीचा ब्रेक एकाएकी लागल्यामुळे ते पडलेलेही होते. हा राग दुसऱ्या कोणावर काढता येणेजोगा नव्हताच. तोच ही भिकाऱ्याची संधी. त्या भिकाऱ्यावर भिकारी कसला, दहाबारा वर्षांचे पोर होते–आमचे सर्वात धाकटे अगदी खच्चून ओरडले व आपला गेलेला मान भरून काढला ते पोर दुसऱ्या गाडीकडे भीक मागायला गेले. त्या खलनायकाने पाच पैसे टाकले वाटते !

तोच भगवा दिवा लागला व आमच्या गाडीच्या समोरून आडव्या गाड्या जायला लागल्या. या सर्व गाड्या अशाच आमच्यासारख्या थांबल्या होत्या. पण त्यांना प्राधान्य देणेत आले. या गाड्या ज्या रस्त्याने आल्या त्या रस्त्यावर

रेल्वेचे फाटक असावे. आणि ते बंदही असावे. कारण या गाड्या बऱ्याच होत्या. व रेल्वेच्या फाटकाजवळ थांबवावे लागले असल्यामुळे या वेळेस त्या दुप्पट जोराने चालल्या होत्या अगदी पहिल्या प्रथम स्कूटरस्वार गेले. तांबडे शिरस्त्राण होते व त्यांच्या पाठीमागे त्यांच्या सहचारिणी होत्या ते जोडपे प्रौढ असावे आणि त्या अर्धांगिनी पतिदेवांना येताना "आले घेणेची आठवण करा" असे सांगत असाव्या असे वाटत होते. त्या स्कूटरच्या मागून कोणत्या तरी 'पिलू' अगर 'आर्देशीर' ची गाडी चालली. त्या पिलू आर्देशीरबरोबर कुणीतरी जख्ख म्हातारी पण फ्रॉकमधली 'शिरीन' किंवा बानू असावी. त्यांच्या पाठीमागून कोणत्या तरी को–ऑपरेटिव्ह सोसायटीचा गच्च भरलेला ट्रक होता. ट्रक वरती तरी पिठाच्या पोत्यानी भरलेला दिसला. आत काही ठेवले होते की काय सांगता येणार नाही. त्यांचे मागून बी. ई. एस्. टी ची बस. बसमध्ये पांढरा गणवेपवाला इनिस्पेकटर अगदी दरवाजावरच उभा. जणू हे शत्रू आपणच पकडून घेऊन चाललो आहोत या भावनेने आणि त्याच्या शेजारीच एक गौरयोवना कृष्णोपनेत्रधारी, अत्यल्पवस्त्रा !

नंतर कोणत्या तरी दवाखान्याची रुग्णवाहिका. फक्त एक का दोन परिचारिका व दुसरे कोणीतरी. त्याच्याबरोबर या परिचारिकांचा नर्मविनोद चालला होता. आत बहुधा रुग्ण नसावा. सारथी त्या परिचारिकांच्या नर्मविनोदांत भाग घेत असावा. कारण तो मधूनच आपल्या पाठीमागे पाहत होता. त्याच्यानंतर कोणत्या तरी चहा का सिगरेट कंपनीचा टेंपो. फक्त सारथी तेवढा दिसत होता व त्या टेंपोवर तरुण–तरुणी काही तरी बोलताहेत असे चित्र होते. तरुण–तरुणी एकत्र बोलताहेत म्हणजे कसली तरी जाहिरात. त्याच्यानंतर अशीच एक अंबेसेडर आली. आता ही अंबेसेडर गेली की आम्हाला सिग्नल मिळणार. पण–पण ती अँबेसेडर एकाएकी बंदच पडली ! गाडीत दुसरे कुणी नव्हते. त्या ड्रायव्हरसाहेबांची पंचाइत झाली. ते उतरले. तोच यांत्रिक रीतीने आम्हाला 'जा' असा बावटा मिळाला.

खलनायकाने गाडी जोरात सुरूच केली. एष्टीवाला आपला रणगाड्यासारखा निघाला. त्या बंद पडलेल्या अंबेसडेरवाल्याला जगदंबा आठवली. एस्टी सरळ त्याच्या गाडीवर येऊन आदळणार. . . .

आम्ही गाडी सुरू केली. तोच पोलिसांनी शिट्टी मारली. बहुधा त्या अंबेसेडरवाल्यासाठीच.

तोच

" अग बाई.." आमच्या सौ.

" थांबा. थांबा..."

" काय झाले ?– " आम्ही नम्र सेवकाच्या भाषेत."

" येताना गॅस बंद करायचा राहिला. आणि हेमंतला मी ब्लॉकच्या मागच्या दाराची किल्ली लावायला सांगितलं होतं. ती लावली नाही. "

" आता.."

" आता मागे फिरायला हवे."

बरे झाले ट्रॅफिक स्टॉप आला म्हणून. आठवण तरी झाली.

चला लवकर मागे फिरा. काय होईल त्या गॅसचे..

असो. आत्ता पुन्हा ट्रॅफिक स्टॉपला वळसा घालून मागे फिरायचे –

नमस्कार माझा तया ट्रॅफिक स्टॉपा !

□ □ □

# माझ्या 'प्रेमा' प्रकरणाचा सप्ताह

आत्तापर्यंत अनेक प्रेमप्रकरणे मी आयुष्यात केली. मी प्रेमच करीत आलो. पण हाती धुपाटणी आली. काही प्रेमाची रोपटी उगवल्या दिवशीच खुडली गेली. काही प्रेमे उमलली, पण नंतर कोमेजली. काही हृदयातूनच निपटून काढावी लागली. काही काही प्रेमांत 'नवकाव्य, गद्यकाव्य – विरहगीत' यांच्या चढत्या भांजण्या झाल्या. काही प्रेमांत 'द्वंद्वगीते' स्फुरली गेली. काही प्रेमप्रकरणात चंद्र सूर्य, पथ्वी, आणाभाका शपथा – सर्व काही मंगल व पवित्र आले होते. पण प्रेमलतेला संपूर्ण फुले अशी आलीच नाहीत. आमच्या प्रेमाची वेल सुकायचीच किंवा बकरीने खायचीच. अपयश आणि ते सुद्धा प्रेमात–ही आमची स्पेशॅलिटीच. आणि अपयश तरी कसे, साधेसुधे नव्हे तर विषाद वाटण्याजोगे. उदाहरणार्थ मी एकदा अगदी कुंडली दाखवून पिरे-माचा मुहूर्त काढला होता. व एका 'ला' अन्त असलेली मा शा – शि – बाला अशीच कुणीतरी निवडून काढली व अगदी पुस्तक घेऊन प्रेम करू लागलो. ती जिथे जिथे जाईल तिथे तिथे जाणे, तिच्या आईच्या नजरेस मी येऊन "फार चांगला आहे हो . . ." असे आपल्याबाबत सर्टिफिकेट मिळविणे, कुठे ती बसमध्ये असली तर आपण होऊन उभे राहून जागा करून देणे – इत्यादी प्रकारांनी मी तिची ओळख करून घेतली होती. आणि आता हळूहळू पुस्तकातील पाचवे प्रकरण 'प्रेम दृढ कसे करावे' या स्वाध्यायापर्यंत येऊन पोचलो होतो. आणि मग एक दिवस अत्यंत मनोज्ञ वेषात ती आली आणि लाडिकपणे म्हणाली,

"ए – ए – उद्या संध्याकाळी तू आलेच पाहिजेस."

"मी – संध्याकाळी ? . . . ." मी अगदी हुरळून गेलो होतो. उद्या संध्या-काळी का, अगदी आतापासून तू मरशील तेव्हापर्यंत मी तुझेबरोबर राहीन,

असे मन म्हणत होते. पण आपण त्या गावचेच नाही अशा अविर्भावात मी विचारले,"

"का ?"

"अरे, एवढे माझे ऐकत नाहीस ? फक्त उद्याच – उद्याच" तिने परत काकुळतीने सांगितले.

"नाही ग. मला अभ्यास आहे. आणि वडील परवानगी द्यायचे नाहीत ग." जणू मी फारच अभ्यास करीत असतो आणि वडिलांचे ऐकणारा राम किंवा श्रावणच मी म्हणजे !

"अरे – असे नको म्हणूस. फक्त उद्याच संध्याकाळी शप्पथ आहे तुला !"

शपथेचा प्रकार आल्यावरोवर मी विरघळल्यासारखे दाखविलेच. होतो खरा आगोदरच विरघळलेला म्हणा. मी पुन्हा विचारले,

"बरे येतो – पण कुठे "

"कुठे कुठे – अरे हॉटेलात."

"हॉटेलात . . . हॉटेलात – हॉटेलात ?" . . . .मी एकदम हुरळून सांगितलं. आलोच "आलोच पण, पण . . . ."

"पण, नाही बिण नाही, आलंच पाहिजेस."

"अगं एकच अट आहे माझी." मी अगदी शिनिमातल्यासारखे.

"तू ये तर खरा. सांगशील ती अट पुरी करीन मी."

"बघ हं, बघ . . . ."

"तूच – बघ तूच . . . .तुझ्याशिवाय कोण आहे प्रेमाचे मला ?"

"पण काय आहे सांगशील की नाही ? आम्हाला मजा तरी कळेल."

"माझे लग्न ठरलेय. आणि एकदम छान मुलगा आहे रे. दोन हजार रुपये पगार आणि स्मार्ट आहे. तुझी ओळख करून देणार आहे मी. "

नाटकात राजाचे काम झाल्यावर घरून आई-वडिलांचा निरोप येतो ना – 'लवकर ये. किती वेळ झाला !'– त्यावेळी त्या राजाची स्थिती कशी होते ना, तशीच स्थिती झाली माझी. पण करणार काय ?

दुसऱ्या दिवशी त्या हॉटेलात लग्नाला गेलो खरा. तो चांडाळ अगदी तिच्यावरोवर बसून हसत हसत आपले फोटो काढून घेई. आइस्क्रीम काय खाई. काय हातवारे करी. काय विनोद करी – सताप आला होता त्या

खलनायकाचा ! वाटायचे, याला गिरगिर गाऱ्या करून फेकून द्यावे आणि . . . . आणि पण मी पडलो. 'अगदी प्रेमाचा मनुष्य.' असे आमचे प्रेम. काही झाडांना फळे येतात ती अपक्वच राहतात किंवा कुजतात. फळ कधीच पक्व होत नाही. असा आमच्या प्रेमाचा वृक्ष.

दुसरे असेच अपयशी प्रेमप्रकरण. पण तिने मला तिचा मित्र म्हणून तिच्या दुसऱ्या लग्नाला रजिस्ट्रारसमोर साक्षीदार म्हणून नेले होते. कॉलेजात असताना तिला चित्रपटाला जाण्याची फार हौस होती. दूर लांब-गावात चित्रपटगृह ! आमचे घर तिच्या शेजारी पण चित्रपटगहापासून लांब. म्हणून रात्री येताना माझी सोबत म्हणून ती मला बरोबर न्यायची. तिचे वडीलही मलाच घेऊन जा म्हणून आग्रह धरत. कारण त्या भागात मी बँटमवेट रेसलर म्हणून परचित होतो. त्यामुळे त्या मुलीच्या वाटेला कुणी जाणार नाही ही खात्री. एका चिकण्या पोराने माझी दोस्ती जमविली व शेवटी त्याने आपले लग्न तिच्याशी ठरवले. पुढे तो कोणत्या तरी पुरात वाहून गेला. हिने दुसरे लग्न ठरविले, आणि त्यावेळी माझी साक्ष – असे हे प्रेम. आता हा जो दुसरा रजिस्टर्ड लग्न करणारा, तो कुणीतरी सर्कसवाला होता. अगदी अस्वलासारखा. नाचणारा. ढेरपोट्या आणि केसाळ. माझ्यापेक्षा तर निश्चित चांगला नव्हता. पण प्रेम आंधळे असते आणि माझे प्रेम ठार आंधळे होते. जरा चालले की, खड्ड्यातच पडायचे.

माझ्या प्रेमप्रकरणांची बखर म्हणण्याऐवजी प्रेमाची कबरच असायची. अगदी पांढरी फटफटीत कबर. 'खेळ चालला की माझ्या पूर्व संचिताचा' असे म्हणणेजोगी नुकतीच एक गोष्ट घडली. जिच्याबरोबर मी एक रात्र व दीड दिवस सतत माझ्या गावापासून मुंबईपर्यंत गाडीने प्रवास केला ती तीच कृत्या परवाच्या दिवशी अगदी लाडिकपणे मी 'जवळचा' किंवा 'मामा' म्हणून आपल्या मुलीच्या वाङ्निश्चयाकरता मला बोलवायला आली होती. सर्व प्रवासात ती माझ्याबरोबर होती. तिच्या आईने तिला फराळाचा डबासुद्धा दिलेला नव्हता. माझा फराळाचा डबा घेतला तिने, आणि फस्त करून टाकला. वाटेत जिथे जिथे गाडी थांबेल तिथे तिथे चहा कॉफी कधी लेमन कधी पान असे मी तिला माझ्या पैशाने दिले होते. पण प्रवासातच कुणी सैन्याधिकारी तिला दिसला आणि त्याने मुंबईत उतरता उतरता तिच्याशी सर्व

काही ठरविले व डायरेक्ट लग्न करूनही टाकले ! त्या पोरीचे (त्यावेळी ती 'सुलोचना' होती. आता डोळ्यात फूल पडून म्हातारी झाली आहे. पण केशकलाप सोडून पांढऱ्या रंगाचे कपडे तिला आवडतात. केस मात्र जरासुद्धा पांढरे दिसता नयेत हा कटाक्ष.) आईवडील मला त्यांच्या अंतकाळ-पर्यंत दुवा देत होते ....."काय हो, याचा गुण. याच्यावरोबर पोरगी गेली आणि चांगलाच नवरा मुलगा मिळाला की हो ! याच्या हात-गुणाने ! आम्हाला जरासुद्धा खर्च पडला नाही बरे !" आणि ही माझी जाहि-रात सर्वत्र पसरली आणि पुष्कळ मुली माझ्याबरोबर प्रवासात आपण होऊन यावयास तयार झाल्या. आयुष्याच्या प्रवासास जोडीने यावयाला मात्र कुणीच तयार झाले नाही ! ही – काय नाव होते विसरलो आता – पण असेच काहीतरी 'सुलभा' 'शलभा' – 'लाभ' ही अक्षरे असणारे असे नाव होते – त्या दिवशी आली आणि अगदी जवळ येऊन सांगू लागली.

"यायला पाहिजे हं अगदी नक्की."

"पाहतो वेळ मिळाला तर " ....मी.

" असं कसं – असं कसं ?" ती नाजुक नखराईनं.

" नाही – पण मला वेळ नको का ? का उगीच नाही म्हणेन मी ?"

" तुमचीच मुलगी आहे समजून यायचे."

माझ्या नशिबात पहिला मुलगा होता. हिच्याशी जरी लग्न झाले असते तरी मुलगाच झाला असता. ही मुलगी माझी नव्हेच. मी विचारात पडलो. ते पाहून तिने पुन्हा लाडिकपणे – अगदी पूर्वी तिच्याबरोबर प्रवासात अस-ताना चहा पीत असताना ज्या लाडिकपणे ती अभिनय करायची त्याच अभि-नयाने ती पुन्हा बोलली –

"यायचेच. मला जवळचे कोण आहे आता ?"

माझा मुलगा, आणि तो देखील थोरला, समोरच उभा होता. पपांकडे शांत-पणे पहात उभा होता. मी अस्वस्थ झालो. मला काहीच बोलता येईना. नव्हते. त्यावेळी डोळ्यांच्या भाषेने बोलायचे असे ठरवले. मी डोळे तिच्या-कडे लावणार तोच तिने माझ्या थोरल्या मुलाला जवळ घेतले व ' एक पापा दे पाहू ' अस सांगून 'पापा' घेतला. आणि तिने सांगितलं "तुझ्या पपापेक्षा तूच चांगला आहेस रे. तू लग्नाला ये आणि पपांना घेऊन ये. मी गाडी पाठविते."

असे म्हणत ती अंतर्धान पावली. असे हे आमच्या प्रेमाचे उपनिबद्. प्रेम करायला जावे आणि हाती यावे कोळसे.

कोळसे शब्दावरून आठवण झाली. या नावाच्या एका देवतेवर किंवा परीवर किंवा अप्सरेवर– आता पुढे शब्दकोश संपला. मी फार फार फार फार प्रेम करीत होतो. लंडन ते सिडने या रस्त्यावर जेवढे फार – फार – फार मावतील तेवढे फार हं. कॉलेजातील एका वर्षाची सहामाही मी घालविली तिच्यासाठी. आणि शेवटी एका फॅमिली रूममध्ये ठराविक वेळेला मिसळ व च्याय खाण्यापर्यंत आम्ही जमायचे – इतक्यापर्यंत काम आणले होते. फॅमिली रूममध्ये एकच मिसळ व एकच कप च्याय आम्हा दोघांमध्ये म्हणजे त्यावेळच्या मानाने – म्हणजे ज्यावेळी मिनिटाला एक मैल असे पळण्याचे रेकॉर्ड नव्हते त्यावेळी – फारच मोठी जम्प ! अर्थात सर्व मिसळ तीच खाई व चहादेखील घशाखाली तीच ओतत असे. माझे मात्र पोट भरत असे. पण एकदा त्या फॅमिली रूममध्ये तिचे वडील व सावत्र आई आले आणि त्या दिवसापासून ती तिची सावत्रआई सटवाई तिच्या वडलांच्या पाठीमागेच लागली " पोरीचे लग्न करून द्या. तिला लवकर उजवा नाहीतर घराण्याचे नाव उजवील." "पोरगी हाताबाहेर जाईल" "पोरगी उफाड्याची आहे" असे सारखी ती म्हणायची आणि त्या म्हाताऱ्याला ते सारखे ऐकून ऐकून कंटाळा आला होता. ती देखील हे स्वतःचे म्हणतच नव्हती मुळी. तीही अशीच उफाड्याची झाली होती म्हणून तिच्या आईवडिलांनी या बिजवराला देऊन टाकली होती. तेच तिच्या आईचे शब्द ती पाठ म्हणत असे आणि आता तर फॅमिली रूमच्या मिसळीचा प्रसंग तिने डोळ्याने पाहिला. म्हणून ती सटवाई बेधडक मंगलकार्याच्या व विवाह मंडपाच्या कंत्राटदाराकडे गेली. कुणी दिगंबरबुवा म्हणून हे कंत्राटदार होते. स्वयंपाकाची लहान लहान कंत्राटे घेऊन ते पुढे मंगलकार्याचे भले मोठे कंत्राटदार झाले. अगदी चांगले "परशीद" झाले. तुमच्याकडे नवरा असेल तर नवरीमुलीपासून सारे पुरविण्याचे कंत्राट त्यांचेकडे. माधव काझीचे एक लग्न त्यांचेकडेच झाले होते. या कोळसे पोरीचे लग्न करायचे आणि तेसुद्धा चोवीस तासात या कोळसे पोरीला उजवायचेच अशी गळ त्या सटवाईनें या दिगंबरबुवांना घातली होती. आम्हाला या आमच्या 'माषुक' कितीही

गरीब अगर गुलाबी दिसत असल्या तरी त्यांच्या पत्रिकेत पॉवरफुल मंगळ होता एवढेच नव्हे तर तिचा जन्म तिळयानंतर तीन मुले एका पाठोपाठ झाली आणि मेली, त्यानंतर–झाला असल्याने तिच्या पाठीमागे काहीतरी अघोरी विद्या अगर देवदेवस्की लागली होती असे काहीतरी होते. कारण ज्यांच्या घरी म्हणून हे आईबाप "यंदा कर्तव्य आहे का" म्हणून विचारायला जात त्यांच्या त्यांच्या घरी काहीतरी अनिष्ट घडत असे म्हणजे एकाकडे विचारायला गेले तर त्यांना म्युनिसिपालिटीची नोटीस आली व त्याचे घर म्युनिसिपालिटीने पाडूनच टाकले. तर दुसऱ्या कोणाच्या घराचे छप्परच पडले. आणि हे याच पोरीचे विचारणे आले की एकदोन दिवसातच घडायचे म्हणून प्रत्येकानी आपल्या दारावरील पाटीतील "आहेत" हे खोडूनच टाकले होते दिगंबरबुवांना या साऱ्या गोष्टी माहीत. पण गिऱ्हाइकासाठी सर्व काही करावयाचे हा त्यांचा नियम. गिऱ्हाईक हेच आपले अन्नदाते. त्यांना परत कसे पाठवायचे ? म्हणून मग दिगंबरबुवांनीच हिच्याशी लग्न केले. दिगंबरबुवांची पहिली पत्नी कोकणात पाणी काढता काढता विहीरीत पडली आणि हंबरडा फोडून मेली. त्यानंतर दिगंबरबुवांना हाच चान्स होता व "गिऱ्हाइकांचा संतोष हेच आमचे समाधान" या व्रताची सांगता होत होती. आणि दिगंबरबुवांनीच या कोळसेशी लग्न केले आणि मंगलकार्यात राबता राबता या मंगलकलशाची फुटकी तपेली झाली. हिचे दात पडले आणि अस्थमा सुरू झाला. असो. एक दिवस मी कुणाच्या तरी विवाहानिमित्त त्या मंगलकार्यालयात गेलो असता मला मुद्दाम चांगले ताट देऊन तिने पानात भजी व भाजी जास्त घातली. ती स्वत: जातीने वाढायला हजर होती. मीही पूर्वीच्या मिसळीचा राग काढून घेतला. पूर्वी हीच सर्व मिसळ खायची काय ? आता मारतो ताव म्हणून मी तिने दिलेल्या भजांवर व भाजीवर ताव मारला होता. पण प्रेम मला विसरावे लागले होते. त्यानंतर कळले की तिचा मंगळ पराक्रम स्थानात शिरला व दिगंबरबुवा एक दिवस शिरा तळत असता दत्ताघरी गेले. मंगलकार्यालय बंद पडले. तिथ आता कोर्टाचा दिवाणी तुरुंग व जनावरांना ठेवायची जागा या गोष्टी आल्या. भांडीकुंडी विकावी लागली. दिगंबरबुवांची ओळख सांगणारी आणखी अशीच स्त्री पुढे आली. तिने कोर्टकज्जे केले आणि आमच्या या कोळसे काळवंडल्या

आणि अकाली वृद्ध झाल्या. आणि आता तिला कुणाचा आसरा हवा झाला. फॅमिली रूममधल्या सिंगल मिसळीची आठवण ठेवून ती आता माझ्याकडे आली प्रेमाऐवजी प्रेतच आमच्या हाती आले म्हणा, मी मग अनाथाश्रमाचे व वृद्धाश्रमाचे उंबरठे झिजवले. त्या विश्वस्तांना हरतऱ्हेने समजून सांगितले व तिला प्रवेश मिळवून दिला. कारण ती अनाथही ठरत नव्हती की वृद्धही ठरत नव्हती. नियमांत फेरफार केले व पूर्वीच्या प्रेमाला स्मरून (यावेळी तांब्यांचे गीत आठवले " सेवा ही पूर्विची स्मरोनी । मधु मागसि माझ्या सख्या परी । मधुघटचि रिकामे पडति घरी ") मी तिला आसरा देवविला.

त्या आश्रमाचा एक फॉर्म असतो. त्यामध्ये " जवळचे कोण ?" असा एक प्रश्न होता. त्यामध्ये तिने 'कोणी नाही– फक्त परमेश्वर व सु. वि. देसाई' असे लिहिले होते. माझ्या तीन मुलांनी " कोणा तरी एका वृद्धेला मातृसुख द्या " या योजनेनुसार तिला दत्तक मातोश्री मानले होते व तिच्याकडे ती मुले आठवड्यातून जात. मुले म्हणत " पण कित्ती कित्ती चांगली आहे हो ती !"

असो – सांगायचे हेच की माझी प्रेमप्रकरणे ही दरिद्र्यांच्या मनोरथा-प्रमाणे 'उत्पद्यन्ते विलीयन्ते'–उमलणारी व चटकन विलय पावणारी अशीच. मी कितीतरी ही प्रकरणे विसरून गेलो आहे. कधीतरी या पूर्वीच्या स्वप्नराण्या भेटल्या की ही प्रकरणे पुनः पुन्हा उफाळतात. पण तसे आता काही विशेष वाटत नाही. हे चालायचेच. पण एक प्रेमप्रकरण असं आहे की त्यातील प्रेमा अजून कुठे भेटली नाही आणि ती भेटली तरी मी अगर ती एकमेकांना ओळख दाखवू की काय ही शंका आहे. खरोखरच ते प्रेम आमचे – हो आमचे म्हणायला हरकत नाही. कारण तिचेही प्रेम होतेच माझ्यावर – चांगले पक्व फळात रूपांतर घेणार होते. पण सातच दिवसांत आमच्या प्रेमाचा उदय व ऱ्हास झाला. फक्त एकच आठवडा. या आठवड्यात प्रेमाचे सप्तरंग दिसले मला. 'प्रेमा' म्हणजे माझ्या त्यावेळच्या जीवनातील सर्वस्वी नायिका–खलनायिका, विदूषक – काय म्हणतात ते – एकच पात्री नाटक होते. त्या वेळच्या जीवनात या प्रेमामुळे अजूनही मी थोडा विसावतो. सात दिवस ते आठवतात आणि नंतर खेळ खलास.

त्याचे असे झाले – आमच्या कॉलेजने बहि:शाल कार्यक्रम म्हणून एक खेडे दत्तक घेतले होते. आम्ही ज्या महानगरात राहात होतो त्यापासून एक तास लांब – एस्टीने. आमच्या महानगरापासून तालुक्याचे एक गाव वीस मिनिटांत येई. या तालुक्याच्या गावापासून एक जरा मोठी बाजारपेठ असलेले मोठे गाव पंचवीस मिनिटावर आणि त्यानंतर बरोबर बारा मिनिटांनी हे खेडे असा प्रवास. बहुधा प्रिन्सिपॉलसाहेबांच्या सासुरवाडीचे ते गाव असावे म्हणून त्यांनी ते निवडलेले असावे. त्या गावात एक रस्ता आम्ही विद्यार्थ्यांनी करायचा असे ठरविले होते. दहा का पंधरा दिवसांची सुटी व त्या सुटीत हा कार्यक्रम आमच्या कॉलेजने घेतला होता. आमच्या कॉलेजची मुले तिथेच एका देवळात राहायची. प्रिन्सिपॉल मात्र महानगरात राहायचे. मी या श्रमदान यात्रेचा मुख्य अधिकारी होतो. अर्थात " हा पुढे-पुढे करतो म्हणून याला अधिकारी नेमले " अशी कुणकुण होतीच. असो. मला दररोज सायंकाळी ७ च्या एस्टीने त्या खेड्यातून महानगरात यावे लागे. प्रिन्सिपॉलसाहेबांना सारा वृत्तांत सांगावा लागे. दुसरे दिवशी सकाळी सातच्या एस्टीने परत. एस्टीचे स्टॉप तीन. बसल्यावर गाडी सरळ त्या तालुक्याच्या ठिकाणी थांबे. त्यानंतर ते मोठे गाव आणि त्यानंतर ते आमचे दत्तक खेडे. येताना व जाताना, ती एस्टी आमच्या प्रिन्सिपॉलनीच सार्व-जनिक सेवा म्हणून सुरू करायला लावली असल्यामुळे, एस्टीच्या पहिल्या बाकावरील सीट आमच्यासाठी उपलब्ध व रिझर्व्ह केलेल्या. ड्रायव्हरच्या पाठी-मागे जाळी. जाळीला लागून मोठा बाकडा. त्यानंतर जागा व त्यानंतर-बाकांच्या दोन रांगा. पहिल्या बाकावरील एकदोन सीटस् आमच्यासाठी कंप्लीट रिझर्व्ह. मला येताना किंवा जाताना एक व दोन नंबरची सीट मिळायचीच. मी एक समंजस तरुण आहे व खेड्याच्या सुधारणेसाठी झटत आहे असा गावकरी लोकांचा समज. शक्यतो आदराने ते माझ्याकडे पाहात. माझ्या सीटजवळ कुणीच बसत नव्हते. कदाचित कंडक्टर त्यांच्याकडून पैसे घेत असून तिकिटे देत नसावा. आणि कुणी असा बिन तिकिटाचा माझ्याजवळ बसला आणि मला काहीतरी कळले तर ? या विचाराने तो कंडक्टर लोकांना माझ्यापासून दूर बसावयास सांगत असेल कदाचित. पण सांगायचे म्हणजे पहिल्या बाकड्यावर मी अगदी जहांगीरासारखा बसत असे एकटा. माझ्या-

समोर जे बाकडे होते–ड्रायव्हरच्या पाठीमागे असलेल्या जाळीला लागून, पण माझ्या सीटला समोर असे – त्या सीटवर लोक बसत. विशेषत: एस्टी त्या तालुक्याच्या ठिकाणी आली की त्या तालुक्यातील प्रवासी त्या सीटवर बसत. मी मुद्दाम हातात गीता व काही इंग्लिश पुस्तके धरी. म्हणजे त्या गावकऱ्यांना वाटे " लई शिकलाय हा." असो. एक दिवस मी सकाळी प्रिन्सिपॉल साहेबांकडून खेडचाला परत जात होतो. प्रिन्सिपॉलसाहेब दररोज अहवाल मागवीत. ते कधीतरी स्वत:ही येणार होते. रस्ता लवकर करायला हवा. मी या योजनेचा सूत्रधार असल्याने माझ्यावरच सारे बेतणार होते. मी या विचारात असता ती एष्टी त्या तालुक्याच्या ठिकाणी आली. नित्याप्रमाणे दोन मिनिटे थांबली आणि इथूनच आता प्रकरण स्टार्ट होणार.

नाकी डोळी नीटस – 'सुबक–ठेंगणी' म्हणा पण – पण काय सांगू हो, शब्द सुचतच नाहीत – छान – थोडक्यात सांगायचे म्हणजे मला आवडणारी. एकदम आवडणारी मुलगी बसमध्ये आली. ती आल्यावर कंडक्टरसाहेबांनी सांगितले, "जा पुढे बसा . . . ." ती पुढे आली. माझ्याजवळ सीट रिकामी होती. पण ती तिथे बसली नाही. मला जरा पहिल्यांदा वाईट वाटले खरे. पण ते योग्यच होते. समोरच्याच सीटवर ती बसली. एकदम माझ्यासमोर. माझ्या हृदयाचा विद्युत्स्पंदन आलेख जरा बदलला. पण मी भगवद्गीता वाचावयास घेतली. न जाणो मी तिच्याकडे टक लावून पाहायला लागलो असे गावकऱ्यांना दिसले तर. . . ? मी गीता डोळ्यासमोर धरलेली असल्यामुळे कंडक्टरसाहेबांनी मला निरुपद्रवी ठरविले. गाडीत जे इतर खेडूत होते – दुसरे कोणी नगरवासीय नव्हतेच – त्यांनीही मला निरुपद्रवी ठरविले. एवढेच काय त्या मुलीलाही मी निरुपद्रवी वाटू लागलो असेन. इतका मी "माझे काम बरे की मी बरा" या वृत्तीचे नाटकी प्रदर्शन करीत होतो. मी गीता डोळ्यांसमोर धरली होती खरी, पण वाटायचे की प्रभू श्रीकृष्णजींना सोळासहस्र नारी होत्या आणि आपण एका नारीकडे पाहूसुद्धा नये. आई म्हणत असे "देव देऊन पाहात असतो. आपण लाथाडू नये." ही तर आपणहून माझ्यासमोर आली आहे. तिला आपण पाहूसुद्धा नये ? लाथाडण्याला चांगलाच चान्स होता. तिचे पाय व माझे पाय अगदी जवळ जवळ त्या मोकळ्या

जागेतच ठेवले होते. पण—पण मी अस्वस्थ झालो. प्राचार्यांनी कार्यक्रमप्रमुख नेमताना मला सूचना दिली होती, "भावनांना आवर घाला. तुमच्यावर सर्वांचे लक्ष आहे. असे समजा आणि वागा. तुम्हास कुणीतरी पाहत आहे. कोणी ना कोणीतरी तुमच्यावर बारीक दृष्टीने पाहात आहे हे लक्षात राहू द्या." आता मला वाटायला लागले की एस्टीतले दुसरे कोणीच नाही, पण हीच पोरगी हळूच चोरून माझ्याकडे पाहात आहे. आता कसे वागायचे? आज गप्पच बसू. मी पुस्तक समोर धरले. एकही पान उलटले नाही आणि आता ते मोठे गाव आले आणि ती मुलगी उतरू लागली. मी माझे पाय आवरते घेतले. न जाणो ती उतरताना तिचे पाय लागतील — लागावेत ही इच्छा — पण आज काहीच नको. मी ज्या बाजूला बसलो होतो त्याच बाजूला एष्टीतून उतरल्यावर तिला जायचे होते. त्या मोठ्या गावाकडे जाताना तिने एस्टीकडे पर्यायाने माझ्याकडे दृष्टी टाकलीच. पण कंडक्टरने ताबडतोब घंटा मारली व एस्टी पुढे निघाली. मी मात्र आता हातातून पुस्तक खालती ठेवले आणि डोळे मिटून घेतले. पण चर्मचक्षू मिटले म्हणून अंतश्चक्षू? सारखी तीच डोळ्यां-समोर आणि समोरच एक कोणत्यातरी दाणेदार खताची जाहिरात होती. त्या जाहिरातीत कोणीतरी मराठमोळा स्त्री होती आणि ती अगदी "उघडचाने" उघड माझ्याकडे पाहात होती! ती मुलगी उतरली खरी, पण माझ्या हृदयात एकदम आत आत शिरली. अगदी एका कप्प्यापर्यंत! पण म्हटले, हा विचार सोडावा. आपण या गावचे नाही. प्रिन्सिपॉलसाहेबांची कदाचित सासुरवाडी इकडे असावी. पण मी गुरुजनांसारखे करावे असे नाही. गावी उतरलो व डोक्यात दुसरा कोणता विषय नको म्हणून हिशेब लिहायला घेतले. बाकीच्या मुलांनाही आश्चर्य वाटले. कुठेतरी जखमी झाल्याशिवाय हा असा अबोल राहाणार नाही ही प्रतिक्रिया. पण कॉलेजात साऱ्या प्रेमात जखमी नव्हे तर मेलो आहे, हे बहुजनांना माहीतच. मी पुन्हा संध्याकाळी प्रिन्सिपॉलसाहेबां-कडे गेलो. कालचा एष्टीतला प्रसंग उद्भवला — म्हणजे आपणाकडे कुणी-तरी पाहत आहे हे लक्षात आल्यावर काय करावे? याबद्दल प्रिन्सिपॉलना विचारावे असे वाटत होते. पण प्रत्यक्ष बोलता आले नाही. एष्टीनेच परतलो. तो परत त्या स्टॉपवर तीच.

आता ! मी पुन्हा भगवद्गीता घेतली व पाय जरा कलंडता केला. म्हटले ही आली तर माझ्या पायाला हिच्या चरणारविंदांचा स्पर्श होईल. आणि त्याप्रमाणे ती आली आणि सीटवर बसताना तिच्या पदकमलांचा स्पर्श झाला. आता पाय चुकून लागल्यावर मी तिला हात लावून नमस्कार केला. आपला पाय कोणालाही लागला तर क्षमाप्रदर्शक असा नमस्कार करावा लागतो. त्याप्रमाणे मी नमस्कार केला. तिचाही पाय 'चुकून' लागला होता. तिने मला हात लावून क्षमाप्रदर्शक नमस्कार केला आणि या प्रतिनमस्कारात एकमेकांचे हात 'चुकून'– खरोखरच चुकून एकमेकांना लागले. पायाने सुरुवात होऊन एकमेकांचे हात एकमेकाला लागले. आणि दुसऱ्याच दिवशी बरेच भरीव काम झाले. थोडा वेळ एकमेकांच्या नजराही एकमेकांना भिडल्या. असो. तोच तिचा स्टॉप् आला. ती उतरली. उतरताना तिने खरोखरच माझ्याकडे पाहिले. पण ड्रायव्हर गाडी थांबवायला तयारच नव्हता. त्याची ही ओव्हर-टाइम होती. त्याने जोरातच गाडी मारली. त्याला एकदा अंग टेकायला मिळावे म्हणून हा माझ्या आनंदात विरजण कालवीत होता. असो. समोरच्या त्या शुभ्र दाणेदार पीक येण्याकरिता सुचविलेल्या खताची जाहिरात मला चित्ताकर्षक वाटेना.

दुसऱ्या दिवशी परत येताना–माझे नेहेमीचे शस्त्र–गोळ्या (बंदुकीच्या नव्हेत) लिमलेटच्या व पेपरमिट बरोबर घेतल्या. दोन-तीन दिवसांनी प्रिन्सिपॉलसाहेब स्वत: येणार होते म्हणून त्यांच्यासाठी टॉवेल, साबण इत्यादी सामान घेऊन निघालो. तो एस्टी त्या स्टॉपच्या अलीकडेच थांबली. एकदम बिघाड झाला. माझ्या प्रेमाच्या गाडीचे हे प्रतीकच. गाडीत बिघाड झाला-आणि पाऊस पडायला सुरुवात झाली. अरेरे! आता काय करावे. मी पुस्तक हाती घेतले. पण यावेळी जे पुस्तक हाताला लागले ती गीता नव्हती. प्रिन्सिपॉलसाहेबांची मोठी जाडजूड वही–डायरीसारखी होती. प्रिन्सिपॉलसाहेबांच्या सामाना-बरोबर चुकून आली होती. त्यात प्रिन्सिपॉलसाहेबांनी बरेच शेर लिहून घेतले होते. पहिलाच शेर –

"ऐ बारिश तू इतना न बरस
की वह आ नहीं सके

आनेके बाद तू इतना ही बरस
की वह जा नहीं सके ।"
(ए पावसा तू इतका वर्षाव करू नकोस
की ती येऊ शकणार नाही
पण ती आल्यावर तू इतका कोसळ
की ती जाऊच शकणार नाही. )

असा होता. मला वाटायला लागले की पाऊस फारच पडायला लागला तर ती येणारच नाही. पण का कुणास ठाऊक त्या पावसात ती भिजत आली व एष्टीत बसली. आणि थेट माझ्यासमोर. स्टॉपवर वाट पाहून ती कंटाळली व सरळ उभ्या असलेल्या एष्टीत ती भिजत आली व बसली. ही संधी अर्थात् देवानेच आणून दिली.

मी तिला माझ्याकडचा टॉवेल दिला आणि अंग पुसायला सांगितले. खरे सांगायचे म्हणजे ती भिजलेली होती हे मला जास्त समाधानकारक वाटत होते. असो. पण तो तपशीलाचा भाग. तिने टॉवेलने अंग पुसल्याबरोबर माझ्या हातातील दोन गोळ्या तिला दिल्या. ती हूं का चूं म्हणाली नाही आणि पट-दिशी तोंडात टाकल्यान् त्या गोळ्या.

तिच्या चेहऱ्यावर थोडी उत्साहाची लहर दिसायला लागल्यावर मी जरा पायाला पाय लावलाच. तिने तो मागे घेतला नाही आता . . . .

मग कळले –
की तिचे नांव प्रेमा होते. ती त्या गावच्या पाटलाची मुलगी होती. तिची थोरली बहीण पहिलटकरीण होती. पाटलांनी पहिले बाळंतपण काढायचे ठरविले होते. म्हणून तालुक्याच्या एका मॅटर्निटी होममध्ये तिला ठेवले होते. ती बाळंत होऊन तिला मुलगा झाला होता. आणि ही प्रेमा दररोज संध्याकाळी मी जात असे त्याअगोदरच्या गाडीने जायची व मॅटर्निटी होममध्ये रात्री झोपायची व सकाळी मी येत असलेल्या गाडीने परत यायची. प्रेमाने आणखी एक गोळी मागून घेतली आणि पाऊस बंद झाला. एस्टी सुरू झाली.

मी परत त्या खेड्यात गेलो. दोन-तीन दिवसांत प्रेमाची व माझी जाण्याची व येण्याची गाडी एकच होऊ लागली. माझ्या गोळ्या संपू लागल्या आणि मी तरंगू लागलो. प्रेमाची गाडी जरा आता व्यवस्थित चालू लागली.

प्रिन्सिपॉलसाहेबांनी स्वतः यायचे ठरविले. मी त्यांना आणायला गेलो. नेहमीच्याच एस्टीने ते मी निघालो. खेड्यात जाताना मोटर नको. जे नेहमीचे वाहन असते त्याच वाहनांनी जायचे असे प्रिन्सिपॉल म्हणत. मी व ते एस्टी-तील पहिल्या बाकावर बसलो. मी चांगल्या पांढऱ्या शुभ्र कपड्यात आणि शांतपणे प्रिन्सिपॉलसाहेबांच्या प्रश्नाला माहिती सांगू लागलो. एस्टीतून जाताना प्रिन्सिपॉलसाहेब सांगत होते,

" अरे बघ–आपला देश किती निसर्गसुंदर आहे. पण दारिद्र्य किती रे!" सांगत असता–आमची निसर्गसुंदर प्रेमा ज्या स्टॉपला गाडीत चढते त्या स्टॉपला एस्टी थांबली.

त्या स्टॉप्वर प्रेमा होतीच. पण यावेळी प्रेमाबरोबर तिची थोरली बहीण व हातात लहान मुलगा. बहिणीला बाळंतपण चांगलेच मानवले होते. तिला बहुधा दोन सीटस् लागणार होत्या. ती आली व समोरच्या बाकावर बसली. प्रेमा अर्थात तिला चिकटूनच. आणि गाडी सुरू झाली. प्रिन्सिपॉलसाहेबांचे लक्ष त्या थोरल्या बहिणीवर. माझे आपले माझ्या प्रेमावर. पण मी तिच्या-वरून लक्ष काढले आणि प्रिन्सिपॉलसाहेब काय सांगतात ते ऐकत राहिलो. जणू काय प्रेमा माझ्या गावचीच नव्हे.

थोड्याच वेळात एकदम माझ्या कपड्यावर कुणीतरी गरम पाण्याची धार सोडते आहे असा भास झाला. तोच प्रेमा मला हात लावून म्हणाली, " जरा थांबा. जरा–जरा . . ." प्रिन्सिपॉलसाहेबही चटकन् थांबले. प्रेमाच्या बहिणीचे जे मूल होते–मुलगाच होता तो–त्याने आमच्या प्रिन्सिपॉलांकडे व आम्ही एस्टीत आहोत याचा काहीच विचार न करता सरळ सूं सूं केली होती. लहानच मूल ते आणि मांडीवर! सरळ जे कारंजे उडाले ते माझ्या पांढऱ्या कपड्यांवर! आणि आज तरी मी कपडे घालून मिरवणार होतो. या पोरान् कारंजे सतत एक मिनिट तरी सोडले असेल आणि खुशाल आरामात. त्याची ती संततधार आमचेवर पडू नये म्हणून प्रेमाने मला हात लावला आणि . . . . माझ्या कपड्याबरोबर हृदयही थोडे डागळले.

" Oh Gosh ! " प्रिन्सिपॉलसाहेब एकदम फडर्या इंग्रजीत बोलले. प्रेमाची बहीण एकदम आश्चर्यचकित झाल्यासारखे करायला लागली. बरेच दिवस पतिदेव जवळ नसल्यामुळे तिला कोणाला रागाने बोलू असेच वाटत असले

पाहिजे. आमच्या प्रिन्सिपॉलसाहेबांकडे तिने अगदी ससाण्याची दृष्टी टाकली. परत प्रेमाकडे दृष्टी टाकली. ती पुढे काही बोलणार तोच माझे कपडे चिंब झालेले तिने पाहिले व जरा मुस्करली. ती मुस्करून मला किंवा प्रिन्सिपॉलसाहेबांना काहीच उपयोग नव्हता ! पण जरा तप्त वातावरण शांत झाले . . . . तोच पाठीमागची एक म्हातारी बोलली, " अहो, हे चालायचंच. तुम्ही देखील कितीदा मुतला असाल. " ती म्हातारी मला उद्देशून बोलली की प्रिन्सिपॉलसाहेबांना, ते कळले नाही. पण मी मात्र मान खालती घातली. आता गावात प्रिन्सिपॉलसाहेबांबरोबर या कपड्याने फिरायचे म्हणजे . . . . ? आणि परत कपड्यांना दुर्गंधी . . . .पण मी हिरमुसला पाहून प्रेमा जरा सिम्पथेटिक झाली.

" काही काळजी करू नका. तुमचे कपडे मी देईन धुवून. " ती.

मी मनात म्हटले, " सारे कपडे घेऊन गेलीस तरी हरकत नाही. हे सारे शरीर तुझे आहे. तुझेच–शप्पथ तुझेच–सर्वस्वी तुझेच." पण प्रिन्सिपॉलसाहेबांचे लक्ष मजकडे होते. मी काहीच बोललो नाही.

एरवी पुस्तके वाचून उपदेश करणारे तासन् तास गुंगवून ठेवणारे प्रिन्सिपॉल आता मी कसे वागावे याबाबत काही काही सुद्धा सांगू शकत नव्हते. प्रिन्सिपॉलसाहेबांनी मला विचारले,

" Do you know her ? (तुझ्या ती माहितीची आहे काय ? )"

' पूर्वजन्मीची ओळख ' असे सांगून चकित करावे असे वाटले मला. पण मी गप्पच राहिलो. खोटे नको–खरेही नको.

तोच तिचा स्टॉप आला आणि ती प्रेमा उतरली. तिची बहीणही उतरली.

आता मला कळले की हे कारंजे जे उडाले–ते आता आमच्या प्रेमप्रकरणावर. सवाई माधवरावांनी कारंजावर उडी मारली होती. तसेच आता आमच्या प्रणयाराधनेने या कारंजावर उडी घेतली. कारण तालुक्याच्या मॅटर्निटी होममधून प्रेमाची बहीण परत आली. आता प्रेमाला रात्रीचे तरी तालुक्याला जाऊन सकाळी परत त्या एस्टीने येण्याचे कारण नव्हते.जाऊ द्या, आमची प्रेमाची बोट बुडाली तर– "आमच्या भाळी लिहिली सदैव कटकट वटवट करण्याची"– मी आपला मनातल्या मनात रुष्ट झालो. पुन्हा कार्यक्रमात मन रंगवले आणि प्रिन्सिपॉलसाहेबांना गावात फिरविले. दुपारी प्रिन्सिपॉलसाहेब वामकुक्षी घेणार

होते. मला आता काही प्रेमभंग झाल्याने कशातच रस नव्हता. सरळ आपण गावाबाहेरच्या देवळाकडे जाऊ व शांत बसू असे ठरविले आणि मी देवळाकडे गेलो. पाहतो तो काय तर तिथेच प्रेमा. . . .माझी प्रेमा. . . .माझी माझी प्रेमा. . . .प्रेमा. . .मी पटकन् शीळ घातली. आता प्रिन्सिपॉलसाहेब झोपले होते. मला काही परत जायची घाई नव्हती व मी आता संध्याकाळी परत जाऊन प्रिन्सिपॉलसाहेबांसाठी–कारण ते आज तिथेच वास्तव्य करणार होते–लागणाऱ्या काही वस्तू आणणार होतो. प्रिन्सिपॉलसाहेबांना काय वस्तू लागतात हे मलाच जास्त माहीत होते. म्हणून संध्याकाळच्या एस्टीने जायचे व परत रात्री टॅक्सीने यायचे असे ठरले होते. टॅक्सीचा खर्च व थोडा जास्त भत्ताही मंजूर झाला होता. आता मी हुरळूनच गेलो होतो. काळजी नव्हती. आणि प्रेमाचे पांघरूण घालणारी प्रेमा होती.

प्रेमा तिकडे का आली होती ? तर त्या देवळाजवळ एक पॉवरबाज देवर्षी राहात होता. त्याला प्रेमाच्या आईने बोलाविले होते. प्रेमाची बहीण माहेरला येऊन बरेच दिवस झाले होते. तिच्या पतिदेवांकडे, कुणीतरी काही तरी पाटलाच्या विरुद्ध असणाऱ्यांनी कागाळ्या केल्या होत्या. त्याने त्या नवऱ्याचे डोके बिथरले होते आणि म्हणून त्याच्याकडील लोकांनी पाटलाला एक रजिस्टर्ड नोटिस दिली होती. "ही नोटीस पोचल्यापासून सात दिवसांच्या आत सौ. . . .हिला पाठविणे. नपेक्षा आम्ही दुसरा घरोबा करू व पुढील परिणामास तुम्हास सर्वस्वी जबाबदार धरले जाल." या नोटिशीने पाटलीणबाई जरा घाबरल्या होत्या. आपल्या जावयाला कुणी काही कर्तुक केले काय व त्याला उतारा काय याबाबत या देवर्षीला विचारावे म्हणून प्रेमा आली होती. काम जरा खाजगी असल्यामुळे प्रेमाला बाहेर जरुरीपेक्षा जास्त वेळ राहायला मुभा होती. मी शीळ घातली. ती थांबली.

आणि मग–मग

न बोलणे हेच बोलणे ठरले. डोळे डोळ्याला भिडले आणि त्या देवळात एक गाय संथपणे रवंथ करीत बसली होती–त्या गायीच्या साक्षीने. . . . साक्षीने. . .असो.

प्रेमाला तिच्या बहिणीच्या नवऱ्याचा राग आला होता. "मी तसा नाही" हे सांगण्याकरिता मी प्रेमाला बोललो,

" प्रेमा तू माझी झालीस तर तुला कधी कधी मी माहेरी धाडणार नाही आणि धाडल्यावर अशी खुळ्यासारखी नोटीस देणार नाही."

" माहेरी धाडणार नाही ? अवो खुळे का शाणे ?" प्रेमा मनमुरादपणे हसत, अगदी हंसा वाडकर चंद्रकांत मांढरेशी भालबा पेंढारकरांच्या कोणत्याही शिवकालीन सिनेमात हसते– किंवा हसायची तशी हसली.

" तसं नाही. . . .तसं नाही."

" मला काय वाटते सांगू. . . .काय शब्द नाहीत सुचत. . . " मी.

" मग माणसांनी गप्प बसावे. . ." ती म्हणाली. मी मग गप्पच बसलो.

" प्रेमा, आता तू किती वेळ इथे बसणार ?" परत बोलण्याचा माझा प्रयत्न.

" तुम्हाला कशाला काळजी ? "

" प्रेमा, आता मलाच तुझी काळजी करावी लागणार." नाटकात मी एकदा दादाजी कोंडदेवाचे काम केले होते. त्या 'टोन' मध्ये दादाजी कोंडदेवाच्या . . दादाजी कोंडदेवांकडे एक बाग रक्षणाकरता होती. त्या बागेतील त्यांनी फळे काढली म्हणून त्यांनी स्वतःचा हात तोडायचा ठरविले व रक्षणाची जबाबदारी कशी असते याबाबत छत्रपती बालराजांना ऐकवले. त्याच भाषाशैलीनं.

तो देवर्षी कोंबडे व लिंबू आणायला गेला होता. मला आता त्याने कोंबडा मारता मारता कोंबड्यानेच त्या देवर्ष्याचे डोळे फोडून मारून टाकावे असे वाटायला लागले. तो देवर्षीच मेला तर ! पण अशी अभद्र इच्छा करून काय उपयोग ? त्या देवर्षीकडे आज दोन गारुडी आले होते. म्हणे लांबून– फार लांबून अस्सल नाग घेऊन. तो देवर्षी गारुड्यांमध्ये फारच पॉप्युलर होता. नागावर मंत्र देणे– नागाकडून गुप्तधन शोधायला लावणे याच्यात तो निष्णात होता म्हणे. आता हा देवर्षी त्या गारुड्यांचे काम, लिंबू हे सगळे करून येईपर्यंत चांगला तासभर जाणार.

मी मग प्रेमाशी बोलू लागलो. 'चहा' मागविण्याची सोय नव्हती. बरा झाला असता. देवळात खाण्याची वस्तू म्हणजे परसाद, पण तोही इथे कुठे दिसत नव्हता. शेवटी मी व प्रेमाने ठरविले की संध्याकाळच्या एस्टीने तालुक्याला जायचे. सिनेमा बघायचा व टॅक्सीने मी तिच्या घरी तिला परत सोडायचे. आणाभाका झाल्या. आणि मी परत आमच्या कँपला गेलो. काहीतरी थातुरमातुर करून संध्याकाळच्या एस्टीवर आलो.

एस्टीवर मीच आता एकटा असणार. तो बघतो तो दोन का तीन गारुडीही आले होते. मी पुढची सीट पकडली. गारुडीही आत घुसले. एष्टी चालू होणार तोंच प्रेमा धावतधावत आली आणि माझ्याजवळ बसली. मी दोन महानगराची तिकीटे काढली.

एस्टी चालू झाली. तालुक्याचे म्हणजे प्रेमाचे ठिकाण आले. पण प्रेमा उतरली नाही. लोक गाडीत भराभर बसले आणि गाडी जोरात सुरू झाली. सिनेमा पकडायचा म्हणजे गाडी फास्ट पाहिजेच. मी त्या ड्रायव्हरला टिप्सचे आमिष दाखविले व त्याने गाडी जोरजोरात चालविली. रस्त्यात खांचखळगे होते. गाडी जरा उडे. आत धक्के बसत. त्या धक्क्यामुळे माझा फायदाच झाला. मला प्रेमाची ऊब मिळायची. प्रेमा मला बिलगून बसली.

गाडी जसजशी फास्ट झाली—तसतसे बरे वाटू लागले. पण, पण . . . पण . . .

पाहतो तो ड्रायव्हरने एकदम चाक सोडले व

“ अरे बाप रे – अरे बाप रे . . . . . ” असे ओरडायला सुरवात केली.

काय होतेय ते पाहतो तो दोन काळेभोर नाग ड्रायव्हरच्या डोळ्यासमोर असणाऱ्या काचेतून आत गाडीत येत होते. गारुड्यांनी वरती बुट्ट्या ठेवल्या होत्या. ड्रायव्हरच्या द्रुतगतीमुळे त्या उघडल्या गेल्या व टपावरून नाग सरळ बाहेर पडले ते ड्रायव्हरच्या डोळ्यासमोर आले.

ते काळेकभिन्न नाग बघितल्यावर ड्रायव्हरचा चाकावरील तोल सुटला.

ते नाग सरळ आत यायला लागलेले पाहून कंडक्टर घाबरला. आता प्रेमा . . . मी . . .

पण एवढा विचार कुणाला आहे ? ती गाडी सरळ खड्यात जाऊन पडली !

पुढे दोनतीन दिवसांनी मी शुद्धीवर आलो. प्रेमाच्या पायाचे हाड मोडले.

. . आणि इथेच माझ्या प्रेमाचा सप्ताह संपला.

. प्रेमप्रकरण संपले.

प्रेमाला बरी झाल्यावर तिच्या पाटील बापाने पुन्हा फोडून काढले. मी काही परत त्या गावाला गेलो नाही. कुणीतरी सांगत होते की प्रेमा सध्या ब्रह्माकुमारी प्रजापती ईश्वरी का अशाच पंथात दाखल झाली आहे व परमेश्वरावर प्रेम करत आहे.

□ □ □

# यशस्वी शाहीर

"जळ्ळले मेले ते समाजकार्य ! घराकडे लक्ष घालाल की नाही ? घरापासूनच समाज सुरू होतो."

सकाळी पहिली फैर झाडली गेली. गोळी बरोबर लागत होती. टार्जेटकडे पहायला लागतच नव्हते. टार्जेट दाढी करत होते. टार्जेटला दाढीचे नवे पाते थोडे लागले होते. रक्तही आले होते. पण टार्जेट शांतच.

टार्जेटकडून पहिल्यांदा प्रतिक्रिया नसते, हे खरे. पण टार्जेटवर जरा जास्त जोराचा, मशीनगनचा मारा सुरू करायला हवा म्हणून पुढे पटापट फैरी झडू लागल्या.

"अनाथ, पंगू, आंधळ्या मुलांचे कल्याणकार्य आता पुरे ! उदंड झाली आंधळी मुले. स्वत:च्या मुलांकडे थोडे लक्ष द्यावे आता." गोळीबार मैदानावर टार्जेट म्हणून पेंढा व कापूस भरलेले पोते माणसाच्या अकारासारख करून ठेवतात. त्या पेंढा भरलेल्या किंवा शेतात राखणदार म्हणून ठेवलेल्या गाडगे महाराजांसारखी माझी स्थिती . मी शांतच.

"कोणी पंगू मुलगा येऊ दे. त्याची सोय कशी होते पाहा. त्याच्या फी करता कुणालाही भेटायचे. त्याच्या पायी. . . ." आता गोळ्या मर्मी लागायला लागल्या.

"अग पण मी सोय करीत नाही का मुलांची ? त्यांना चांगल्यातल्या चांगल्या शाळेत घातले आहे. शिकवणी ठेवली आहे. तो जे काही मागेल ते देत असतोय् . . . . आणखी काय करायचे ? " मी सविरोध नापसंती दर्शवली. यूनियन लीडर आवेशपूर्ण बोलायला लागला की मॅनेजर जसे बोलतो तसे.

"आणखीन् काय करायचे ! . . .कोणत्यातरी कुमारी मातेला विचारून या. पाहा कसे सुचते ते. माता मात्र कुमारी हवी. "

मला हसू आले. 'कुमारी' या शब्दावर जोर तितकाच हास्यजनक होता. " हसायचे काय आहे त्यात एवढे ? कोणी नवऱ्याने सोडलेली येऊ द्या. कुणी मुकी-बहिरी येऊ द्या. त्यांचे पुनर्वसन कसे ही काळजी. पण मी – मी चांगल्या घरची ना ! – माझ्या वडलांना किंवा आईला लग्नाच्या अगोदर मी झाले असते तर एव्हाना माझा मुलगा आय. एस. एस. ! आणि मी कुमारी-माता असते तर माझ्या मुलाला फॅक्टरी काढून दिली असती, फ्याक्टरी."

आता मात्र बरोबर गोळी लागली. आता शरणागतीच द्यायला हवी होती. संपूर्णपणे शरणागती. एकदम निःशस्त्र होऊन मी घायाळ होऊन विचारले.

" बरे राणीसाहेब ! हुकूम करा. आमच्या चुका आहेत. चुका झाल्या, आता काय करावे. तुम्ही चांगल्या आहात – चांगल्या घराणातल्या आहात म्हणूनच दुर्बलांची सेवा घडते ना. का त्यांचा उपहास, व आईवडिलांचे नाव का काढता ? "

" मी माझ्या आई-वडिलांबद्दल बोलले. दुसऱ्या कोणाबद्दल मी बोलले नाही. " थोडी नरमाई.

" बरे ते असू दे. पण तुम्ही व्यंगी नाही याबाबत परमेश्वराचे उपकार मानायचे. व्यर्थ त्रागा नको. मी काय करायला हवे ?" मी थोडा राग-थोडा शांतपणा यांचे मिश्रण करीत.

" अहो जरा थोरल्याकडे लक्ष द्या. त्याने काही इंग्रजीत पवाडे रचले आहेत. गाऊन देखिल दाखवतो. आर्टिस्ट होणार असे म्हणतोय. काहीतरी करून तो पुढे येईल असे करा. " आवाज खाली करीत व मन वळविण्याचे भाषेत व जरा जवळ येऊन – पण परत मर्यादा ठेवून.

" म्हणजे काय करायचे ? . . . "

" सगळ्याच गोष्टी का सांगाव्या लागतात ? बाकीच्यांनी आपल्या मुलाला मिलिटरी कमिशनं मिळवून घेतली. कुणी अमेरिकेला धाडले. तुम्हाला मुलाला थोडे पुढे आणता येत नाही ? कुठेतरी त्याचा कार्यक्रम. . . .पण आमचेच नशीव. . ." " तुटक तुटक " बोलणे. तुटक-तुटक का तर आमच्या लक्षात यावे म्हणून. व्यवस्थित जरी असले तरी आमच्या लक्षात येत नाही. असे त्यांचे म्हणणे. तुटक - तुटक कसे मग येणार ?

हेमन्त – म्हणजे आमचे थोरले – नंबर एक. हे हल्ली कसातरी तारा व करवंटी किंवा काहीतरी डबडे किंवा मडके जोडून काहीतरी आवाज काढून प्रोग्रॅम करीत असतात. कुठे गळा दाबल्यानंतर घशातून आवाज निघतो किंवा प्राण जातांना जसा आवाज उमटतो असे काहीतरी आवाज त्या तारा करवंटीला जोडून आणि नंतर छेडून काढीत असतात, हे माझ्या कानी आले होते. हेमन्त म्हणजे बालराजे. घराण्याची कुलपरंपरा म्हणजे नोकरी. मोठ्यात मोठी दौलत म्हणजे साहेबांची मर्जी. ही दौलत मिळवायचे सोडून आमचे बाल-राजे गनिमी कावा खेळू लागले. शाळा-कॉलेजच्या परीक्षेतून बचावले जात ते केवळ "हे तो श्रीची कृपा" या न्यायाने. कारण अभ्यास करताना मी त्याला कधीच पाहिले नव्हते. या वर्षी मला वाटते युनिव्हर्सिटीची परीक्षा नव्हती म्हणून हे तुणतुणे, ते इंग्रजी गाणे आणि ओरडणे यांत तो काहीतरी प्रगती करीत होता. घराण्याची परंपरा – इमाने इतबारे चाकरी करणे व 'खाविन्द चरणारविन्दी मिलिंदायमान होणे' आणि नंतर वार्धक्यात श्वानवृत्तीने कुठला तरी 'प्रसाद', 'कृपा' किंवा 'निकेतन' बांधणे हे तो पाळणार नव्हता. " लववेना हे शिर माते " या वृत्तीने कोणाचीच नोकरी करायची नाही हे व्रत घेतलेले. अर्थात नोकरी कोण देणार म्हणा ? आणि त्याला लागणारी गुणवत्ता...? ते न बोललेले बरे. त्याच्या आईसाहेबांना वाटायचे की पोरगा अगदी अभिनव 'स्टेज आर्टिस्ट' रंगभूमीचा कलाकार होणार. रंगभूमीला कळा आणू नये म्हणजे झाले. पण मी घरच्या आघाडीवर लढाईच करीत नाही. सारे शांत ठेवत असतो. उगीच डोकेदुखी नको म्हणून. हेमंताने पवाडे व बॅलड्स अशी काही तरी चमत्कारित मिसळ केली होती. 'गरम' 'ताजी' मिसळ होती की काय माहीत नाही पण काहीतरी नवीन होते हे खरे. शिळा मसाला असायचाच. मिसळच ती. पवाडयाच्या शेवटी 'जी जी जी रे जी जी जी' असे असते तसे काही याने ज्यो, ज्यो, असं काही योजले होते. एरवी नोकरीत आला असता तर हेच 'जी – जी – जी' करावे लागणार होते. कुलपरंपरेचा अंश कुठेतरी होताच म्हणा ! 'आर्टिस्ट' ची कल्पना स्वप्नरम्य खरी. पण जेवणाची भ्रांत होते हे कुठे माहीत ? गणपती-उत्सव झाला की आर्टिस्ट पावसाळयातील बेडकाप्रमाणे इकडे तिकडे डरांव डरांव करीत फिरतात, हे मी पाहिलेले होते. गणेशोत्सवाला देखील आता आर्टिस्ट लागत नाहीत. कवाली पाहिजे असते

लोकांना किंवा तळीराम-सुधाकरांची संघ किंवा द्वंद्व गीते ! पवाडे, बॅलड कोण ऐकणार ? गणपती आरती सुद्धा ऐकत नाही तर पवाडे ऐकेल होय ? आणि पैसे देऊन कोण येणार याच्या कार्यक्रमाला ? थिएटर निम्यापेक्षा अधिक पास-धारकांनी भरलेले. पुढच्या खुर्च्या तर फुकटचांनीच सुशोभित केलेल्या ! थिएटरचे भाडे – लायटिंग यांमध्ये तो आर्टिस्ट गळ्यापर्यंत कर्जात बुडायचा. आर्टिस्टचे जीवन म्हणजे मृत्यूची गीता. त्यापेक्षा नोकरी बरी. पण माझे हे विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य मला नव्हते. आमच्या घरी नेहमीच आणीबाणी लादलेली.

" अहो – त्याला पैसे मिळवून द्या असं सांगत नाही बरे मी. " सौ.नी आम्हाला पुन्हा बजावले.

" मग – मग मी काय करावे अशी अपेक्षा ? पैसे पैसे . . ." माझे बोलणे पुरे होण्याच्या आतच प्रतिटोला आला.

" पैसे – पैसे काय घेऊन बसलात ? माहीत आहे तुम्ही आयुष्यात किती पैसे मिळवलेत ते आत्तापर्यंत ! स्वत:साठी मिळवले नाहीत तर त्याच्यासाठी कितीसे मिळवणार म्हणा . . . . "

" पण तुम्ही काय म्हणता माझ्या लक्षात आले नाही . . . " असा कोणताही वाद असला की मी आदरार्थी ' तुम्ही ' हा शब्द वापरतो. " इतका त्रागा नका करून घेऊ . . . . "

" अहो तुमच्या ओळखीच्या इतक्या शाळा आहेत. कुठेतरी त्याचा पंधरा ते वीस मिनिटांचा कार्यक्रम ठेवा. बस्. पोराला सभाधीटपणा येईल. आणि मग भीड चेपेल . . . . "

आमच्या सौ.च्या डोळ्यासमोर हेमंत राष्ट्रपतींसमोर वाद्य वाजवीत आहे आणि राष्ट्रपती व त्यांची कोण असेल ती बेगम म्हणा किंवा सौभाग्यलक्ष्मी म्हणा किंवा. . .खूप झाली आहेत व त्याला बक्षिसावर बक्षिसे मिळत आहेत. असे भारतीय फिल्म डिव्हिजनचे चित्र येत होते. व कार्यक्रम झाल्यावर हेमंतला वार्ताहर गराडा घालत आहेत व त्याच्या विजयाचे व यशाचे रहस्य विचारीत आहेत व हेमंत सांगत आहे. " माझा पहिला कार्यक्रम – आईने घडवून आणला – म्हणून . . ." ही सर्व डॉक्युमेंटरी आमच्या सौभाग्यवतीच्या डोळ्यांपुढून सरकत होती असे वाटले.

मला हे कार्यक्रम कोणत्या तरी शाळेत आयोजित करण्याचे प्रपोजल्, काही-तरीच वाटायला लागले. पुष्कळ शाळा, कॉलिजे व संस्था यांचा माझा अनेक प्रकारे संबंध आला व येत होता. पण आपण स्वत: होऊन " माझ्या मुलाचा कार्यक्रम तुमच्या शाळेत ठेवा " अशी कुणाला विनंती करणे मला बरेच वाटेना. कोणी समोर आला व गोड बोलायला लागला की सौभाग्यलक्ष्मीचे कर्कश स्वर आठवायचे, " अहो मुलाकडे लक्ष घाला " पण या गोड बोलणाऱ्याला हेमंतच्या त्या कर्कश गाण्याचा कार्यक्रम आखायला सांगणे म्हणजे आपण त्या माणसावर अन्याय करीत आहोत असे वाटायचे. हेमंतचे ते घसा फुटलेले तारस्वर – ती सोंगाड्याच्या आवाजाची तबकडी – ती कर-वंटी की मडक्याला जोडलेली ती तार व ती छेडताना येणारा ध्वनी–ऐकून या गोड बोलणाऱ्या माणसाचा ते प्रेक्षक खूनच करतील ! सकाळ-संध्याकाळ हेमंतची प्रॅक्टिस का रियाज माझ्या कानावर पडेच की. ! उगाच आपल्या हातून कुणाची हत्या व्हायला नको. पण सौभाग्यवतीचा तर फारच आग्रह.

मला कसेसेच होऊ लागले. पुत्रप्रेम नव्हे तर पत्नीबरोबर ' सहजीवन ' याकरतां – कांहीतरी करायला हवे. माझ्यावर प्रेम करणारे एक सात्त्विक सार्व-जनिक कार्यकर्ते होते. त्यांना माझी ही अगतिकता कळली. मी एका तालुक्यात काही नोकरीच्या कामानिमित्त जाणार होतो. हे त्यांना कळले. त्यांनी तावडतोब आमच्या सौभाग्यलक्ष्मीची गाठ घेतली. त्यांना सांगितले, " हेमंताला त्याच्या संगीताच्या सामग्रीसह घेऊन तुम्हीही साहेबांबरोबर या." त्या दिवशी माझ्याबरोबर मोटर गाडीत हेमंत व त्याची आई हेमंतचे ते तुणतुणे, ती सोंगाड्याची ध्वनिफीत आणखी चित्र-विचित्र टोपी ! कुणालाही वाटावे सर्कस चालली आहे !

त्या गावात प्रवासीगृहात मी उतरलो. हेमंत सारखा प्रॅक्टिस करीत होता. आई लयबद्ध होऊन ऐकत होती. मी मग माझ्या कामाला गेलो. कामावरून चार–साडेचारला मी परत यावयाचा. तत्पूर्वी त्या माझ्या मित्रांनी हेमंतच्या आईला वचनच दिले होते "हेमंतचा कार्यक्रम ठेवू. कुणाकडे तरी ठेवूच. सांगि-तल्याबरोबर चलायला हवे." हेमंतची आई केव्हा बोलावणे येईल याचा वाट पहात होती. व ' बोलावणे केव्हा येईल त्यावेळी येवो, आपण तयार असायला हवे ' या न्यायाने अगदी-अपटु-डेट तयार राहिली होती.

मी कामावरून परत आलो तो प्रवासीगृहात कुणी नव्हते. नित्याप्रमाणे बंदुकीची फैरी झडली नाही. हेमंतही दिसला नाही. मी शांतपणे आरामखुर्चीवर बसलो. तोंच एक गाडी आली. " आपणाला बोलावलेय " म्हणून सांगण्यात आले. मी त्या गाडीत बसलो. व गाडीवाला नेईल तिकडे जाऊ लागलो. गाडी फार लांब जाऊ लागली. मला वाटले हा गाडीवाला मला कुठे गुहेत तर नेऊन मारून टाकणार नाही ना? आणि मला मारून तरी याला काय मिळणार म्हणा? आणि समजा याने सांगितले असते की, दहा हजार रुपये द्या मग सोडतो" तर हेमंतने याला सांगितले असते "दहा का? वीसहजार रुपये घ्या पण पपांना सोडू नका." असो. पण शेवटी गाडी एका मोठ्या इमारतीकडे आली. त्या इमारतीत एक हॉल होता. त्या हॉलात बरीच गर्दी होती. सुरेख कपडे घातलेली मुले, मोठी माणसे व स्त्रिया बसल्या होत्या. सभास्थानावर हेमंत बसला होता. त्याच्या शेजारी आई. मी हळूच तिथे उभा राहिलो.

हेमंतने मानाचा मुजरा केला. माझ्या त्या मित्राने टाळचा वाजवायला सुरवात केली. तावडतोब टाळ्यांनी तो हॉल पूर्णपणे भरून गेला. हॉल जणू डोक्यावर घेतला. शेवटी आमच्या मित्रांनी 'थांबा थांबा' असे सांगितले. त्यावेळी कुठे थांबले सारे. हेमंतचा कार्यक्रम सुरू झाला. इतक्या मोठ्या प्रेक्षक समूहासमोर हेमंतचा कार्यक्रम पहिल्यांदाच सुरू झालेला. गीतेतील अर्जुना-सारखे झाले. हेमंतचे पाय लटपटले. त्याला गाणे सुचेना. तरी त्याने तुणतुणे हातांत घेतले. पण त्या तुणतुण्याची तार सकाळीच आई काहीतरी करीत असतांना तुटली होती हेमंत मटकन बसलाच. आईने त्याला पुन्हा उठविले. तो उठला. पुन्हा बसला. इकडे माझ्या मित्रांनी परत टाळी मारली. तावडतोब टाळ्यांचा डोंगर. कोणाला वाटावे की आईसुद्धा हेमंतची साथी आहे. आईने शेवटी धरून हेमंतला उठवले . . .

आता हेमंत म्हणायला लागला —

Joe, Joe.
Swimming Pool is my School.
My books are woman's looks
Joe - Joe . . . .

तोच ध्वनिवर्धक बंद पडला. माझ्या मित्राने जोरात टाळ्या मारल्या. टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात हेमंत मटकन खुर्चीत बसला !

तावडतोब एका बालिकेने स्टेजवर जाऊन हेमंतला हार घातला व टाळ्या पिटल्या. दुसऱ्या बालिकेने तर फक्त मुकाच घ्यायचे राहिले होते. इतकी ती हेमंतला बिलगली. भराभर बाकीच्या मुलांनी हेमंतला गराडा घालायला सुरवात केली. समारंभ संपला. एकाने तर हेमंतचा फोटो घेतला. कुणी स्वाक्षरीसाठी डायरी पुढे केली.

सगळ्यांना हेमंत म्हणजे यशस्वी शाहीर झाला होता. मी त्या मित्राला विचारले, "हेमंतचा असा सत्कार का ? त्याने काय केले ? – पुरती पांचही मिनिटे तो स्टेजवर उभा नव्हता. "

त्याने सांगितलं, "ती मुले–मुली व मोठी माणसे मूक व बधिर आहेत. मूक व बधिर संस्थेच्या आजी व माजी विद्यार्थ्यांचे संमेलन होते. हेमंत हा एक मूक व बधिर आहे, असे त्यांना वाटले व हेमंतची आई त्या संस्थेचा पूर्वीची विद्यार्थिनी आहे असा त्या सर्वांचा समज.

आपल्या संस्थेची मूक व बधिर विद्यार्थिनी आता लग्न होऊन व्यवस्थित संसार करीत आहे. तिला मूल आहे. ते मोठे आहे हे दाखविण्याकरता ती स्टेजवर आली आहे. आणि ती आतां देणगी देणार आहे, असा त्यांचा ग्रह.

अर्थात हा ग्रह त्या मित्रानेच करून दिला होता. मित्राने टाळ्या वाजवल्या की सर्वांनी वाजवायच्या व त्याने पुरे अशी खूण केली की पुरे करावयाचे ही योजना. हार–स्वाक्षरीचा बेत त्यां मित्रानेच आखला होता. तो मित्र त्या संस्थेचा आश्रयदाता. त्या सर्व जमावामध्ये एकूण एक– फक्त मी व मित्र सोडून व हेमंत व हेमंतची आई वगळून – बहिरे व मुके. संस्थेचा शिपाई फक्त मूक व बधिर नव्हता. पण तो तिथे नव्हता.

हेमंत अर्थात् यशस्वी शाहीर ठरला होता.

□ □ □

# वहिनींचा बांगडा

माझे शरीर प्रमाणापेक्षा स्थूल दिसते. जरा का – चांगलेच पोट पुढे आलेय. मान - गळा - छाती सर्व एकाच लेव्हलमध्ये. तयार कपडयांच्या दुकानातील कोणताही शर्ट - झब्बा मला चालत नाही. गणपती उत्सवात कोणत्यातरी नाटक का मेळयात घटोत्कचाचे काम करावयाचे असल्यास मला स्पेशल बोलावण यते. माझ्या गुणांबाबत काय बोलावयाचे ते लोक बोलू दे. पण देहावरून 'तुंदिलतनू' 'भाताडया' 'वजनदार' 'एकच आहार - एकच आकार' अशा तऱ्हेची शेलापागोटी माझेबाबत लोक फेकतील. देहावरून मला कुणीही ओळखून काढेल हे निश्चित आणि माझ्या वजनदारपणाचा थोडा मला अभिमानही आहे हे खरे. माझ्या वजनदारपणा-मुळे कॉलेजात विद्यार्थिनींची सहल असली की मुद्दाम मला बरोबर सगळेजण घत म्हणजे कुणी त्यांची कळ काढू नये. माझ्याकडे बघितलं की टिंगलबाज गार होऊन जावा.

हे शरीर असे होण्याचे कारण एकच "कुस्ती". ही कुस्ती मी खेळणार खाण्याच्या निरनिराळया पदार्थांबरोबर. जिलब्या - बटाटेवडे - वांगीभात भाज्या – लाडू यांच्याबरोबर जोरदार कुस्ती. जिलब्यांबरोबर तर माझे शत्रुत्वच. कितीही संख्येने त्या येवोत– फडशाच पाडे मी त्यांचा. आणि त्यांचा स्वाहाकार झाला की आत्मा शांत करण्याकरता बादलीभर मठ्ठा पीत असे अगदी गटागटा. बटाटेवडयांबाबत तर 'तो आला - उचलला - मटकावला' हेच तंत्र. हजारो बटाटे वडयांना मी गिळंकृत केले आहे. चिनी सैन्यासारखे 'लाटावर लाटा' या पद्धतीने जरी बटाटेवडे आले तरी मी एकटा पुरून उरत असे. कॉलेजच्या दिवसात मी म्हणजे खाणावळवाल्यांना पाण्यात दिसत असे. रविवार अगर सुटीच्या दिवशी होणारे भोजन म्हणजे माझा

आखाडाच ! या आखाडयातील एकमेव वीर म्हणजे मी. शत्रूंना मारत असे एवढेच नव्हे तर काही शत्रूंना कावीज करून युद्धकैदी म्हणून जसे नेतात — तसेच मी बऱ्याच वस्तूंना घरी नेई. कोणा 'बादशाही' खाणावळवाल्याला केवळ मी मेंबर झाल्यामुळे "बादशाही" तियल्या तिथेच टाकून राणा-प्रतापासारखे रानोमाळ हिंडण्याची पाळी आली. त्याचे अक्षरशः दिवाळे निघाले. आणि ऐन दिवाळीत ! तसाच एक न्यू रॉयल खाणावळवाला होता. मी मेंबर झाल्यावर पहिल्या आठच दिवसात आठव्या एडवर्डप्रमाणे त्याला 'रॉयल' कीचा त्याग करावा लागला. माझे नाव खाणावळवाल्यांना फारच परिचयाचे. मी गेलो की सध्या मेंबरशिप बंद आहे म्हणून सांगत. सर्व खाणावळवाल्यांनी शेवटी एक अलिखित ठराव केला होता - माझ्या-बाबत. असो.

कुक्कुट भोजनाचे वेळी तर मी एकदम चमकत असे. अनेक कुक्कुटांच्या नरडीचा मी घोट घेतला आहे. अनेक अबला कोंबडयांना मी विधवा केले आहे. त्यांच्या जोडीदारांच्या रुधिराने मी अक्षरशः स्नान केले आहे. त्यांच्या अनेक पुत्रांचा मी शिरच्छेद केला आहे. बकऱ्यांच्या बाबत तर मी मेषमेध केला आहे. जवळ जवळ सहस्र मेध केले असावेत. मेषमटनमार्तंड म्हणून कुणीही मला पदवी द्यावी. इतकी मी खाण्यात प्रगती केली आहे.

या सर्व तऱ्हेच्या खाण्यामध्ये प्राविण्य व प्रगती मिळविण्याकरता माझ्या पुष्कळ वहिनींनी हातभार लावला आहे. चांगलाच हातभार लावला आहे. वीर सावरकरांचे 'वहिनीस पत्र' किंवा रांगणेकरांचे नाटक 'वहिनी', य. गो. जोशींच्या 'वहिनींच्या बांगडया'. . अशी बरीच साहित्य प्रकरणे वहिनीच्या प्रेमाची महती सांगतात. या माझ्या शरीराच्या प्रमाणाबाहेर आकारामध्ये वहिनींच्या हातच्या आहाराचा भाग आहे. वहिनींच्या माहेरी भरपूर, भरपूर म्हणण्यापेक्षा भरपूर होऊन जास्त खाल्लेल्या अन्नाने या शरीरावर थोडे थर चढविले आहेत. वहिनींनी प्रेमाने शरीराच्या पाठीवर हात फिरविला नसेल पण खायला घालून शरीरावर मूठमूठभर मांस चढविले. त्या वहिनींबाबतच आता सांगायचे आहे. अनेक प्रेमळ वहिनी व एक खाष्ट वहिनी व त्यांच्या माहेरचे अन्न कसे खाल्ले व एका वहिनीने तांगडया कशा उलटवल्या हे सांगणार आहे.

माझ्या वहिनी म्हणजे सख्ख्या भावाच्या पत्नी आहेत असे नाही. मित्र पत्नी. अर्थात भ्रातृजायाही यात आहेत. माझे भाऊ कितीही 'याला अक्कल नाही' असे म्हणत असले तरी कोणत्याही वहिनीने मला भरपूर जेवण खायला घातल्याशिवाय बाहेर पाठविले नाही. कोणत्याही वहिनीकडे गेलो तर दोन फुल कप चहा व प्लेटभरून काहीतरी खायला असणारच. एक वेळ त्या गाईला पान देणार नाहीत. पण मी आलो की काही करून खायला घालतीलच. त्यांच्या माहेरीसुद्धा मला भरपूर – अगदी इच्छाभोजन व तेमुद्धा आकण्ठ मला मिळतेच व मिळालेही. माझे मित्र, बंधू खरोखरच सत्शील. चागल्या अभिजात कुलातील कन्या त्यांच्या भार्या झालेल्या. माझे मित्र भराभर पास झाले. मी मात्र एकेक इयत्ता घटवीत बसलो. पण माझ्या मित्रांचे माझ्यावर फार प्रेम. कोणी आय. ए. एस., कुणी हायकोर्ट जज्ज–पण सर्व विसरून ते माझ्याकडे येतील. 'सुभाष चल. जरा मोठ्याने हस एकदा' असे म्हणतील आणि जातील. माझ्या सौ.ची, मुलांची चौकशी करतील. मित्रांबाबत मी खरोखरीच सुखी आहे आणि माझ्या सर्व दोषांना दुर्लक्षून माझे मित्र माझ्यावर प्रेमाचा वर्षाव करतात.

असाच एक मित्र विदर्भ अमरावतीतील – देशमुख नाव त्याचे. ए. बी. का बी. ए. देशमुखांचा मुलगा. विदर्भात नुसते देशमुख कधीच नसतात. ते ए. एम. देशमुख असतील. 'जे. आर' असतील. 'एष्टी' असतील. 'बी बी' असतील. ते आपल्या इंग्रजी आद्याक्षरावरून प्रसिद्ध असतात. ए ते झेड्पर्यंत. मी फक्त क्यू व एक्सने सुरू होणारा देशमुख पाहायचा आहे. हा देशमुख मुलगा चांगला. राजकारणापासून अलिप्त व विद्या व संशोधन यात रस घेणारा. सधन प्रतिष्ठित घराण्यातला. कोल्हापूरच्या एका सरदाराने का जहागीरदाराने आपली कन्या त्याला द्यावी असे ठरविले. सरदार का जहागीरदार आपल्या गावी वाड्यात राहात होते. ती एकुलती कन्या. चांगल्या प्रतिष्ठित घरात द्यावी. राजकारण, डॉक्टर हा पेशा नसणारा मुलगा हवा होता. तो मुलगा आपल्या मुलीकडे पाहील, समाजाकडे नको हा विचार. थोडा हात सैल करून खर्च करायलाही ते तयार होते. मुलाच्या आवडीनिवडी – मुलाबाबत एकूण माहिती गुप्तपणे कशी काढायची ? हरकरे पाठविले. आणि जासूदांनी बातमी आणली की देसाई म्हणून त्या पोराचा मित्र आहे. त्याला फोडला की झाले काम. बस. एवढे कळले

मात्र – त्या जहागीरदाराने मला नजरकैदच केले. मला नजरकैदेत का बरे ठेवावे ? – माझ्या लग्नाचा मुळीसुद्धा प्रश्न नव्हता. पाळण्यातील मुलीनेही माझ्याशी त्यावेळी लग्न केले नसते किंवा वळजबरीने तिला कुणी लग्नाला उभे केले असते तर ' सावधान ' म्हणण्याच्या वेळीच पळाली असती आणि कुणा आचार्यांची शिष्या झाली असती. नंतर मला कळले की माझ्या या देशमुख मित्राबाबत त्यांना माहिती हवी आहे. मला काय – वेळ भरपूर होता व कोल्हापूर केव्हातरी पाहायचेच होते. आयता चान्स कशाला सोडा ? मी माझ्या मित्राला खाजगीत विचारले. त्याला ही कोल्हापूरकर मुलगी हवी होती आणि मी काहीतरी सांगून हे लग्न घडवून आणावे ही त्याची मनापासून इच्छा. मी आभास केला की त्याला काहीच माहीत नाही आणि एक दिवस त्या जहागीर-दाराकडे गेलो.

त्या जहागिरीच्या गावात – आता गाव ओसाडच पडले होते – माझी बड-दास्त अत्युत्तम ठेवली होती. त्यांना कुणीतरी सांगितले होते की मी ' बामण ' आहे. म्हणून त्यांनी एक म्हातारा सोवळेकरी ( ' ब्राह्मण आचारी ' ) आणला होता. गाईचे तूप – पुरणपोळी – मोतीचूरलाडू – श्रीखंड या शाकाहारी पदार्थांचा माझ्यासाठी विशिष्ट स्वयंपाक होत होता. मित्राचे होणारे श्वशूर माझ्याशी बोलत व आडून आडून विचारून घेत. मी हातचे राखे. थोडा कृत्रिमपणा माझ्या बोलण्यात येई. मलाही अवघडल्यासारखे वाटे.

दुपारीच जेवण झाल्यावर मी मुद्दाम मा-साहेबांना भेटायचे ठरविले. मा-साहेबांना अत्यानंद झाला. मा-साहेब आपण म्हणून कधी पुरुषाशी बोलत नसत. गेले पन्नास वर्षे त्या वाड्याच्या बाहेरही गेल्या नव्हत्या. आपण होऊन त्या कुणासंबंधी प्रश्नही विचारत नसत. खुद्द जहागीरदारसाहेबांचे त्यांच्याशी बोलणे थोडेच व मोजके होते. म्हणूनच जहागीरदारांना ही एकच कन्या होती. जहागीरदारांना पुत्रसंपदा फार होती म्हणतात. पण ती मुंबई – कलकत्ता शहरात विखुरलेली. कायदेशीर वारस अशी हीच. या कन्येचा वर कसा असेल याची चिंता मासाहेबांना होतीच. मी कोल्हापुरी राजघराण्यातील पद्धतीप्रमाणे मा-साहेबांना लवून चरणस्पर्श केला. त्या म्हातारीला बरे वाटले. तिने माझ्या पाठीवर हात फिरविला. मी खालीच बसलो. थोड्याच वेळात माझ्या होणाऱ्या वहिनी आल्या आणि बाजूलाच अंधारात बसल्या.

मी एकदम विषयाला हात घातला व माझ्या मित्राचे कौतुक सांगू लागलो. मला नल-दमयंती आख्यानातील हंसाचे काम करायचे होते. तावडतोब मासाहेबांनी दोन ग्लासभरून दूध व ओव्हलटीन आणून दिले. ओव्हलटीन आणलेले पाहून मी जरा आश्चर्यचकीत झालो व ग्लासाकडे पाहू लागलो.

"त्यात मांस नाही बरे. . ." मासाहेब बोलल्या. त्यांना वाटले की मी शुद्ध शाकाहारी आहे आणि म्हणून मी संशयाने पाहातोय.

"नाही. मी मांस खातोय्. पण आताच दूध कशाला . ." मी. मी मांस खातो म्हणताच मासाहेब आनंदित झाल्या व घरात तयार असलेली हरणाची सागुती मागवली.

हरणापेक्षाही चपलतेने मीही सागुती भराभरा खाल्ली आणि मग मासाहेबांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांना उत्तरे दिली. मासाहेबांची खात्री झाली की जावई निर्व्यसनी आहे.

– आणि यथाकाल करवीरनिवासिनी विदर्भकन्या बनली. मी मात्र मासाहेबांचा आवडता झालो. केव्हाही गेले तर त्यांच्याबरोबर बसवीत व मला हरणाची सागुती किंवा कोंबडा – ससा मिळेच. मी आलो की कुणाला तरी शिकारीला पिटाळत व माझी सोय होत असे. मी त्या गावात आलो की एक तरी प्राणी देहत्याग करून गेलाच पाहिजे असे होई. मासाहेब जावईबापूंशी कधी बोलत नसत. मीच त्यांच्या निरोपाचे माध्यम. आणि मला खूष करायचे म्हणजे चांगले परातभर मटण आणून ठेवायचे. इकडचे कोल्हापुरी मटण खाल्ले की विदर्भात निरोप घेऊन गेलो की तेथील मटण खायचे. केवळ मटणा-वरच ते सर्व वर्ष गेले.

कालांतराने विदर्भस्नुषा माहेरी आली. पुत्ररत्नाला तिने जन्म दिला. देशमुखसाहेब कोणत्यातरी संशोधनात गुंतले व आपले लग्न झाले हे विसरूनच गेले. मला तावडतोब सांगावा आला. चांगला आठवडाभर कोल्हापूरच्या त्या जहागिरीच्या खेड्यात गेलो. मासाहेबांकडे गेलो तो दोन परात सागुती तयार. यथेच्छ ताव मारला. नंतर मासाहेबांनी विषय काढला. जावईबापू आले नाहीत.

"एवढंच ना ? मी पाहातो काय ते."

अशी प्रतिज्ञा केली. विदर्भात गेलो. त्या देशमुखाचे संशोधन आता संपले

होते. आणि आता कुठे त्याला आपल्या पत्नीची आठवण आली. त्याला घेऊन कोल्हापूरला गेलो.

मासाहेबांना आनंद झाला. मला मटनाचे – झणझणीत मटणाचे ताट !

हे असे नेहेमीच माझ्या मित्रांच्या बाबतीत घडायचे. मित्रांचे हे नाजुक संबंध व्यवस्थित ठेवण्याकरिता मित्रपत्नींच्या मातोश्री माझ्यावर फार प्रेम करायच्या. मला सर्व अंत:पुरात प्रवेश व कोणी पाहात नाही हे पाहून भरपूर जेवण. जेवण म्हणण्यापेक्षा मांस व मटण. ते एकदा माझे झाले की मग पुढचे काम व्यवस्थित.

एका मित्राच्या बाबतीत त्याच्या सासू बहुधा त्या गोव्याकडील सुवर्णकार समाजाच्या होत्या. त्यांनी प्रथम प्रथम मला चांगले खायला दिले. पण नंतर जावईबापू त्यांच्याकडे फार चांगले वागायला लागल्यावर माझा भाव घसरला. त्या जावईबापूला मी हे सांगितलं. त्याचे माझ्यावर विशेष प्रेम. एक दिवस तो सासुरवाडीला गेला. जरा रागातच. चहा दिला तो घेतला नाही. मेहुण्यांशी बोलला नाही. सासऱ्यांना उडत उडत नमस्कार केला आणि परत स्वत:च्या घरी गेला. ताबडतोब त्याचे तीनही मेहुणे माझ्याकडे धावत आले. " आईने बोलाविले. "

मी गेलो. आईने चांगला दोन वाट्या तुपाचा सांजा आणि मटण पुढे ठेवलं. ते खाल्ल्यावर मी त्या आईला विचारलं ' का बोलवणे केलेत. ' आईसाहेबांनी काळजी व्यक्त केली की जावईबापू एकदम बिघडले आहेत. मी म्हणालोच " तो बरा तर बरा. नाहीतर काय करेल ते सांगता येणार नाही. ताबडतोब आईने आणखी मटण मागविले. माझ्यासमोर ठेवलं मी यथेच्छ बोकणा मारला.

आणि मग जावईबापूंना घेऊन आलो. त्या दिवसापासून त्या घरात आता मी केव्हाही गेलो तर मटण तयार. अगोदर मटण – गोवा पद्धतीचे – आणि मग दुसऱ्या गोष्टी. अर्थात् मटण खाऊन होईपर्यंत गोष्टी संपतातच.

पण यानंतर माझी कार्यपद्धती ठरून गेली. जावईबापूंबरोबर त्याच्या सासुरवाडीला जायचे. जावईबापूने मात्र जरा रागात असल्यासारखे दाखवायचे. चहा पहिल्यांदा नको म्हणायचा. नंतर घेतला तर अर्धाच कप घ्यायचा. कुणी मेहुणा जवळ आला तर बोलायचे नाही. तर कुणी विचारले तर तुटक बोलायचं.

हे झाले की त्या सासूबाई मला निरोप धाडणार. किंवा मला स्पेशल अंतःपुरात बोलावणार. मला तृप्तीभोजन – कोंबडी किंवा बकरी वळी दिली जाणार पुलाव – बस. एवढे झाले की मग माझ्याकडून सासू चौकशी करून माहिती काढून घेणार – का जावईबापू असे करतो वगैरे.

मग मी सांगणार – " त्यात काही काळजी करण्याचे नाही. मी सांगतो त्याला. "

आणि मग जावईबापू शांत व्हायचे. या पद्धतीने मी चांगलाच माजलो. मुसलमान, बोहरी, पार्शी, मराठे – सर्व समाजात सासू एकाच तऱ्हेच्या! जावई जरा रागावला की घाबरून जाणाऱ्या. आणि या साऱ्या सासवा मला जावयाचा मित्र असल्याने फार धरून ठेवीत आणि माझी चंगळ चालेच ! पुलाव्याचे सर्व प्रकार मी खाल्ले आहेत आणि ते सुद्धा भरपूर. फक्त जावई-बापूने तुसडेपणाने वागायला हवे. सासरे आपले गप्प असतात. कारण तेही आपल्या तारुण्यात असे वागलेले असतात म्हणा. जावईबापूंचे खाते सर्वस्वी सासू सांभाळत असते. आणि एकदा त्या सासूला कळले की त्या जावयाचा मी मित्र की मग मला खायला भरपूर. माझ्या सगळ्या मित्रांच्या सासवांना मी असा परिचित आणि म्हणून माझे शरीर जरा मोठेच.

आबासाहेब हे माझे असेच मित्र. सात्त्विक व करारी. बी. एससी. कृषी झाल्यावर शेतकऱ्यांची सेवा करू म्हणून ते मध्यप्रदेश शासनात गेले. शेतकऱ्यांची सेवा करायची ना. मग भारतात कुठेही. महाराष्ट्रात केली तर राज-कारणाचा वास येईल म्हणून त्यांनी पूर्वी भोपाळ राज्यात नोकरी धरली होती. त्यानंतर ते मध्यप्रदेश राज्यात रुजू झाले. यांच्या विवाहप्रसंगी यांच्या सासू-मेहुण्यांनी माझी फारच मदत घेतली. ती म्हणजे त्यांची माहिती मिळविण्या-करता. हे लोक पूर्वीच्या सावंतवाडी संस्थानातील आजगावचे. त्यांचा देव वेताळ पण यांच्यातील पुरुष माणसे फारच शांत व धर्मशील. हे आजगावकर लोक ग्रँटरोडमध्ये राहात. त्यांची मुलगी 'बेबी' ती मात्र जरा लाडकी होती. तिला या आबासाहेबांकडे द्यावी म्हणून तिच्या वडिलांचा विचार. अर्थात आबासाहेबांना जवळचा मीच हे त्यांना कळले आणि मला बोलावणे आले. त्या 'बेबी'च्या आई गोव्याच्या. धार्मिक व प्रेमळ. त्यांचा माझ्यावर लोभ. त्यांनी बोलावल्यावर गोव्याचे स्पेशल पापलेट त्यांनी करून घातले. मी ते

यथेच्छ खाल्ले आणि नंतर आबासाहेबांचा व त्यांचा संबंध जुळून आला. कु. बेबीच्या सौ. अरुंधती झाल्या. पण का कुणास ठाऊक मी हे अधाशासारखे खाणे आणि ते सुद्धा त्या मातेच्या अगतिकपणाचा फायदा घेऊन — त्या बेबीला रुचत नसावे. पण — पण काय करणार ? मी पडलो त्या जावयाचा जिगर दोस्त.

यथाकाल विवाह झाला. या बेबीला एक बेबी झाली. आणि ही बेबी - माहेरला आली. पापलेट, इस्वण, सरंगे व बांगडे — हे या आजगावकरांचे वैशिष्टय. मटण खाऊन मला कंटाळा आला होता. बांगडे खावे व तेसुद्धा भरपूर असे वाटू लागलं . . .आबासाहेबांना मी व माझ्या मित्रांनी योजना समजावून सांगितली. आबासाहेब अगोदर खाण्यात कच्चे. बांगडे खायचे म्हटले तर फार फार तर एक तुकडा. आबासाहेबांबरोबर मी जायचे. पण जावयाचे जेवण थोडेच हे माहीत असल्याने जास्त काय करतील आणि मग माझी पंचाइत. तर याकरता आबासाहेबांनी रागवायचे व जावईबापूचे पाणी दाखवायचे. मग मला सासूबाई बोलावतील व बांगडा खायला घालतील ही योजना.

ठरल्याप्रमाणे आबासाहेब व मी ग्रॅन्ट रोडला गेलो. घंटा जरा हळूच वाजविली. "आबासाहेब आले," "आबासाहेब आले" घरात प्रत्येकजण बोलायला लागले. मी आबासाहेबाला चिमटा घेतला. आबासाहेब आता रागाने लाल झाले. खुर्चीवर बसले. हसेनात की बोलेनात. मी सरळ आत गेलो. आबासाहेब चार मिनिटे स्वस्थ बसले. मेव्हण्याने चहा आणून दिला.

"का ? नको मला चहा. कशाला तो. . . ."

"थोडा• घ्या. थोडा घ्या."

"नकोय् म्हणून मी सांगितलंय् ना" आबासाहेब.

अगदी किल्ली दिल्याप्रमाणे शेड्यूलनुसार आबासाहेब आपल्या भ्रुकुटी चढवीत होते. घरात बांगड्याचा वास येत होता. आपण जेवढे रागावलेले दाखवू तेवढे जास्त प्रमाणात बांगडे आपल्या मित्राच्या घशात जाणार हे आबासाहेबांचे गणीत. आबासाहेब अगदी शहाजहानसारखे बसले होते. आबासाहेबांच्या श्वशुराना थोडी चुणुक होतीच. ते शांत बसले.

मी इकडे आबासाहेबांच्या सासूबाईंकडे बसलो. तोच आबासाहेबांचा मेव्हणा येऊन सासूबाईना काही खुणा करू लागला. आबासाहेबांनी चहा घेतला नाही हे सासूबाईना कळविण्यात आले. सासूबाई थोड्या बावचळल्या. मी

जवळच होतो. मला बांगडा हवा होता. बांगडा अजून तव्यावरच तडफडत होता. बांगडा पानात अगर बशीत आणून माझ्यासमोर ठेवला की मग तिकडे आबासाहेब शांत होणार होते. तडफड संपणार होती.

इतक्यात बेबी वहिनी आली. बेबीवहिनीला आईने सांगितले की आबासाहेब नेहेमीच्या मुडमध्ये नाहीत. चहा घेत नाहीत. आणि काहीतरी बिघडले आहे. बेबीवहिनीनी माझ्याकडे पाहिले व तडफडणाऱ्या बांगड्याकडेही पाहिले.

बेबीवहिनी तडक बाहेर गेली. आबासाहेबांचा शहाजहान झाला होता. पण बेबीवहिनी नूरजहाँ नसली तरी चांगली जहाँबाज होती. तिने तेवढ्याच तजेलदार डोळ्यांनी आबासाहेबांकडे दृष्टी टाकली. आबासाहेबांना शहाजहानला जसे त्याच्या मुलांनी तुरुंगात टाकले त्यावेळी शहाजहानाला जसे वाटावे तसे झाले. आबासाहेबांना चहाची फारच तलफ आली होती. माझ्या नादाने त्याने ऐटीत चहा नको म्हणून सांगितले होते. मी मात्र त्यांना चहा न मिळाल्यामुळे बांगडा गट्टम करणार होतो. बेबीवहिनीला पाहताच आबासाहेबांनी मान खालती टाकली. बेबीवहिनी आबासाहेबांच्या जवळ तसेच डोळे वटारीत - डोळे वटारीत गेली. बिचारे मेव्हणे आणि श्वशूर बाजूला बसले.

इकडे सासूबाई विचारात पडल्या. जावईबापू का बरे रागवले. काय बिनसले त्यांचे. मला विचारायचे पण बांगडा पोटात पडल्याशिवाय माझी मोटार व्यवस्थित सुरू होणारच नव्हती.

"झाला का बांगडा ?" सासूबाईंनी पृच्छा केली.

तोच अरु का, बेबीवहिनी आत आल्या. माझ्याकडे त्या चमत्कारिक दृष्टीने पाहू लागल्या.

"काय झाले ग बेबी. . "

"अग चहा आहे कुठे. . . " बेबी.

बेबीच चहा घेऊन बाहेर गेली. आबासाहेबांच्याजवळ तिने चहा नेला आणि नुसते पाहिले मात्र.

"घ्या आता हं. नाहीतर मी तर जन्मात चहा करणार नाही " आबासाहेब खुद्कन् हसले. भोळे बिचारे.

अरुवहिनी आत पुन्हा आल्या व तिने निक्षून सांगितलं.

"आई, आज–निदान आता तरी मी बांगडा इथे भाऊजींना खायला घालणार नाही. जे काही खायचे असेल ते पंक्तीत. . . "

"अग अग, बेबी काय बोलतेस तू हे ?" आबासाहेबांच्या सासूबाई.

" मी बरोबर तेच करीत आहे. माझा नवरा रागावला तर त्याला सरळ आणायला मी समर्थ आहे. या भाऊजींना मध्यस्थी करायला नको. यांचच लग्न कसं होत नाही ते पाहा म्हणावं. या भाऊजींना बाहेरच्या खोलीत बसव. ज्यांच्याबरोबर आले त्यांच्याबरोबरच बसा म्हणावं. "

मी पुरता गडबडलो. आमची योजनाच फसली. आबासाहेब हसले व फसले. मला बांगडा काही मनसोक्त खायला मिळाला नाही. वहिनींनी स्पेशल बांगडा आणला होता तो.

वहिनींचा बांगडा –

माझे पितळच उघडं पडलं. आबासाहेब माझी थट्टा करतात.

बांगड्याने तंगड्या मोडल्या !

तुझ्या वहिनीचा बांगडा !

□ □ □

# आपले मरण पाहिले म्या डोळा

पृथ्वीतलावर येऊन आम्ही महत्कार्य केले असेल ते हे की आमचा वंशवेल आम्ही वाढविला! माझ्या पत्रिकेतील सर्व भाकिते खोटी ठरली पण पत्रिकेच्या शेवटी एक भरतवाक्य छापलेले असते ना. . . " वंशो विस्तारता यातु . " ज्या कोणाची ही जन्मपत्रिका असेल त्याचा वंश विस्तार पावो " एवढेच भरतवाक्य ठरले. खरे आमची पुत्रसंपदा तीन दोन पुत्र, एक कन्या. थोरल्याचे नाव 'अमलेन्दू' हे बंगाली नाव आमच्या सौभाग्यलक्ष्मीच्या माहेरकडील अशाच एका कैकेयीने सुचविले. ही कैकेयी राहायची कलकत्त्याला! पण तिथून आमच्या सौभाग्यलक्ष्मीच्या माहेरच्या माणसांवर फार हुकमत गाजवायची. कलकत्त्याच्या या काळीमातेला आमच्या श्वशूरगृहात भलताच भाव आणि ही-देखील भाव मारण्यात पटाईत. " मला किनै – किनै – बंगाली नावे फार आवडतात. कितीतरी सुंदर असतात " असे नेहमी म्हणायची. हिच्या बंगाली नावांची हौस पुरवायलाच की काय आमच्या ज्येष्ठ व श्रेष्ठ कुलदीपकांना पृथ्वीवर अवतार घ्यावा लागला. आमच्या श्वशूरांना या कैकेयीच्या इच्छेला मान द्यावा लागला व आमच्या पहिल्या कुलदीपकाचे नाव या कैकयीने 'अमलेन्दू' ठेवले आणि त्या कैकयीचा एक बंगाली नावाबद्दलचा वर पुरा झाला. तसे तिच्या पतिदेवाला वरेच पुत्र होते. चांगला स्वामी विषयानंद होता तो. कन्या व कुमारींकडे–कन्याकुमारींकडे जात असे आणि हे पुत्र तिचे नव्हते. तिला एक का दोन कन्या आहेत. पण बंगाली नसून केरळकोकिळा वाटतात. सांगायचे म्हणजे आमच्या मुलांच्या नावावर वंगीय ठसा या कैकयीने मारला. दुसऱ्यांदा कन्यारत्नाचा आम्हाला लाभ झाला. या कन्या म्हणजे आम्ही कनककोशच समजतो. पण या कैकयीने पुन्हा सोनार बांगलाकडील नांव ठेवले 'आभा'– तिसरे कालांतराने जन्मले. त्याचे नाव ईश्वरचंद्र, तर या

कैकयीमुळे हे 'अ–आ–ईचे मॅचिंग आमच्या घरात आले. आमच्या पूर्णांगिनीला मॅचिंग – सुसंवादित्वाची विलक्षण आवड. 'अ–आ–ई'चे हे मॅचिंग पूर्णपणे जमले आणि त्यांना पसंत पडले. त्या कैकेयीमातेबद्दल यासाठी त्यांच्या मनात आदर आहेच. सिमेट्रीकरिता पतिदेवांबरोबर त्यांच्या एकदम उलट वागायचे म्हणजे 'सिमेट्री' जमते असे त्यांचे (–अर्थात त्या कैकेयीचेच) मत म्हणून छत्तीस आकडा प्रिय. पत्रिकेत छत्तीस गुण जमले नसून बरोबर छत्तिसासारखे आम्ही दोघांचे प्रत्येक गुणविशेष आहेत. आता आमची ही 'अ–आ–ई' वर्णमाला 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत गेली असती पण आम्ही अज्ञानी प्रयत्नांची पराकाष्ठा करून ती योजना थांबविली. कारण प्रश्न आला की 'ञ' 'ङ' 'ण' ने सुरू होणारी नावे कोठून आणायची ? पण त्या कैकेयीने काहीतरी गौडबंगाल करून बंगाली साहित्यातून 'ञ' 'ङ' 'ण' ने सुरू होणारी नावे आणली असती म्हणा. म्हणजे सर्व बाराखड्या मिळून शंभर व पाच अशा एकशेपाच सदस्य असलेल्या कुटुंबाचा मी कुटुंबप्रमुख झालो असतो व कर्जाने बेजार होऊन धृतराष्ट्रासारखा आंधळा बनणार होतो. देणेकऱ्यांनी या 'अ–ज्ञ' वर्णमालेच्या जन्मदात्याला गळा दाबून ठार केले असते. असो सध्या आमचे कुटुंब म्हणजे ही तीन 'अ–आ–ई कारटी व त्यांची आई – पुण्यशील मातोश्री व शून्यातून ब्रह्म निर्माण करणार सोऽहम्–एकूण पंचमहाभूते.

ही तीन कारटी घरात असली की त्या दिवशी धरणीकंपच घरी असणार म्हणून समजायचे. अभ्यासाचे नांव नाहीच. प्रत्येकाचे प्रगतिपुस्तक म्हणजे अधोगतीचाच आलेख. तिघांच्या तऱ्हा तीन पण धांगडधिंगाबाबत एक मत. थोरल्याचे कॉलेज अकराला! तर लहानग्यांचे कॉन्व्हेंट सकाळी, तर मधलीचे कान्व्हेंट दोन वेळा सकाळी व दुपारी. थोरला म्हणजे शुद्ध आर्य व वेदांची परंपरा जतन करणाऱ्या कॉलेजात जाणारा, तर धाकटी दोन 'वसुधैव कुटुम्बकम्' या तत्त्वप्रणालीच्या कॉन्व्हेंटमध्ये. थोरल्याच्या कॉलेजात श्रद्धास्थान म्हणजे वक्रतुंड महाकाय. . . .व चांगले पोटभरून जेवणारा गणपती, तर लहान्या दोघांचा देव-उपाशी येशू व नियमितपणे मोजके खाणारी मेरी ! थोरल्याच्या शाळेत गोमाता अतिपूज्य तर कॉन्व्हेंटचे सर्व शिक्षक गोमांस विशेषतः 'वृषभाची जिव्हा' आवडीने खाणारे असे वैचित्र्य.

एकदा गंमतच झाली. गणेशचतुर्थी व ईद एकाच दिवशी आली. चतुर्थीचे चंद्रदर्शन नको म्हणून थोरला घरीच राहीला. तर ईदचे दिवशी क्रेसेंट पाहा व विश्वबंधुत्वाला सामोरे जा असा लहानांना संदेश. त्याकरिता मुद्दाम पपा व आईंना घेऊन अर्धचंद्र पाहायचा असे दोघांनी ठरविले. घरात सुट्टी असली की ही पोरे व त्यांचे मित्र असायचेच. त्यावेळी घरातले सामान तुटलेच – फर्निचर मोडलेच असे समजायचे. शेजारचा फर्निचरवाला महिन्याच्या शेवटी मला सोफासेट नवीन घ्यायचा का हे विचारतोच. सोफ्याचे अजून चारही पाय जायचे आहेत. तीन पाय गेले आहेत सर्वात आवडता खेळ या पोरांचा म्हणजे 'चोर–शिपाई'. आता हे सगळेच चोर. पण खेळ म्हणून कोणीतरी शिपाई व्हायचे आणि हा शिपाई जाता जाता शेंगा तोंडात टाकणार. कधी कधी शाळा मास्तर व विद्यार्थी हा खेळ. आमच्या कन्या मास्तरीणबाईचे काम करणार आणि बाकीचे विद्यार्थी. कधी लढाई तर कधी पार्लमेंट असले खेळ. लहानगा ईश्वर ( खरे म्हणजे सैतानच ) मला एकदा विचारत होता, "द्यूत म्हणजे काय ? कौरव–पांडव द्यूत खेळत होते म्हणजे काय खेळत होते ?" द्यूताला कोणी बोलाविले तर नाही म्हणावयाचे नसते तरी आतापासून द्यूत शिकवा – असे सांगे मला. हे द्यूतभास्कर होणार तर आता नक्कीच वाटायला लागले. धर्मराजांनी द्रौपदी पणाला लावली. यथाकाल हा धाकटा आईवडिलांना कावडीत घेऊन द्यूत-स्थानावर नेईल व पणाला लावेल. सांगायला हरकत नाही की या पोरांनी माझीही वाटणी केलीय. माझ्या डाव्या कुशीला कुणी झोपायचे – उजव्या कुशीला कुणी झोपायचे – पपा बाहेर चालले की त्यांचे बूट कोणी पॉलिश करायचे याबाबत तह–वाटण्या झाल्या आहेत. त्या समझोत्यातच माझ्या हाताची, पायाची वाटणी झालेली आहे त्या पेठेत आमचे घर कोणते हे विचारावे लागतच नाही. आतील आरडा-ओरडीने अर्ध्या मैलावरून कळेलच. हस्तकौशल्य वापरून एक पाटी पोरांनी तयार केलेली आहे.

| | |
|---|---|
| अमलेन्दु देसाई | अकरावी पूर्ण XII (सध्या) |
| आभा देसाई | सहावी पूर्ण VII (सध्या) |
| ईश्वर देसाई | दुसरी Second |

आणि खालती 'आहेत'. 'नाहीत' हा शब्द नाहीच मुळी.

दाही नसल्या तरी उत्तर व दक्षिण दिशेला आम्हाला अन्नासाठी जावे लागते. संध्याकाळी दमून घरी आलो की आमची वाटणी होतेच. उजव्या हातातले सामान थोरला घेणार. मधलीने 'आभाने' डाव्या हातात जे असेल ते उचलून घ्यायचे व चरणकमलांतील बट ईश्वराने काढून जागच्याजागी ठेवायचे आणि नंतर यांचा धांगडधिंगा सुरूच. सुटीच्या दिवशी तर नावाला म्हणून झोप नाही पोरांच्या डवा पारटर्या – राक्षसपाटर्या'च म्हणा ना – नाटके हा सारा गोंधळ. वरे कुणाला मारावे म्हटले तर यांच्या प्रात: स्मरणीय मातोश्री आपल्या ठेवणीतील आवाजांत सुनावणार.

"उठल्या–सुटल्या मुलांना रागवावे हा कायदा कोणता म्हणते मी. पोरेच ती. लहान असेस्तोवर दंगा करणारच. आता का मामंजी रागावतील मुले दंगा करतात म्हणून . . . थोडा विचार करावा माणसांनी . . . ."

एवढे खरे की मुलांना जन्म देतांना आम्ही ही फले उद्‌भवतील असा विचार केला नव्हताच. आम्ही "निष्काम" नव्हतो ! पण त्यावेळी फलाची अपेक्षा नव्हती.

असो. पण रागवायचे कुणावर ?

त्या दिवशी सुट्टी होती. बरेच दिवस चालढकल केल्यामुळे ऑफिसचे काम तुंबले होते. ते घरी आणले होते. हिशेवाच्या चुका पाहावयाच्या होत्या आणि ते ऑफिसमध्ये जमत नव्हते. उलट ती चूक माझ्या लक्षांत येऊ नये म्हणून कर्मचारीवृंद मी ते काम हातात घेतले की कांहीतरी नवीन काम काढून माझे लक्ष दुसरीकडे नेण्याचा प्रयत्न करी. म्हणून मी ते हिशेब घरी आणले होते. वरिष्ठांचे फोनही आले होते. काम लवकर पाहा व अहवाल पाठवा. एकदोनदा वरिष्ठांनी बोलावलेही होते व मला काम जमत नव्हतं म्हणून मी घरी आणले होते. अगदी कातावून गेलो होतो. आणि पुन्हा पुन्हा हिशेब पाहात होतो. चूक कुठे दिसते पाहात होतो. तोच –

" सापडला रे सापडला . . . .

" ए नाही. नाही नाही रे. याने अगोदर बघितले. मी पाहिलेयाला . . . .

" खोटा–खोटा–रडी खाती – खोटारडा रे खोटारडा . . . ."

" मला खोटा म्हणतोस बघ हं . . . ."

" तूच तूच खोटारडा . . . ."

हे सर्व आवेशपूर्ण संभाषण आणि त्यानंतर आरडा ओरडा व मारामारी. इकडे मला हिशेब कळेनात. साहेब मानगुटीला बसलेले आणि परत ही मारामारी. या सर्व चोरांची व शिपायांची मारामारी. चोरांनी शिपायाला मारले. शिपायाने चोराचा चावा घेतला. . . . आणि गोंगाट. शेवटी न राहवून मी म्हटले.

" अरे गप बसता की नाही ? काय चालवलेय् हे घरांचे. मी इथून जातोच कसा. . . . "

" खरंच पपा तुम्ही बाहेर फिरायला जा कसे. . . . "

मधली आभा.

" बाहेर आणि मी "– मी जरा चिडलो. ही चिमुरडी खुशाल मला घराच्या बाहेर जाण्यास सांगते याबद्दल माझा राग वाढलाच. मी शांतपणे काम करतोय. आणि ही चिमुरडी मलाच सांगते बाहेर जायला. मी चिडलो.

" बाहेर–नाही. मी आता चाललोच. परत घरात येतच नाही. या घरात कुणी पाऊल टाकण्याची तरी सोय आहे ? अभ्यास नाही, शिस्त नाही. सारखी ओरड. मी चाललोच. . . . "

आता मी नेहेमीपेक्षा निराळा चिडलेलो आहे हे पाहून हे सगळे चोर आता एकदम संत झाले. प्रत्येकाने आपआपले काम टाकले व खेळ तिथेच थांबला. प्रत्येकाचे मित्र आपआपल्या घरी पळाले. धाकटा उद्दामपणे भांडत होता. तो कोपऱ्यांत बसला. मधले हळूच आईच्या कुशीत दडले. आई दुपारी पडणार होती म्हणून आताच हातात काहीतरी वर्तमानपत्र तिने घेतले होते. वर्तमानपत्र घेतले की छान झोप येत असे तिला. वाचता वाचता झोपी जायचे. तीदेखील आता गडबडली.

" काय झाले मी म्हणते. . . . " तिचा ठराविक फेकीतील आवाज.

" काही झाले नाही. आता होणार आहे " मी आता पुरुषत्व गाजवायचे सुरू केले.

यांना जरा शिस्त लावा. मी आता बाहेरच जातो.

" शिस्त म्हणजे आणखीन कसली. . . . " सौ. जरा बेफिकिरीच्या आवाजात.

" हे बघ – मला तू आता शिकवू नकोस " – अगदी छत्रपतींच्या आवेशात मी बोलायला सुरवात केली. मी रागावलोच होतो. हिशेबातील चूक सापडत

नाही म्हणून रागवलो होतो खरा. पण आज काही केल्या वायकांपुढे नमते घ्यायचे नाही असे ठरविले. " काही नाही " मी आता वायकोपुढे आवाज चढविला. नाही म्हणायला या " चोरांचा " मी वाप होतोच. मलाही चोरांपेक्षा चांगला अभिनय जमतोच. " यांना शिक्षा एकच. ती ही की मी इथून जाणे — कायमचेच जाणे " मी आवेशपूर्ण बोललो.

" असे अभद्र बोलू नये . . . " सौभाग्यवतीचा नरमाईचा आवाज पण— त्यातही ' आपण सल्ला देतो ' असा सुनावणीची झालर असलेला भाव.

" मला माहीत आहे, काय बोलावे आणि काय बोलू नये ते. आता या मुलाबाळांसमोर मला शिकवू नकोस. तू या मुलांना काय शिकवतेस तेच वघ. घर म्हणजे धुडगूस झालाय्. काही शांती . . . " मी आता खटकेवाज बोलू लागलो. अभिनयही उत्तम झाला. सौभाग्यवतीने मान खालती घातली. पोरे निमूटपणे वसून, थोरल्याने तोंडासमोर खोटेच पुस्तक धरले होते. धाकटा गप्प बसला होता. पण त्याच्या डोळ्यांत मिष्किलपणा दिसत होता. सारे शांत होते. पण आता माझा जयच होत होता.

" मी निघालोच आता. मला राह्यचे नाही. कुठे आहे माझा बुशशर्ट ? " तरी मुले शांत.

" मीच घेतो आता माझा बुशशर्ट. माझे कपडे. कुणाचा संपर्क नको. संवंधच नको यांचा. " मी पुन्हा त्राग्यानेच.

तोच धाकटयाने माझी चप्पल वाहेर काढून ठेवली. मधलीने माझा वुशशर्ट आणला.

मी त्यांचेकडे न वघता वुशशर्ट घातला. पँट घातली आणि निघायला सुरुवात केली.

" थांवा हे पैशाचे पाकीट ठेवा. " थोरला.

" हो पैसे पाहिजेतच. जातो आता लांब. " थोरल्याकडे न पाहता मी बोललो. थोरला माझे पैसे वगैरे सांभाळून ठेवत असतो. थोरल्याने पैशाचे पाकीट आणून बुशशर्टच्या खिशात ठेवले आणि तो गप्प बसला.

एका घरात अचानक दरवडेखोर आला की जसे लोक शांत वसतात व दरोडेखोर जे मागेल ते देतात, तशाच स्वरूपाचे एकंदरीत चालले होते. मी अगदी रागांत होतो. आणि मुले व त्यांची आई अगदी भयग्रस्त व शांत होती.

पैशाचे पाकीट खिशात ठेवल्यावर मी चालू लागलो. . . तोच सौ.ने अत्यंत हळू आवाजात गळ टाकला.

" कोणी आले तर काय सांगायचे ? केव्हा येणे होईल ?" आमच्या सौ. ने असा प्रश्न केला. मी उत्तर दिले की माझ्या रागाचा तकलुदीपणा बाहेर येणार. मी जरा चिडलेलाच होतो आणि आता कोणालाच शरण जायचे नाही असे ठरविले होते मी. परत रागाने बोललो,

" आता परत कशाला. चाललोच मी. तुम्ही सगळे चांगलं वागा अगर न वागा. मी आता परत येतच नाही. मला जाऊ द्या. माझी काळजी आता नको. मला काहीसुद्धा नको.. "

आता सौं.ला मात्र झटका बसला. नित्याप्रमाणे ठेवणीतील अस्त्र काढल्यावर बिरघळणारा हा शूर वीर भलताच संतापला आहे हे पटले. मीही चिडलोच होतो. सौभाग्यलक्ष्मीची सारी अस्त्रे बोथट झाली होती व आता तिच्या कोणत्याच शस्त्रांनी अगर अस्त्रांनी माझ्यावर परिणाम होणार नव्हता. तरीसुद्धा सौं.ने एक काकुळतीची नजर फेकली व विचारले,

" एवढे पैसे पुरतील ? सुटे दहा पंधरा रुपये ठेवावेत. . .पाकिटात किती असतील पाहिले नाहीत. ."

" काही नको माझी काळजी. मला कळते ही माझी काळजी का ते. मुलांना शिस्त लावा. काही नकोत मला पैसे. . . ."

इतक्यात थोरल्याने भीत भीत पुढे होऊन खिशात दहाबारा रुपये कोंबले. सुट्या नोटाच आणि गप्प उभा राहिला.

मी खिसे मुळी चाचपडलेसुद्धा नाहीत. आणि निघालो. तोच पुन्हा एकदा जोराने जाळे फेकण्याचा हेतूने सौ.ने आवाज काढला,

" ते पाकीट जपून हं. हरवाल. . ."

आणि अगदी खाली मान घालून, माझ्याकडे नजर न टाकता, पण हळूच चोरटी नजर मला समजेल अशा तऱ्हेने टाकत. थोडक्यात म्हणजे मी तिला पहिल्यांदा पाह्यला गेलो होतो त्यावेळी तिने जशी पोझ घेतली तशा तऱ्हेची. पण आता जरा केसाच्या बटा पांढऱ्या झालेल्या !

मी पण आता निर्धारच केला होता. काहीही असो या सौ.चे काही आज चालवून घ्यायचे नाही. मी बोललो,

. . .

" हरवले तर हरवले. राहू द्यात हे पाकीट. तुम्हालाच ठेवा. मला कशाला. " आता आणखी एक वरती या पडलेल्यांना चपराक बसावी म्हणून मी बोललो, त्याचबरोबर आपण साहेब आहोत हे दाखवण्याकरता म्हणून.

"I am disgusted; thoroughly disgusted."

मुख्य शत्रू म्हणजे सौभाग्यलक्ष्मी आता शांतच झाल्या. त्यांचे सारे बाण, शस्त्रे, अस्त्रे या योद्धयापुढे निकामी पडत चालली. पुन्हा एकदा शेवटचे अमोघ अस्त्र म्हणून सौभाग्यलक्ष्मीने सांगितले,

" कुठेही जा. आपला वाढदिवस म्हणून मुलांनी लॉटरीचे तिकीट काढले ते ठेवलेय. ते पाहावे. "

लॉटरी व मुले म्हटले म्हणजे मी विरघळेन म्हणून हा मायावी बाण टाकला होता.

नुकताच माझा वाढदिवस झाला होता. ( growing in ears and years also ) त्या दिवशी सर्व मुलांनी एकमताने माझ्यासाठी लॉटरीचे तिकीट काढले होते. माझ्या जन्मतारखेतील आकडे एकत्र करून जेवढे आकडे येतात तेवढा एक नंबर काढला होता. त्या नंबरचे तिकीट काढले होते आणि पाकिटात ठेवले होते. तिकीट लागले तर माझ्या नशिबामुळे. आणि मग मात्र त्या त्या सगळ्या चोरांची भागी. नाही लागले तर " पपा लकी नाहीत " हा एकमताने ठराव. हे तिकीट पाकिटात ठेवले होते.

मी पण आता विजयी वीर होतो. या लॉटरी तिकिटाला भुरळून जायचेच नाही असा निर्धार केला होता ना. मी पुन्हा रागाने म्हणालो,

" घ्या ते तिकीट. त्याच्याच करता मी हवा आहे तुम्हाला. " पुन्हा सारे गप्प बसले. सौ.चा सागरगोट्याचा डाव मी उधळून लावला. पण पुन्हा सौ.ने हिंमत न हरता किनऱ्या आवाजात म्हटले,

" नको असू देत ते पाकीट. कुठे लांब जायचे झाले तर. . ." तिने हा गळ टाकला होता. पण मीही आता गळाला ओळखून होतो. मी परत आवाज चढवला व बोललो,

" मी कुठे लांब जाईन. पाकीट तिकीट पाहिजे तर ठेवा तुम्हाला. होऊ देत धुडगूस. माझी काळजी नको. . ."

अगदी मी ध्रुवबाळ झालो होतो. अर्धे राज्य दिले तरी – आणि सौभाग्यलक्ष्मी पूर्ण व सर्व राज्य द्यायला तयार होत्या– मी परतणार नव्हतो.

सुटे पैसे घेतले. पाकीट घेतलं व निघालो. निघालोच.

एक 'फक्त प्रौढांसाठी' म्हणून सिनेमा आला होता. तिथे जायचे ठरविले. सरळ बस स्टॉप गाठला. दुपारची वेळ होती. बसमध्ये गर्दी नव्हती. जागा मिळाली. कंडक्टरनी विचारले. "कोणता स्टॉप ?"

"जिथे बस शेवटी पोचते तिकडे" असे सांगून टाकले. तिकिटासाठी पाकिट काढले व पाकिटातील शंभर रुपयांची नोट पुढे केली. कंडक्टरसाहेबांच्या लक्षात आले असावे की, आम्ही जरा उद्विग्न आहोत. शेजारच्या पॅसेंजरनीही पाहिले. मला पॅसेंजरने बसायला सांगितलं. त्याच्या शेजारी जागा रिकामी झाली होती.

कंडक्टरसाहेबांनी सांगितले, "सुटे काढा."

मग कळले की पँटीच्या खिशात सुटे पैसे आहेत म्हणून. ते पैसे काढले व तिकीट मिळाले. शेजारचा पॅसेंजर उतरला म्हणून मी खिडकीला टेकून बसलो तो पॅसेंजर उतरला. बस यथाकाल थांबली.

सिनेमागृहात 'फक्त प्रौढांकरताच' असा सिनेमा होता. बाहेर चित्रे सुरेख लागलेली होती. मी पँटीच्या खिशातील पैशाने तिकिट काढले. तिकीट मिळायला वेळ लागला नाही. बाहेरच कुणीतरी तिकीट विकत होते ते मला मिळाले.

सिनेमातील जाहिराती सुरू झाल्या. टूथपेस्टसंबंधी तीन जाहिराती. मी दंतमंजन वापरीत होतो. पण आता ठरवले उद्यापासून चैनच करायची. अगदी कुणाला विचारायचे नाही. दोन जाहिरातींत फक्त दांत व दातांचे आरोग्य याबाबत शास्त्रीय माहिती दिली होती. तिसऱ्या जाहिरातीत मात्र स्त्री आली. आणि तिने एका टूथपेस्टचे महत्त्व सांगितले. ही टूथपेस्ट घ्यायची असे मी ठरवीत होतो. तोच पुन्हा घरच्या प्रकाराची आठवण झाली. स्त्री मोहक असली की पुढे काय होते हे मी आता पुरेपूर अजमावले व अनुभवले होते. शेवटी 'स्त्री' असली की सत्यानाश. एकदम ठरविले की ही टूथपेस्ट घ्यायची नाहीच. स्त्री संग नको आता आपली राखुंडी बरी.

नंतर आली जाहिरात कोणत्या तरी सुगंधी साबणाची. एक कोमलकाय यौवनभरी साबणाच्या आड उभी होती. ती अबला होती की काय सांगता

येणार नाही. कारण सावणाच्या वरती तिचे डोळे व डोके दाखविले होते. खालती पाय व मध्ये चौकोनी सावण असला सावण आम्हाला नकोच होता. आमच्या घराण्यात असा कोमलकाय कुणी निपजला नाही. या सावणाने जर मनुष्य कोमलकाय होत असेल तर आमची शिकेकाई वरी. शरीर कोमल असणे हे आमच्या घरात कुणालाच मान्य नव्हते. अभ्यास करून नोकरी मिळाली नाही तरी धनुष्याला दुसरी प्रत्यंचा म्हणून स्टेशनवर हमाली तरी करायला आले पाहिजे – या हेतूने आमचे शरीर घडलेले होते. गावातील कोणत्याही नाटकात भीम - घटोत्कच इत्यादी कामाला 'स्टेपनी' म्हणून आमचा वापर होत होता. अजूनपर्यंत सुदाम्याच्या कामाला आमच्या घराण्यात – निदान – अण्णासाहेब किर्लोस्करांपासून तरी – कोणीच मिळाले नव्हते. तसेच अश्व शर्यतीसाठी 'जॉकी' होण्याचे स्वप्नसुद्धा आमच्या घराण्यात कोणाला पडलेले नव्हते. तर या कोमलतनूसाठी लागणारा साबण आम्हाला नकोच होता. नंतर जाहिरात 'सुखी कुटुंब' – कुटुंब व सुख यांचा पुरेपूर कंटाळा आला होता. पण आता काय – सिनेमा पाहयला आलो होतो ना. नंतर परत डोकेदुखीची व तिच्यावरील गोळ्यांची जाहिरात आली.शेवटी एकदाचा खरा सिनेमा आला.

आणि माझी चुळवूळ सुरू झाली. ती एकेक चित्रे व सीन पाहून वरोवर सौभाग्यलक्ष्मी हव्यात असे सारखे वाटू लागले. सौभाग्यलक्ष्मीला विनाकारण रागावलो असे वाटायला लागले. पण दुसरे मन म्हणू लागले की केव्हातरी हे असे झालेच पाहिजे, कळले पाहिजे. प्रत्येक वेळी वायकांची नवरेगिरी किती चालवून घ्यायची ? थोड्याशा सुखाकरता सर्वस्व हरवून बसायचे ते काय ! सारखं बोलणं खायचं. ही कारटी अशी. राहू देत. काय होतेय ती नसली तर – असे मनाचे द्वंद्व चालले होते.

तोच सिनेमातील समरप्रसंग सुरू झाला. एका अरण्यात एका छायावहुल वृक्षाच्या फांदीवर राजपुत्र बसला आहे व राजकन्या आता डोहात उडी घेणार. तोच राजपुत्र झाडाच्या फांदीवरून एकदम डोहात उडी घेतो आणि मग...मग... मग त्यांचे मीलन होते. मीलन पाहताना जरा अस्वस्थ झालो, हे कबूल. पण नंतर विचार केला की हे मीलन होताना त्या राजपुत्राला व राजकन्येला निदान शंभर कारागिरांसमोर 'एकांत' करावा लागला होता आणि आम्ही एकांतात जरी सौभाग्यलक्ष्मीशी काही अतिप्रसंग केला तर

"काही आहे की नाही? मामंजी, मुले, शेजारी" जणू काही मायक्रोस्कोप लावून राहिले आहेत आणि हिच्यावरच ! अशा तऱ्हेची समजूतच ! असो. मला शेवटी त्या मीलनाचा कंटाळा आला.

बाजूला दृष्टी टाकली. प्रत्येकाचे कुणाशी तरी मीलनच चालले होते. माझ्याशेजारी एक जख्ख म्हातारा पारशी बसला होता आणि त्याच्या अगदी जवळच तोंडाचे साफ बोळके झालेली अशी फ्रॉकातील पारशीबाई बसली होती. तिचे नाव 'गुल' असावे. कारण तो म्हातारा त्या थेरडीला म्हणत होता, "ए मारू सांभाळ. ए गुलजार जो ना जो" आणि प्रत्येक प्रसंगावर 'ए जो ना गुल, गुलजार जो ना जो' असे करीत होता आणि गुलुगुलु बोलण्याचा प्रयत्न करीत होता. प्रत्येकाचे आपल्या शेजारच्या स्त्रीशी बोलणे सुरू झाले होते. एक तरुण दांपत्य होते. त्यांचे कार्टे एकदम किरकिर करायला लागले म्हणून तो नवरा त्या कार्ट्याला घेऊन बाहेर बसला बिचारा !

आता मला हा सिनेमाच असह्य झाला. ती सिनेमातली मीलने ती थेटरातली मीलने सारे खोटे वाटू लागले. 'फक्त प्रौढांकरता' या नावाचे आकर्षणही राहिले नाही. सिनेमात पुन्हा एकदा मीलन झाले आणि मी तडक बाहेर पडलो.

आता बाहेर जायचे आणि भजी व बटाटवडे खायचे असे ठरविले. बाहेर हॉटेलात गेल्यावर – 'आत्ताच करायला टाकलेत. सिनेमा सुटेपर्यंत तयार होतील' असे हॉटेलवाल्याने सांगितले.

मीही चवताळलो आणि एका चांगल्या स्वागतिका असणाऱ्या हॉटेलात जाऊन यथास्थित चाप मारावा म्हणून एका हॉटेलाच्या समोर गेलो.

पण म्हटले खिशात पैसे किती आहेत ते पाहू या. म्हणून बुशशर्टमध्ये पाहिले. तो पाकीट नाही. अरे – सिनेमागृहात पाकीट पडणे शक्यच नाही. बहुधा ते बसमध्ये पडले असणार. पडले असण्याऐवजी त्या शेजारच्याच पॅसेंजरने लांबविले असावे नक्कीच. कारण त्यानच शंभर रुपयाची नोट पाहिली होती व मी जरा तंद्रीत आहे हे पाहिले होते. मधल्याच स्टॉपवर उतरला होता तो. आता कुठे मिळणार? आणि पोलिसांना सांगून काय उपयोग? चांगले पाचसहा तास झाले असतील. त्या खिसेकापूने ते पैसे आता कुणा

नर्तकीला दिले असतील किंवा चांगल्या चषकातून तो वारुणी आणि तरुणीचा उपभोग घेत असेल. असू देत बिचारा ! नाहीतर आमचे हे पैसे मुलांच्या फिया, डॉक्टर, व हिंग - तेल - साडी - चोळी या यादीतच जायचे. त्यापेक्षा कुणी 'मधुरा अगर मदिरा' यांच्यासाठी खर्च केले तर त्या पैशांना तरी धन्यता वाटेल. पण . . . पण आता काय करायचे ? सुटे पैसे संपले होते. फारतर वसला पुरतील !

या हॉटेलात पैसे नाहीत असे कळले तर हीच मोहक हास्य करणारी कृत्या मला हाकलून काढेल. या स्वागतिकेमुळे मी थोडा अगतिक झालो होतो खरा. पण या स्वागितिकेच्या आव्हानात्मक हास्याला भुलून जर मी हॉटेलात काही खायला वसलो तर शेवटी आमच्यावर विषप्रयोगच होईल किंवा विष-प्रयोग करवून घेण्याची पाळी येईल. एका स्त्रीच्या मोहक हास्याला भुललो व जन्मभर भात आमटी लोणचे खात आहे याची जाणीव झालीच. आता या स्वागतिकेच्या हास्याचा मोह नको. सरळ काढता पाय घ्यावा या हेतूने मी बाहेर पाय टाकायला सुरुवात केलीच.

तो ती स्वागतिका व्हिक्स व्हेपोरब का अशाच कुठल्या तरी औषधातील जाहिरातीतील स्त्रीप्रमाणे कृत्रिम कवळीचे हास्य करून बोललीच.

"का, लवकरसे चालला ?"

आणि परत मोहक हास्य.

"अग अवदसे" मी मनात दात चावीत म्हणालो, "माझे पैशाचे पाकीट हरवलेय ग. नाहीतर तुझ्याबरोबर शंभर रुपयाची भजी खाल्ली असती. पैसे नसताना तुझा - - घालेल का जेवायला." पण मी हंसत म्हणालो, "मैत्रीण बाहेर वाट पाहात असेल. ती येणार होती. पाहून येतो आत्ताच."

माझ्या तुंदिलतनूकडे पाहून मला कुणी मैत्रीण असणे व तीसुद्धा हॉटेलात माझ्यावरोबर केवळ भजी खाण्याकरता येणारी, असे कुणालाही खरे वाटले नसते. असलीच मैत्रीण तर फारतर तिच्या सामानाचा भार वाहण्याकरता माझा उपयोग करण्याकरता असा ग्रह झाला असता. किंवा रेशनिंग कार्डावर जादा तांदूळ मिळण्याकरता म्हणून मला "कुणी तरी मित्र केले असते. बस. पण आता दुसरे काय सांगणार. तडक बाहेर पडलो झाले.

आणि दारातच बस.

बसमध्ये बसलो आणि ' अग अग म्हशी मला कुठे नेशी ' त्याप्रमाणे बसने सरळ घराकडे आणले मला.

घराकडे आलो खरा. पण जरा दूरच थांबलो. पाहतो तो दारात दोन तीन पोलीस उभे. एक हवालदारसाहेब का मेजर म्हणतात ते. व त्यांच्या सहाय्याला दोन का तीन कॉन्स्टेबल ! सरकारी इस्पितळाची रुग्णवाहिका उभी. आजूबाजूचे दोन तीन लोक जमलेले.

मला जरा भेदरल्यासारखे झाले.

मी बाहेर गेलो म्हणून सौभाग्यलक्ष्मीने स्वतःचे बरे वाईट करून घेतले नसेल ना ? पण काही केल्या ती आत्महत्या तरी करणार नाही. माझ्यासाठी जीव देण्याच्या आणाभाका तिने घेतल्या असतील पण त्या जीव इतक्या लवकर देतील असे वाटले नाही. तरीपण पाहू काय होते ते. म्हणून पाहात राहिलो.

तोच आमच्या लक्ष्मी नेसूच्या वस्त्रानिशी बाहेर आल्या व त्यांच्याबरोबर कुलदीपकही. नेहेमी अर्धातास रंगभूषा आणि संवादित्व – मॅचिंग – करण्यात घालविल्याशिवाय आमच्या सौ. ने कधीही प्रथम पदन्यास केला नाही. आणि आज काय हे ? धाकटी मुले तर भेदरलेली दिसत होती. त्याना भेदरल्यासारखे पाहून मला जरा बरे वाटले. कारटी सदानकदा आरडा ओरडीत गुंतलेली. भय म्हणजे काय माहित नव्हतेच त्याना. आज मात्र भेदरलेले आणि खरोखरच भेदरलेले दिसले ! बरे झाले एकदाचे.

आमच्या सौभाग्यलक्ष्मी व कुलदीपक त्या रुग्णवाहिकेत बसल्या. एकाकी किंवा अचानक आजारी पडणाऱ्या आमच्या सौभाग्यलक्ष्मी कोमलतनू नाहीत व नव्हत्यासुद्धा. प्रकृती चांगलीच. शाळेच्या हुतुतू टीममध्ये खेळणारी. प्रतिपक्षाच्या भिडूला फटका बसला की त्याचा दमच गेला अशा प्रकृतीची. आठवते म्हणून सांगतो. त्या कैकेयीने एकदा आमच्या श्वशुरांना जाऊन सांगितले की " तुमच्या मुलीचा जावई छळ करतो, मारहाण करतो. " श्वशुरांचे मत जावयाबद्दल तसे यथातथाच पण त्यांनी स्पष्टपणे सांगितले,

" माझी मुलगी मार खाणारी नाही. दोन उलटे देईल." तर सांगावयाचे म्हणजे आमच्या सौभाग्यलक्ष्मीच्या धष्टपुष्टपणावर भारीच विश्वास – पण मग का ही रुग्णवाहिका आमच्या घरी ?

पण ते पोलीस व आमच्या लक्ष्मी गाडीत बसल्या आणि रुग्णवाहिका सुरू झाली. गाडीत थोरला होता. हवालदार म्हणतात,

" चल जोरसे. "

इतक्यात मी गाडीच्या पुढे झालो.

" काय कळतेय की नाही.

" सरकारी कामात व्यत्यय आणता का ? कोण तुम्ही ? " हवालदार साहेब गुरगुरायला लागले.

" मी कोण. . . .कोण मी. . .कोणाला विचारता तुम्ही ? "

मी आवाज चढविला.

तोच गाडीचे दार ताडदिशी उघडून आमच्या सौ. बाहेर धावल्या व मला त्यांनी आलिंगन दिले. इतके घट्ट आलिंगन दिले की भीमाला धृतराष्ट्रांनी इतक्या जोराचे दिले नसावे.

तोच ' पपा '. . . .' पपा '.

पपा आले पपा आले म्हणून तिन्ही कार्टी धावली व प्रत्येकाने आपआपल्या समझोत्याप्रमाणे माझ्या शरीराचे भाग धरले.

हवालदारसाहेब बाहेर आले.

आणि माझे पाकिट व पाकिटावरचा फोटो त्यांनी माझ्यासमोर धरला.

आमच्या सौ. आता स्फुंदून स्फुंदून रडायला लागल्या. इतके स्फुंदून स्फुंदून रडणे मी पहिल्या प्रथमच अनुभवत होतो. हवालदारसाहेबदेखील मख्ख झाले.

त्याचे असे झाले होते की नुकताच एक ॲक्सिडेंट झाला होता व जखमी मनुष्य मृत्युशय्येवर पडला होता. जखमी माणसाला हॉस्पिटलात नेले होते. त्याचा चेहेरा छिन्नविछिन्न झाला होता आणि त्या जखमी माणसाच्या अंगावर माझे पाकीट सापडले होते. त्या पाकिटाच्या आधारे हवालदार आमच्या घरी आले होते. पाकीट, लॉटरीचे तिकीट या साऱ्या खाणाखुणा काढल्यावर आमच्या सौ. ना हवालदारांनी सांगितले की ' तुमचे पतिदेव ॲक्सिडेंटमध्ये सापडले आहेत. त्यांना पाहायला चला '

आणि आमच्या सौ. ना खरोखरच मरणप्राय धक्का बसला आणि त्या तशाच हॉस्पिटलात चालू लागल्या होत्या. ते पाकीट माझेच. पण मला वाटते ते त्या बसमधील पॅसेंजरने उचलले असावे आणि तो पाकीटमार ॲक्सि-

डेंटमध्ये शेवटी सापडला आणि अंत्यसमयी आमचे पाकीट व फोटो त्याच्या अंगावर सापडले. आणि त्यानुसार हवालदार पंचनाम्याच्या तयारीनिशी आले होते आणि मी आता सरळ सरळ समोर उभा होतो. 'का हो पाकिटे नीट संभाळता येत नाहीत काय ?' शेवटी हवालदारानी विचारलेच.

संध्याकाळीच लॉटरीच्या तिकिटाचा रिझल्ट होता. तिकिट लागले. पाच रुपये मिळाले. त्या पाच रुपयाची वाटणी झालीच. माझा एक रुपया त्या मयता-करता मी धाडून दिला. थोडक्यात मी त्यादिवशी माझे सर्वस्वी मरण माझ्या डोळ्यांनी पाहिले. वायकोजवळ नसणे हेही मरणच. थोडा काल का होईना पण यातना फार होतात हे खरे.

□ □ □

# कल्याणच्या सुभेदाराची सून

"...तसं नाही. मी लिप्स्टिक् नीट करीत होते..."

"पण परीक्षा मंडपात ? ..."

"लिप्स्टिक् पसरायला काही ठराविक..." पुढचे शब्द समजावे अशा अर्थाने सलज्ज दृष्टिपात.

"पण कागदाचा वापर लिपस्टिक्करिता ?..." जणू हा प्रौढ गृहस्थ लिप्स व लिपस्टिककरिता अधिकारी व्यक्ती आहे अशा आविर्भावात.

"रुमाल खराब होऊ नये म्हणून ..."

"हां – तोच लिप्स्टिक्चा कागद मला पाहयला हवा आहे."

"त्यात काय पाहयचे ? त्याच्चा चोळामोळा तर झाला."

हे संभाषण जर कोणत्या उपवनात अगर सिनमागृहात असते तर –

'नाही नाही – मला तोच तोच चुरगळलेला कागद हवाय. तोच–तोच ओठाला लागलेला कागद. नाही, तोच भाग्यवंत चुरगळलेला कागद हवा आहे..'

असे उत्तर त्या पुरुषाकडून अपेक्षित केले असते.

पण हा संवाद स्त्रीपुरुषामधील आहे खरा. पण हे स्त्रीपुरुष परीक्षा-मंडपात बोलत आहेत. या स्त्रीवर जवळ जवळ अर्धा तास बारिक नजर या पुरुषाने ठवली आहे. आणि तो पुरुष आता करड्या आवाजात बोलत आहेत.

"तोच चोळामोळा केलेला कागद मला पाहयचा आहे. स्पष्टच सांगतो तुम्ही कॉपी करीत आहात."

"कॉपी..." 'पी' वर विशिष्ट पद्धतीन जोर देत.

"हो कॉपी ! मघापासून. सतत मी पाहत आहे. अगदी जवळ जवळ अर्धा तास मी बारकाईनं तुम्हाला केवळ तुम्हालाच पाहत आहे. तुमची प्रत्येक

क्रृती मी पाहत आहे. तुमच्याखेरीज माझे लक्ष कोणावरच नाही . . .आणि आणि . . ."

केवळ आपल्यावरच. थोड थोडके नाही, तर अर्धा तास आपल्या प्रत्येक हालचालींवर या भारदस्त पुरुषाचे लक्ष आहे हे उघड रीतीने कळल्यावर त्या विद्यार्थिनीची मुद्रा सलज्ज गंभीर झाली. तिने एक विषाद व विलासयुक्त उसासा टाकला.

पण या उसाशाचे त्या पर्यवेक्षकांने काहीही वाटले नाही. ते पर्यवेक्षक मातबर होते व खास मसलतीने त्यांना इथे नेमले होते. विद्यापीठाच्या परीक्षांमधून गोंधळ चालतो व सार्वत्रिक कॉपी होते अशी फार मोठ्या प्रमाणात तक्रार होती. विद्यापीठाच्या कुलगुरूंची जाहीर चौकशी व्हावी असे एक पत्रक – अर्थात कुलगुरूंच्या जवळच्या नातेवाईकांनीच – प्रसिद्ध केले होते. त्यातच विद्यार्थ्यांचा संप, प्राध्यापकांचे खडू-फळा बंद आंदोलन, विद्यापीठ कर्मचाऱ्यांचा सत्याग्रह, त्यावर भरीस भर म्हणून सरकारी अनुदानात कपात यामुळे परीक्षा लांबल्या होत्या. विद्यापीठाचे उपकुलगुरू भलतेच त्रासून गेले होते व या परीक्षेत काही केंद्रांवर कॉपी होते व ठराविक वर्गाची उडाणटप्पू मुले कॉपी करतात व अत्युच्च श्रेणीचे गुण मिळवतात म्हणून जाहीर आरोप-प्रत्यारोप झाले होते. त्या महानगरातील महिलांनी या परीक्षांतील गैरप्रकाराबाबत एक मोर्चाही उपकुलगुरूंच्या निवासस्थानावर नेला होता. उपकुलगुरूंच्या सौभाग्यवती त्या मोर्चात सामील झाल्या होत्या. म्हणून सर्व परीक्षा काही थोड्याच केंद्रांवर घ्याव्यात असे विद्यापीठ समितीने व उपकुलगुरूंनी ठरविले होते. केंद्रावरील परीक्षा अधिकारी चांगले मातबर व कुशल ठेवायचे व कॉपी करणाऱ्या समाजकंटकांना चांगले शासन घडवायचे असा विचार उपकुलगुरूंनी केला. विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय महत्त्व कमी होऊ नये व विद्यापीठाच्या गुणवत्तेसंबंधी काही किंवदन्ती पसरल्या जाऊ नयेत, या बाबतीतही आत्यंतिक योजना आखली होती. खास करून जो प्रमुख गनीम – कॉपी करणारा – त्याचे पारिपत्य होईल ही कल्पना.

आणि म्हणूनच सर्व महानगरातील विद्यार्थ्यांना एकच परीक्षा केंद्र ठेवले होते. प्राचार्य शहाजी शिसोदे या धर्मनिष्ठ, शिस्तप्रिय तरुणाला केंद्राचे सर्वाधिकारी नेमले होते. शहाजीराजे – त्यांचे विद्यार्थी व काही प्रेमळ मित्र

त्यांना शहाजी राजे म्हणत – मनाचे उमदे पण तेवढेच कडक. राजस्थानातून आलेले त्यांचे 'कुटुंव–'कुटुंब' जरा वेगळा शब्द वाटेल–कुटुंव म्हणण्यापेक्षा त्यांचे घराणे – एकदोन पिढ्या महाराष्ट्रात स्थायिक झालेले. शहाजीराजे त्यांच्या घराण्यात पहिलेच शिकलेले. त्यांच्या जमातीतील महाराष्ट्रात जी घराणी आली होती ती कुठे पोलिसांत, तर कुठे अडत दलाल, तर कुठे पानाचे हुंडेकरी– अगदी फार झाले तर महानगरातील कोणत्याशा बादशाही अगर श्रीकृष्ण लॉजिंग व बोर्डिंगचे मालक– अशावर आपला चरितार्थ चालवीत. महाराष्ट्रात स्थायिक झाल्यामुळे या जमातीतील लोकांना महाराष्ट्रातच सोयरीक पाहावी लागे. कारण राजस्थानातील मुली महाराष्ट्रात येण्यास घाबरून जात असत. शहाजीराजांनी हुंडा घ्यायचे नाही असे ठरविले असल्यामुळे जमातीतील कोणीच त्यांना मुलगी देण्यास तयार नसे. त्यांना वाटायचे मुलगा व्यंगी आहे. म्हणून राजे अविवाहित राहिले. अर्थात त्यांच्या लहानपणी कुणा लखूजीराव यांची मुलगी "मला हा नवला पाहिजे" असे म्हणाली होती व कुणा लखोजीरावाला हा जोडा छान दिसतो असे कुणीतरी बोलले होते. पण लखोजीराव नंतर पानाच्या गादीचे मालक झाले व आकडेशास्त्रज्ञ झाले आणि त्यांचे नशीब उदयाला आले. मास्तर, प्रोफेसर अगर प्रिन्सिपाल झाला तरी मास्तर जावई नको – म्हणून शहाजीराजांना त्या लखूजीरावाने आपली मुलगी काही दिली नाही. त्या लखूजीरावाचे आणि शाळेचे जन्मभर वाकडे.पहिलीला का इन्फंटला लखूजीरावाला शाळेच्या मास्तरने बदडून काढले होते. लखूजीरावाने हे आपल्या वडिलांना घरी सांगितले. त्यावेळी लखुजीरावाच्या आईने शाळेत येऊन मास्तरना सहस्र शिव्या दिल्या व वडिलांनी मास्तरना बदडले तेव्हापासून लखूजीरावांना शाळा-कॉलेजचा तिटकारा. अशा मास्तरना आपली मुलगी–जरी लहानपणी तिला हा नवरा चांगला दिसला असला व लोकांनी चांगला जोडा शोभतो असे उद्‌गार काढले असले तरी– द्यायची नाही असे ठरविले. त्यामुळे शहाजीराजांना लखूजीरावांनी मुलगी दिली नव्हती. बाकी जमातीतील लोकांचा 'हा हुंडा घेत नाही; याच्यात काहीतरी व्यंग असणार' हा समज. म्हणून शहाजीराव विवाहाशिवायच राहिले. फावल्या वेळात संशोधन व दाढी कुरवाळीत वाचन व इतर वेळ विद्यापीठाचे काम यातच शहाजीराजांचा वेळ जाई. राष्ट्रीय छात्र योजना, गिर्यारोहण, पोलो या खेळांतील चमूंचे

मार्गदर्शन त्यांचेकडे असायचे. पण प्रामाणिकपणा शिस्त कडक. व व्यक्तिगत भावना कामात आणू नयेत हा दंडक. त्यांच्या कामाच्या उरकाबाबत सर्वत्र ख्याती होती व सर्वांनाच त्यांच्याबाबत आदरभाव आणि म्हणून त्यांना परीक्षा केंद्राचे प्रमुख अधिकारी नेमले.

शहाजी राजांना प्रमुख म्हणून नेमल्यावर आबाजी सोनदेव यांची निवड पर्यवेक्षक म्हणून होणारच. आबाजी सोनदेव इमानइतबारे नोकरी करणारे व धन्यास जे प्रिय असणार ते देणारे असा लौकिक. आबाजी सोनदेव विद्यापीठाच्या ग्रंथागारातील एक मुख्य अधिकारी. पण शहाजी राजे कॉलेजात असताना त्यांना कधी कधी एकापेक्षा नियमाला सोडून दोन पुस्तके जास्त देत असत.म्हणून आबाजी सोनदेव शहाजी राजांना जास्त प्रिय. आणि म्हणूनच आपल्या अधिकारांत आबाजी सोनदेवांची पर्यवेक्षक म्हणून शहाजीराजांनी नेमणूक केली होती. ग्रंथालयात विद्यार्थी पाने हळूच कशी फाडतात. पुस्तके कोण कशी लंपास करतात यावर ग्रंथालयाचे अधिकारी म्हणून आबाजी सोनदेवांनी विशेष लक्ष दिलेले. त्यांच्या बुटांना रबरी तळवे असत. त्यामुळे ते कोठेही चालले तरी कुणालाही 'सावध' होता येत नसे. त्यांची पाळत ठेवण्याची पद्धतही वेगळीच होती.कुणाला कळायचेही नाही की ते पाळत ठेवतात म्हणून. खऱ्याचे भोक्ते. खोट मुळीच खपायचे नाही. लहानपणी म्हणे त्यांचे एका मुलीवर प्रेम होते. आणि त्या मुलीला कळायचेही नाही की ते पाळत ठेवत ते. ती मुलगी लंगडी खेळत होती व मैत्रिणीचे लक्ष चुकवून तिने पाय जमिनीला टेकवला आणि मैत्रिणीला आउट केले. हे यांनी पाहिले होते. जेव्हा पुढे या मुलीबद्दल त्यांना विचारणा केली व 'कर्तव्य' आहे काय म्हणून विचारले त्यावेळी यांनी स्पष्ट नकार दिला.कारण मग शेवटी कळले त्यावेळी त्या मुलीने शपथ घेतली की मी असे खोटे वागणार नाही. आणि मग कुठे हे बोहल्यावर उभे राहिले. लग्नातसुद्धा भटजींनी एक नारळ लंपास केला त्यावेळी यांनी सर्वांसमक्ष 'हे वर्तन आम्हास पसंत नाही' असे सांगितले. असो. अशा आबाजी सोनदेवाकडे – अगदी विश्वासू सेवकाकडे हे पर्यवेक्षकाचे काम दिले होते. उपकुलगुरूंचे खंदे सेवक शहाजी राजे व राजांचे एकनिष्ठ बंदे म्हणजे श्री. आबाजी सोनदेव.

आबाजी सोनदेवांनी ही कॉपी पकडली होती. जवळ जवळ तास सव्वातास त्यांनी या विद्यार्थिनीवर नजर ठेवली होती. विद्यार्थिनी प्रौढ होती. पंचवीस ते तीसच्या आंत. गौर वर्ण व मुस्लिम पद्धतीचा पेहराव. चेहेरा झांकायला ओढणी किंवा दुपट्टा वापरी. आबाजी सोनदेव अगदी बारिक रितीने पाहात होते. हळूच कांही विद्यार्थी तिच्याकडे चोरट्या नजरेन पाहात होते हेही आबाजी सोनदेवांनी पाहिले. त्याचबरोबर आबाजी सोनदेव यांनी या विद्यार्थिनीवर नजर रोखलेली आहे हे चाणाक्षानी ताडलेच. आबाजी सोन-देवांना पूर्णपणे माहीत होते की या केंद्रावर कॉपी करणाऱ्यामध्ये स्त्री-विद्यार्थिनी जास्त; व पुष्कळदा पर्यवेक्षकांचा या कॉपी करणाऱ्यांना आशीर्वाद असतो. आणि म्हणूनच स्त्री विद्यार्थिनींवर आबाजी सोनदेव यांचा डोळा.

अर्धा तासभर ज्यावेळी सोनदेवांनी पाहिले की ही मुलगी कॉपी करत आहे त्याचवेळी ते तिच्याजवळ गेले व वर सांगितलेला हा त्यांचा संवाद.

आबाजी सोनदेवांवर ज्यावेळी तिन विलास व विषादपूर्ण उसासा टाकला त्यावेळी आबाजी जरासुद्धा चळले नाहीत. तिला वाटले की आबाजींना तो उसासा ऐकूच गेला नाही. तिने परत दुसरा उसासा टाकला. आबासाहेबांची उमर बरीच झाली होती. असे उसासे त्यांनी कितीतरी अनुभवलेले होते. आणि आबाजींची पणती आता त्या विद्यार्थिनीएवढी होती. आबाजींचे लग्न त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षीच झाले होते व वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी पितृपद मिळवले होते. त्यांच्या पुत्रांनी व जांवयांनी त्यांचा वारसा चालवून त्यांना 'ग्रेट ग्रँड फादर' या पदवीपर्यंत पोचविले होते.त्यांच्यावर आता या उमाळ्याचा व उसाशांचा परिणाम होणार नव्हता. त्या प्रौढेने पुन्हा आपले वदन ओढणीत लपवणेचा प्रयत्न केला. पण आबाजी सोनदेव जरासुद्धा हालायला तयार होईना.

"काय नाव आपले ?" आबासाहेबांनी आपल्या करड्या भाषेत विचारले. थोडे मुसमुस रडणे व 'मेड टु आरडर' अश्रू.

"मी तुमचे नाव विचारीत आहे." आबासाहेब पुन्हा अधिकारवाणीत.

"सु...सु..."

"सु – सु – काय ?"

"सुभेदार."

" सुभेदार कोण – कुठले ? . . . "

" कल्याण . . "

इतके झाल्यावर ती विद्यार्थिनी एकदम अस्वस्थ झाल्यासारखी दिसली.

आता एवढी कॉपी पकडल्यावर आता हे प्रकरण दावता येणार नाही. आणि शहाजीराजांना याचा सर्व खुलासा व्हायला पाहिजेच. असे आबाजींना वाटले. संधीव्यवहार बरा नव्हे. धन्याकडे जाणे श्रेयस्कार.

" आपणाला आता माझ्याबरोबर यावे लागेल. . . "

ही विद्यार्थिनी डोके टेबलावर टेकूनच बसली.

आबाजींनी तावडतोब प्यूनला बोलावले. टेबलावरील सर्व वस्तू घ्यायला सांगितल्या. मग कुठे ती मुलगी जायला तयार झाली.

" पण साहेब त्यास्नी कुठे न्यायचे ? " लायब्रीत का ?"

प्यूनला वाटले की हा बामण लई कावेबाज असणार. भाएर चल म्हणजे लायब्रीच बरी. कारण प्यून दुसऱ्या महाविद्यालयाचा. त्याला आबाजी सोनदेव व शहाजीराजे यांचे हे नाते माहीत नव्हते. त्याच्या महाविद्यालयात 'लायब्री'चा उपयोग काय केला जातो यावरून त्यांनी आबाजी सोनदेवांना प्रश्न विचारले.

" लायब्ररीत काय साहेब बसले आहेत ?" आबाजी सोनदेवांनी अगदी आपण त्या गावचे नाहीत अशा रीतीने प्यूनला विचारले.

" साहेबांकडे व्हय ! " प्यून नाराजीच्या सुरात बोलता झाला. आबाजी सोनदेव, कल्याणची ती सुभेदार व तो प्यून हातात पेपर व तो चोळामेळा केलेला कागद घेतलेला–असे सर्व प्राचार्य शहाजी शिसोदे यांच्या खोलीवर गेले.

प्राचार्य शिसोदे आज जरा मूडमध्ये होते. परीक्षा संचालकाचे काम म्हणजे आपली करडी उपस्थिती जाणवणे बस ! बाकी सर्व लेखनकार्य, अहवाल व चिटणीशी करणारे कर्मचारी अधिकारी यांचा वृंद जय्यत तयार होताच. मल्हारराव चिटणीस यांनी शिवछत्रपतींच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रातच लिहिले आहे– 'चिटणीस पत्रलेखक याणी. . .नाना प्रकारचे कल्पना करून चतुरपणे लेखन करावे.' आणि हेच शिवछत्रपतीचे सप्तप्रकरणात्मक चरित्र प्रा. शहाजी शिसोदे आता वाचत होते. आबाजी सोनदेवांनी ही चिटणीस बखर मुद्दाम लायब्ररीतून काढून राजांना वाचावयाला दिली होती. राजांना

आता कोणत्याही विशेष प्रकारच्या साहित्यात रस नव्हता. कोणतेही साहित्य घेतले तर त्यात स्त्रियांची वर्णने असायची. राजांना आता ही वर्णने त्याज्य वाटायची की काय माहीत नाही. पण आपल्या हातात अशी पुस्तके दिसली तर लोक काय म्हणतील, ही काळजी वाटायची. म्हणून ते आता बखरीत लक्ष घालीत. चिटणीसांनी लिहिलेली शिवरायांची बखर त्यांना जरा इंटरेस्टिंग वाटली. कारण आबाजी सोनदेवांनी काढून दिलेली होती. अर्थात् ग्रंथालयात हे पुस्तक तसेच पडून होते. पण आबाजी सोनदेवांनी प्राचार्यांवर भलताच भाव मारला होता. प्राचार्यांना जे आवडेल तेच आपण करीत असतो असे आबाजींना वाटे. प्रा. शहाजीराजे वाचू लागले.

"कल्याणावरी स्वारी करावी, प्रांत घ्यावा. म्हणून आबाजी सोनदेव पाठविले. त्यांनी फौजेसुद्धा जाऊन शहर लुटले. मुलुख घेतला व किल्ले घेतले. ते त्यासच सुभा सांगून त्याजकडेच ठेवले. शहरात मुल्लाणा हयाती सुभेदार होता तो दस्त केला. त्याची सून परम सुंदर होती. ती आबाजीपंती ठेवून घेऊन त्यास वसो देऊन निरोप दिला."

प्रा. शहाजी राजांना या गोष्टीबद्दल रस नव्हता. पण छत्रपतींबाबत फारच आदर. कारण छत्रपती मूळचे शिसोदे घराण्याचे. पण शहाजीराजांची खात्री होती की हा कल्याणचा प्रसंग खरा नाही. शिवाजीवरील चिटणीसांच्या बखरीत एवढाच उल्लेख पाहिल्यावरोबर त्यांनी तौलनिक अभ्यासाकरिता तिथेच आबाजी सोनदेवांनी आणखी दिलेले शिवदिग्विजय पुस्तक पान १६९ उघडले. पांडुरंग रामचंद्र नंदुरबारकर आणि लक्ष्मण काशीनाथ दांडेकर यांनी ते संपादित केलेले होते. त्यातील उतारा प्राचार्य वाचू लागले.

'तो कारखाना आबाजी सोनदेव यांजकडे सांगितला. मशारनिल्हेनी कामे चांगली केली. जाणोन संतोष जाला. पंतांनी कल्याणचे सुभ्यात काजी मुलाणा यांची कन्या बहुत चांगली होती. ते वृत्त कळोन, त्या काजी पासोन राजीपणानी, महाराजांस नजर करावयास ती मुलगी, पैका देऊन, संतोपी करून घेतली. तिजवर दहा-पाच हजारांचे दागिने घालोन, वस्त्रपात्र तयार करून सरकारांत आणोन विनंती केली की, "नाटकशाळेकरिता जनानखान्यात सरकारचे चाकरीचे उपयोगी अशी, सुंदर स्वरूपवान लावण्यवती आहे. ठेवावयास योग्य आहे." बोलताच महाराजांनी दरचे समयी कचेरीत सर्व जमा

जाले असतां त्या जागी आणावयाची आज्ञा केली. ते सर्वगांनी एकले. समानशीलांत चर्चा करू लागले "धणी आहेत. हा पडतपोशी कारभार. दरबारात आणवणे कारण काय ? होईल ते पाहावे" तो पंतानी ते स्त्रीस आणोन, दरबारांत नजर केली. तिचे लावण्य पाहून, बोलते झाले की "हे स्त्री. लावण्यवती सुंदर स्वरूपवान आहे. आमचे मातु:श्रीची तसबीर अशी असती तर आम्हीही चांगले सौंदर्यवान विशेष, आपले मातु:श्रीचे उदरी जन्मतो." हे सभाजनीचे, श्रवणी पडतांच. चकित होऊन पाहू लागले. महाराजांनी वस्त्रें अलंकार आणवोन ते स्त्रियस दिल्हे. पालखी देऊन माघारी पाठवले. सुभेदारास आज्ञा केली की "तिजला भ्रतार करून देणे,आणि तिचा निर्वाह चालवणे बोभाट येऊ न देणे या उपरी अशी करणी कोण्ही केल्यास, कार्यास येणार नाही. असा संबंध करावा. धर्माचा लोप व्हावा. तेंव्हा जनांस शिक्षा कशी लागली. आपले धर्मीनी संपूर्ण जातीन वर्तावे. कोण्ही वाईट नाही." अशी निविष्ट ताकीद होताच, सर्वांस दहशत पडली महाराज स्वस्त्रीशिवाय अन्य स्त्रीशी रत नाहीत. अशी जितेंद्रियपणाची खात्री सर्वांची जाती. '

शहाजीराजांना प्रश्न पडला की कल्याणच्या सुभदाराची मुलगी की सून ? छत्रपतींकडे कुणाला धरून आवाजी सोनदेवांनी आणले होते ? ही कपोलकल्पित कथा असायला हवी. नाहीतर इतकी तफावत का ? सून व मुलगी ही तफावत असल्याची निदर्शक. आपण अरेबिक, फारसी किंवा उर्दू वृत्तान्त पाहू आणि यावर एकदा लिहू. पण उर्दू, फारसीचे ज्ञान अलीफ, बे पलिकडे झालेले नव्हते ! कारण ज्या मुल्लाकडे ते अरबी शिकायला जायचे त्यांच्या शहजादी . . . . .पुढचे नको. पण अरबी, उर्दू प्राचार्य शहाजीराजांना येत नव्हते. ते विचारांत होते – कल्याणच्या सुभेदाराची सून की मुलगी – सून का मुलगी . स्नुपा का सुता . .

तोच "बाहेर आबाजी सोनदेव आले आहेत"म्हणून त्यांना त्यांच्या खोलीबाहेर असलेल्या हशमांनी सांगितलं.

"त्यांना पाठवून द्या."

पाहतो तो आबाजी सोनदेव ही प्रौढा विद्यार्थिनी व एक प्यून ज्याच्या हातात पेपर चुरगळलेला कागद आहे.

ती प्रौढा विद्यार्थिनी अगतिका झाली. आणि खालती मान घालून ती अगदी शांतपणे पॉइजने उसासे ढाळू लागली

आबाजी सोनदेवांवर उसासे काहीच परिणाम करू शकले नाहीत हे तिला कळून चुकले व ती दुखावली गेलेली होती. पण आता मात्र शस्त्र फुकट जाणार नाही अशा सावधगिरीने तिने उसासे फेकायला सुरवात केली. अगदी जपून, सांभाळून. प्रत्येक उसासा हेमगर्भमात्रेसारखा. "भरतनाटय व भारतीय संगीत यामध्ये आपला हात धरणारा कोणी नाही." असे तिची मैत्रीण तिला सांगत असे त्यावेळी ही सांगायची की 'मी उसासे टाकले की माझा हात धरणारच.' अशा तऱ्हेने तिने उसासे टेक्नॉलॉजी डेव्हलप केली होती.

आबाजी सोनदेव काही सांगणार याच्या अगोदरच हिने अमोघ उसासे फेकले असल्यामुळे प्राचार्य शहाजी जरा हेलावलेच. सध्या ऐतिहासिक वाङमय वाचत असल्यामुळे त्या वाङमयीन भाषेत ते बोलले,

"आपण आसन अलंकृत केलेत तर . ?"

आबाजी सोनदेव हे काही बसणारच नव्हते. आपल्याला उद्देशून ही देवभाषा आहे असे कळल्यावर आपल्या उसाशांनी काम केलेय ही तिची खात्री झालीच. पण आता उसासे तिने थांबवले. कारण ते शस्त्र अगदी थेंबाथेंबाने वापरावे लागते. "गुंज गुंज" भर – आयुर्वेदीय भाषेत सांगायचे असेल तर! मगच "गुंज उठी शहनाई" असे ऐकायला मिळते. एकदम उसासे टाकायला सुरवात केली तर चटदिशी सरकारी हॉस्पिटलला हे प्राचार्य फोन करायचे आणि मग तो डॉक्टर . . आणि त्या हॉस्पिटलांतील परीक्षा नको रे बाबा! उसासे अगदी सुवर्णाच्या वर्खाप्रमाणे नजर वापरावेत. ती बसली. बसता बसता प्राचार्यांच्या डोळ्यांकडे चटकन उघडझाप नजर तिने टाकलीच. म्हणजे "डोळ्यात वाच माझ्या तू गीत भावनांचे" अशा अर्थाची नजर.

आबासाहेब सोनदेवांनी आपली दृप्टी तर न्याहाळली नाही ना अशा विचाराने राजे जरा गंभीर झाले व कुठेही दृप्टी न फिरवता बोलते झाले.

"हं, काय आहे? . . ."

"कॉपी . . .कॉपी करत होत्या या; मी अर्धा तास यांना पाहात होतो. कागदातून काहीतरी लिहून यांनी आणले होते. आणि ते या पाहात होत्या व लिहीत होत्या . . ."

"या कॉपी करीत होत्या.? " राजे विचारते झाले.

"आम्ही यावेळी पुरता बंदोबस्त ठेवला होता." गैर राबता ( माणसे

भेटण्यास प्रतिबंध–शिवकालीन भाषाप्रयोग) केला होता. कोणासही कोणत्याही विद्यार्थ्याला भेटू दिले नाही. तरी सर्वांवर कडी म्हणून यांनी कॉपी केली. "

पुन्हा थोडी मान खालती झाली व हुंदका. मान खालतीच झाली होती. पण थोडी आणखी दिसण्यासारखी खाली झाली. हेतू हा की दुसऱ्याचे हृदय खालीवर व्हावे.

" आपले नाव. . . ." राजांनी पृच्छा केली.

सुभेदार शांतच राहिल्या.

" आपले आपले शुभ नांव ? . . " राजांना वाटले, आपण नुसतेच 'नांव' विचारले ती चूक केली. आपल्या भाषेत प्रसाद हवा. म्हणून शब्द त्या मार्दवाने त्यांनी विचारले.

" सुभेदार. . ."

" सुभेदार, पण कोण ? कुठच्या? . . ." राजांनी जरा परत जरबेने विचारले.

" कल्याणच्या. "

" वडिलांचे नांव? "

" नाहीत. "

" नाहीत म्हणजे काय ? . . . "

" नाही, वडील गेले व त्यांचे नाव आता लावत नाही."

वडील गेले हे ऐकून राजांना थोडे बरेच वाटले. पण त्यांचे नांव आता लावत नाही म्हणताना थोडी धास्ती वाटली.

" का? . . . "

" माझी शादी झाली आहे."

शहाजीराजांच्या आशेचा अंकुर एकदम खाक जळाला.

" पतिदेव कुठे राहतात?"

आता मात्र अश्रूंचा पूर वाहायला लागला.

राजानी इकडेतिकडे पाहिले. त्याबरोबर प्यून निघून गेला. इकडे या सुभेदार सुनेने का कन्यकेने आपल्या ओढणीनेच डोळे पुसायला सुरवात केली.

आबाजी सोनदेवांनी विचारले–

" आपली आज्ञा घेऊ ? परीक्षा हॉलमध्ये कुणीच नाही. "

आणि आबाजी जायला निघाले. ते खोलीच्या बाहेर गेले हे पाहिल्या न पाहिल्यासारखे करून विद्यार्थिनीने हळूच एक हुंदका दिला.

तोच आवाजी सोनदेव पुन्हा आले.

" हो, सांगायला विसरलो. हे चुरगळलेले कागद–यांचा या वापर करीत होत्या. या प्रश्नपत्रिका उत्तरपत्रिका मी आता चलतो.

चुरगळलेला कागद राजियाने उघडला. तो त्यात उर्दूत काहीतरी लिहिल्या-सारखे दिलेले.

राजियांना उर्दूचा षोक होता. पण लेखन अवगत नव्हते. त्यांनी हिय्या करून विचारले,

" याचा अर्थ. . ."

" काही नाही. उर्दूतील तो शेर आहे. " हुंदके सावरत.

" पण परीक्षेच्या वेळी. . . ? "

" साहेब, या परीक्षेच्या वेळी. . .आपण विचारता! खरे सांगू का. . ."

" हो खरे सांगण्याकरिताच आपण आला आहात. "

" साहेब ही परीक्षा पास व्हायलाच पाहिजे मला. काहीही करून. त्याकरिता कॉपी करीत होते हे खरे. "

" पण उर्दूत काय लिहिलेय ते "

" उर्दूत नाही ते. उलटचा अक्षरांनी उलटी लिपी काढून लिहिलेय ते. लिपस्टिकच्या आरशापुढे धरले की एकदम अक्षरे उलगडतात. "

" पण एवढी चोरी का ?. . ."

" पदार्थविज्ञान-शास्त्राचे कितीही घोका. लक्षात राहात नाही हो. आणि म्हणून (चुंबकत्व) वर लिहून घेतलं होतं मॅग्नेटिझम. "

" काय आहे ते ?"

" दोन विरोधी धर्म एकमेकांशी आकर्षित होतात. दक्षिण ध्रुव व उत्तर ध्रुव यांचे चुंबक एकमेकांशी सख्य धरतात. . ."

शांतता. एकदम शांतता.

कोणीच नाही हे पाहून राजियांच्या दृष्टीला दृष्टी भिडवण्याचा कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचा का कन्येचा प्रयत्न होता. कावेबाजीची हुन्नर सुरू झाली व काही केल्या गड घेण्याची शिकस्त सुरू झाली. इतक्यात पेपर सुटल्याची घंटा झाली. हा शेवटचाच पेपर होता. सुभेदारांतर्फे बाहेर लोक उभे राहिले होते. सर्व मुले आली तरी सुभेदार का येत नाही हे विचारण्यासाठी एक मोठा

मनुष्य हॉलमध्ये आला. त्याने चौकशी केली आणि कळले की प्राचार्य शहाजी शिसोदेकडे आपल्या कन्या का स्नुषा आहेत.

ते धावतच प्राचार्यांच्या खोलीत गेले. प्राचार्य एव्हाना विरघळत होते. पण परस्त्री व यवन अगर म्लेंछ धर्मातील म्हणून प्राचार्यांच्या विलासवृत्तीचा विकास कधी होई तर त्याचवरोबर कोमेजे.

सुभेदार आले. सुभेदार प्राचार्यांना ओळखत असत. सुभदार हे एक सार्वजनिक कार्यकर्ते होते. बऱ्याचशा ऐक्यवर्धक हितेच्छू मंडळावर ते होते. आणि समंजस, सात्त्विक कार्यकर्ते म्हणून त्यांचा लौकिक होता.

राजे व आपली सून एकत्र वसलेली त्यांनी पाहिली व ते आत आले.

सूनबाई उठून उभ्या राहिल्या.

राजांनी उठून सुभेदारांना अभिवादन केले.

" काय येणे झाले ?" राजांनी विचारणा केली.

" साहेव– साहेव या सुनेकरता आलो. "

" सून का मुलगी? " मघाशी इतिहासग्रंथ वाचताना हाच प्रश्न राजांना सतावून सोडत होता. कल्याणच्या सुभदाराची सून का मुलगी?

" काहीही म्हणा–सून म्हणा की मुलगी. मला कोण आहे? साहेब दोन्हीही."

" असं कसं ? "

" साहेब मी स्वत: अनाथाश्रमातल्या मुलींना दत्तक घेतो–शिकवतो आणि दत्तक घेतो. अशीच माझी ही मुलगी "

" पण मग सून कशी ?"

" साहेब, असाच एक तरुण पाकिस्तानातून आला होता. पाकिस्तान युद्ध सुरू झाले. त्याला परत जाता येईना. म्हणून तो माझ्याकडेच राहिला. "

" आणि मग ? "

" मग त्याच्याशीच हिने निका लावला का शादी केली–काय सांगू दुर्दैव?"

" मग काय ?"

" युद्ध संपले आणि तो परत आपल्या देशात गेला तो आलाच नाही. तिकडे तो चोरीच्या व फसवणुकीच्या आरोपाखाली पकडला गेला होता. युद्धाचा फायदा घेऊन इकडे पळून आला. पुन्हा तिकडे गेला. आणि फसवणुकीच्या आरोपाखाली शिक्षा भोगतो आहे. हिला आता काहीच आधार नाही. ना हिंदू–

ना मुसलमान. विवाह नाही. तशी गोड आहे ही. लोकांना काय सांगायचे ? म्हणून माझी सून म्हणतो मी. कल्याणच्या सुभेदाराची सून म्हणून माहित आहे साऱ्यांना. "

" असे ? मग हिचा विवाह झाला नाही तर ?"

" काय सांगायचे ? म्हणूनच तर मी हिला परीक्षेला बसवले ही शेवटचीच संधी आणि म्हणून कदाचित चुकली असेल तर. . "

आता . . .आता?

प्राचार्यांना हे प्रकरण दाबता येणे शक्यच नव्हते. राजांनी सांगितले,

" माझा नाइलाज आहे. या परीक्षेला पास होणार नाहीत व यांना आता शिक्षणक्षेत्रातून कायमचे हाकलले जाणार."

"नका हो—नका हो, असे निष्ठूर होऊ नका, साहेब! काहीतरी या पोरीवर लक्ष द्या. हिला कोणीच नाही. " राजे विचारात पडले. किती झाले तरी छत्रपतींच्या वंशातील ते. शरणागताला अभय द्यायचे हे छत्रपतींच्या वंशातूनच क्षत्रियांनी शिकायचे. यावेळी काय करावे 'शिवरायाचा आठवावा प्रताप' दुसरे काय ? शिवराय बोलले होते "अशी सुन्दर कन्या जर आमच्या मातोश्री असत्या तर. . ." मग आपण शिवरायांप्रमाणेच वागायला हवे. पण आपण आहोत शहाजी राजे बोलते झाले,

" काही हरकत नाही. अशी सुन्दर स्त्री आमच्या मुलाच्या मातोश्री होतील तर. "

" तर . . तर मुलाचे नाव शिवाजीच ठेवायचे". . आबाजी सोनदेव यावेळी मध्येच उपटले होते.

त्या विद्यार्थिनीला परीक्षेतून रीतसर बाद करण्यात आले व कालांतराने त्या शिवाजी शहाजी शिसोदे यांच्या मातोश्री झाल्या !

शिसोदे हे कल्याणच्या सुभेदारांना आपले वडील असे मानतात. म्हणून ती विद्यार्थिनी कल्याणच्या सुभेदाराची सून अशीच राहिली आहे. आबाजी सोनदेव यांना प्रमोशन मिळाले आहे.

□ □ □

# शेवटी डॉक्टर भेटले एकदाचे

" टाकतो मारून तुला. पुरा सांपडलास. म्लेंच्छा . . . . . माझ्या तरवारीची तहान पुरी भागली. यमसदनीच पाठवितो . . . ."

" जा रे बे. तुमको मारूंगाच – उसके वाद मरूँगा . . . ."

" थांब आता पुरा सापडलासच तू यवना . .

" बचेंगे तो और भी लढेंगे . . ."

" जास्त बडबडू नको. आता देवाचे नाव घे आणि . . . .

" जानता हूँ बे – हमारे साथ लढने की खुद् खुदा को भी शक्ती—शक्ती नहीं – नहीं ताकत् नहीं . . "

" असे काय – घे तर . . . ."

आणि तलवारीला तलवार भिडली. तुंबळ रणकंदन झाले आणि एक वीर जायबंदी झाला. एकदम घायाळ होऊन समरभूमीवर पडला. धरणीवर रक्तस्राव झाला नाही. धरणीवर आपले रक्त पडले तर धरणीला ते सहन होणार नाही. या भावनेनें की काय तो जखमी वीर ओरडू लागलो. " रक्त, रक्त " आई मला मारलं. आई मला मारलं.

जिंकणारा वीर एकदम रणांगण सोडून पळाला. तो थेट आपल्या अभ्यासाच्या खोलीत. टेबलावर अस्ताव्यस्त पडलेल्या पुस्तकातून त्याने अर्थशास्त्राचे पुस्तक काढले व मोठमोठ्याने व्याख्या पुन्हा पाठ करू लागला. पुनः पुन्हा " संकलपना " " संकल्पना " " अर्थशास्त्र " " अर्थशास्त्र " " पैसा " वगैरे म्हणजे आपण जणू त्या गावचेच नाही ! अस्खलीत उर्दूत का हिंदीत गुरमीने बोलणारे ते यवनवीर धरणीवर असहाय होऊन पडले. त्यांचा मान

मरातब गेला. व आता फक्त ओरडून मातोश्रींना बोलावून कागाळी करण्या-पलीकडे दुसरा कोणताच गनिमी कावा त्यांना योजता येईना.

सांगायला नकोच – की हे समरांगण किंवा हळदीघाट किंवा राक्षसभुवन अगर प्रतापगडची झाडी – म्हणजे आमच्या गरीबखाना – किंवा झोपडीतील कोणी आले-गेले तर उठवस करण्याची दर्शनी खोली. " दिवाणखाना " थोडा लिपस्टिकीय किंवा उच्चभ्रू भाषेत बोलायचे म्हटले म्हणजे " सिटिंगरूम " आणि हे दोन योद्धे – धैर्ये शौर्ये च आगळे असे असणारे हे वीर म्हणजे आमचे दोन पुत्र. शाळा कॉलेजांना ज्या दिवशी सुट्टी असेल त्या दिवशी आमच्या 'सीटिंगरूमचे' रूपांतर क्रीडांगण, कुस्त्यांचा आखाडा, सभापीठ, चित्रपटगृह, अश्वशर्यतीचे मैदान यांमध्ये चटकन् होई. चोर-शिपायांच्या न्यायसभा, पत्त्यांच्या डावांतील खलवते, लपंडाव खळातील दीर्घ योजना व फार मोठ्या " गमती-जमती " आमच्या दिवाणखान्यात झाल्या आहेत. काही वेळेस तो दिवाण-इ-आम (सार्वजनिक सभेचा हॉल) तर काही वेळेस दिवाण-इ-खास (विशिष्ट सल्लामसलतीकरता) झाला आहे. आजचा कार्यक्रम हा तल-वारीच्या द्वंद्वाचा होता. कालच हे दोन शूर मावळे कोणत्या तरी ऐतिहासिक चित्रपटाला गेले होते. दिवाळीची सुटी होती. आणि म्हणून लायब्ररीतून विशेष योजनेनुसार पुस्तके आणविली होती व त्या पुस्तकातील खटकेबाज संवाद हे वीर बोलत होते. तलवारीचे द्वंद्वयुद्ध आज अगदी तुंबळ होणार होते. तलवार म्हणजे एकाची – पावसाळा नसल्याने व तीर मोडकळीस आल्यामुळे अडगळीत टाकलेली माझी छत्री. ही एकाची भवानी तलवार. तर दुसरा झुल्फि-कारअली ( झुल्फिकारअली म्हणजे तलवार बहाद्दर ) –केव्हाही उघडझाप करता येणारी–पटकन लहान होणारी–अत्यंत रंगीबेरंगी कपडा असणारी छत्री–समशेर म्हणून वापरली होती. ती महागडी व लेटेस्ट फॅशनची छत्री त्यांच्या पूज्यचरण, पुण्यशील, प्रात:स्मरणीय मातोश्रींची. द्वंद्वयुद्ध हे लुटु-पुटीचेच. द्वंद्वात जिंकेल त्याला कोणतीतरी सुंदरी किंवा अबला, अप्सरा मिळायची असे मुळीच नाही. पण द्वंद्वाचे पर्यावसान जर भांडणात झाले तर मात्र कोपायमान मातोश्रींचा प्रसाद आणि तो भरपूरच.

दिवाळीच्या सुट्ट्या होत्या. त्यामुळे द्वंद्वाची कल्पना निघाली. आव्हान प्रतिआव्हान झाले आणि तलवारी खणखणू लागल्या. बहुधा धर्मयुद्धाचा

नियम कुणातरी एकाने भंग केला असावा. न पेक्षा तो वीर घायाळ होऊ शकला नसता. धर्मयुद्धाच्या नियमात – जे नियम मातोश्रीकडून संमत करून घेतले गेले होते. फक्त तलवारीनेच तलवारीवर वार करायचा होता. तलवार शरीराच्या कोणत्याही भागावर चालवावयाची नाही. निःशस्त्र झाल्यावर तलवार हाती घ्यायची नाही. एकदा तलवार हातातून पडली की रडी घाऊन पुन्हा तलवार हातात घ्यायची नाही. 'आरडा ओरडी करायची नाही' हा नियम मातोश्रींनी लादलेला. पण या नियमाचा भंग सारखाच होत असे. पण आता एका वीराला घाव बसला व तो 'बचेंगे तो और भी लढेंगे' हे मगाचचे त्यांचे बोलणे विसरून गळा काढून रडायला लागला. तो वार बहुधा धर्मयुद्धाच्या नीतीचा अगर नियमाच भंग झाल्याने वर्मी लागला. पडलेला वीर तसाच पडला. सूर्यास्ताचे आत समरभूमीवर कोणाला काय करावयाचे ते करावयाचे. सूर्यास्तानंतर समरभूमीवर कोणी योद्धा दिसून उपयोग नाही. कारण त्यानंतर "मुलांचे पपा आणि त्यांचे मित्र यांचा गप्पा व पत्त्यात वेळ जाणार. कधी बाहेर मला नेणार नाहीत." – हे वाक्य आमच्या घरात ऐकू येणारच त्यावरून समरभूमीचे सूर्यास्तानंतर काय होते ते ठरवावे. थोडक्यात म्हणजे सूर्यास्तानंतर सिटिंगरूमचे सिटिंगरूममध्येच रूपांतर करावे लागणार हा कडक नियम मग तो अजिंक्य योद्धा असो अगर सम्राट अशोकासारखा शांतिप्रिय राजा असो. सिटिंगरूममध्ये त्याला मोडक्या का होईना खुर्चीवर बसावेच लागणार आता सूर्यास्ताचे आत त्या पडलेल्या वीराला रणांगण सोडायला हवे होते. नुसतेच रणांगण सोडायचे म्हणजे विजयी वीराला शरणच गेल्यासारखे होईल. तो मग गर्वाने फुगेल व "जिरवली की नाही, जिरवली की नाही!" असे म्हणणार. त्यापेक्षा जरा आणखी आरडा ओरडी करावी व चंडीमातेला जागवावे. रणचंडी जागृत झाली की त्या विजयी वीराला धपाधप फटके बसतील. अशी युद्धनीती आखून त्या पडलेल्या वीराने विव्हळायला सुरुवात केली.

"आई – आई – पडलो. . .पडलो. . ."

ही आरोळी मात्र आता बरोबर ज्याच्या कानात जायची तिथे अगदी बरोबर गेली. जसे मारीचाने "धाव लक्ष्मणा. . ." अशी आरोळी मारली आणि ती बरोबर सीतेच्या कानी गेली तसेच – तसेच अगदी.

" काय – काय – होतेय रे. . .सकाळी अभ्यास करायचा सोडून काय खेळ मांडलाय हा ? " स्वगत पण कडकडाटानी सर्व घरातील लोकांना ऐकू जाईल अशा रीतीच्या आवाजात.

फोडणी टाकली. भांड्याचा आवाज झाला. जखमी वीराला आता बरे वाटले. आता रणचंडी निघालीच. भांड्याचा आवाज झाला की समजावच "निगाह रखो–निगाह रखो." रणचंडी निघाली आणि आपणाला आता धपाटे बसणारच. पण त्या विजयी वीराला जास्त धपाटे बसणार आणि त्याला विजयाचा आनंद तरी मुळीच मिळणार नाही.

रणचंडी रणावर गेली नाही. जो वीर आता बुद्धीचे शस्त्र तजेलदार करीत होता त्याच्या वटिकेत गेली. बुद्धीचे शस्त्र म्हणजे परीक्षा पास होणे. तो पाठ करीत होता. " संकल्पना–पैसा–बँका–पत, पतपेढी." अर्थशास्त्राचा तो कधी-काळी पदवीधर होणार होता. त्याकरता अभ्यास. त्या वीराला कळलेच होते की. रणचंडी आता येईलच. आपली पाठ थोडी ठणक ठेवलेली बरी. हाच आता विचार स्वसंरक्षणाचे आता कोणतेच साधन नव्हते. ती रणचंडी जी निघालीती सरळ कांही न बोलता त्या विजयी वीराच्या अंगावर तुटूनच पडली. काही न बोलता तिने त्याच्या पाठीत धपाधपा धपाटे घातले.

" अग आई ग. . . ." तो विजयी वीर.

"आई ग – आई ग काय " रणचंडीने भलतेच रौद्र स्वरूप धारण केले. " शंभरदा, शंभरदा सांगितले " – असे म्हणत प्रत्येक शब्दाला दोन धपके अशी स्पीड वाढविली. " घरात असे जीव घेणे खेळ नकोत म्हणून "

" नाही ग – त्यानेच सांगितले." तो विजयी वीर केविलवाणा झाला.

" तो सांगतोय आणि तू ऐकतोस काय. " परत धपाटा. तो विजयी वीर आता अर्धमेला झाला हे त्या धारातिर्थी पडलेल्या वीराने ओळखले व तो शांत झाला. तरी " आई ग " . . .असे कण्हणे सुरू ठेवलेच.

रणचंडी तिथे धारातीर्थावर गेली. धारातीर्थावर कागदाचा खच पडला होता. तलवारी तशाच पडल्या होत्या व खुर्च्या अस्ताव्यस्त झालेल्या दिसत होत्या. रणचंडीने धारातीर्थ व्यवस्थित करायला सुरुवात केली. तोच हा घायाळ वीर रणचंडीच्या अंगाला भिडला. अंगाला भिडल्यामुळे रणचंडीला जोराचा हात मारता येईना.

" चालता हो इथून. बोलू नकोस. रडणे आवर " सर्व शांत झाले.

पण. . . .जखमी वीराला खरोखरच जखम झाली होती. त्याच्या पायाला काहीतरी झाले होते आणि तिथेच छत्रीचा गंजलेला तीर लागला होता. रण-चंडीने ते पाहिले.

संध्याकाळी पतिदेव आल्यावर गृहभर्त्यांचा तडकाफडकीचा आदेश अगदी आणीबाणीचा.

" समाज कार्य पुरे झाले. मुलाला घेऊन डॉक्टरकडे जाणे व टिटॅनसचे इंजेक्शन घेणे आजच आता . . . . .

आपल्याइतका मार बसला नाही. पण आता डॉक्टरांचे इंजेक्शन आपल्या शत्रूला मिळणार या आनंदाने तो विजयी वीर हुरळून गेला.

" नको डॉक्टरकडे नको ." तो घायाळ.

मलाही आता संध्याकाळी डॉक्टरांकडे जाणे नकोच होते. पण !

" मग शाळा बुडणार. टिटॅनसचं इंजेक्शन घेतले नाही तर काय होईल माहीत नाही. उगीच भलते नको. . ." आदेश.

दुसऱ्या कुणाबरोबर तरी मुलाला पाठविले असते पण मुलाच्या मातो-श्रींना विश्वास नव्हता. तो मुलगा ' इंजेक्शन घेतले ' म्हणून खोटेच सांगून यायचा. दुसरा कोणी त्याला साथ द्यायचा. त्यामानाने मुलाचे वडील कसेही असले तरी आपण सांगितलेले ऐकतील व फसविणार नाहीत. डॉक्टरकडे पोराला नेणार याची थोडी खात्री होती. नवरा कसाही असो आपल्याला फसविणार नाही. ( आणि फसविणाऱ्याला कोण फसवणार म्हणा ) अजूनही मुसलमानी पद्धतीप्रमाणे याच नवऱ्याशी लग्न करायचे ठरविले तर आपण लग्नमंडपांत त्या काझीला सांगू " हमको कबूल नहीं – कबूल नहीं – कबूल नहीं ' नवरा. मात्र खाली मान घालून सांगेल " कबूल, कबूल – कबूल." – असा नवरा. ही खात्री म्हणूनच त्या नम्र सेवकाला आज्ञा – ' या पोराला डॉक्टरकडे घेऊन चला. '

आदेश आले की ते ताबडतोब अंमलबजावणीत आणलेच पाहिजेत हा माझा शिरस्ता. मी त्या पोराला घेतले आणि डॉक्टरकडे गेलो. एव्हाना आठ वाजून गेले होते. " उद्या सकाळी साडेआठला या " कंपाउंडरने न पाहताच सांगितले. आणि औषध कुटत असताना लहानसा जसा दगड फेकून द्यावा

– त्याप्रमाणे मला फेकूनच दिले. आमच्या मुलाला आनंद झाला. इंजेक्शनचा त्रास वाचला.

दुसऱ्या दिवशी मुलांच्या आईने सकाळी देवाचे स्तोत्र वाचण्याअगोदरच डॉक्टरचे नाव घ्यायला सुरुवात केली व मुलाला व मला बाहेरच काढले. मुलानेही थोडा सत्याग्रहाचा प्रकार केला. पण आणीबाणीत सत्याग्रहाचे काही चालण्याजोगे नव्हते. एवढेच नव्हे तर काल जो शत्रू होता–त्यानेही आई-कडे आपला शब्द खर्चून पाहिलं "डॉक्टरकडे जाण्याइतपत जखम झाली नाही" असं सांगितलं पण त्याला धपके पुन्हा बसले. टिटॅनसची फारच धास्ती तिला. तिच्या माहेरी कोणी तिच्या आजीचा मावसभाऊ टिटेनसने मेला होता. मेला असायचा आपल्या कर्माने पण नांव टिटॅनसचे – त्या वेळेपासून टिटॅनसची धास्ती हिला! टिटॅनसवर हल्ली म्हणे जर्मन डॉक्टरांनी पावडर शोधून काढली आहे. पण इंजेक्शन खरे! आणि डॉक्टर ठरलेला! जनरल प्रॅक्टिशनर! तो लांब जरी राहात असला तरी तोच. धनुर्वातावरचे इंजेक्शन त्यानेच द्यावे आणि डॉक्टर चांगला का तर तिच्या लांबच्या वहिणीचा जावई म्हणे. हिच्या वहिणीचा – 'जांवई भला' खरा. पण मला आता भुर्दंड! त्याच्याकडं जा. तोंड देखलं हं-हं करा. आणि उगीच कांहीतरी बोलून हसा. आणि हिच्या वहिणीची मुलगी. . . "ते काही नाही. चहा घेतलाच पाहिजे" म्हणून चांगला दोन टमरेल भरून मला चहा देणार. चहा इतका देणार की त्या साखरेने मला मधुमेहच व्हावा आणि हिच्या नवऱ्याचे मी मरेपर्यंत पेशन्ट राहावे. मला हे नको होते आणि तो जांवई आणि त्याची ती अपूर्वाईची बायको चांगली असली तरी हिच्या लांबच्या वहिणीचा म्हणजे त्या डॉक्टरच्या सासूचा मला राग यायचा. महाचांडाळ आणि दुष्टा! अगदी माझ्या लग्नाच्या वेळे-पासूनच तिने माझ्याशी दुष्टावा धरला होता. लग्नात आइस्क्रीम पार्टीच्यावेळी ती पुढे पुढे फार करी. आणि हिच्या माहेरच्या माणसांची ती विजयालक्ष्मी पंडित–परराष्ट्रीय मंत्री! तर आम्हाला–व्याह्यांच्या सर्व लोकांना परराष्ट्र समजून ही लग्नात मिरवणार. कुणी नाही हे पाहून मी आमच्या पत्नीकडे तिने खाल्लेले आइस्क्रीम मागायचा. तिने मग आपली प्लेट मला द्यायची व मी तिला आणि हे कुणाच्या लक्षात न येता. पण मी माझी प्लेट हिला देणार आणि हिची प्लेट माझ्याकडे यायला लागली की ती....ती परराष्ट्रमंत्री धावत

येणार. तिच्याबरोबर कोणीतरी शरीराचे धनुष्यबाण झालेला म्हातारा असायचा. आणि ती या डॉक्टरांची सासू – त्याची "हे हे हे' करीत ओळख करून द्यायची. त्याच्याबरोबर माझा व आपला फोटो काढून घ्यायची. साहजिकच माझे आइस्क्रीम फुकट ! हिची वहीण आपल्या वाट्याचं आइस्क्रीम खायची. माझ्या वाट्याचेही खायची. मी मात्र आइस्क्रीमविना. आणि या डॉक्टराची सासू परत टुणटुणीत होऊन दुसऱ्या म्हाताऱ्याला बोलवायला तयार. मला आईस्क्रीम मागता येत नव्हते. जावईबापू आइस्क्रीम किती खाणार ? लग्नानंतरसुद्धा या डॉक्टरच्या सासूने माझ्याशी दुष्टावा धरला होता. तिला वाटायचे की मी माझ्या बायकोला फार छळतोय. आता कोण कोणाला छळेल हे माझ्या सासऱ्यांना चांगले माहीत. पण या वयेचा माझ्याकडे दुष्टावा. पुढचा जन्म जर हिला आला तर तो डासांचा येईल, डासांचा ! व मी तिला चुटकीसरशी मारून टाकीन. असो. या सासूमुळे मी त्या डॉक्टरच्या घरी फारच क्वचित जायचा. तो डॉक्टर भला मनुष्य. त्याची बायकोही भली. पण फोटोला, चांगल्या फोटोला घाणेरडी चौकट असली की कसे वाटते तसे वाटायचे मला. मी मग त्या डॉक्टरच्या दवाखान्यात गेलो.

कंपाउण्डरने दुसऱ्या दिवशी सकाळी बोलावले होते. सकाळी गेल्यावर दवाखान्यात गर्दी होती. कोणत्यातरी जाहिरातीचे एक कागदी घड्याळ होते. बहुधा व्हिटॅमिनची जाहिरात होती. आणि तिथे त्या जाहिरातीतच एक घड्याळ बसविले होते. घड्याळाचे काटे पावणेनऊवर आणून ठेवले होते. आणि खालती मोठा मजकूर छापला होता. डॉक्टर बाहेर गेले आहेत. एव्हा येतील पावणेनऊ असे घड्याळ दर्शवीत होते.

त्या जाहिरातीजवळ केवळ देह हेच फक्त वस्त्र आहे अशा स्त्रीचे एक कॅलेंडर होते व पोट दुखायला लागले की हमखास गुण पडणाऱ्या गोळ्यांची जाहिरात त्या कॅलेंडरवर केली होती. नंतर दुसरे चित्र होते. त्यामध्ये देहाचे वस्त्रच काढून घेतले होते व तशी स्त्री व तिचे हृदय व रक्ताभिसरण दाखविले होते. स्त्री, तिचे हृदय व रक्ताभिसरण यावर मी आता परंज्ञानी झालो होतो.

तिथेच एक दांपत्य बसले होते. बसले होते म्हणण्यापेक्षा त्यातील स्त्री जोडीदार बसला होता व पुरुष अगदी लगटून उभा होता. आजारी बहुधा ती स्त्री असावी. पण या पुरुषाला त्या वेदना होत होत्या असे वाटे. ती बाई

चेहऱ्यावर काहीतरी भाव आणू लागली की तावडतोब हा नवरा विव्हळे. जणू या दोघांची हृदये नव्हेत तर शरीरेसुद्धा एक आहेत. नवरा जरा शांत राहिला तर हिला अस्वस्थच वाटायचे. ही मग हळुच हुंदका द्यायची व तो कळवळायचा. डॉक्टरसाहेबांच्या कंपाउण्डरना विचारायचा. "केव्हा येणार डॉक्टर ?" डॉक्टरांच्या कंपाउण्डरने त्याला आश्वासन दिले होते की डॉक्टर आल्यावर पहिल्यांदा त्याची केस काढणार. पण या पोराला वाटायचे की तापाच्या थर्मामिटरप्रमाणे प्रेमाचे थर्मामीटर असायला हवे. म्हणजे आपण किती प्रेम करतो हे समजेल. तो आपल्या पत्नीला जरासुद्धा सोडून जायला तयार नव्हता. आणि त्याच्या पत्नीचा आजार कसला असावा हे कुणाला सांगायला नकोच. माझा मुलगा तिच्याकडे जरा निराळ्या रीतीने पाहात होता. मुलांचे कुतूहल ते.तिच्या डाव्या पायाला थोडी सूज आलेली होती. आणखी काय आजार होते ते त्या तिच्या नवऱ्याला माहीत.

पलीकडच्या बाकावर एक अर्धाष्टपुत्रा सौभाग्यवती बसली होती. चांगली चार पोरे तिच्याजवळ होती. दोन्ही बाजूला दोन दोन आणि ही थप्पयामावशी मध्येच बसलेली. भालप्रदेशावर कुंकू होते खरे—पण तिच्याकडे पाहिल्यावर कोणालाही वाटेल की हिच्या नवऱ्याने आत्महत्त्या केली असावी किंवा हिला पाहून परांगदा झाला असावा. या चार पोरात थोरली फारतर दहा-अकरा वर्षांची परकरी असावी. तिचे नाव ताई ! – दुसरी अक्का, तिसरे बाळ्या, चवथे लहान शंकर – हे शंकरराव फक्त शर्टातच होते. बाकी लिंग व इतर भाग उघडाच. आणि याने घेतले होते गणपतीचे पोट. शेंबडेही होते आणि प्रमाणाबाहेर खाल्ल्यामुळे त्याचे पोट पुढे आले होते आणि तो पीतही असावा. पिणे म्हणजे अंगावर. कारण आईच्या मांडीवर बसला होता व आईच्या पदराआड तोंड घालीत होता. आई त्राग्याने त्या शंकराकडे पाहू लागली. शंकर आता रडणार असे दिसल्यावर "तो बघ बुवा आला" असे म्हणत तिने माझ्याकडे बोट दाखविले आणि ते पोर थोडे गप्प राहिले. माझ्याकडेच डोळेभरून ते शेंबडे पाहायला लागले. डॉक्टर राहिला बाजूलाच. कुणाचेही शत्रुत्त्व न पत्करणाऱ्या मला ते पोरगे मी कुणीतरी चंगीजखान किंवा सिंदबादच्या सफरीतील पक्षी व माणूस यांचे एकीकरण झालेला राक्षस अशा रीतीने पाहू लागले. मीच मान खाली घातली. त्या ताईकडे बहुधा या चार – विशेषतः त्या बाळ्या व

अक्कामधील शिस्त लावण्याचे काम असावे. तो बाव्या व ती अक्का आलटून पालटून आपल्या आईच्या एका बाजूला व दुसऱ्या बाजूला वसत. थोडा काही-तरी वाद झाला. तो ताईने अधिकारात सोडविण्याचा प्रयत्न केला. पक्षकारांनी ऐकले नाही. ताईनेच अपील केले व अपीलाचा तडकाफडकी निर्णय लागला. दोन्ही पक्षकारांना देहदंड झाला. रडण्याची सोय नव्हती. आवाज कुणी काढा-यचा नव्हता. चेहऱ्यावर चमत्कारिक भाव आणून त्या दोघांनी ती शिक्षा एकदम मान्य केली. कंपाउण्डरने पुन्हा डोळे वटारलेच. ताईने परत शिस्तीत वसायला सांगितले. ती अक्का गप्प बसली. मी तिच्याकडे पाहिले. ती खुदकन हसली. जणू माझेच पोर. इकडे माझ्याजवळचे जे माझे पोर होते ते आनंदात होते. त्याला काहीही होत नव्हते. धनुर्वाताच्या भीतीमुळे त्याच्या आईने त्याला धाडले होते. इंजेक्शनच्या धास्तीने ते भेदरले होते. मला काहीतरी सांगून इंजेक्शनचे नाटक करता येण्याजोगे नव्हते. म्हणजे ज्याला काही आजार नव्हता असे माझे मूल भेदरून बसले होते. मी त्याला परका वाटत होतो. कारण इंजेक्शन मी चुकवणार नव्हतो आणि ते-पोर ती अक्का आजारी असून आनंदात दिसत होती. मी तिला जवळचा वाटत होतो आणि म्हणून खुदकन् हसत होती. डॉक्टरच्या दवाखान्यात अजब न्याय मिळत होता. तो त्या अर्धाष्टपुत्रेचा परिवार डॉक्टरांच्या येण्याची वाट पाहात होता. ती बाई कुटुं-बाच्या त्रिकोणाकडे – समोरच भिंतीवर लावला होता तो – त्याच्याकडे पाहात होती. त्या ताईनेही तो त्रिकोण पाहिला होता. निरोधाची जाहिरातही पाहि-लेली दिसत होती. पण तिने आईला न विचारता त्यांचा अर्थ समजून घेतलेला असावा. असो. त्या परिवाराने सर्व बाकडाच अडविला होता. त्या सर्वांच्या चेहऱ्यावरील ' भावाकडे ' माझा मुलगा शांतपणे पाहात होता. मुलेच ती. माझा काय – त्या अर्धाष्टपुत्रेचा काय – त्या मुलांना कृत्रिम शांतता जाचक वाटत होती. त्या पोरांना खेळावेसे वाटत होते. खरे सांगायचे म्हणजे मलासुद्धा – नव्हे त्या बाईलासुद्धा बाहेर जाऊन चिचा पाडाव्यात व मनमुराद बागडावे असेच वाटत असेल. पण बाह्य आवरणे – देखावे ठेवायला हवेत ना ! ते सर्व – स्त्री सत्ताधारी कुटुंब डॉक्टरांची अगदी चातकासारखी वाट पाहात होते. पण

तेवढ्या दवाखान्यातील वेळातच त्या स्त्रीला आराम मिळत असावा. कारण घरी किंवा दवाखान्याच्या बाहेर ती कार्टी उगी वसली नसती.

नंतर एक प्रौढ जोडपे आले. 'कॅक्स्टस' 'फमिना'– या शव्दातले. महाराष्ट्रीय असावे. पण वाघिणीचे दूध प्यालेले. इंग्रजी भाषा म्हणजे वाघिणीचे दूधच होते त्यांना. सारे " पपा–डॅडी–यस् मॅन–नो सिस्टर " हे काम. नवरा टॉय-वूट व व्यवस्थित दाढी केलेला. कृष्णतुळशीच्या वर्णाचा. पण तुळशीच्या लग्नात कृष्णतुळशीला कापसाची माळ घातली की कशी दिसते – तसा त्याला त्याचा पोशाख दिसत होता. मिशी अगदी व्यवस्थित कापली होती. पावडरही अगदी जपून – वेतानेच वापरलेली. पण परिणामकारक दिसेलं अशी थोडे सेन्टही लावलेलं होतं आणि वरोबर ' मिसेस '. ती आपली हेअरस्टाईल संभाळत होती. हेअरस्टाईल म्हणजे पक्ष्याचे एक घरटेच होते म्हणा. त्या ताईचे व वाप्याचे लक्ष त्या घरटयाकडे गेले. जो पेशंट येई त्याची नजर घरटयाकडे जाई व कॅलेंडरवर. स्पष्टच सांगितलेले बरे. माझीही नजर गेली होती. पण नंतर लगेच स्त्रीच्या हृदयाचा व रुधिराभिसरणाचा नकाशा होता त्याच्याकडे लक्ष गेले. आणि मी शांत राहिलो. पण त्या प्रौढेला पूर्णपणे कल्पना होती की दवाखान्यात सध्या तरी तिच्यासारखी चित्ताकर्षक केशरचना कुणाची नसणार. आणि प्रत्येकजण तिच्या केशकलापाकडे चोरटचा नजरेने पाहात आहे. तिला वरे वाटत होते. मध्येच ती आपल्या थोरल्या मुलाला फार तर वारा वर्षाचा होता तो – ' कीप क्वायट ' म्हणत होती. तो मुलगा खरोखरच गुड वॉय होता. पण आपण जरा शिस्तप्रिय आहोत व इंग्रजी बोलतो घरात–हे दाखविण्या-करता ती त्या मुलाला हळूच इंग्रजीत बोलायची. ते पोरगे अगदी युनिफॉर्मात होते. लाल डगला घातला होता त्याने. रेल्वेचे हमाल घालतात तसल्या रंगाचा. त्या पोराच्या तोंडात कसली तरी गोळी होती आणि ते पोर ती गोळी चघळत होते. माझा मुलगा त्या पोराकडे आशाळभूतपणे पाहात होता ! या बाईला माहीत होते की दवाखान्यात आपण आता राणी आहोत – व थोडा वेळ तरी आपल्या राणीपदाला कोणी प्रतिस्पर्धी भेटणार नाही आणि डॉक्टर लवकरच यायला पाहिजेत असे काही नव्हते. तरीपण ती आपल्या हाताकडे पाही. घड्या-ळात पाहून डोक्यावर आठ्या आणी. जणू काय हिचा चित्रवाणीकरिता फोटोच घेताय. तो नवरादेखील – " आपण या राणीचे मालक आहोत–मालक "

अशा दृष्टीने लोकांकडे पाहात होता. त्या बाईच्या चपला उंच टाचांच्या होत्या आणि डॉक्टरकडे यायचे म्हणून विशेष ड्रेस केलेला होता असे वाटते. चेहऱ्यावर पावडरचा थर. पण पाठीमागे पोलक्याच्या वरील भागावरून म्हणजे माने-कडील हो – तिचा रंग काय असेल हे कळत होतं. स्वतःच्याच सैन्यात जसे पंचमस्तंभी असतात तसे तिच्या कानाखालील व कानामागील भाग तिचा रंग काय आहे हे गुप्तपणे सांगत होते. गालावर तिच्या लाली आली होती व भुवया "धनुष्याकृती" होत्या. डॉक्टरकडे आजार असो अगर नसो – नित्य नियत-कालिक तपासून घ्यावे अशा मताचे ते कुटुंब असावे. डॉक्टरांची फी व औषधे "कंपनी सरकार" भरीत असावी. एक लहान मूलही होते. ते रडायला लागले. ते बहुधा आजारी असावे. ते रडायला लागल्यावर तो नवरा "यस् – यस् माय बॉय" करीत त्या पोराला बाहेर घेऊन गेला. आपल्या कपड्याच्या इस्त्रीलाही तो थोडाफार जपत होता. पण ते पोरगे बाप इंग्रजी बोलत असला तरी बापाच्या कपड्याची इस्त्री बिघडवीत होते. बापानी पण दक्षता म्हणून सुरकुत्या न पडणाऱ्या वस्त्राचे कपडे घातले होते. बाप बाहेर गेला आणि त्याने धूम्रपान करायला सुरुवात केली. ते लहानसे पोर त्या धूम्रवलयाने खूष झाले असावे. इकडे या बाईने परत आपली केशरचना व्यवस्थित केली व त्या मुलाला परत इंग्रजीत सांगितले, "सिट राईट" आता हा मुलगा काही अंगावरचे पिणारा नव्हता. पण त्या अर्धाष्टपुत्रेने तिचा मुलगा अंगावर प्यायला लागल्यावर पदराची जशी सावरासावर करावी तशीच सावरासावर तिने पदराची केली. आपण स्लीव्हलेस ब्लाऊज घातले हेदेखील लोकांना कळेल अशी आपल्या वस्त्रांची चाळवाचाळव केली आणि डोळ्यांनी सर्वत्र हेरत हेरत 'किती वेळ हा' असं नजरेनं बोलून तळहातावर आपले शीर ठेवले. तिचीही नजर त्या 'निरोध' वर गेलीच. पोरगा त्या स्त्रीची व व्हिटॅमिनची जाहिरात पाहात होता. तिच्या पोराकडे ती अर्धाष्टपुत्रीची पोरे पाहात होती. अर्धाष्टपुत्रेनेदेखील तिच्याकडे चमत्कारिक रीतीने पाहिले. पण काय करणार. डॉक्टर काही तिच्या हक्काचा नव्हता. सर्वांचाच डॉक्टर! अशा वाया येणारच डॉक्टरकडे.

माझ्या शेजारी एक मिशाळ खेडूत पाटील बसला होता. थंडीने हुडहुडी भरली होती वाटते त्याला. त्याच्या खेड्यात हे डॉक्टर नावाजलेले म्हणून

तो आला होता. हातात औषधासाठी म्हणून रॉकेलच्या वाटली एवढी वाटली ! बराच वेळ तो बसला होता. त्याने हातावरचे घड्याळ मला बघायला सांगितले. त्याच्या हातावर चांगले इंपोर्टेड घड्याळ होते. पण वाजले किती बघायचे मी. त्याला ते समजत नव्हते. " डाक्टर कवा येतील ? आता किती वाजल्यात् ? " म्हणून मला त्याने विचारले व कांबळे पांघरून पहुडला. त्याने आपली बैलगाडी आणली होती.

नंतर एक एकदम तरुण असे कॉलेजयुवक आले. त्यांच्या डोक्याला फार मोठे बँडेज होते. पण ते सरळ कंपाउण्डरच्या खोलीत गेले. त्यांचे डॉक्टरकडे काम नसावे. नुसते बँडेज बांधून घ्यायचे होते आणि त्याबाबत कंपाउण्डरचा हात उजवा होता .कंपाउण्डरने सांगितले, " आता डॉक्टर येण्याची वेळ झाली. दुपारीच ये." तावडतोव ते कॉलेजयुवक सायकलीवर वसले आणि गेले.

एक वृद्ध गृहस्थ नंतर आले. पण ते आजारी नव्हते. त्यांच्यावरोबर त्यांचा नातू होता. तो आजारी असावा. तो त्या आजोबांची काठी म्हणून उपयोग करीत होता. डॉक्टरांच्या दवाखान्यात आता भराभर पेशंट्स येऊ लागले.

कंपाउण्डरसाहेव मघाशी जरा ऐटीत फिरत होते. कुणी विचारलेच ' डॉक्टर केव्हा येतील ' तर न वोलता तो घड्याळाकडे वोट दाखवायचा. रडणाऱ्या मुलांवर डोळे वटारायचा. आता डॉक्टर यायला वेळ व्हायला लागलाय हे पाहून तो आत कंपाउण्डरचे रूममध्ये गेला.

तो एक इसम काही फोटोंचे पाकीट घेऊन आला. त्याने फोटो आणले होते. त्याने विचारले,

" डॉक्टर केव्हा येतील ? "

" तुम्ही संध्याकाळीच या. आता तो फोटो ठेवा इथे. "

" अहो, मी केव्हा येण्याचा प्रश्न नाही. डॉक्टर केव्हा येतील हे विचारतोय मी. " तो फोटो आणणारा बहुधा वकिलाचा कारकून असावा. त्याने सरळ पॉइंटमध्ये पकडले.

" मग बसा तर. पावणेनऊला येणार म्हणून सांगितलंय. मला पुढचे माहीत नाही. " कंपाउण्डर त्राग्याने वोलला. तो वकिलाचा कारकून कायदेबाज पावित्र्यात परत गेला.

त्यावेळी तो तरुण नवरा परत कंपाउण्डरकडे काकुळतीने पाहू लागला.

" मला पहिल्यांदा भेट मिळेल या डॉक्टरबरोबर ? " अशा अर्थाचं.

" तुम्ही गप्प बसा. डॉक्टर आले की पहिल्यांदा तुमची गाठ घालून देतो. " अशा तऱ्हेचे हातवारे. कंपाउण्डर आता केसपेपर लावायला लागले व दवाखान्यात अगदी जपून फिरायला लागले. लिलिपुटच्या राज्यात गलिवर जसा फिरतो तशा तऱ्हेने. गलिवरचा अंगठा जरी कुठे लागला तर दहा-बारा लिलिपुट मरायचे ही भीती. म्हणून गलिवर अंगठ्यावर हळूहळू चालायचा. अगदी तसेच. कंपाउण्डर हळूहळू चालत कंपाउण्डरच्या खोक्यात गेले व केसप्रमाणे नंबर देऊ लागले. तोच टुरटुर करीत एक गाडी आली. डॉक्टरसाहेब उतरले. डॉक्टरांची बॅग घेऊन कोणीतरी आले होते. चेहऱ्यावरून डॉक्टरांखेरीज त्याच्या डोळ्यांत दुसरा कोणता विषय असेल असे वाटत नव्हते. चेहरा अगदी केविलवाणा झाला होता. बँकेवर ठेवीदारांची धाड आल्यावर मदत करणाऱ्या सावकाराकडे बँकेचा मॅनेजर जातो त्यावेळी त्याच्या चेहऱ्यावर जो भाव दिसेल तसा भाव त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता.

डॉक्टरसाहेबांनी त्याच्या पाठीवर हात मारला.

" छे छे; काहीच काळजी नको . . . या दोन गोळ्या घ्या. दिवसातून दोनदा. माझ्याकडच्या दिल्या असत्या पण आता नाहीत. कुठेही दुकानात मिळतील."

" पण डॉक्टर, या कंपनीच्या नाही मिळाल्या तर. . "

" नाही तर दुसऱ्या कंपनीच्या. सर्व कंपन्या एकच . . . "

डॉक्टर बाहेरच दारात उभे होते. आणि तो हातात बॅग घेतलेला अगदी-हिंपुटीस आला होता.

" अहो, कोण आलेय का ? कोणत्या कंपनीचे ? " डॉक्टरांनी तिथूनच कंपाउण्डरला विचारले.

" हो साडेनऊला येतील ते रिप्रेझेंटेटिव्ह " कंपाउण्डर.

" मग जरा थांबा हो. "

" डॉक्टर जास्त वेळ थांबले तर त्यांना त्रास नाही होणार ? "

" छे छे; असा कुठला त्रास होतोय. थांबा बसा इथेच. "

त्या बॅगवाल्याने बॅग आत ठेवली आणि तो बाहेर बसला.

डॉक्टर आत गेले.

आणि डॉक्टरना जरासुद्धा उसंत न देता ते तरुण जोडपे डॉक्टरांच्या पाठी-मागे गेले. कंपाउण्डरने तावडतोब त्यांना केसपेपर दिला.

बाकीच्या पेशंटस्ना नंबर द्यायला सुरुवात झाली. या पेशंटनंतर त्या केशकलापीचाच नंबर. नंतर त्या अर्धाष्टपुत्रीची पाव-डझन पोरे. नंतर मी. असा अंदाज केला.

तोच एक ढेरपोटे पोलिस अधिकारी आले आणि त्यांच्याबरोबर त्यांचा ड्रायव्हर. पोलिससाहेबांना रात्री जेवण फार झाले आणि बांत्या झाल्या आणि उद्याच ड्युटीवर जायला हवे होते. आणि म्हणून तावडतोब इलाज हवा होता. कंपाउण्डरसाहेबांनी आपल्या घरमालकाला एकदा दारू पिऊन शिव्या दिल्या होत्या. त्यावेळी घरमालकांनी पोलिसात कंप्लेन्ट नोंदविली होती. पेशंटना राजा वाटणारे हे कंपाउण्डर त्यावेळी अगदी अगतिक झाले होते आणि त्याचवेळी या साहेबांबरोबर असलेल्या पोलिसाने फार उपकार केले होते आणि प्रकरण मिटविले होते. त्याचे उपकार स्मरून पोलिस अधिकाऱ्याला डॉक्टरसाहेबांकडे तावडतोब पाठविण्याचे कंपाउण्डरने ठरविले.

आत तो तरुण नवरा अनेक प्रश्न डॉक्टरना विचारीत होता. डॉक्टर सांगत होते, "काही काळजी करू नका."

"डॉक्टर, तिच्या पायाला फार सूज आहे हो."

"असणार. ती उतरणार . . ."

"आणि डॉक्टर, तिला बांत्या फार होतात."

"होणारच – कळेल तुम्हाला . . "

"डॉक्टर, तिच्या डोळ्याच्या खाली फारच वर्तुळे झाली आहेत . . ."

"हे पाहा – तुम्ही आता तुमचे काम केलेत; मी माझे काम करतो."

"हः हंः हंः" ती पत्नी हसली. अगदी मनसोक्त. त्यावेळी मग तो नवरा बाहेर निघाला. डॉक्टरांनी त्याच्या पाठीवर हात मारला. परत पत्नी हसली. याला बरे वाटले.

याचवेळी कोणत्या तरी औषधी कंपनीचा प्रतिनिधी आला होता. हातात बॅग. सुरेख पॉलिश केलेला चेहरा व बूट. अत्युत्कृष्ट केशरचना. म्हणजे या 'ममी' च्या केशरचनेला स्पर्धा ठरेल अशीच. त्या ममीला जरा हेवा वाटला. हा औषधविक्रेता इंग्रजीही ममीपेक्षा सुरेख बोलत होता. केसां-

वरून 'झुल्फ' कार नाव ठेवावे. मगाशी डॉक्टरांची बॅग धरत आलेला आता चुळबुळ करू लागला. कंपाउण्डरची मनधरणी करू लागला. कंपाउण्डर मुद्दाम शांत होता. लोक अशी मनधरणी करू लागले की आपण मुद्दाम शांत राह्यचे व आपला भाव वाढवायचा हे कंपाउण्डरला चांगलेच माहीत. त्या बॅग धरणाऱ्याला वाटले, की आत दुसरा रोगी गेला की, आपणाला अर्धा तास थांबावे लागणार. पण डॉक्टरांना एका पेशंटच्या पाठीमागे एक सिगारेट ओढायची असते हे फक्त कंपाउण्डरला माहीत. कंपाउण्डर आत गेले व रिप्रेझेंटेटिव्ह आले म्हणून सांगितले.

"उद्या बोलवा त्यांना. उद्या नको दोन-तीन दिवसांनी या म्हणून सांगा." डॉक्टर.

"हे पाहा तुम्ही" कंपाउण्डर एक डोळा डॉक्टरांच्या खोलीत व एक डोळा बाहेरच्या खोलीत अशा पोझने सांगू लागला.

तोच डॉक्टर बोलले, "थांबा. थांबा त्यांना बोलवा."

रिप्रेझेंटेटिव्हच्या त्या अतिपॉलिश केलेल्या चेहऱ्यावर थोडा आनंद झाला. डॉक्टरसाहेबांनी इतक्या लवकर बोलावले ही काही साधीसुधी गोष्ट नव्हती काही. तो बॅग धरणारा मघासचा पुढे पुढे करू लागला.

"हे पाहा तुमच्याकडे ग्लॅस्कोचे ." डॉक्टरनी नाव काही तरी घेतले, "आहे काय?"

रिप्रेझेंटेटिव्ह जरा विमनस्क झाले.

"बरे ग्लॅस्को नसले तर वायरचे..."

"नाही नाही त्याला सबस्टिटयूट म्हणून हल्ली नवीन निघाले आहे."

त्या रिप्रेझेंटेटिव्हला जाहिरात ही पासष्टावी कला हे उपजत ज्ञान होते.

"ते नको हो." डॉक्टरांचा अहंभाव थोडा जागृत झाला. "सबस्टिटयूट काय द्यावे हे मला नका सांगू तुम्ही. नाही ना तुमच्याकडं "

डॉक्टरनी त्या रिप्रेझेंटेटिव्हकडे– 'आपले आता काम झाले आपण जाऊ शकता' अशी दृष्टी टाकली.

"तुम्ही असे करा" डॉक्टरांनी त्या बॅग धरीत त्यांच्यावरोबर मघाशी आलेल्याला सांगितलं. "मी लिहून देतो त्या गोळ्या घ्या. मिळतील त्या. जा लवकर. आणि त्या गोळ्या घ्या. "

डॉक्टरांनी काहीतरी न वाचता येणाऱ्या अक्षरात खरडले. ती चिठ्ठी घेऊन तो धावत गेला.

रिप्रेझेंटेटिव्हला कंपाउण्डरने हळूच सांगितले, " दोन-चार दिवसांनी या. आज सकाळीच डॉक्टर कुठल्या केसला गेले होते. तिथे वेळ झाला."

रिप्रेझेंटेटिव्हनी काही सॅम्पल्स व त्यावरील साहित्य कंपाउण्डरकडे दिले. त्या साहित्यावर एक स्त्रीचे व एक बालकाचे चित्र होते. कंपाउण्डर ते पाहू लागला. रिप्रेझेंटेटिव्ह बाहेर जाऊ लागले. जाताना त्यांनी ' ममी ' वर एक कटाक्ष टाकलाच.

कंपाउण्डरसाहेबांनी आत त्या पोलिस अधिकाऱ्याला धाडले.

डॉक्टरसाहेबांच्या मोटारगाडीसंबंधी काही लायसेन्सचे लफडे होते. त्यामुळे हे पोलिससाहेब आले त्यावेळी डॉक्टरांना फार बरे वाटले.

आम्ही आपले बाहेर बसून होतो. डॉक्टरांनी त्या पोलिससाहेबाला सिगारेट दिली आणि धूम्रवलये बाहेर यायला सुरुवात झाली.

माझा मुलगा आता पोलिस पाहून भेदरला होता. तो म्हणाला, "पपा जाऊ, पपा जाऊ" त्याला आता कशाचंच आकर्षण राहिले नव्हते– त्या ममीचे, त्या अर्धाष्टपुत्रेचे–त्या कॅलेंडरचं–"पपा चला, पपा चला" म्हणून तो म्हणू लागला. एव्हाना दहा वाजायला आले. मला साडेदहा वाजता अशाच एका चांडाळाकडे जायचे होते. त्याची अपॉईंटमेंट चुकली असती तर तो जन्मभर बोंबलत राहाणार माझ्या नावानं. या डॉक्टरच्या सासूचाच तो अवतार. आयुष्यात मी काय केलेय कुणास ठाऊक. पण माझ्या नावानं दुष्टावा धरणारे दररोज वाढत चालले आहेत. असो. मी कंपाउण्डरला सांगितले. परत येतो आणि चाललो.

कंपाउण्डरला काय ? दररोज आजारी लोकांना पाहण्याची सवय. मी लवकर गेलो काय की मेलो त्याचा पगार चालूच. त्याने माझ्याकडे नजरही टाकली नाही. हळूच ममीकडे दृष्टी फेकली. मी दवाखान्याच्या बाहेर आलो. पोराला हायसे वाटले. बाहेर मोटरी, सायकली होत्या. एक रिक्षावालाही होता. रिक्षाला विचारले, ' येतोस का '– त्याने सांगितलं की तो स्वतःच डॉक्टरच्या औषधाकरिता आलाय. तो खेडूत बाहेर येऊन आपल्या बैलगाडीत कांबळे पांघरून पडला होता. औषधाची बाटली तशीच पडली होती गाडीत.

मी घरी आलो. वीज कडाडलीच.

"भेटले का डॉक्टर ?"

"नाही." मग मी सर्व हकिगत सांगितली व डॉक्टर भेटणे शक्य नाही. आणि तो कंपाउण्डर माझी केस सर्वांत प्रथम काढून डॉक्टरकडे काढणे शक्य नाही. कारण माझ्याबाबत त्याला आकर्षण असे काही नाही. डॉक्टरचं व माझं नातं त्याला माहीत नव्हते व नाते कळले तर तो "कामात मी नाते आणणार नाही" असेच सांगणार. आता मात्र आमची वीज पेटलीच. साधे टिटॅनसचे इंजेक्शन. ते देखील ओळखीच्या डॉक्टरकडून लवकर मिळू नये. ती संतापली.

ती स्वत:च आपल्या वहिणीच्या मुलीकडे म्हणजे डॉक्टरीणबाईकडं गेली. डॉक्टर बाहेर गेले होते. अर्थात व्हीजिट व पेशंटस्. डॉक्टरसाहेबांना घरी तसा वेळ फारच कमी मिळे. अलीकडे दोन दिवस त्या गावात कोणती तरी कॉन्फरन्स होती म्हणून डॉक्टरना बाहेरच राहावे लागत असे. हिने आपल्या मुलाच्या इंजेक्शनचे सांगितलं. दुसऱ्या कोणावरही हिचा विश्वास नव्हता. धनुर्वाताचं इंजेक्शन याच डॉक्टरांनी द्यायला पाहिजे म्हणून हट्ट धरला. थोड्या गुजगोष्टी झाल्या. थोड्या उखाळ्या पाखाळ्या झाल्या. डॉक्टरणीने सांगितलं,

"उद्या सात वाजता दवाखान्यात ये."

दुसरे दिवशी मी त्या मुलाला व त्याच्या आईला घेऊन दवाखान्यात गेलो. नेहमीचा कंपाउण्डर आज अचानक आजारी पडला. मला वाटलं, काल त्या मेडिकल रिप्रेझेंटेटिव्हनी दिलेल्या गोळ्या यानेच मटकावल्या असाव्यात आणि म्हणून आजारी पडला असावा. त्याने दुसऱ्या कोणाला तरी तात्पुरते कंपाउण्डर म्हणून पाठविले होते. या कंपाउण्डरला डॉक्टरीणबाई कोण माहीत नव्हते. डॉक्टरीणबाईची व डॉक्टरांची आज डॉक्टर बाहेर गेले असल्यामुळे गाठ नव्हती. म्हणून डॉक्टरीणबाई दवाखान्यात येतील असं वाटलं नव्हतं.

त्या कंपाउण्डरनी सांगितलं,

"बाहेर स्त्री पेशंट आहे. काहीतरी लागलंय आणि टिटॅनसचे इंजेक्शन द्यायला हवे."

टिटॅनसचे इंजेक्शन व लेडी पेशंट म्हणताना टॉप प्रायॉरिटी. त्या कंपाउण्डरला वाटले, की डॉक्टरीणबाईंनाच इंजेक्शन द्यायचे.

डॉक्टरसाहेब आत आराम खुर्चीवर सिगारेट ओढीत वसले.

मी, डॉक्टरीणवाई, मुलाची आई, मुलगा आत गेलो. डॉक्टर थकलेले होते आणि त्यांनी आपली खुर्ची खिडकीकडे वळविली होती. पेशंटकडे पाठ. सिगारेट पूर्ण झाल्यावर पेशंटकडे पाहायचं.

" काय होतंय " डॉक्टरसाहेव पेशंटकडे न पाहाताच.

" आपण वसा हं. आपणांवरोबर कुणी घरचं आहे ? "

" ताप वगैरे आलाय का ? "

" पाहू हात "

हे सगळं डॉक्टर पेशंटकडे पाठ करूनच वोलत होते. सिगारेट ओढत समोरच्या खिडकीतून वाहेर पाहात होते. वाहेर एक छोटीशी सभा चाललेली होती व डॉक्टरसाहेव ते पाहात होते. सिगारेट पुरी करता करता त्यांनी सांगितलं,

" पाहू वरं हात– ताप आलाय का पाहू . . . "

डॉक्टरांच्या पत्नीनेच हात टेवलावर ठेवला. कंकणांचा आवाज झाला. डॉक्टरांनी मागे पाहिले नाही. सिगारेट ओढत दुसऱ्या हाताने टेवलावर ठेवलेला हा हात हातात घेतला. डॉक्टरना फक्त टेंपरेचर किती असेल हे पाहायला म्हणजे अदमास करायला पाहिजे होते. ते कंटाळलेलेही होते. पेशंटकडे न पाहाता तापावरून समजायचे. ताप असेल तर इंजेक्शन द्यायचे की नाही, ठरवायचे. पण त्याकरता खुर्चीवरून उठून तपासण्याकरिता दोन-तीन मिनिटे का घालवा ? सिगारेट पिता पिता पाहू ताप आलाय की काय ते. पेशंटकडे पाहण्याची तशी जरुरी नव्हती व डॉक्टरसाहेवांना आता तसे स्त्रियांचे असे आकर्षणही नव्हते. कुणाचे डोळे लाल दिसले तर त्या मृगनयनेला डॉक्टर सरळ सांगत, " जा डोळे तपासून घे" कोणाच्या मुखकमलावर जरुरीपेक्षा जास्त लाली दिसली की डॉक्टर व्लडप्रेशर तपासायला सांगत. डॉक्टरनी पेशंटकडे पाठ केलीच होती. समोर पाहात पाहात एका हाताने सिगारेट ओढत त्यांनी आपला हात पेशंटच्या हातावर ठेवायला सुरुवात केली. पल्स पाहताना पेशंटला पाहावे लागते. कारण त्यावेळी पर्सचा प्रश्न असतो. हे Pulse व Purse मधील वक्तव्य डॉक्टरांच्या चांगले लक्षात होते. पण टिटॅनसच्या इंजेक्शनला पर्सची किंवा पल्सची जरुरी नव्हती मुळी.

डॉक्टरनी हात ठेवला. 'पेशंट'ने मुकाट्याने हात दिला. स्पर्श करताच थंड वाटला डॉक्टरना. त्या हाताने पटकन् डॉक्टरच्या हाताला विळखा घातला. डॉक्टर एकदम घाबरले. जागृतावस्थेत आले.

" अग तू – तू ? "

" हो मीच. "

" पण तुला काय झालं. कुठे जखम झाली . . . "

" अहो, मला जखम झाली नाही. त्या गाढव कंपाउण्डरला शिकवा. एरव्ही त्याचे बरोबर आहे. "

" बरोबर कसं ? "

" तुम्हाला मी भेटणार म्हणजे आता पेशंट म्हणूनच भेटायला हवे. पेशंट म्हणून आले की किती प्रेमळपणे बोलता तुम्ही. मी इतकी मर मर मरते. आणि आजारी पडले तर काही औषध नको – विश्रांती घे म्हणून सांगणार. "

" जास्त औषधे घेऊ नये म्हणून. "

" पण मग पेशंटना इतक्या प्रेमळपणे . औषधे घ्यायला . . .कसं सांगता. पेशंटच झालेलं बरे . . . "

" इतकी इम्पेशन्ट होऊ नको. . " डॉक्टर.

" अग, बाहेरच्या पेशंटशी प्रेमळपणाने वागलेच पाहिजे. नाहीतर डॉक्टरना प्रॅक्टिस तरी मिळेल काय . ." आमच्या सौ. अगदी आपण समाजशास्त्रज्ञ आहोत व समाजाचा आपला दांडगा अभ्यास आहे अशा अविर्भावात.

" बरे बरे . . .ते काही नाही. मावशीच्या मुलाला इंजेक्शन द्या बरे . . "

डॉक्टरांची नजर आता कुठे मावशीच्या मुलावर व त्या मुलाच्या वडिलांवर गेली. डॉक्टर जरा ओशाळले.

" बसा . . .बसा "

डॉक्टरांची बायको व आमची बायको आता गप्पा मारीत बसल्या. डॉक्टर शेवटी भेटले एकदाचे.

–सांगणे नकोच – डॉक्टरांनी सांगितले की उठसूट इंजेक्शने देण्याची जरुरी नाही. आमच्या मुलाला बरे वाटले . असो –

तर सांगायचे एवढेच की डॉक्टर भेटले एकदाचे शेवटी !

□ □ □

झाले वाचून ?

# आता ऐका थोडे नेहमीचे

ही " हसुभापिते किंवा हं ! सुभाषिते " म्हणा – का लिहिली ? थोडेसे त्याबावत सांगायचे. कोणतेही पुस्तक घ्या – मग तो विडी कारखान्याचा अहवाल असो किंवा विश्वकोश असो. त्या पुस्तकाच्या आरंभाला प्रस्तावना, प्रकाशकाचे ' चार ' शब्द व आभारप्रदर्शन ही मंडळी पहिल्या प्रथम पुढे-पुढे करीत आलीच पाहिजेत. वाचकाला हवा असतो मजकूर. पण ही मंडळी आवश्यकता नसताना जादा पुढे-पुढे करीत असतात. त्या प्रस्तावनेत ती कृत्रिम लीनता यायला हवीच. त्या चार शब्दांत आठ मित्रांचा उल्लेख पाहिजेच. ती एक " कुणी काय उपकार केले " यावावत क्लिष्ट लिष्ट ! हे सगळे क्रियाकर्म नसले तर ते पुस्तकच होत नाही. अगदी हिशेबाच्या वह्या जरी पुस्तकरूपाने " परशिध्द " करायच्या असल्या तरी दरवाजावर ही नाटक-मंडळी हवीच. म्हणून मजकूर संपल्यावरच या मंडळींना बोलावीत आहे.

हे पुस्तक झाले एका राजकन्येमुळे. राजकन्या इंदूराजे पटवर्धन, जमखिंडी. आत्तापर्यंत लायब्ररीतून आणलेल्या पुस्तकांतूनच मी राजकन्यांना पाहिलेले. बरे ही पुस्तके घरात वाचायची सोय नव्हती. शाळेत संस्कृतच्या तासांत – अभ्यासाच्या पुस्तकात पुस्तके ठेवून – वाचायची. संस्कृतचे गुरुजी राजन् हा शब्द कसा चालवायचा हे बोर्डवर लिहीत. राजन्‌ची षष्ठी राज्ञ – राज्ञ. कन्या – राजकन्या असा विग्रह करीत. आणि मी मात्र पुस्तकातल्या राजकन्येबरोबर तिच्या प्रासादात किंवा अरण्यात फिरत असे. कुणा राज-कन्येने काही ठराविक पण केलेला असे – तर दुसऱ्या कुणी वेष बदलून लढाईत शत्रूसैन्याला पाणी दाखवलेले असे. कुणी राजकन्या दु:खी – शत्रूच्या तावडीत सापडलेली, तर कुणा राजकन्येवर – प्रधानाचाच डोळा ! वाचता वाचता त्या राजकन्येला दु:खातून कसे बाहेर काढावे हा विचार येई आणि मग शेवटी तिला जो कोणी छळणारा असेल तो - तो मरे किंवा त्यांचे पूर्ण-पणे वाटोळे होई व राजकन्या आनंदी व सुखी होई. संस्कृतच्या परीक्षेत मी

नापास होई. 'साधे शब्दही याला चालवायला येत नाहीत' म्हणून संस्कृतमध्ये एका मार्कानेच जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती गमावून बसलेले वडील सचिंत व खिन्न होत. कालांतराने पुस्तकी राजकन्या लायब्ररीच्या कपाटात जाऊन बसल्या. कदाचित माझ्या मुलांबरोबर त्या आता पुन्हा त्यांच्या अभ्यासात येतील. लायब्ररीत येणारी कोणतीही कन्या मला राजकन्या वाटावी हेही वय निघून गेले. संसार सुरू झाला. यथाकाल वाढला. केसांनी पांढरे निशाण दाखवायला सुरुवात केली. पांढऱ्या केसाला काळिमा लावावा की काय असा विचार येऊ लागला. आणि अशाच वेळी एक दिवस ही राजकन्या आली आणि आपल्या राज्याला भेट द्या म्हणून मला सांगू लागली.

पुस्तकातील राजकन्येची सारी दुःखे व मनःस्ताप या राजकन्येने पचविले होते. आयुष्यातील अर्धी उमर म्हणजे वेदनांचा वेद झाला होता. प्रियजनांचा वियोग, कपटनीती, शाठ्य, किंवदन्ती, विजनवास, धारातीर्थ, राजपुरुषाच्या वाट्याला येणारे सारे तिने अनुभवले होते. हिच्या प्रपितामहांनी -- सर परशुरामभाऊंनी – पुण्याच्याच नव्हे तर साऱ्या भारतवर्षातील विद्यार्थ्यांच्या व ज्ञानीजनांच्या हृदयातच अक्षय राज्य स्थापले होते. दिल्लीतील गोरे राज्य गेले. पंडितजी आले. शास्त्री आले. इंदिराजी आल्या– राजेशाही नष्ट करण्याचा हुकुमनामा झाला. पण सर परशुरामांच्या – या राजकन्येच्या प्रपितामहांच्या विद्यार्थिहृदयात दृढ झालेल्या सिंहासनाला जरासुद्धा धक्का लागला नाही. हिने राजघराण्याचा वारसा चालविला आणि नवीनच राज्य संस्थापन केले. या राज्याचे -- साम्राज्य – पारमेष्ट्य व्हायला लागले. समुद्रपर्यायी नव्हे तर साता समुद्रांकडील लोक तिचे सार्वभौमत्व मान्य करू लागले. या साम्राज्याची कीर्ती सर्व खंडांत गाजायला लागली. हे राज्य स्थापन करण्याकरिता तिने तलवारीचा वापर केला नव्हता. सैन्यातील लष्करी डावपेच पूर्ण माहीत असून कोणतेही सैन्य उभे न करता हे राज्य तिने वाढवले होते. अत्युत्कृष्ट सौंदर्यवती कन्यांचा ताफा सदैव दिमतीला असताना तिने हेरगिरीचे जाळे विणून हे राज्य स्थापले नव्हते. लोकांना मांडलीक करताना एका हातात कुराण व एका हातात तलवार किंवा 'शापादपि शरादपि' असा रुद्रावतार धारण केला नव्हता. तिचा दरबार मोठा होता. मुक्त होता. भर्तृहरी पुन्हा आला असता तर त्याला मान्य करावे

लागले असते, की त्याने सांगितलेली राजदरबारातील शल्ये या दरबारात मुळीच नव्हती तरी तो सार्वभौम दरबार होता. केवळ प्रेम व सेवा या अस्त्रांनी या अनघेने हे राज्य स्थापन केले होते. साम्राज्य कोणते तर 'आनंदग्राम' – आणि कुठे तर ज्ञानराजांच्या आळंदीजवळ. प्रज्ञा-प्रतिभा व प्रेम यांचे प्रयागतीर्थ ! तिथेच या राजकन्येचे स्वर्गसाम्राज्य.

प्रजाजन कोण तर – हात, पाय, नाक गळलेले कुष्ठरोगी. पुन्हा समाजात येऊन पुनर्वसन होण्यासाठी आलेले. राजबिंडे पुरुष होते. पण त्यांच्या पायाची बोटे गळालेली होती. रूपयौवना स्त्रिया होत्या पण त्यांच्या त्वचेची संवेदना-शक्तीच गेलेली. लहान, निरागस अर्भके होती पण चोखण्यासाठी तोंडात हात घालायचा म्हटला तर अंगठा गळलेला. या राजकन्येने त्यांचे पुनर्वसन सुरू केले. वाळ्याच्या पंख्याने वारा घालून घेणारी ही राजकन्या वाळ्याचे सोडा – साधे गवत जमा करून एकेक झोपडी बांधू लागली. हिची वस्त्रे बदलण्याकरिता दासी असत. पण ही अपंग महारोग्यांना नेसवू लागली. कुष्ठरोग्यांसाठी जे जे म्हणून करावे लागे ते ते तिने स्वत:च्या नाजुक व कोमल हातांनी केले आणि तेसुद्धा संस्थानाचे किंवा स्वत:च्या पूर्वजांचे काहीही न घेता. साऱ्यांचा त्याग करून. 'त्यागात् शान्ति: अनन्तरम्' या न्यायाने तिने ही परमशांतीची दौलत सर्वस्वाचा त्याग करून उभारली होती. पृथ्वीवरील महारोग्यांना ते माहीत झाले. राजकन्येचे तेज साऱ्यांना माहीत होऊ लागले. महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. सादिक अली यांच्या कानी या राजकन्येच्या साम्राज्याची माहिती आली. अधिकारग्रहण घेऊन त्यांना फार दिवस झाले नव्हते. या राज्यपालाला ही झोपडीतील राजकन्या आणि तिचे सैनिक व प्रजाजन पहावेसे वाटू लागले. भेट ठरली. राज्यपाल श्री. सादिक अली व त्यांच्या सर्वमंगला बेगम शांती या येणार होत्या. त्या दोघांना या 'पतंजली योगसूत्रे' प्रत्यक्षात आणणाऱ्या राजकन्येला तिच्याच राज्यात जाऊन अभिवादन करावे असे वाटत होते. ते येणार होते. त्यांच्याबरोबर पुण्याचे पौरजन. अभिजनवती स्त्रिया येणार होत्या. ऑस्ट्रेलिया खंडातील माणसेही येणार होती.

– आणि याचवेळी मी यावे म्हणून या राजकन्येने मला आमंत्रण दिले. तिचे नि:श्वसित म्हणजे आदेश वाटत होता. काहीही ओळख नसता मला

आमंत्रण आले होते. मी राजा नव्हतो. नाटकात राजाचे नव्हे – तर राजा नाव असलेल्या पात्राचेही मी कधी काम केले नव्हते. राजविंडा तर नव्हतोच. काही काहीमुद्धा माझ्याकडे नसताना या राजकन्येने मला बोलाविले होते. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये माझे श्रद्धेय वडील तिला शिकवीत होते. माझ्या वडिलांनी अनेकांना गणित शिकविले होते. मला माझ्या व्यवहारी चढती, उतरती भाजणी आणि चक्रवाढ व्याजाच्या गणितात मी अडकून राहिलो होतो. अगणित चुका व्यवहारी गणित सोडविताना झाल्या होत्या. पण या राजकन्येने लक्षात ठेवून मला बोलाविले. व्यवहारात मनाचे महारोगी पाहात होतो. शरीराचे महारोगी पाहिलेले होते. राज्यपाल येणार व मला मिरवावे लागेल याचेही आकर्षण नव्हते. 'कुणाची तरी ओळख होईल व काहीतरी लभ्यांश घडेल' म्हणून समारंभाला जावे ही मनोवृत्ती नव्हतीच. पण राजकन्येचे आमंत्रण नाकारणे सुसंस्कृत वाटत नव्हते. ठेवणीतला सूट व गळफास बसेल इतका आवळलेला 'नेकटाय' लावून मी त्या राज्यात गेलो होतो. माझ्याबरोबर माझी साध्वी सहचारिणी होती. त्या राज्यात आम्हा दोघांचे चांगलेच स्वागत झाले. राज्यपाल येणार म्हणून भालदार-चोपदार–पोलीस–आरक्षक–अधिकारी–सेवक–मोटारी सारे जमले होते. ही राजकन्या खुर्च्या मांडून ठेवीत होती. तिचे सेवक, मुले तिला मदत करीत होते. या आनंदग्रामात प्रत्येकजण आनंदी होता. या राजकन्येने जणू जादूची कांडी फिरवलेली होती. पंगू गिरी ओलांडण्याची इच्छा करीत होता. असाध्य ते साध्य करण्याची जिद्द प्रत्येकाचीच होती. त्या राज्यातील प्रत्येकजण या राजकन्येला भक्तिभावाने नमस्कार करीत होता अगदी लवून. प्रणिपात करून – 'या देवी सर्वभूतेषु सेवारूपेण संस्थिता । नमस्तस्यै नमस्तस्यै– नमस्तस्यै नमो नमः ।' जी देवी सर्व विश्वामध्ये सेवेच्या रूपाने येऊन राहिली आहे तिला नमस्कार असो – नमस्कार असो – नमस्कार असो. प्रत्येकजण हृदयाने तिला नमस्कार करीत होता. राज्यपालांचे एकनिष्ठ सेवकही त्या राजकन्येला पाहून गहिवरले. तिला खुर्च्या लावायला मदत करू लागले. पण प्रत्येकाला आपल्या जागेवर बसण्यासाठी त्या राजकन्येने आज्ञा केली. प्रत्येकजण तिचे कौतुकाने व आदराने ऐकत होता. मी एका इंदिरेचे

राज्य अनुभवले होते. त्या राज्यशासनाची चौकशी आता सुरू होणार होती. दुसऱ्या इंदूचे हे राज्य पाहत होतो.

राज्यपाल आले. इंदूचे – राजकन्येचे त्यांनी मनोमन कौतुक केले. हात नसलेल्या प्रजाजनांचे नमस्कार स्वीकारताना राज्यपाल गहिवरले. राज्यपालांनी या राजकन्येला देणगी दिली. या राजकन्येचे जवळ जवळ मांडलिकत्व पत्करण्यासारखे झाले. वर्षासन म्हणूनही काही रक्कम द्यायची हे तत्त्व राज्यपाल मान्य करू लागले. राज्यपालांनी देणगी दिली. त्यावरोवर इतर पौरजनांनी भराभर देणग्या जाहीर केल्या. कुणा एका संस्थेने पाच सहस्र रुपये जाहीर केले. एका कॉलेजकन्येने श्रमदान देऊ केले. कुणी काही, कुणी काही. माझा देह – मुटाबुटात गुंडाळलेला – जसाच्या तसा खुर्चीत होता गणपतीची मूर्ती कोरण्याअगोदर शाडूचा पुतळा ठेवतात ना. अगदी गोळा फक्त तसा अगदी. मला काहीच देणगीसाठी जाहीर करता येत नव्हते. मला हातपाय होते पण या हातपाय गळलेल्यांसाठी मी काहीच करू शकत नव्हतो. ते आनंदी होते, मी सुन्न झालो होतो. आतापर्यंत केवळ लोक ऐकत म्हणून "लोकांना सदैव मदत करावी" असे मी फावल्या वेळात सांगत असे. लोकांच्या टाळ्यांच्या गजरात हार घालून घेत असे व हार घालून घेत असता 'लोकांसाठी काहीतरी करावे' असे हळूच बोलत असे व त्यावेळी एक सटकन् फोटो निघत असे. पण आता मात्र मी अवाक् झालो. लोकांची फुटकी-तुटकी शरीरे पाहून माझ्या दुर्बलत्वाची मला जाणीव झाली. मी काही काहीसुद्धा देऊ शकत नव्हतो. राजकन्या आग्रह करू लागली, "थोडा चहा घ्या." नेक-टायचा गळफास बसलेल्या घशातून चहा उतरेना. प्रत्येकाच्या देणग्या जाहीर होत होत्या. मला साधे हास्यसुद्धा देता येत नव्हते. मी सरळ घरी आलो.

कुणीतरी दिलेला गांधीजींचा फोटो बाहेर होताच. "कुष्ठरोग हा मानव जातीचा कलंक आहे. त्याच्या निर्मूलनाबाबत प्रत्येक मानवाने काहीतरी करायलाच हवे." म्हणून गांधीजी सांगत होते. गांधी-साहित्य मी कधीतरी प्रवासात वाचलेले. ते सुद्धा हातातील गांधीच्या चित्राचे पुस्तक सहप्रवाशांन दिसावे या बेताने आज काही काही सुचेना. माझ्या सद्गुरूंना विचारले. हसले. ते मौनातच होते. आणि का कुणास ठाऊक ही दहा भाषिते चित्रपटा प्रमाणे मन:चक्षुसमोर आली पटापट कागदावर उतरली गेली, पूर्वजन्मी

मित्र आले. कुणी छपाई केली, कुणी प्रुफे पाहिली. कुणाची नावे सांगायची ? सारेच सद्गुरूंनी केलेले. मी हा नाममात्र. साहित्यसंमेलन आले. पुस्तक प्रसिद्ध झाले. आणि या पुस्तकाची सारी सारी कमाई आनंदग्रामने घ्यायचे हे ठरले.

या पुस्तकाची किंमत दहा रुपये अधिक स्वेच्छेने काही द्यावेसे वाटेल ते अशी ठेवली आहे. सारे पैसे कुणा कुष्ठरोग्याच्या पुनर्वसनासाठी आनंदग्रामात जातील. झोपायच्या वेळी किंवा कोणत्या तरी सुखासनात बसून हे पुस्तक ज्यावेळी तुम्ही वाचीत असाल त्यावेळी या पुस्तकाचे दहा रुपये वर आणखी काही किंमत दिली असेल तर ती – सगळी कोणातरी कुष्ठरोग्याला आसनस्थ व्हायला मदत करीत असेल. सर्व पैसे आनंदग्रामला – कुणा अर्भकासाठी– कुणा संवेदनाहीन महारोगी षोडषवर्षीय कुमारीसाठी – किंवा गलितगात्र वृद्धासाठी – सारे सारे पैसे त्या राजकन्येच्या साम्राज्यासाठी. खुद्द मी स्वत: ही पुस्तके विकत घेणार आहे. सदिच्छाभेट म्हणून पुस्तक द्यायचे झाले तरी विकतच घेऊन हे मी पुस्तक देणार आहे. हा निराळाच व्यवहार आहे. पूर्णांकाचा व्यवहार आहे. शून्यातून शून्य निघून गेले तरी शून्यच राहते हे प्रमेय सांगणारा व्यवहार.

पण वाचकांना सांगायचे हेच की – "दहा रुपये दिले पण दहा रुपयाच्या मानाने काहीच नाही का या पुस्तकात" असे वाचक म्हणतील तर त्या शिव्याशाप मला मिळाव्यात. त्या आनंदग्रामला अगर राजकन्येला नकोत. पाकिस्तानचे प्रख्यात गझलगायक मेहदी हुसेन यांचे एक नजम यावेळी आठवते. भारत-पाकिस्तानच्या लढाईला दोन्ही देशांचे सैनिक खंदकात बसून कधी कधी एकाच वेळी त्या नजमाच्या पंक्ती म्हणत.

'मुझे तुम् नजरसे गिरा तो रहे हो,
मुझे तुम् कभी भी भुला न सकोगे ।'

हे पुस्तक हेच म्हणेल – तुम्ही मला तुमच्या नजरेने खाली पाहात असाल– तुम्हाला मी कमी प्रतीचा वाटत असेन – पण मला तुम्ही विसरू शकणार नाही – वारंवार आठवण काढाल तुम्ही.

– बस् – आता इथेच पुरे करतो.

– सुभाषचंद्र देसाई